१९२८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र. 2907

# ...वारी महाराज

# ...ग्रंथ.

## भाग २ रा.



REFBK-0003693

प्रकाशक
दामोदर सांवळाराम आणि मंडळी;
ग्रंथसंपादक व ग्रंथप्रकाशक इ. ठाकुरद्वार रोड, मुंबई नं. २.

किंमत १। रुपाया.

कै. प्रभाकर विठ्ठल गुप्ते, रा. ठाणें

यांचे स्मरणार्थ

संग्रहालयास देणगी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक

अनुक्रमांक ८८८८३ दि: ०७/८/७५

2707 नों: दि: 3-3-02

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

दा. क्र. ३६९३

॥ श्रीमत् ॥

# श्रीअनंतनाथ ब्रह्मचारी महाराज

अनुक्रम ........ दि: ........
........ नोंद दि. ........

यांचे

# समग्र ग्रंथ.

REFBK-0003693
REFBK-0003693

## भाग २ रा.

हा ग्रंथ श्रीमदनंतभक्तमंडळीच्या आज्ञेवरून

**जी. कृष्णराव, पे. पोष्टमास्तर पैठण**

यांनीं श्री महाराजांच्या दफ्तरानुक्रमानें तयार केला आहे.

प्रकाशक

**दामोदर सांवळाराम आणि मंडळी,**

ग्रंथसंपादक व ग्रंथप्रकाशक इ. ठाकुरद्वार रोड, मुंबई नं. २.

शके १८४९, सन १९२८ इ.

किंमत १। रुपाया.

हा ग्रंथ रा. रा. दामोदर सांवळाराम यंदे यांनीं आपल्या इंदुप्रकाश छापखान्यांत छापून प्रसिद्ध केला.
ह्या पुस्तकासंबंधाचे सर्व हक्क प्रकाशकांनीं आपणाकडे राखून ठेविले आहेत.

मराठी ग्रंथ

# प्रस्तावना.

आर्या.

भूजल तेज समीर, ख रवि शशि काष्टादिकीं असे भरला ॥
स्थिरचर व्यापुनि अवघा तो परमात्मा दशांगुली उरला ॥ १ ॥

असा सर्वत्र व्यापक हृदयस्थ जगत्चालक जो प्रभु त्यांचे चरणीं सप्रेम अंतःकरणपूर्वक अनंतानंत शिरसाष्टांग प्रणाम करून विनंती कीं,श्रीअनंतनाथ ब्रह्मचारी महाराज पैठण यांच्या समग्र ग्रंथाचा प्रथमखंड (भाग पहिला) शके १८४८ सन १९२६ ई. मध्यें प्रसिद्ध झाला. आज दुसरा भागही प्रकाशक दामोदर सांवळाराम आणि मंडळी इंदुप्रकाश छापखाना मुंबई, यांचे स्वामित्वाखालीं प्रसिद्ध करण्याचा सुयोग आला आहे. हल्लीं जगांत सर्वत्र कादंबऱ्या, नाटकें यांचाच प्रसार विशेष असून सार्वत्रिक त्याची अभिरुचीही असल्यामुळें संतांच्या ग्रंथाकडे मुमुक्षू खेरीज सर्व विमुख झाले आहेत याबद्दल खेद वाटतो; परंतु ईश्वरीसत्ता व त्याची प्रेरणा तशीच असल्यामुळें कांहीं उपाय नाहीं. श्रीयुत दामोदर सांवळाराम शेट यंदे यांनीं वेदांतपर, परमार्थिक व संतसाधू यांचेच ग्रंथ प्रकाशनाचे कामीं आपलें सर्व जीवित वाहून घेतल्याकारणानें परमात्म्यांनीं त्यांचे अंतःकरणांत ही प्रेरणाच उत्पन्न केली व यामुळेंच त्यांचे हस्तें ग्रंथ छापण्याचें काम चालू आहे, ही ईश्वरी कृपाच समजली पाहिजे.

श्री अनंत ब्रह्मचारी महाराजांचा जन्म कारवारांत एका श्रीनाथभक्त ब्राह्मण कुलांत होऊन वयाच्या नवव्या वर्षीं गृहत्यागून गोकर्ण क्षेत्रीं सत्पुरुषाची व त्यांची गांठ पडली. त्यांचे जवळ योगाभ्यासाची पूर्णता झाली. पुढें कोंकणांत समुद्रकांठीं क्षेत्र हरिहरेश्वराचे देवालयांत निरालस्यपणें स्वस्वरूपीं ध्यानस्थीतीचा अभ्यास करीत असतां साक्षात्कार झाला, आणि स्वयंस्फूर्ति होऊन कोयाळ वाणीनें कवित्वलेखनास आरंभ झाला. हाच वरदहस्त. प्रेमी व भावीक

मंडळीस संकटसमयीं दर्शन देऊन त्यांचे संकटनिवारण वगैरे पुष्कळ अनुभविक गोष्टींचा साग्र खुलासा पहिल्या भागांतलि संक्षिप्त चरित्रांत केला आहे. पुढें महाराजांची व कै० बळवंतराव मास्तर यांची गांठ पडली. महाराजांचे वेळोवेळीं लेखन झालेल्या ग्रंथाची प्रत रा० बळवंतराव मास्तर स्वत: करीत. याप्रमाणें सर्व ग्रंथाचा संग्रह कोंकणांत ' नाते ' येथें होऊन श्री अनंतमहाराजांचे आज्ञेवरून तो समग्र ग्रंथ मजकडे पैठणास आला. इतक्या सर्वांस कारण मुख्य बळवंतराव मास्तरच असून यांच्याच सद्भावयुक्त सेवातत्परतेमुळें महाराज प्रसिद्धीस आले.

येथें नलगे साधन चतुष्टय सायास ॥ शास्त्र व्युत्पत्ती चातुर्य विलास ॥
एक धरिला विश्वास ॥ स्वयंप्रकाश ते करिती ॥ १ ॥

बळवंतराव मास्तर यांस ' वसंत संत ' असें महाराज म्हणत. महाराजांनीं लिहिलेले १ नाथस्तुति, २ दधिमंथन भाग १।२, ३ निर्गुण ध्यान, ४ द्वादशश्लोकी सूर्यस्तोत्र, ५ गायत्रिमंत्र आणि ६ श्रीएकनाथ हरिपाठ, यांवर वसंत संत बळवंतराव यांनीं श्लोक, अन्वय, अर्थ आणि भावार्थ रूपानें स्पष्ट विवेचन केलें आहे. यावरून वसंतसंत हे किती कोटीचे व अधिकारी पुरुष होते, हें सहज लक्षांत येईल. वसंतसंत यांनीं अनंतनाथ स्फूर्ति या पुस्तकांत पूर्वार्ध व उत्तरार्ध रूपानें महाराजांचें साग्र चरित्र लेखन केलें आहे. तें पाहिलें असतां वाचकांच्या लक्ष्यांत येईल कीं, ते पूर्ण अधिकारी होते. हे श्रीवसंत संत, बळवंतराव मास्तर हे शके १८३८ आषाढ वद्य ६ गुरुवारीं नाते येथें ब्रम्हस्वरूपीं लीन झाले. त्यांचा वार्षिक पुण्यतिथीउत्सव नातें आणि पैठण येथें होत असतो.

महाराजांचे अति प्रेमी आणि रात्रंदिवस सेवा तत्पर असणारे व निर्याण समयीं ही सन्निध असलेले श्रीयुत भगवानगीर बुवा नेकरगांव, यांनीं लिहून पाठविलेलें सर्व चरित्र संक्षिप्तरीतीनें या भागास जोडलें आहे. तें अवलोकन केलें असतां बुवास वेळोवेळीं आलेल्या अनुभवाचा खुलासा लक्षांत येईल.

या भागांतील चरित्रें द्वयार्थी असून कांहीं ठिकाणीं भावार्थ ही स्पष्ट केला आहे. मानसपूजा, तसेंच नवविध गोपी ( नवविधभक्ती ) चें विवरण उत्तम प्रकारें केलें आहे. शिवाय, अष्टकें, स्तोत्रें, वगैरे विशेष मनन करण्यासारखीं आहेत. यांचें निदान चार पांच वेळां सूक्ष्मरीतीनें मननपूर्वक अवलोकन झाल्या-शिवाय पूर्ण भावार्थ लक्षांत येणार नाहीं. पहिल्या भागांत दप्तर नं. १।२।३ आणि या भागांत दप्तर नं. ४।५ अशीं अनुक्रमानें छापलीं आहेत. दप्तर नं. ६।७।८ प्रकरणें ५८ ग्रंथसंख्या २३६० हे तिसऱ्या भागांत घेण्यांत येतील; दप्तर नं. ९ यांत सर्व प्रकारचीं रामायणें आहेत, तीं चौथ्या भागांत प्रसिद्ध होतील. अभंग संख्या १९००० आणि पदें २५०० हे, भाग ५ पासून पुढील भागांत प्रकाशित केले जातील.

ग्रंथप्रकाशनांचे कामीं द्रव्य साह्यता, व सर्व ग्रंथाचा उतारा करणें, व प्रुफें तपासणें, या कामीं रात्रंदिवस सारखे बसून अविश्रांत श्रम, श्री. जगन्नाथ बळवंत बापट, तसेंच रावसाहेब पतकी वगैरे मंडळींनीं घेतले, याबद्दल त्यांचा मी महतामहत् आभारी आहे. तसेंच आमच्या विनंतीस मान देऊन पुढें निघणारा तिसरा भाग मोठ्या टाईपानीं छापण्याचें श्रीयुत दामोदर सांवळाराम शेठ यंदे यांनीं कबूल केलें आहे, याबद्दल त्यांचे अनंत आभार आहेत. असें झाल्यास पुस्तकाची पृष्ठसंख्या त्या मानानें वाढेल हें खरें, परंतु सर्वत्रांस समाधान व आनंद वाटेल, आणि वृद्धवाचक आशिर्वाद देतील.

सर्वत्रांचा कृपाकांक्षी,

**जी. कृष्ण,**

पेन्शनर मोडमास्तर, पैठण.

# प्रकाशकाचे दोन शब्द.

ब्रम्हचारी श्री अनंत महाराज यांनीं लिहून ठेवलेल्या काव्यग्रंथांपैकीं हा दुसरा भाग जिज्ञासु वाचकांच्या सेवेंत सादर करण्याचा योग आज घडून आला याबद्दल त्या जगच्चालक सर्वशक्तिमान प्रभूचे अनंत आभार आहेत. मनुष्यजन्म क्षणभंगूर आहे. ह्या क्षणभंगूर संसारांत मानवी प्राण्यानें सदिच्छा धरून सत्कार्य करीत रहावें, हें एकच कर्तव्य त्याच्या स्वाधीनचें आहे. इष्टकार्य सिद्धीस नेणें हें केवळ परमेश्वरी इच्छेवर अवलंबून आहे. पैठणचे पेनशनर पोष्टमास्तर श्रीयुत जी. कृष्णराव हे एक प्रेमळ व भाविक गृहस्थ आहेत. त्यांनीं श्री अनंतमहाराजांचा प्रचंड ग्रंथसमूह मला दाखविला आणि ह्या ग्रंथाचें प्रकाशनाचें कार्य शिरावर घ्यावें अशी इच्छा प्रकट केली. श्रीमहराजांची प्रसाद-वाणी अत्यंत गोड वाटली आणि अशा प्रासादिक ग्रंथाचा लाभ मुमुक्षूंस करून देण्याचे कामीं आपला हातभार लागावा असें मनानें ठरविलें. हृदयस्थ प्रभूची प्रेरणा होतांच कामास सुरुवात करून शके १८४८ चे चैत्र मासांत पहिला भाग वाचकांच्या सेवेंत सादर केला, आणि दुसरा भाग लगेच सहा महिन्यांनीं प्रसिद्ध करण्याची उमेद धरिली; परंतु प्रभूची इच्छा तशी नव्हती. त्याच्याच कृपेनें प्रापंचिक अडचणी एकामागून एक उत्पन्न झाल्या आणि एकावर्षांत कुटुंबांतील साह्यकर्तीं अशीं तीन माणसें इहलोक सोडून गेलीं ! अर्थात् तुफान समुद्रांत सांप-डलेल्या नौकेप्रमाणें स्वीकृत कार्यरूपी नौका हेलकावे खावूं लागली ! कांहीं काळ मनाची स्थिति अस्वस्थ झाली आणि ह्या अशाश्वत जगाचा तिरस्कार उत्पन्न झाला. अशा पारिस्थितीमुळें हा दुसरा भाग ठरलेल्या वेळीं बाहेर पडूं शकला नाहीं, याबद्दल जिज्ञासु वाचक दोष देणार नाहींत असा भरंवसा आहे.

ह्या भागांत श्रीमन्महाराजांचीं दोन दप्तरें घेतलीं आहेत. हीं दोन्हीं दप्तरेंही महाराजांच्या मूळ दप्तरास धरूनच छापिलीं आहेत. स्वतःचें असें कांहीं घातलें नाहीं किंवा कोणत्याहि प्रकारें फेरफार केलेला नाहीं. दुसरी गोष्ट अशी कीं, या पुढील भाग हल्लींपेक्षां जाड टाईपांत काढावे अशी इच्छा कित्येक प्रेमळ वाचकांनीं प्रकट केली आहे. ठळक टाईप घेतल्यास पृष्ठसंख्या बरीच वाढणार आहे, परंतु इच्छाभोजन देऊन आतिथीस तृप्त करणें, हें जसें गृहस्थाश्रमाचें एक कर्तव्य मानलें आहे, त्याप्रमाणें वाचकांची इच्छा पूर्ण करणें, हें ग्रंथप्रकाशकाचें एक कर्तव्य होय. त्या कर्तव्यास अनुसरून पुढील भागापासून वाचकांच्या इच्छेनुरूप ठळक टाईप वापरण्याचें ठरविलें आहे. सर्वशक्तिमान प्रभू हें कार्य सेवटास नेईल आणि प्रेमळ वाचक तें गोड करून घेतील अशी उमेद आहे.

ग्रंथप्रकाशक

# विषयानुक्रमणिका.

## दफतर चौथें.


| विषय | पान. |
|---|---|
| १ महाराजांचें संक्षिप्त चरित्र | ९–२६ |
| २ श्रीमदनंताष्टक ... | २७–२८ |
| ३ दुष्यंतशकुंतलाख्यान ... | १ |
| ४ शुकरंभाचरित्र ... ... | ३० |
| ५ सुदामचरित्र ... ... | ४२ |
| ६ सुदामचरित्र ( भाग २ ) | ५२ |
| ७ दामाजीपंताचें चरित्र ... | ७५ |
| ८ ध्रुवचरित्र ... ... | ८४ |
| ९ सुभद्राहरण | १०४ |
| १० कालियामर्दन ( पूर्वभाग ) | १२५ |
| ११ कालियामर्दन ( उत्तरभाग ) | १२९ |
| १२ कालियामर्दन नं. ३ अपूर्ण | १३४ |
| १३ ऋषिपत्न्याख्यान ... | १३७ |


## दफतर पांचवें.


| विषय | पान. |
|---|---|
| १ करुणाबत्तीसी ... ... | १६२ |
| २ मानसपूजा ... ... | १६६ |
| ३ नवविधगोपी ... ... | १७६ |
| १ अर्चन ... ... | १७९ |
| २ दास्य ... ... | १८० |
| ३ स्मरण ... ... | १८२ |
| ४ पादसेवन ... ... | १८३ |
| ५ वंदन ... .. | १८५ |
| ६ श्रवण ... ... | १८८ |
| ७ कीर्तन ... ... | १८९ |
| ८ सख्य ... ... | १९० |
| ९ आत्मनिवेदन ... | १९२ |
| ४ वाल्मिकचरित्र ... ... | १९५ |
| ५ श्रीशुकजन्मचरित्र (पूर्वभाग) | २०१ |
| ६ श्रीशुकजन्मचरित्र (उत्तरभाग) | २०५ |
| ७ स्वात्मसुबोध ... ... | २१० |
| ८ योगेंद्रवर्तन ... ... | २१७ |
| ९ सद्गुरुलक्षण ... ... | २१९ |
| १० विनयार्जव ... ... | २१९ |
| ११ अनंतपाथिका ... ... | २२२ |
| १२ सारीपाट ... ... | २२४ |
| १३ गोपीगीत ... ... | २२६ |
| १४ प्रभातबोध ... ... | २२९ |
| १५ चिरंजीव पद ( पत्र ) ओवी | २३० |
| १६ श्रीगुरुदत्तात्रेयाष्टक | २३८ |
| १७ श्रीसद्गुरुशंकराष्टक ... | २४० |
| १८ श्रीसूर्यनारायण स्तोत्र . | २४० |
| १९ श्रीरामचंद्रध्यान ... | २४१ |
| २० भीमरूपीस्तोत्र ... ... | २४३ |
| २१ निर्गुणध्यान ... ... | २४५ |
| २२ श्रीसद्गुरुशंकराष्टक ... | २४९ |
| २३ शंकरध्यान ... ... | २५० |

| विषय. | पान. |
| --- | --- |
| २४ विश्वनाथ स्तव... | ... २५२ |
| २५ श्रीगुरुयेकनाथाष्टकें(१४) | २५४-२६५ |
| २६ शंकराष्टक ...( सवाई ) | २६६ |
| २७ शंकरस्तोत्र ... | ... २६७ |
| २८ सद्गुरुस्तोत्र ... | ... २६७ |
| २९ शंकरस्तुति ... | ... २६८ |
| ३० गंगाष्टक ... | ... २७१ |
| ३१ पार्वतीस्तोत्र ( श्लोक ६ ) | २७२ |
| ३२ लक्ष्मीस्तोत्र ( श्लोक ४ ) | २७३ |
| ३३ जगदंबिकास्तोत्र (श्लोक १३) | २७४ |
| ३४ तुळजापुरनिवासीनीस्तोत्र | २७५ |
| ३५ महालक्ष्मीस्तोत्र ( श्लोक ९ ) | २७७ |


दफतर पांचवें समास.

प्रकर्णे ३६ ओंव्या ११३ सवाई १० श्लोक ८६७ एकूण १९९० काव्य

ग्रं. क्र. ३६९३

# ब्रह्मचारी श्रीअनंतमहाराज यांचें संक्षिप्त चरित्र.

( लेखकः – श्री महंत ज्ञानगीरबुवा नेऊरगांव )

## १ अभंग

वसतां सेजारी संत हजाराच्या ॥ भाव तो सर्वांच्या मत्ताधारें ॥ १ ॥
जैसें ज्याचें मत्त तैसें तया दिसे ॥ लाघव विलसे ऐसें संतीं ॥ २ ॥
न भावे पराहे कोणा कोणे काळीं ॥ काळवेळा टाळी सुकाळींत ॥३॥
ऐसा जगमित्र अनंत विचित्र ॥ ययाचें चरित्र कोण जाणे ॥ ४ ॥

## २ अभंग

संतचरित्राहे पवित्र परम ॥ परी तें उत्तम स्वमुखींचें ॥ १ ॥
जयांतरीं आत्मभाव भरीणाहे ॥ संताननीचें हें गंगारूपी ॥ २ ॥
दुजें संतलीला शिद्धीप्रद काव्य ॥ न वैभवें भव्य मानवी तें ॥ ३ ॥
जनानें रचीलें संसार क्रमांत ॥ तयांत न मात समत्वाची ॥ ४ ॥
अनंत यारितीं संतलीलामृत ॥ जनीं अवगत द्वैपायनी ॥ ५ ॥

## ३ अभंग

शिद्धीबुद्धीवादें रचोनी सांगणें ॥ मत्त माजवणें जनाठायीं ॥ १ ॥
नाम या चरित्र संतांचें राखीलें ॥ सत्य आव्हरीलें हतभाग्यें ॥ २ ॥
लौकीक वाढाया नीचपणीं थारा ॥ केला हा मातरा भक्तीचाहे ॥ ३ ॥
जळो ही विद्धत्ता अनंत न पाही ॥ संगे कोणालाही वास देऊं ॥ ४ ॥

## श्रीजीचे संबधांत प्रत्यक्ष पाहिलेल्या कांहीं अनुभवीक गोष्टी.

१. माझें दहा बारा वर्षांचे सहवासांत [ सतत नाहीं केव्हां एक महिना, केव्हां दोन महिने, केव्हां चार महिने ] दिवसा अथवा रात्रीं केव्हांही महाराजांस झोपतांना पाहिलें नाहीं.

२. एके दिवशीं महाराज ऊस खाताना त्यांचा एक दांत पडून हातांत आला, तो त्यांनीं मजला दाखविला. तो पडलेल्या जागीं पूर्ववत दाबून बसविला तो अखेरपर्यंत कायम होता.

३. शके १८१७ सालीं श्रीमहाराज औरंगाबादीं श्री नागेश्वर महादेवाचे मंदिरांत चित्रें काढीत होते. मीही त्यांचेजवळ त्यांचे हाताखालीं ते सांगतील तो रंग घोटून देणें, कलमा धुणें, सांगतील त्या ठिकाणीं रंग देणें, वगैरे करीत असे. तेथील पुजारी जानकीराम हा आजारी पडला. औरंगाबादेहून दोन मैलावर सीख लोकांचें " हरसुल " हें पवित्र ठिकाण आहे. तेथें देवालय व तीर्थकुंड आहे. तेथील पुजाऱ्याचें नांवही जानकीराम असे, तो प्रेमी व भावीक असून वेळोवेळां औरंगाबादेस महाराजांकडे येऊन विनंती करी कीं, महाराज आपण कांहीं दिवस हरसुलास चला, आणि तेथील मंदिरांवरही कांहीं चित्रें काढा. नागेश्वराचे मंदिरांत चित्रें काढण्याचें काम चालूच होतें. श्रीनागेश्वरांतील जानकीराम पुजारी फार आजारी असलेला तीन दिवसांनीं मरणार, त्याचे अगोदर एके दिवसी प्रातःकाळीं महाराज म्हणाले, बुवा, बळवंतराव मास्तर येथें रहातील आपण दोघेही हरसुलास जाऊं. त्याप्रमाणें मास्तरास तुम्ही येथेंच रहा, असें सांगून महाराज निघाले. रंगाचें काय काय सामान बरोबर घेऊं असें मी त्यांस विचारिलें असतां कांहीं घ्यावयाचें नाहीं म्हणून सांगितलें. सर्व सामान आवरून ठेवा. त्याप्रमाणें मीं तें सर्व सामान पेटींत बंद करून ठेविलें आणि महाराजांबरोबर लागलीच निघालों. रस्त्यानें जातांना बरेच लांब गेल्यावर महाराज म्हणाले, बुवा फक्त कंपास व पेन्सील आणिली असती तर ठीक होतें. मी म्हणालों परत जाऊन ते घेऊन येतों. तेव्हां ते म्हणाले आतां कांहीं परत जाऊं नका पाहून घेऊं. पुढें दहा पांच पाऊलें गेल्यावर सडकेच्या कडेन निंबाचे झाडाखालीं एक कंपास आणि पेन्सील पडलेली त्यांनीं मजला दाखविली, आणि म्हणाले, बुवा, ती पहा,

पेन्सील व कंपास पडली आहे ती घ्या, अपालें काम झालें. मी ती उचलून घेतली आणि म्हणालों, महाराज या जिनसा येथें कशा आल्या ? ते म्हणाले कोणाचे तरी पडलें असेल त्यांत काय आहे !

४. शके १८१८ यासालीं गोदावरीचे कांठीं श्रीशंकेश्वर महादेवाचें स्थान नेऊरगांव येथें आहे. तेथेंच आमचा पुरातन मठ आहे. त्या ठिकाणीं महाराज राहिले. मंदिरांत चित्रें काढण्याचें काम चालू होतें. मी रात्रंदिवस त्यांचेपाशींच असे. दिवसा सकाळीं दोन तास चित्रें काढण्याचें काम होई. नंतर स्वयंपाक व लिहिणें होई. जेवण झाल्यावर पुन्हा लिहीणें आणि सुमारें तीन वाजल्यापासून संध्याकाळपर्यंत चित्राचें काम चाले. मी दुपारीं गावांत घरीं जाऊन जेवून परत येत असे. रात्रीं महाराज स्वयंपाक करीत, आणि आम्ही दोघेही जेवीत असूं. रात्रीं महाराज आणि मी दोघांशिवाय तिसऱ्याचा संबंध नसे. थोडे दिवसपर्यंत म्हणजे सुमारें महिना दीड महिना श्री बळवंतराव मास्तर होते. पुढें त्यांना महाराजांनीं जाण्यास सांगितल्यावरून ते गेले दिवसभर जितके अभंग लिहीणें होई त्या सर्वांचें विवरण रात्रीं महाराज करीत असत. ते वक्ते आणि मी श्रोता, असे आम्ही दोघेच असावयाचे. नंतर महाराज मला म्हणत, बुवा आतां निजा. मग मी उठून दिवसभर जें काय लिहिणें झालें असेल तें वाचून नंतर निजत असे. त्यांत विशेष हें असे कीं, रोजचे लिहिलेले अभंगाचें रात्रीं विवरण करतांना त्या लिहिण्यापैकीं कांहीं अभंग सांगण्याचे शिलक राहिले असतील आणि पुन्हा दुसरे दिवशीं जें लिहिणें होई त्यांचें विवरण करते वेळीं, कालचे शिलक राहिलेले अभंगापासून सांगण्यास सुरुवात करीत, असा नित्य क्रम असे. याचा पडताळा मी पुष्कळवेळां पाहिला. लिहितांना भराभर सारखे अस्खलित पाण्याच्या प्रवाहाप्रमाणें लिहीणें होत असे. रात्रीं जेव्हां महाराज बोलत असत तेव्हां वृत्ति इतकी तल्लीन होत असे कीं, तें शब्दानें व्यक्त करतां येत नाहीं. केव्हां केव्हां असें वाटे कीं, रात्र मोठी झाली असती तर बरें झालें असतें.

माझा मुलगा आठ नऊ वर्षांचा नारायण हा शाळेंत जाण्याचा कंटाळा करीत असे. त्यास शाळेंत नेण्यासाठीं शाळेंतील मुलें येत, तेव्हां तो देवळावर किंवा झाडावर अशा अवघड ठिकाणीं चढून बसत असे कीं, त्या जागीं कोण्या मुलांना किंवा थोर मनुष्यांना जातां येऊं नये. माझे भयानें मी जों पर्यंत महाराजांजवळ असे, त्यावेळीं तो कोठेंतरी एखादे झाडावर

चढून बसे, आणि मी कांहीं कामामुळें गांवांत गेलों म्हणजे माझे पश्चात् तो महाराजांजवळ जाई. महाराजही त्याला जवळ बोलावून बसवीत, आणि त्याच्याशीं मोठ्या प्रेमपूर्वक कौतुकानें गोष्टी करीत. मी येत असतांना मला दुरून पाहूनच तेथून तो पळून जात असे; त्याच्या सर्व गोष्टी महाराज मला हंसून सांगत असत. एके दिवशीं महाराज देवळावर चित्रें काढीत असतांना हा मुलगा जवळ होता. महाराज वानराचें चित्र काढीत होते. मुलानें विचारिलें " बाबा हें काय आहे ? " महाराज म्हणाले, " हें वानराचें चित्र आहे. " मुलगा म्हणाला, वानर कसा असतो ? महाराज म्हणाले " अरे, वानर तुझ्या सारखाच असतो. तूं जसा उड्या मारीत फिरतोस, झाडावर चढतोस, तसाच वानरही उड्या मारतो व झाडावर चढतो. वानराला शेंपूट असतें तें तुला नाहीं, फरक एवढाच आहे. " मुलगा म्हणाला, बाबा वानर कोठें राहतो तो मला दाखवाल काय ? महाराज म्हणाले, " बरें. तूं उद्यां याचवेळीं येथें ये म्हणजे तो तुला दाखवीन. " दुसरे दिवशीं सकाळीं सुमारें नऊ वाजण्याचे वेळीं एक वानर येऊन देवळावर बसला. इतक्यांत मुलगाही तेथें आला. महाराज म्हणाले " बघ, नारायणा वानर दाखविण्याचें तुला काल कबूल केलें होतें, तो पहा आज वानर येथें आला आहे. त्याला इकडे बोलावूं का ? " मुलगा म्हणाला, नको नको, बाबा तो मला धरील. ' भिऊं नको, मी तुला धरूं देणार नाहीं. ' असें महाराज म्हणाले. महाराजांनीं वानरास या म्हणतांच तें अगदीं जवळ येऊन बसलें. इतक्यांत मीही गावांतून तेथें गेलों. मला पाहून मुलगा पळून जाऊं लागला. महाराज म्हणाले, नारायणा, बापाला भिऊं नको. मी त्याला तुला मारूं देणार नाहीं. पोटभर वानर पहा. नंतर महाराज मला म्हणाले, बुवा, आज घरीं जेवायला जाऊं नका. नारायणासुद्धां येथेंच जेवा. मी म्हणालों, महाराज आपल्या एकट्यापुरताच आपण स्वयंपाक केला आहे ? हरकत नाहीं, थोडें थोडें सर्वजण जेवूं, असें महाराज म्हणाले, आणि चार पात्रें वाढिलीं; व मुलाला म्हणाले, बघ नारायण आतां आपल्या बरोबर वानरालाही जेऊं घालूं. तुझ्या सारखा तोही हातानें जेवील. मग महाराजांनीं दोन पात्रें आह्मां दोघां बापलेकांना दिलीं, आणि एक पात्र जवळच मांडलें, आणि वानराला म्हणाले, चला या आतां. असें म्हणतांच वानरही देवळाजवळून त्या पात्रावर येऊन बसलें. तेवढ्या अन्नांत वानरासह आमचें चौघांचेंही जेवण पूर्ण पोटभर व समाधानकारक झालें. नंतर

तें वानर तीन दिवस तेथेंच राहिलें. दिवसा झाडावर बसावें व बागडावें, आणि रात्रीं देवळावर येऊन बसावें. चवथे दिवशीं वानर तेथून गेलें.

६. ऊरगांव येथील रा. नारायणराव (ऊर्फ नानासाहेब) अभ्यंकर यांचे वडील श्री. बाळाजीपंत दादा होते. नारायणरावचा व माझा अति स्नेह असल्यामुळें मी औरंगाबादेस नागेश्वराचे देवळांत उभयतां बापलेकांस महाराजांचें दर्शन करविलें होतें. महाराज नेऊरगावीं असतांना नारायणरावचे वडील नित्य अस्तमानी देवदर्शनाला येत असत. तेव्हां ते क्षणभर महाराजांजवळ बसत. त्यांचे मनाचा अंतःकरणपूर्वक प्रेमभाव असा झाला कीं, हें लोकोत्तर, निरिच्छ, दर्शनीय साधू आहेत. यांचे पूर्ण कृपादृष्टीनें व आशिर्वादेंकरून आपलें कल्याण होईल. या पूज्य व सप्रेम भावनेनें तेही महाराजांशीं सदैव वागत असत. त्या दिवसापासून त्यांचे उन्नतीस आरंभ झाला. त्याप्रमाणें संतती व संपत्ती दोन्ही बाजूंनीं आज त्यांचा काल श्रीजीचे कृपेनें आनंदांत जात असून सार्वत्रिक लौकीक वाढला आहे.

७. विजापूर येथून कोणी एका देशमुखानें महाराजाकरितां चर्मी जोडा मुद्दाम उत्तम बांधवून टपालांतून पाठविला, तो तीन अंगुलें कमी आला. महाराज म्हणाले, “ इतके लांबून त्यानें हेतूपूर्वक पाठविला, कांहीं दिवस पायांत घालूं, ” असें म्हणून पायांत घातला. नेऊरगांवापासून तीन कोसांवर वाहेगांव आहे. तेथील पाटील माझा स्नेही असल्यानें तो महाराजांकडे नेहमीं येत असे. त्यांनीं दोनतीन वेळां प्रेमपूर्वक आदरानें वाहेगांवीं येण्याविषयीं विनंती केली. त्यास रुकार मिळाला. एके दिवशीं सहज आम्ही तांगा घेऊन सकाळीं महाराजांसह वाहेगांवीं गेलों. महाराजांच्या आज्ञेप्रमाणें माझा मुलगा नारायण ह्यास बरोबर घेतलें. पाटलाच्या मळयांत स्वयंपाकाचें सर्व सामान आल्यावर महाराजांनीं स्वयंपाक केला. पाटलासह सर्वांचें जेवण झाल्यावर एक दिवस मुक्काम करण्याबद्दल अतिशय आग्रह पडला. घरीं जाण्याविषयीं मुलगा सारखा रडूं लागला. पाटलानीं त्याची पुष्कळ प्रकारें समजूत केली तरी तो ऐकेना. महाराज म्हणाले, “ काय करावें मुलगा ऐकत नाहीं, तेव्हां जाणें भाग आहे. ” आम्हीं परत नेऊरगांवीं आलों. रस्त्यानें महाराज म्हणाले “ बुवा असें शस्त्र बरोबर घ्यावें लागतें. मुलगा बरोबर नसता तर ही मंडळी आज आपल्याला ठेवून घेतीच व मुक्काम

करावा लागला असता. ” टांग्यांतून येतांना महाराजांचा एक जोडा रस्त्यांत केव्हां पडला माहीत नाहीं. नेऊरगांवीं उतरतांना टांग्यांत एकच जोडा होता. महाराज म्हणाले जाऊं द्या. तो पायासही बरोबर येत नव्हता. नेऊरगांवचा एक गरीब कुणबी सखाराम थिटे, हा रोजंदारीनें रोज मजुरी करून पोट भरी. महाराजांचे ठिकाणीं त्याचा भक्तीपूर्वक भाव असे. तो मनुष्य त्या दिवशीं मजुरीनें रानांत गेला होता. परत येतांना त्यास महाराजांचा जोडा रस्त्यांत सांपडला. त्यानें तो ओळखून धोत्रांत गुंडाळून डोकीवर घेऊन आला. घरीं न जातां तसाच देवळाकडेवळून महाराजांचें दर्शन घेतलें आणि म्हणाला, महाराज, हा आपला जोडा मला रस्त्यांत सांपडला. माझें भाग्य फार थोर आहे. महाराज म्हणाले, त्या जोड्याचे मनांत कांहीं दिवस पायांत रहावें असें दिसतें. त्या मनुष्यानें एक कर्डीची खोती चार खंडीस घेतली होती. त्यांत वीस खंडी कर्डी झाल्या. त्यामुळें तर महाराजांचे ठिकाणीं त्याची पूर्ण भक्ति बसली. त्याची उन्नती इतकी झाली कीं त्यानें स्वतःचें घरही बांधिलें. जवळ आठ बैल झाले. संतती मुळींच नव्हती, त्यास एक मुलगाही झाला. त्यास रौप्य–दर्शन स्वप्नांत होत नव्हतें, तो आतां सोन्याचांदीचे दागीने घालूं लागला. तो स्वतः मजुरी करून पोट भरीत असे, पण हल्लीं त्याचे येथें दुसरे लोक मजुरीनें येऊं लागले. याप्रमाणें महाराजांचे कृपेंकरून त्याची स्थिति हल्लीं सुखसमाधानकारक आहे.

८. महाराजांचे दररोज दुपारचें जेवण भात आणि डाळ हें असे. भोजनानंतर निमा भात शिलक ठेवलेला तो ते पक्ष्यांना खाऊं घालीत. त्यावेळीं राघू, सांळुक्या, चिमण्या, कावळे वगैरे पक्षी दररोज महाराजांचे जवळ येऊन त्यांचे हातांतून खात. कांहीं पक्षी निर्भयपणें अंगावरही बसत. हें पाहून एके दिवशीं मी म्हणालों, महाराज, हे पक्षी आमचे जवळ न येतां आम्हांस कां भितात? महाराज म्हणाले, “ बुवा, यांत आश्चर्य मानण्यासारखें काय आहे? ज्याची भावना अद्वैत आणि सम व सत्य होईल त्याचेजवळ निःशंकपणें ते सहज येतील. फार काय व्याघ्रादीक पशू शुद्धां स्नेहानें वागतील आणि हें नरजन्मांतच होणें शक्य आहे. महाराज पुढें म्हणाले, बुवा, एकदां मी महाबळेश्वराहून भाड्याची बैलगाडी करून सकाळीं चार वाजतां निघालों. गाडी वाघाची भीति दाखवूं लागला. सुमारें दोन अडीच मैल आलों, तों पुढें रस्त्यावर एक भला मोठा घटाईत वाघ बसलेला होता. बैल पुढें चालेनात,

आणि गाडी हांकणाराही थरथरां कांपू लागला. इतक्यांत एक दुसरा वाघही पहिल्या वाघाजवळ येऊन बसला. तें पाहून त्याचे अंगास दरदरून घाम आला आणि मूर्च्छा येऊन तो खालीं पडणार इतक्यांत मी त्यास सांवरून धरिलें, आणि मागें गाडींत लोटलें. तो असावध झाला. बैलांचा कासरा मी स्वतः हातांत घेऊन गाडी नीट वाघांवर हांकली. तें पाहून दोन्ही वाघ, गाडी दहा कदमांवर होतीं तोंच वाटेंतून उठून पूर्व दिशेकडे एका मागें एक निघून गेल. पुढें गाडी एक मैल गेल्यावर गाडीवाल्यास सावध करून सांगितलें; भिऊं नको, वाघ निघून गेले. तेव्हां तो चकित होऊन म्हणाला, 'बुवा, आज मोठें अरिष्ट टळलें. तुम्हीं, मी आणि बैल, वाघांच्या सपाट्यांतून जिवंत सुटलों नसतों. माझीं बायकामुलें निराश्रित झालीं असतीं. आज आपल्यासाठीं देव धांवून आला.' मी त्याला सांगितलें, बाबारे, देव तुझ्याजवळच होता आणि आहे. आतां निर्धास्त होऊन गाडी हांक. तो आवेशानें गाडी हांकू लागला. ही हकीकत ऐकिल्यावर मी ह्मणालों, महाराज, हें तर पक्ष्यांपेक्षांही अतीशय आश्चर्यकारक आहे. क्रूर श्वापदें आपलें भक्ष्य पाहून तें सोडून गेलीं! मला तर हें गूढ उकलत नाहीं. त्यावर महाराज म्हणाले, बुवा तुकारामाचें एक वाक्य आहे.

## अभंग

चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती ॥ व्याघ्रही न खाती सर्प तया ॥
आवडेल जीवा जीवाचियेपरी ॥ सकळां अंतरीं एक भाव ॥ १ ॥

याच संबंधांत त्यांनीं स्वतः एक अभंग लिहीला आहे तो असाः—

संतोष पोसला रोष पारोसला ॥ अच्युत तोषला तयायोगें ॥ १ ॥
योगक्षेम चाले काळकृपाळत्वें ॥ सम होतीं तत्वें सर्व अंगीं ॥ २ ॥
व्याघ्र धेनु एका ठायीं बसताती ॥ वैर विसरती सत्व रज ॥ ३ ॥
तमाचें संधान निद्रेंत नांदेना ॥ जागृतीं वसेना भवभ्रम ॥ ४ ॥
ऐसा पराक्रम संताऽनंत देसी ॥ संगीत विलासी अभंगा हे ॥ ५ ॥

पुढें कांहीं दिवसांनीं महाराज पैठणास निघून गेले.

९. शके १८१९ महाराजांस गंगापुराहून पौषमासीं नेऊर गांवीं मी घेऊन आलों. तेथें निंबाचे झाडाखालीं त्यांचे करितां मुद्दाम छपर तयार केलें, आणि तेथें जवळच एक नवीन विहीरही तयार केली होती. त्या छपरांत महाराज

राहिले. चित्राचें काम बंद असून लिहिण्याचें काम चालू होतें. चित्राचे कामाची पूणता झाली. कलम श्रीनाथ महाराज पैठण यांचे चरणीं ठेवून आलों आणि याबद्दल पठणचे पोष्टमास्तर ( जी. कृष्ण ) यांस समक्ष सर्व सांगितलें आहे, मी आतां शष्टीला येणार नाहीं, असें महाराज म्हणाले. महाराजांचे हे उद्गार ऐकले, त्या दिवसापासून मी दोनप्रहरीं फक्त घरीं जेवण्यास जाऊन रात्रंदिवस त्यांचे जवळ हजर रहात असे. रात्रौ महाराज स्वयंपाक करीत तेव्हां मी तेथेंच जेवीत असे. त्यावेळीं गणपतराव जेऊरकर यांनीं नवीन बांधलेल्या विहिरीवर बागाइताचें काम करण्यास आरंभ केला होता. जमिनीस खत वगैरे कांहींच दिलें नव्हतें, परंतु त्यांत मिरच्या, वांगीं, डिंगऱ्या, मुळें वगैरे भाज्या इतक्या पिकल्या कीं, दररोज काढतां काढतां कंटाळा आला. शेवटीं सर्व लोकांस सांगितलें कीं, ज्याला जें लागेल तें त्यांनीं तोडून घेऊन जावें. असें केलें होतें तरी दररोज निघणारा भाजीपाला कांहीं केल्या संपेना. आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्या जमिनींत आतां खत देऊनही तितका माल पिकत नाहीं !

१०. एके दिवशीं फाल्गुन मासांत माझा मुलगा, नारायण हा महाराजांस म्हणाला, बाबा, हुर्डा खावयाचा आहे. महाराज म्हणाले, “ बरें, उद्यां तुला खाऊं घालूं. ” मी गांवांतून आल्यावर महाराज मला म्हणाले, बुवा नारायण म्हणाला, हुर्डा खावयाचा आहे. मी तें ऐकून हंसलों आणि म्हणालों, पोर वेडें आहे. जंगलांतील सर्व माल सवंगून गाडे वाहणीनें तो खळ्यांत आला. जंगलांत कोठें एक ताट देखील उभें दिसत नाहीं आणि भोंवतालीं दहा दहा कोसांत बागाईतांत सुद्धां माल नाहीं. अशा वेळीं हुर्डा मिळणें ही असंभव-नीय गोष्ट असल्यामुळें मी हंसलों. महाराज म्हणाले, बुवा पोर वेडें नाहीं तुम्हींच वेडे आहां. मुलाचे मनांत केव्हां केव्हां स्फूर्ति झाली म्हणजे त्याचे बोलण्यासारखें घडून येत असतें. यांत अशक्य असें कांहींच नाहीं. दुसरे दिवशीं महाराजांजवळ गणपतराव जेरूरकरांस बसवून मी गांवांत गेलों. दिवसाचे तीन वाजण्याचे सुमारास एक (परका मनुष्य) कुणबी येऊन महा-राजांस दुरूनच नमन करून बसला. त्यानें गणपतराव यांस चिलीम मागितली असतां येथें चिलीम वगैरे कांहीं नाहीं असें त्यांनीं उत्तर दिलें. महाराज म्हणाले, गणपती, ही तंबाखू घे आणि त्याला चिलीम पाज. मग गणपतरावांनीं चिलमींत तंबाखू घालून त्या मनुष्यास ते चिलीम देऊं लागले, तो म्हणाला,

अगोदर महाराजांस द्या. महाराजांनीं चिलीम ओढून नंतर त्या मनुष्यास दिली, त्यानें ती ओढून परत दिली. त्याचे पाठीस गाठोडें होतें तें सोडून, हुर्ड्यांचीं पंचवीस तीस हिरवीं कोवळीं लुसलुसीत व ताजीं कणसें पुढें ठेवून तो म्हणाला, महाराज, हा हुर्डा तुह्मांला घ्या. असें म्हणून तो लागलीच नाहींसा झाला. मी गांवांतून त्याच वेळीं आलों. महाराज म्हणाले बुवा, तुह्मीं काल हंसून पोरास वेडे म्हणालां, पहा आज हुर्डा आला कीं नाहीं? कणसें कशीं आलीं ती सर्व हकीकत मजला गणपतराव जेरूरकरांनीं सांगितली. ती ऐकतांच त्याचा शोध करण्यास मी निघालों. चोहींकडे शोध केला, सर्व देऊळें व गंगेवर जाऊन पाहिलें, परंतु कोठेंही त्या मनुष्याचा पत्ता लागला नाहीं. महाराज म्हणाले, बुवा तुम्हीं शोधून तरी काय करणार? तो कोणी ही असो. कणसें कोठून तरी आणिलीं असतील त्याची चौकशी कां करितां? गोवऱ्या आणा व कणसें भाजा. गणपतरावानीं लागलीच गोवऱ्या आणून कणसें भाजिलीं. कणसें चोळून हुर्डा महाराजांस दिला. नारायण यानेंही हुर्डा आनंदानें खाल्ला. अम्हीं चौघांनीं तो रुचकर हुर्डा प्रेमानें खाल्ला, परंतु माझ्याच्यानें राहवेना. मी ह्मणालों, महाराज, काल मुलानें हुर्डा खावयाचा म्हटलें आणि आज लागलीच हुर्डा मिळणें अशक्य असून तो मिळतो, हें काय गौडबंगाल आहे! मला वाटतें जी सिद्धि ह्मणतात ती हीच कीं काय? त्यावर महाराजांनीं पुढील अभंग म्हणून उत्तर दिलें.

## ॥ अभंग १ ॥

भोळ्या भाविकांसी भावे ऐसा हरी ॥ घरीं काम करी येऊनी जो ॥१॥
हरीच तो आला रूप माणसाचें ॥ घेवोनियां साचें काम करूं ॥ २ ॥
जातां गुप्त झाला ऐसा चमत्कार ॥ कल्पना विकार भावाधारें ॥ ३ ॥
जया भावें सिद्धी भाव तो परोक्ष ॥ भवभ्रमा मोक्ष नाहीं तेथें ॥ ४ ॥
अनंत सिद्धीचा न होय वंचक ॥ नामचि गायक श्रीरंगाचें ॥ ५ ॥

## ॥ अभंग २ ॥

नाना चमत्कार सिद्धीचे दाविती ॥ शिद्धायी मिरविती जनांमाजी ॥१॥
सिद्धी चमत्कार चोहाटीं गाजतो ॥ ऐकोनी नाचतो साधू मनीं ॥ २ ॥
सर्वतप गांठीं सुकृताची लुटी ॥ जनाची चावटी मठीं नांदे ॥ ३ ॥
न हे संत स्वानुभवी या संसारीं ॥ अहंभावाच्यारी वेष कर्ते ॥ ४ ॥

संत वचनानें संत जे जाहाले ॥ सिद्धीचे अंकिले न होती ते ॥ ५ ॥
इंद्राची संपत्ती पातल्या पदानें ॥ लोटिती मदानें स्वानंदाच्या ॥ ६ ॥
रिद्धीसिद्धी दासी ओळघंती द्वारीं ॥ वांतीचिया सरी मानिती जे ॥७ ॥
होती सिद्धी दासी अनंत पायींच्या ॥ पाहे कोण तिच्याकडे वाया । ८ ॥

या प्रमाणें उत्तर देऊन महाराज म्हणाले, बुवा, मार्गक्रमण करतांना जसा धुरोळा उडतो, त्याप्रमाणें परमार्थ मार्गातील सिद्धि हा धुरोळा आहे. मनुष्य अगदीं निरपेक्ष आणि समभावी झाला, कीं ह्या सिद्धि पायांत लुडबुडत असतात.

११. फाल्गुन शुद्ध द्वीतियेपासून महाराजांस ताप येऊं लागला. केव्हां ताप इतका भयंकर येई कीं, अंगास हात लाविला असतां तप्त लोहाप्रमाणें हातास चटके लागावे, आणि लागलीच दोन घटकेनें पाहावें तो सर्व अंग थंडगार लागे. कोणीं पांढरपेशे अगर इतर कोणी महाराजांचे दर्शनाचे आपेक्षेनें किंवा त्यांच्याशीं बोलण्याच्या हेतूनें येणार असें त्यांना अंतरांत समजलें कीं, त्यांनीं म्हणावें, बुवा ताप आला; आणि खरोखर हात लावून पहावें तों भयंकर ताप भरला आहे. थोडया वेळानीं कांहीं माणसें यावीं, त्यांना आम्हीं सांगावें कीं, आतां महाराजांस ताप आला आहे, यावेळीं दर्शन किंवा कांहीं भाषण होणार नाहीं. मी त्यांना महाराजांकडे आंत जाऊं देत नसे. तीं मनुष्यें थोडावेळ वाट पाहून बसून गेलीं, कीं महाराजांनीं म्हणावें, बुवा, आतां ताप गेला. हात लावून पहावें तों खरोखरच अंग थंडगार ! असें नेहमीं होत असे. एके दिवशीं भयंकर ताप असतांना महाराज बाहेर येऊन बसले. मी म्हणालों, महाराज, ताप अंगांत अतीशय आहे, आणि आपण बाहेर उघडे बसलांत ? महाराज म्हणाले, बुवा, एक घागरभर थंड पाणी माझे डोकीवर घाला. मी ह्मणालों महाराज, हें भलतेंच कसें सांगतां ? महाराज म्हणाले, अहो त्यानें ताप जाईल. तुह्मी भिऊं नका. बेलाशक पाणी घाला. आज्ञेप्रमाणें मी एक घागरभर पाणी त्यांच्या अंगावर घातलें. पुन्हां आणखी एक घागर पाणी घालण्याची आज्ञा झाली. त्याप्रमाणें दुसरीही घागर घातली. नंतर अंग पुसून घरांत आले, आणि पहातो तों ताप उतरला. सारांश ताप येणें आणि जाणें हें त्यांचे इच्छेवर अवलंबून होतें. ते दिवशीं महाराज ह्मणाले, बुवा आतां येथून पुढें काळ विलक्षण आला आहे. अशाही वेळीं मधून मधून लिहीणें चालूच होतें. नित्यक्रमांत फेरफार कांहीं नाहीं. श्रीनाथषष्ठीला जाण्यासाठीं मी आठ दिव-

सांची रजा देऊन ठेवली होती. फाल्गुन वद्य चतुर्थीचे दिवशीं मी म्हणालों, महाराज, षष्ठीला चलावयाचें आहेना ? गाडी वगैरेची तयारी करूं का ? त्यावर महाराज म्हणाले, बुवा, मी जेव्हां पैठणाहून निघालों तेव्हां चित्राची कलम नाथाचे चरणीं ठेवून पैठणपोष्टमास्तर यांसही सांगून आलों आहे. आतां तुह्मीं शेवटचे स्नेही आहां म्हणून तुमचेजवळ आलों. त्या दिवशीं नाथ षष्ठी-संबंधानें दोनतीन अभंग लिहीले त्यापैकीं एक अभंग खालीं दिला आहे.

## अभंग

**आली नाथषष्ठी समीप गडीया ॥ स्वानंदें जाऊं या प्रतिष्ठाना ॥ १ ॥**
**गंगेंत न्हाऊंया चरण पाहूंया ॥ नाथाचें गाऊंया प्रेम गीत ॥ २ ॥**
**समाज विलोकूं भावीक जनांचा ॥ निर्धार मनाचा दृढ करूं ॥ ३ ॥**
**अनंत सदांचा एकनाथीं वसे ॥ जाणें येणें नसे ययावरीं ॥ ४ ॥**

महाराज यंदां श्रीनाथषष्ठीला पैठणास जात नाहींत हें मंडळीस माहीत झालें होतें, यामुळें बापूराव बाबळे व लक्ष्मण सोनार व कांहीं नेवाशाची मंडळी फाल्गुन वद्य षष्ठीचे दिवशीं नेऊरगांवीं आली. ही मंडळी दोनतीन दिवस महादेवाचे देवळांत उतरली होती. महाराज नित्य हातानें स्वयं-पाक करून जेवीत. फाल्गुन वद्य अष्टमीचे दिवशीं मंडळीनीं लाडूचा स्वयं-पाक करून सर्वत्र मिळून एके ठिकाणीं जेवण्याचें ठरविलें. महाराजांचे झोळींत खरबुजाच्या बिया सोलून ठेविलेल्या पुष्कळ होत्या, त्या लाडूचे पाकांत टाकण्यास मजजवळ दिल्या. मंडळीचे विनंतीवरून महाराजांनींही जेवणाचें आमंत्रण कबूल केलें. महाराजांसह सर्व मंडळीचें भोजन यथासांग व आनंदांत झालें. मंडळी म्हणाली, महाराज, यंदां पैठणास जाण्याचें झालें नाहीं ? महाराज म्हणाले, यंदा नाथमहाराज येथेंच आले मग तेथें कशाला जायाचें ? भोजनोत्तर महाराज शंकराचे देवळांत बसले. मंडळीनीं भजनास सुरुवात केली. इतक्यांत मी घरीं जाऊन थोडया भाजलेल्या लाह्यांचा काला तयार केला. तो काला आणि साखरेच्या गाठीचीं कांहीं पदकें एका ताटांत ठेवून तें महाराजांपुढें आणून ठेविलें. महाराज म्हणाले, बुवा, हें इतक्यांतून कोणांस न सुचतां तुह्मांला कसें सुचलें ? आज अष्टमी आहे. नाथषष्ठींत आज काला होत असतो आणि नाथ महाराज यंदा येथेंहीं आले आहेत असें आपण म्हणा-

ळांत त्यावरून मीही काल्याची तयारी केली. महाराज म्हणाले, शाबास, सगुण भक्ती म्हणतात ती हीच. कोरडया ज्ञानाला काय करावयाचें आहे ? ज्ञानोत्तर भक्ती होणेंच कठीण आहे. नंतर महाराजांनीं स्वहस्तें सर्वांस काल्याचा प्रसाद वांटून गाठीचें एकएक पदक दिलें. नवमीचे दिवशीं सकाळींच सर्व मंडळी निघून गेली. फाल्गुन वद्य दशमीचे दिवशीं महाराज मला म्हणाले, बुवा ज्ञानेश्वर सांगत असत आणि सच्चिदानंद बाबा लिहीत असे, तसेंच रामदासस्वामी सांगत आणि कल्याण लिहीत असे असें म्हणतात. आपल्याला तर बुवा तसें होत नाहीं. मी म्हणालों, महाराज आपण सांगावें आणि मी लिहावें अशी माझीही इच्छा नसून फक्त सदासर्वकाळ आपणांपुढें आपणाला पहात आनंदानें प्रेम भरित अवलोकनच करीत असावें असा सद्हेतू आहे. महाराज म्हणाले, ठीक आहे; बुवा, मग आतां लिहीण्याचें काम पुरें करितों. असें म्हणून त्यांनीं लेखणी मजजवळ दिली. येथून लिहीणें बंद झालें. त्यांची नेहमीची बैठक विरासन आणि मुखानें अखंड अभंग रूपानें स्मरण हीं अखेर पर्यंत चालू होतीं. ते अभंग मात्र लिहीले गेले नाहींत. यावेळीं श्री. धोंडोपंत साठे हेही आले होते. मी म्हणालों, महाराज, षष्ठी वगैरे होऊन गेली आतां पैठणास जाऊं चला. महाराज म्हणाले, बरें बुवा तुमचे मनांत आहे तर चला जाऊं या. फाल्गुन वद्य एकादशीचे दिवशीं टांगा तयार केला, व महाराज, मी आणि धोंडोपंत असे नेऊर गांवाहून निघून गंगापुरास श्री. सिद्धेश्वरअण्णा यांचे बागेंत येऊन उतरलों. तेथें तीनचार दिवस मुक्काम झाला. फाल्गुन वद्य त्रयोदशीचे दिवशीं महाराज मला जवळ बोलावून म्हणाले, बुवा आपण पैठणास गेलों तर तेथें लोक पालखी अगर म्याना आणतील, चोहोंकडे तारा, पत्रें, जाऊन मोठी धांदल उडेल, धांवपळ होईल, वाजंत्रीं येतील, दिंडीसह गांवभर मिरवणूक होईल व भलीथोरली यात्रा निघेल, तर हें कांहीं-एक नको आहे. आणि येथें गंगापुरासही राहणें नको. मांजरीस गांवाचे बाहेर देवीचें देऊळ आहे तेथें राहूं चला, अशी आज्ञा झाली. त्याप्रमाणें फाल्गुन वद्य चतुर्दशीचे दिवशीं प्रातःकाळीं गंगापुराहून निघून मांजरीस जाऊन देवीचे देवळांत राहिलों. धोंडोपंत बरोबरच होते सुश्रुशेस व सर्व व्यवस्था ठेवण्यास मी सतत जवळ होतों. बापूराव बावळे एक दोघांस बरोबर घेऊन गंगापुराहून येत, आणि रात्रीं परत जात, असा त्यांचा कार्यक्रम असे. महाराजांसाठीं त्यांनीं नेऊरगांवीं एक मच्छरदाणी, चिलटांचा त्रास होऊं

नये म्हणून तयार केली होती. ती देवळांत लावून त्यांत महाराजांचें आंथरूण घातलें होतें. त्यांत महाराज बसत आणि मुखानें अभंग म्हणत.

चैत्र शुद्ध चतुर्दशीचे दिवशीं महाराजांनीं प्रातःकाळीं गळ्यांतील जानवें काढून आणि लंगोटी सोडून ते दिगंबर स्वरूप झाले. ते तसेच निर्याण-काळपर्यंत होते. महाराज सकाळीं मला म्हणाले, अरे आप्पा, ( मांजरीस गेल्यापासून बुवा न म्हणतां आप्पा अशी हाक मारीत, आणि अरे, ये जा असें संबोधित ) दे, कांहीं दे. मी म्हणालों, महाराज, मजजवळ होतें तें मी सर्व देऊन टाकिलें, आतां देण्यास मजपाशीं कांहीं उरलें नाहीं. महाराज म्हणाले, होय; तन, मन, धन दिलें ? मी म्हणालों, महाराज, आतां आपणच कृपाकरून कांहीं अवशिष्ट द्या. यावर उत्तर मिळालें, आप्पा, हा सर्व देहच तुला अर्पण केला आहे. मी म्हणालों, महाराज, तथास्तु. आज्ञाप्रमाण. ते दिवशीं दुपारीं मी महाराजांस म्हणालों, येथें उष्मा फार होतो, शिवाय पर-ठिकाण, आपलें गांव नाहीं, यामुळें बरीच अडचण पडते. करितां नेऊरगांवीं चलावें असें मला वाटतें. महाराज म्हणाले, बरें चला. तुमची मर्जी. मग मी लागलीच गांवांत गेलों आणि एक भाडयाची गाडी ठरविली; आणि दिवसा अति भयंकर उन्ह असते, याकरितां अस्तमानीं गाडी आम्ही बोलावूं तेव्हां देवीचे देवळाजवळ घेऊन ये, म्हणजे थंडवेळेला निघूं, असें गाडीवाल्यास सांगितलें आणि केलेली व्यवस्था देवळांत येऊन महाराजांस निवेदन केली. ते म्हणाले ठीक आहे. अस्तमानाचे वेळीं तेथील टेकडीवर भावीक व प्रेमी मंडळी जवळ होती, त्यांस थोडें दूध आणा असें म्हणतांच लागलीच एकानें दूध आणून दिलें. तें पिऊन त्या मंडळीस महाराज म्हणाले, आतां आमचें निर्याण आहे. त्या दिवशीं बापूराव वाबळे आणि विश्वनाथराव नाझर हे गंगापुराहून मुक्कामास आले होते. संध्याकाळीं निघण्याचा बेत होता, परंतु प्रथम रात्रीं आठ साडे आठ वाजण्याचे सुमारास मुखानें अस्खलित वाणीनें अभंग म्हणत पूर्ण विश्रांती सुखास ( निजधामास ) प्रयाण केलें. त्यावेळीं त्यांची मुखचर्या शांत, समाधान व पूर्ण आनंदमय दिसत होती. ठरविलेली गाडी लागलीच आणविली. त्या गाडींत श्रीजीस बसवून पाठीमागें मी बसलों. धोंडोपंत, बापूराव वाबळे व गणपतराव जेऊरकर जवळ बसले; आणि रातोरात नेऊर गांवीं आलों. इतक्यांत प्रातःकाळ झाला. माझे घरची सर्व मंडळी आणि

दुसरे प्रेमी व भाविक यांची गर्दी झाली. दर्शनास जो कोणी येई तो म्हणे, महाराज तर चांगले बसले असून आमचे कडे पाहतात! सारांश चैतन्य रूपानें देह आहे असाच सर्वांस भास झाला. नंतर गोदावरीचे वाळवंटांत श्रीजीच्या देहास अग्निनारायणानें आपल्या रूपीं मिळविलें. त्यावेळीं मी स्वतः मनाला पुष्कळ आवरून धरिलें; परंतु कांहीं केल्या राहावेना. शेवटीं माझा कंठ दाटून आला; व अतीशय रडूं कोसळलें. अशी माझी विलक्षण स्थिती झाली. जवळचे लोक पुष्कळ शांतवन करीत, परंतु समाधान वाटेना. हें पाहून मंडळी आश्चर्यचकित झाली; व म्हणाली, हा बुवा आईबापासाठीं कधीं रडला नाहीं; मोठमोठे साधू नेऊरगावांत येऊन गेले पण त्यांना यानें फुकट विचारलेंहि नाहीं, देवधर्माला सुद्धां कधीं विचारीत नाहीं. असा हा पूर्ण नास्तिक मनुष्य असून महाराजांच्या सेवेंत सदां तत्पर राहत असे, आणि आज त्यांच्यासाठीं केवढा अटाहास्यानें आक्रोश करीत आहे! हें मोठें नवल आहे! त्या बिचाऱ्यांना यांतील मर्म समजणें शक्य नाहीं. असो. दुसरे दिवशीं चितेची रक्षा व कांहीं अस्थी ठेवून सर्व गंगेंत समर्पण केलें. तरा दिवसपर्यंत धोंडोपंत व मी तेथेंच भजन करीत राहिलों. बापूराव वाबळे गंगापुरास जाऊन पुन्हा आले. तेरावे दिवशीं श्रीसंकेश्वर महादेव आणि गणपती या दोन्ही देवळांचे मध्यें (ठेविलेल्या अस्थी एका तांब्याच्या गडव्यांत घालून वर एक वाटी झांकून चुना वगैरे तयार करवून त्या अस्थी ठेवून वर) समाधी बांधली. त्या दिवशीं बालगोपाळ मंडळीस भोजन घातलें. शके १८२१ पासून या ठिकाणीं (नेऊरगांव, तालुका गंगापूर, पोष्ट सुरेगांव, जिल्हा अहमदनगर) श्रीजीचे पुण्यतिथीचा उत्साह चैत्र शुद्ध ६।७।८ असा तीन दिवस मोठ्या आनंदानें होतो. भजन, पूजन, कीर्तन व अन्नदान होऊन अष्टमीचे दिवशीं दहीहांडी, काला होऊन दिंडीसह पालखींतून महाराजांच्या फोटोची मिरवणूक होत असते. भोंवतालचे व परगांवचे लोकही बरेच येत असतात. प्रतिवर्षी याप्रमाणें उत्साह वाढत्या प्रमाणांत चालू आहे. आतां पुढें येणारा शके १८५० चा चैत्र शुद्ध षष्ठीचा तीसावा उत्साह आहे.

## कांहीं अनुभविक इतर गोष्टी.

१. महाराजांस कफामुळें खोकला उत्पन्न झाला. त्यांस थुंकण्यासाठीं एका गाडग्यांत माती घालून ठेवली होती, त्यांत ते थुंकत. तेव्हां जो बेडका थुंकून गाडग्यांत टाकीत, त्या बेडक्याचा अंधारांत इतका प्रकाश पडे कीं, त्याचे उजेडानें गाडग्यांतील बारीकसारीक काडीकचरासुद्धां स्पष्ट दिसे.

२. महाराजांची स्वयंपाक करण्याची पद्धती अशी असे कीं, तांदूळ असो अथवा डाळ असो, त्यांत प्रमाणांत पाणी घालून चुलीवर ठेवायचें; कोणतीही भाजी असो चुलीवर ठेवतांना त्यांत तिखट, मीठ व तूप वगैरे घालून प्रमाणांत पाणीसुद्धां घालूनच चुलीवर शिजत ठेवावयाचें आणि चुलींत इंधनसुद्धां प्रमाणांत लावावयाचें; पुन्हां त्याजकडे पाहावयाचें नाहीं. तें नियमित वेळेंत शिजून तयार झालें म्हणजे खालीं उतरून ठेवावयाचें; तें कधीं जळावयाचें नाहीं किंवा कच्चेंही रहावयाचें नाहीं. त्या अन्नाची गोडी ज्या भाग्यवानांस तें मिळालें असेल त्यांसच ठाऊक, इतरांस काय ?

३. एकदां नगराहून तीनचार विद्वान पदवीधर इंग्रजी भाषा जाणणारे महाराजांच्या दर्शनास आले. ते आपसांत अमुक प्रश्न करावा, अमुक शंका विचारावी, असें इंग्रेजींत बोलत होते. त्यांच्या पृच्छेच्या अगोदरच महाराजांनीं दुसऱ्या मनुष्याशीं असा संवाद केला कीं, ते पृच्छक जें काय विचारणार किंवा बोलणार, त्याचेंच उत्तर साग्र त्यांत होतें. त्यामुळें त्या मंडळीस असें वाटलें कीं, यांना इंग्रजीसुद्धां चांगलें येत असावें ! महाराजांचा संवाद ऐकून ते चकित झाले. याच प्रमाणें एकदां कानडी भाषेचें आणि मद्रास कडील तामील भाषेच वेदपाठी ब्राह्मण आले होते. त्यांचीही स्थिती याचप्रमाणें झाली. कांहींएक प्रश्न न करितां समाधानवृत्तीनें दर्शन घेऊन ते निघून गेले.

४. एकदां एक गृहस्थ समाधी योग करणारा महाराजांस कोठें तरी भाषणांत अडंका घेऊन अडवावें या कुहेतूनें महाराजांकडे आला, आणि कांहीं प्रश्न महाराजांस विचारणार, इतक्यांत त्याच्याशीं कांहीं एक न बोलतां महाराज माझ्याशींच बोलूं लागले; त्यांत योगाचा आणि समाधीचा विषय असून योगाची फटफजिती अर्थयुक्त वर्णन केली शिवाय योगी काय विचारणार होते त्याचें सर्व उत्तर त्यांत येऊन शंकानिवृत्ती पूर्ण केली. हें ऐकून योगी कांहीं एक न विचारतां मुकाट्यानें उठून चालता झाला.

५. एक साधू ब्रह्मचारी म्हणविणारा नेऊर गांवीं येऊन दीडमहिना राहिला होता. त्याची देवपूजा मोठी असून लोकांस तो कांहीं चमत्कार करून दाखवी. वेडयासारखें भाषण करून वाटेल तसें बडबडे; त्याचें माहात्म इतकें वाढलें कीं, त्याचे नादीं लागून गांवांतील बरेच लोक त्याचे शिष्य झाले. त्याच्या भजनीं लागलेले सर्व त्याला भीत असत. मी मात्र कधींच त्याजकडे गेलों नाहीं. त्याला समजलें कीं येथें ग्यानगीर बुवांचे विहिरीवर छपरांत एक साधू महाराज राहतात. ते कसे काय आहेत हें पाहण्याच्या हेतूनें मुद्दाम महाराजांकडे ओरडतच तो आला; आणि येथें कोठील कोण साधू आहे, असें बडबडूं लागला. हें ऐकून महाराज बाहेर आले आणि त्याजकडे पाहून म्हणाले, काय आहे ? महाराजांकडे पहातांच गर्भगाळित होऊन थरथर कांपूं लागला; तो इतका घाबरला कीं, त्यास कांहीं सुचेनासें होऊन मोटेच्या बैला-प्रमाणें पाठीमागें चालूं लागला ! त्यास जवळचे एका मनुष्यानें धरिलें आणि सांगितलें कीं, तुमचे पाठीमागें विहीर आहे त्यांत पडाल. तेव्हां तो लागलीच शुद्धीवर येऊन कांहीं चकारशब्द न बोलतां मुकाट्यानें चालता झाला.

६. आरसा पुढें ठेवून जो कोणी त्यांत पाहील त्यास त्याचें प्रतिबिंब तसेंच दिसेल. हास्यमुख, रडवें तोंड, विद्रुपमुद्रा, जशी मुद्रा करून पाहील त्या प्रमाणें पाहणारास प्रतिबिंब दिसेल. शांत व आनंदयुक्त पाहील त्यास तसेंच दृष्टीस पडेल. हा सर्व धर्म आरशाचा नसून पाहणाराचा आहे. त्याप्रमाणें महाराज गुणातीत शुद्ध अंतःकरण व स्वयंप्रकाश असल्यामुळें, त्यांचेसमोर जो कोणी मनुष्य येई त्याचे अंतरांतील गुणधर्म महाराजांना स्पष्ट दिसावयाचे. दुसऱ्याचे मनांतील हृद्गत जाणण्याची अपूर्व कला महाराजांचे ठायीं असे.

७. निधनानंतर शवास दहन करणें अथवा मृत्तिकेआड ( पुरणें ) ठेवणें, या दोहोंपैकीं चांगलें कोणतें, असा प्रश्न महाराजांस कोणी विचारिला. त्यास त्यांनीं पुढील प्रमाणें उत्तर दिलें.

॥ दोहा ॥–तुलसी व्हा मरना भला । ज्याहां न अपना कोय ॥
कोल्हे कुत्ते खाजाय । सहज भंडारा होय ॥

८. सन १९०१ इसवी मध्यें ठकीडकी खात्याच्या लोकांनीं माझ-वर बनावट मुकदमा रचून जालन्यास दीड पावणे दोन महिने मला अटकेंत

ठेविलें हे तें. या कारस्थानांत दोन तीन अंमलदारही माझे विरुद्ध होते. सर्व लोकांची खात्री होती कीं, आतां बुवा सुटून परत येणें अशक्य आहे. एके दिवशीं संध्याकाळीं मी अटकेंत असतांना त्या ठिकाणीं महाराज समक्ष येऊन मला म्हणाले, बुवा येथें काय करितां? मी म्हणालो, बसलों आहें. चला नेऊर गांवीं जाऊं, असें म्हणून महाराजांनीं माझे हातांत एक गांजाची पुडी दिली, आणि महाराज अदृष्य झाले. मला फार आश्चर्य वाटलें. महाराजांचें तर निर्याण झालें असून ते येथें आले कसे! जर स्वप्न म्हणावें तर प्रत्यक्ष दिलेली गांजाची पुडी माझे हातांत आहे. फाल्गुन मास असल्यामुळें माझें चिंतन सारखें चालू होतें कीं यंदा महाराजांचे षष्ठीचे उत्साहास आपण अंतरलों. आजपर्यंत आपली षष्टी चुकली नाहीं, पण यंदा चुकत आहे. मर्जी श्रीची! परंतु महाराजांचें दर्शन झाल्यापासून आठवे दिवशीच मीं अगदीं निर्दोष ठरून बंधमुक्त झालों, आणि षष्ठीचे उत्साहाचे दिवशीं नेऊर गांवी हजर झालों. हें अघटीत कृत्य पाहून धन्यता वाटली; आणि श्री अनंत महाराजांचे सारखें चिंतन सद्गदित अंतःकरणानें मनांत होऊं लागलें.

## अभंग.

जयासी दगड वाटती आपुले ॥ देव तया भले संत नाहीं ॥ १ ॥
नास्तीक वाटती वाटगे उन्मत्त ॥ निंदीती समस्त देव धर्म ॥ २ ॥
कर्माचें वाटोळें धर्म निसंतान ॥ मत्त किरस्तान आदरिलें ॥ ३ ॥
भलें न हें ग्रामीं हरामी राहता ॥ कोण पुसे संता उन्मत्ता या ॥ ४ ॥
जीवंत वसतां संता पाहवेना ॥ निमाल्या पूजना आदरीति ॥ ५ ॥
दगड मांडूनी भोंवते भोंवतीं ॥ पर्कमा करीति आयाबाया ॥ ६ ॥
ज्ञानोबा तुकाराम एकनाथ मावली । ध्यानीं या समावली काव्ली भूते ७
शिर्डीलागीं गाती अभंग वदती ॥ समाधिस्त होती तयाहूनी ॥ ८ ॥
जीवंत वसतां विरोधचीं होतां ॥ संताचा असंतां अभावची ॥ ९ ॥
वारीकरी पक्ष शुक्ल एकादशी ॥ जाती पंढरीसी बहूजन ॥ १० ॥
साधनीं लाविले संतानीया भले ॥ कांहींतरी बळे सत्व अंगीं ॥ ११ ॥
संत वचनानें मात भली केली ॥ वारी नेमीयली पंढरीची ॥ १२ ॥

( २ )

संत संगें संत सर्व जरी होती ॥ यादव न होती हरी कां ते ॥ १ ॥
हरीचे संगाती होते वदताती ॥ कुळक्षया जाती कां ते सर्व ॥ २ ॥

उद्धवासारिखे हरी त्यां न करी ॥ जैशातैसा हरी खरा आहे ॥ ३ ॥
जातीचाच व्हावा संत तो संताने ॥ सत्य संत होणें न अंतर ॥ ४ ॥
वचनीं अनंता प्रमाण वागवी ॥ जनां न वागवी संगमांत ॥ ५ ॥

( ३ )

प्यारें वाटे जया तया संत संग ॥ करणें अभंग स्वानुभवा ॥ १ ॥
संतची तो आहे परी असंताच्या ॥ संगानें भ्रमाच्या ठायीं पडे ॥२॥
अनुमान वागे आपूलेपणाचा ॥ नासणें संतांचा बोध होतां ॥ ३ ॥
अनंता जातीचा तयाला न वेळ ॥ होईल निर्भेळ तात्काळ तो ॥ ४ ॥

( ४ )

बाह्य दर्शनानें होई जें दर्शन ॥ संताचें वर्तन न दर्शनीं ॥ १ ॥
देह पाहिल्यानें संताचा मानती ॥ दर्शन तें मतीमंद जन ॥ २ ॥
चर्म दर्शनानें आत्मभाव नाहीं ॥ अदर्शन पाहीं देह दर्शी ॥ ३ ॥
संत वचनाचा भावार्थ अंतरीं ॥ अनंता त्यावरी दर्शनार्थ ॥ ४ ॥

( ५ )

संतांशीं नमन शुद्धमनें होतें ॥ देहानें न होतें पाय धर्ता ॥ १ ॥
धुर्ता हा पुर्ता हे भावार्थ समर्थ ॥ नमन अनर्थकारी पाय ॥ २ ॥
निरोपच्यारी अनंत पणानें ॥ आपणां पाहणे वंदन या ॥ ३ ॥
न माने कायीक वाचीक स्तवन ॥ अनंत जीवन भूवनाचें ॥ ४ ॥

( ६ )

पाय वंदनानें संतोषी जे होती ॥ अंतरीं महंती बाळगी ते ॥ १ ॥
गुरुत्व मानसीं पोसीते तोषती ॥ दुज्याची नम्रोक्ती विलोकूनि ॥ २ ॥
स्तवनें डोलती विखार नागसे ॥ निंदनीं होतसे मानहानी ॥ ३ ॥
हा तो नीच भाव समान न मानी ॥ मत्त अभिमानी अनंतारे ॥ ४ ॥

( ७ )

खाण्यापिण्याचा हे सुकाळ ज्या संती ॥ शिष्यही जमती बहू तेथें ॥१॥
आयतें मिळतां जेवण पोळ्याचें ॥ भंजन गांजाचें आधीं व्हावें ॥ २ ॥
मग भोजनाची लय लागे रुची ॥ वरी लोळण्याची एकाग्रता ॥ ३ ॥
मिळावी अंधार कोठडी निजाया ॥ परमार्थ वा या नाम आहे ॥ ४ ॥
हरी करूं बरें अनंत सावध ॥ तूं तो हरी वद निराश्रयें ॥ ५ ॥

( ८ )

अनेक खोगीर भरतीचे भर्ती ॥ गडी गडावर्ती सज्जनाच्या ॥ १ ॥
मिष्टान्न भोजनीं निष्णात निद्राळू ॥ दरिद्र विशाळू भाळरेखा ॥ २ ॥
जागले वसती तधी भांग घोटी ॥ पाहती कसोटी माल्यावरी ॥ ३ ॥
अनंत या रिती संत समागमीं ॥ जनाच्या उगमीं मायंदाळ ॥ ४ ॥

( ९ )

अत्यंत शहाणा पाहिजे देखणा ॥ संताची रचना अनिर्वाच्य ॥ १ ॥
संत संगतीचा महिमा फळतां ॥ संतांच्या संगीतांतील भाव ॥ २ ॥
कळे सहजानें विपर्यास नोहे ॥ संतावीण आहे अवघड ॥ ३ ॥
पढो बहू काळ परी तो गाभाळ ॥ भावार्थ रसाळ नलभेची ॥ ४ ॥
अनंत अभंग उलटो पालटो ॥ अनंत न भेटो अभाविकां ॥ ५ ॥

( १० )

गाजे तो सज्जनीं वाच्याचा लक्ष्यांष॥ तयानें विध्वंस संसाराचा ॥१॥
साक्षी ययाहश्यीं लक्षी मम मित्रा ॥ जाणाया विचित्रा परात्परा ॥२॥
उलट यंत्राचे तंत्र विवंचीतो ॥ गोळीबार होतो एका वेळीं ॥ ३ ॥
गोळी लागे एका अनेकां आवाज ॥ कळे तोफ आज उडाली हे ॥४॥
न मरती श्रोते बार आवाजानें ॥ मरे गोळीयानें भेदणारा ॥ ५ ॥
मरणें म्हणजे करणें भ्रम दूर ॥ लक्षांश चतुर भेदणारा ॥ ६ ॥
आहे हा वाच्यांषें अनंत संसार ॥ सत्य हा विचार ज्ञानगिरी ॥ ७ ॥

संतपदाब्जमिलिंद, ग्यानगीर.

---

## श्रीमदनंताष्टक.

( कै. माधव रामचंद्र फडके, पैठण )

( शार्दूलविक्रीडित )

शब्दां खंड नसे जयासि मथितां वेदांतिच्या सौरसा ॥
आत्मानात्म विचार वर्णुनि जनां पाजी अभेदा रसा ॥
बोले तेसरिं वर्तुनि जगिं निजानंदांत राहे सदां ॥
पूर्ण ब्रह्म गुरु अनादि नमि त्या प्रेमें अनंतापदा ॥ १ ॥

सह्याद्रि तटिं पार पश्चिम–समुद्राचे पुनीता भुमी ॥
तेथें पूर्व वयांत काल अपुला सत्शोधनी आक्रमी ॥
भासे बालपणीं अनित्य जग हें मानी भवीं आपदा ॥
पूर्ण ब्रह्म गुरु अनादि नमि त्या प्रेमें अनंतापदा ॥ २ ॥
सौख्याचा लवलेश शोध करितां ना येत दृष्टीस ज्या ॥
नित्यानित्य विचार भाव सहजीं ठायीं उदासीनिया ॥
क्षेत्रीं वास करी बहू महि असे ना एकदेशी कदां ॥
पूर्ण ब्रह्म गुरु अनादि नमि त्या प्रेमें अनंतापदा ॥ ३ ॥
चारी धाम फिरे वनीं उपवनीं ग्रामीं दरीं पर्वतीं ॥
राहोनी मठ देवदेवि बघुनी तीर्थें बरीं सर्व तीं ॥
घेई सारचि काढुनि अनुभवा मानीतसे संपदा ॥
पूर्ण ब्रह्म गुरु अनादि नमि त्या प्रेमें अनंतापदा ॥ ४ ॥
साधू संत मुनी महंत कविही वैरागि कोवीद त्या ॥
सगें वास करोनि नित्य कसणीं देहास लावीत त्या ॥
जेथें ढोंग दिसे पळे तिथुनियां थारा न कामां मदां ॥
पूर्ण ब्रह्म गुरु अनादि नमि त्या प्रेमें अनंतापदा ॥ ५ ॥
पक्षातें त्यजुनि विवाद मिटवी ठावा नसे मीपणा ॥
सोहंभाव स्फुरे करी समपणीं तल्लीन हो आपणा ॥
पूर्णानंद पदानिजीं मिळवि जो शोधोनि सच्चित्पदा ॥
पूर्ण ब्रह्म गुरु अनादि नमि त्या प्रेमें अनंतापदा ॥ ६ ॥
होतां प्राप्त वसंत संत सहजीं कोयाळ वाणी फुटे ॥
स्फूर्तीची कविता करी अमित ती देखोनि भ्रांती फिटे ॥
नेवासी कधिं कोंकणीं मठिं प्रतिष्ठानांत राहे कदां ॥
पूर्ण ब्रह्म गुरु अनादि नमि त्या प्रेमें अनंतापदा ॥ ७ ॥
ऐसें वागुनि जो जनातित जनीं देहावसाना करी ॥
षष्ठी सोमदिनीं सुशुद्ध प्रथमी मासांत त्या मांजरीं ॥
अठ्ठारें विस अब्दि शांत समयीं गा माधवा सत्पदा ॥
पूर्ण ब्रह्म गुरु अनादि नमि त्या प्रेमें अनंतापदा ॥ ८ ॥

---

अष्टादशशतविंशति मधुमासीं सोम शुद्ध षष्ठीला ॥
पूर्ण ब्रह्म सनातन अनंत गुरू पावले स्वरूपाला ॥ १ ॥

# अनंत महाराजांचे समग्र ग्रंथ.

ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 3663
स्थळ

## भाग २ रा.

## दुष्यंतशकुंतलाख्यान.

॥ प्रथमः समासः ॥

( वसंततिलका )

श्रीराम जोड रसने रस चाख प्रेमा ॥ गूणामृता श्रवणिं घे त्यजिनाचि धामा ॥
कामा नये कवणही दिठिं देखसी जें ॥ तूझेंच तूं विसरसी भ्रमभाव साजें ॥ १ ॥

( स्वागता )

कामना पुरविता तुजवीणा ॥ कारणीं नच दुजा समध्याना ॥
कोण तूं कवण मी नच जाणें ॥ जाहलें कज कसें इह येणें ॥ २ ॥

( मालिनी )

नमन निधिसुतेच्या कांत पायीं करोनी ॥
कुरुकुळ पुरुषांतें वर्णितों गूण मानीं ॥
नितिधर नृपयोगी व्यास वर्णी पुराणीं ॥
कथन वदत तेंची प्राकृती भाषणांनीं ॥ १ ॥

( इंद्रवज्रा )

श्रृंगार येथे रस पोसलासे ॥ आनंद दूजा कळसीं विलासे ॥
हा भारथाचा मुळचा सुपाया ॥ एकांत भावीक सुखोपठाया ॥ २ ॥

( द्रुतविलंबित )

सुत परिक्षित सादर होउनी ॥ नमितसे विनयें बरवा मुनी ॥
शुकपिता गुरु ज्याप्रति जाहला ॥ कुरुकथा कळवी नृपति भला ॥ ३ ॥

( शार्दूलविक्रीडित )

वैशंपायन व्यासशिष्य बरवा लाधे प्रसादप्रती ॥
सांगे भारथ आदरें करुनियां जन्मेजयाला प्रितीं ॥

व्यासोक्ती करुनी सुशांत मुनि तो वक्ता असे जाह्ला ॥
श्रोता सादर आदरें करुनियां प्रार्थू बरा लागला ॥ ४ ॥

( स्वागता )

पार्थनंदन जयाप्रति आजा ॥ जाह्ला विनविता मुनिराजा ॥
माळिका कुरुकुळा प्रतिमेरू ॥ कोणगा कथिं भला मज सारू ॥ ५ ॥
ऐकवा मजप्रती कथनातें ॥ क्षात्र धर्म पढवा विनयातें ॥
शांति मानस गतीप्रति येऊं ॥ जाणवा अजिं गुरू प्रित भाऊं ॥ ६ ॥
प्रार्थना निपुण ते परिसोनी ॥ तोषला मुनि भला गतिमानी ॥
ऐक गा म्हणतसे तधिं राया ॥ सांगतों श्रवणिं घे सदुपाया ॥ ७ ॥

( इंद्रवज्रा )

विख्यात कीर्ती नृप गूणरासी ॥ जो पौरजाचे कुशिं ये स्वतोषीं ।
दुष्यंत नामें अवनीपती गा ॥ सत्ता जयाची सकळीक योगा ॥ ८ ॥

( शार्दुलविक्रीडित )

तेजें भानुसमान शांत शशिसा गंभीरता सागरू ॥
कूबेराप्रति लाजवी धनबळें ॥ ऐसा दुजा ना नरू ॥
वाचेनें कचतात सासुरपती भूमीपती लाजवी ॥
जो कां गाजवि कीर्ति शक्ति भुतळीं आनंदता जाणवी ॥ ९ ॥

( वसंततिलका )

दाता रसीक गति काळ फुडील दृष्टी ॥
तत्त्वार्थि मार्मिक मती भुतभागिं तुष्टी ॥
न्यायार्थ दक्ष जगतींतिल सर्व राजे ॥
घोंटोनि हेम गतिचे मणि जो विराजे ॥ १० ॥
ज्याचे सभेमधिं सदा कर जोडलेले ॥
नीचासनी असति गा गति बांधलेले ॥ ११ ॥

( स्वागता )

चक्राकृती नृपवळी मुकुटी जे ॥ मध्य पूर्वज तुझा ध्रुव साजे ॥
सार्वभोम गति ज्ञाननिधी जो ॥ सैन्यभार लपवी अवनी जो ॥
नाजरी नर धती मधिं कोणी ॥ योगिसा शडअरी कडसोनी ॥ १२ ॥

( वसंततिलका )

सापत्न भाव श्रुतिं ना नगरांत ज्याचा ॥
ऐकूं नये कधिं जगांत असत्य वाचा ॥
दुष्काळ ना घनसमान सुकाळ कारी ॥
दाही दिशा पिकति त्या द्विजधर्म चारी ॥ १३ ॥

निंदानुवाद अभिमान हिनोत्तरें ही ॥
वाचा वदे नच कधीं नृप धाक पाहीं ॥
दीनार्थ बाप गति जो खलिं दंडधारी ॥
स्त्रीया न वागति कदाहि कुमार्गचारी ॥ १४ ॥

( शार्दुलविक्रीडित )

मर्यादा नितिलक्षणें करूनियां आचार वर्णाश्रमीं ॥
जाती वादनदोप लाविति दुजा कोणी न होती श्रमी ॥
शीरादीं करपाद ऊर सकळीं मोडोनि देहाकृति ॥
शीरें हात न चावती कर पदा नाची कधीं तोडिती ॥ १५ ॥

( इंद्रवज्रा )

कर्मैं निराळीं जासें तोंड हातां ॥ वर्णाश्रमासी नितती सुहीता ॥
गातीं नृपाला सकळीक जाती ॥ छंदान्वयानें गुणभाव मूर्ती ॥ १६ ॥
विद्या अनेकीं जनि वागताती ॥ शस्त्रास्त्र विद्या निपुणी प्रजा ती ॥
नाना कळा गायन शिल्पकारी ॥ येकांत बुद्धी गतिचें विचारी ॥१७॥

( स्वागता )

ब्रह्मवृंद समुहो वनि राहे ॥ वेदघोष करिती निति हो हे ॥
पाळणार्थ नृपतीं सुतिं माता ॥ वर्ण कर्म फळ ये नृपहाता ॥ १८ ॥

( वसंततिलका )

मंत्री अमात्य सकळी गतिनें सुराजी ॥
जे नित्य सादर नयार्थ स्वकीय कार्जीं ॥
हिंसा नसे अवगुणे पशुपक्षि सूखी ॥
ना पाप धात्रि अपकाळ कधींहि नाकीं ॥ १९ ॥

( उपचित्रा )

अपमृत्यु नसे कवणासही ॥ अघ ना घडणें कधिंही मही ॥
कुरुकूळ मणी नृप या रितीं ॥ वसतां धरणी नच कांपती ॥ २० ॥

( इंद्रवज्रा )

कोणे दिनीं एक मतींत भावी ॥ जावें वनातें मृगया स्वभावीं ॥
नाना मृगातें वधुनी शरानें ॥ क्रीडा करावी विधिधर्म मार्गे ॥ २१ ॥
बोले प्रधाना अजि रानिं जाणें ॥ आणीव सैन्यें गतिचीं सुजाणें ॥
आज्ञा म्हणोनी मग जात मंत्री ॥ सैन्याधिकाऱ्या निरखी स्वनेत्रीं ॥२२॥
सांगे चलावे वळवूनि सैन्यें ॥ शीकारखानीं नितियोग्य मानें ॥
आज्ञापितांची मग सैन्य चाले ॥ संख्या अपारी नच मान चाले ॥२३॥
वर्षावकाळीं सरिता नदीला ॥ जाती जशा त्या भरुनी निराळा ॥
राजारथीं बैसुनि मध्यभागीं ॥ जातां स्त्रिया देखति नेत्रभागीं ॥ २४ ॥
राहोनि ऊभ्या वरि गोपुरांच्या ॥ कीती जणी त्या उघड्या जिन्याच्या ॥
द्वारीं उभ्या राहुनि देखताती ॥ चित्तांतरीं कामगती रचीती ॥ २५ ॥
भोगिला किति जणीं मतिमाजीं ॥ देहभाव हरपे घरकाजीं ॥
नेत्र ना चळति ते रुपिहूनी ॥ वाटते गतिमधीं चलणें वनीं ॥ २६ ॥

( इंद्रवज्रा )

कूरंगनेत्री गजगामिनी त्या ॥ भूजंगवेणी नवतीमधीं त्या ॥
सिंहाकृती माज जया कटीचा ॥ इरसारूपें भोगिति नूर त्याचा ॥२७॥

( यूथिका )

चंचळा कृतिमधीं गति हो अशा ॥ शांत त्या पतिहुनी दुरि नाहिंशा ॥
पाहुनी जवळिचे विर शोभले ॥ अस्त्र शस्त्र सकळी धरूनी भले ॥ २८ ॥

( शार्दूलविक्रीडित )

वाजी वारण शंदनादि विरते वोळंबुनी चालिले ॥
हांके अंमर गर्जलें चहुं दिसे रानामधीं शीरले ॥
शोभा त्या वनिची रिती बहु परी मध्यें बरे वीर हे ॥
कीती शोभत साउलं प्रति तरू जे सूकले वीर हें ॥ २९ ॥

( स्वागता )

देवद्वार सुरंगी वट पायरी ॥ सागवान बहु तेथ कुडे धुरी ॥
आम्र पींपळ फळें अधदूंबरीं ॥ पारिजातक कणेरि लघु साजिरीं ॥३०॥

( इंद्रवज्रा )

रातंजनाचे तरु डोल देती ॥ भारें फळांच्या बहु नम्र होती ॥
केळी तशा पोफळि नारळी ही ॥ शोभायमान गमती वरि नारिळी ही ॥२१॥
रंभोर अर्जून हुरे अनेकी ॥ पीसे अरोजे हिरडे बहू कीं ॥
गोडे किती आंबट जांबलिंबी ॥ पेरू पिके डोलति घोस संगीं ॥ २२ ॥

( यूथिका )

माधवी विखरल्या तरुच्यावरी ॥ सूर्य किर्ण भुमिला नच तें वरी ॥
कांचनादि तगरीं फुलतें तुरे ॥ लाल शुभ्र कणसें दिसतीं धुरे ॥ २३ ॥

( इंद्रवज्रा )

मांदार चाफे कनकाकृतीचे ॥ ढाळे अशोकी नवपल्लवाचे ॥
मध्यें तटाके कितियेक ठाया ॥ पाटोदकें तीं बहुतेक ठाया ॥ २४ ॥

( द्रुतविलंबित )

सितळ नीर झरे झुळझूळते ॥ चपळ ते श्रवणीं ध्वनि दावितें ॥
उपरमे विपयीं मन तेथ हो ॥ विरहदुःख हरे सकळीकहो ॥ २५ ॥

( शार्दूलविक्रीडित )

पुष्पाचे मकरंद वाहत बरे षट्पाद ते त्यावरी ॥
वारीं डोलति बिंदुमिश्रवरते मोती धृती सौभरी ॥
डाळिंबी बकुली मधोनि रमती कांता जशा त्यानरीं ॥
वाह्यांगें बहु केवडा तट करी मीरासमेरे धुरी ॥ २६ ॥

( यूथिका )

मोर थोर तरुच्या शिखरावरी ॥ शब्द भाव करिती वरच्यावरी ॥
वृक्ष ढाळि अनिलें जंव डोलते ॥ झेंप घेत दिसती वरि जाण ते ॥ २७ ॥

( स्वागता )

पारवे शुकबकादिक भारी ॥ हंस कोकिल सदा सुखकारी ॥
टाह कर्ण गतिनें मतिलागीं ॥ भासवी स्थिरपणा तनु भागीं ॥ २८ ॥

( इंद्रवज्रा )

मादी नरानें रमती कपोती ॥ जाती अनेकीं वनिं क्रीडताती ॥
मंजूळ भाषा मधुनी तरूच्या ॥ ऊठे बहू ती मधुरेकवाचा ॥ २९ ॥

घारी ससाणे नभि फेर घेती ॥ भीती मनीं नाग बहूत घेती ॥
वायू बहू मंद मधोनि वाहे ॥ भारि थवे श्वापदि धांवताहे ॥ ४० ॥

(तोटक)

गव्हे लांडगे व्याघ्र जंबूक जाती ॥ ससे शार्दुलादी मृगाच्या सुजाती ॥
किती सांबरें उंच सींगें सफाटे ॥ वरी फूटले त्यांतुनी फार फाटे ॥ ४१ ॥

( द्रुतविलंबित )

चपळ तीं हरणें पळतीं बहु ॥ नयन थक्क तया प्रति ती बहू ॥
करि फणी गणितां तुळणा नसे ॥ वनिं अशा शिरला नृप तो असे ॥४२॥

(त्रिष्टुप्)

चहु दिसे शिरली नृपसेना ॥ चपळ धांवति जाग्रत राना ॥
फटाफट कर ते करताती ॥ बहुरिती वदनीं वदताती ॥ ४३ ॥

( शार्दूलविक्रीडित )

हां हूं हौं हत छुहुन्त हाव पसरे थाकें वनीं श्वापदें ॥
धांपें ते वळलीं पळोनी दमलीं प्राणांतता ताप दे ॥
भ्यालीं भ्यासुर भारशब्दगतिनें भांबावलीं बापुडीं ॥
भारी भाव कठोर क्षेत्रि गति हे नाहीं दया या थडी ॥ ४४ ॥
तोडीती वनिं सावदें विखरितें श्रोणी तये त्यांतुनी ॥
पीती तेथ मदोद्धतामसपणें जाती पळोनी वनीं ॥
अग्नी चेंववुनी मधीं चरचरा मांसें करें भाजती ॥
किती खाति तशींच चाउनि मुखें कापिन्नलीसे क्षिती ॥ ४५ ॥
झाडीचें जल कूजकें फळफुलें पानें पडोनी असें ॥
पीती ती वदनें करोनी मुरडीं निद्राहि रात्रीं नसे ॥
फांसे पारधि ठाइं ठाइं टपले मोरांचकोरांवरी ॥
मारी ही वनिं त्या महां प्रळइंची जीवांवरी आभरी ॥ ४६ ॥

( द्रुतविलंबित )

बहु अशी दवडी वनिं जाहली ॥ तनु त्वचा चिरुनी अशुभें भलीं ॥
कितिक कंटक मोडत त्यामधीं ॥ परि नसे स्मृति त्या भरले मदीं ॥४७॥

( भुंजगप्रयात )

असे फीरतां दीन गेले कितीकें ॥ अनेका पशूतें तनुत्याग नीके ॥
तदां एक दीनीं वनीं राव गेला ॥ असे एकटा मानवी सोडलेला ॥ ४८ ॥

( द्रुतविलंबित )

बहुत त्रास गमे वनिं तेधवां ॥ म्हणतसे श्रमलों अजिं माधवा ॥
चहुं दिसे पसरे चमुभार तो ॥ रथ धुरे वरि दारुक राहतो ॥ ४९ ॥

( इंद्रवज्रा )

वाटे मनाला गतिकर्मयोगें ॥ जावें दुरी टाकुनि सैन्य मागें ॥
सांगे सुतासी रथ न्हे सपाटीं ॥ तेव्हां मृगाला दरिच्या कपाटीं ॥ ५० ॥
देखोनि राजा मग पाठिं लागे ॥ रागे रथा कीं सुत त्यानुरागें ॥
पूढें पळे तो मृग शैल्य भागीं ॥ मागोनि हाणी शर राजयोगी ॥ ५१ ॥

( उपजाति )

गिरीच्या कपाटीं हरणें लपावें ॥ तेव्हां गतीचीं दिठि ते न पावे ॥
तदां सारथ्यासी नृपें सूचवीलें ॥ मला खालता ऊतरी पायिं चाले ॥ ५१ ॥

( पृथ्वी )

उभा रथ करी तदां उतरला भुमीच्या स्थळा ॥
पुढें, नृप, पदीं, स्वतां, चलतसे, मृगीं रीजला ॥
बरा निरखितो दिशा सकळही पुढें त्याजसी ॥
दिसे वन बरें सपाट भुमिचें शिरें त्या कुशीं ॥ ५३ ॥

( द्रुताविलंबित )

वसाविलें कवणें तरि हें खरे ॥ बहुत शीतळता मधि या भरे ॥
लघु लघू तरुच्यावरि माधवी ॥ तरुणिची प्रतिमा जणुं मालवी ॥ ५४ ॥
मोगरी जुइ लता बहु शोभल्या ॥ कोवळया किति कळया भरि दाटल्या ॥
पाउलें मधुनियां बहु कोंवळीं ॥ लागलीं दिसत तीं भुमिचे स्थळीं ॥ ५५ ॥

( भुजंगप्रयात )

पुढें पाहतां आश्रमालागिं देखे ॥ मुनी कोण येथें असावें स्वतोखें ॥
तया वंदुनी आपुल्या सैन्य मेळीं ॥ मिळावें असें वाटलें त्याचि काळीं ॥ ५६ ॥

(पृथ्वी.)

नजीक जंव पातला नृप, तदां मठापासिं त्या ॥
दिसे सकळ साजिरें परि नसे मधीं कोण त्या ॥
तनू जिवविणा कळा तसि दिसे उदासी सिरे ॥
गतीमधीं नृपा असें दिसतसे पुसावें बरें ॥ ५७ ॥
नसे मुनिमठीं असे मुनिसुतामधीं येकली ॥
नसे नयनिं ती नृपें निरखिली गती आंतुली ॥
पुढील कथनीं गती श्रवणिची असो ऐक्य ते ॥
तपोवनिं न योग्य भाव असि ते गती मांडते ॥ ५८ ॥

(इंद्रवज्रा)

जन्मेजया गा तव पूर्वजाची ॥ गोष्टी बरी ऐक हि अर्थरूची ॥
शृंगार आतां पसरे वनीं त्या ॥ दावीन तूतें वदुनी रिती त्या ॥ ५९ ॥

(यूथिका)

भारथी वदतसे जनभाषा ॥ भारथान्वयचि हा वहु खासा ॥
आदि पर्व अठरांतुनि मूळीं ॥ वंश जे तरु जुने भुमिमूळीं ॥ ६० ॥
वेद पंचम असें शुकतातें ॥ भारथाकृति करी कविता ते ॥
प्राकृतीं आजि अनंतमुखानें ॥ ऊभवी नरहरी प्रितमानें ॥ ६१ ॥

---

॥ द्वितीय समासः ॥ २ ॥

(शार्दूलविक्रीडित.)

सौती सांगत सादरें करुनियां जन्मेजया आयके ॥
गाथा हे तव पूर्वजावरि रची श्रीव्यास भावें निकें ॥
औदार्यें धिर धारणें करुनियां दुष्यंत चूडामणी ॥
ज्याचें ना पद आड मार्गि पडणें ज्ञानान्वयाचा धणी ॥ १ ॥
कण्वाचे मठिं येउनी सहज ते द्वारीं उभा राहिला ॥
हांकेनें कळवी मठीं कवणसे मंजूळ वाणी भला ॥
कोणाचा वनिं आश्रमू मुनि विणा दीसे बरा चांगला ॥
दीसे वागणुकी म्हणूनि कथितो शब्दो तिणें ऐकिला ॥ २ ॥

( स्वागता )

केवडा न पिवळा जिजहूनी ॥ बाळकांति रविची अशि रानीं ॥
कण्व आश्रमिं मुली मुनियाची ॥ पाहते निरखुनी नृपसाची ॥ ३ ॥
भाव बाळ सरला नवती जडे ॥ स्वासदायक तनू नर आवडे ॥
आंतुनी निरखिला नृप राणा ॥ भाव आप्त दिसला तिज ध्याना ॥ ४ ॥
मानसीं म्हणतसे अजिं कोण हा ॥ राजयोगि दिसतो नच शोध हा ॥
आश्रमीं मुनिचिया नच योग्य तें ॥ वांछिते मम गती निति भासते ॥५॥

( शार्दूलविक्रीडित )

द्वारा आड उभी तनु लपवूनी काढी शिरा सामुरीं ॥
लज्जा भाव स्वभाव दावित बरे व्याकूळ राजा उरीं ॥
पाहोनी तिजला मुनी नभ मठीं भानूदयो भासला ॥
त्रासाला मग आटला श्रमरसा चित्तान्वयें धांवला ॥ ६ ॥

( यूथिका )

पद्मिणी मुनिसुता मग बोलते ॥ आदरें करुनियां स्तवि शांतते ॥
आंतुनी करितसें उपचार ती ॥ आश्रमा कृति रुपें बहु नम्र ती ॥ ७ ॥
वाटलें नृपविरा हटकावें ॥ लाज सांवरुनियां स्वभावें ॥
आर्य आन न कळे वरुनीयां ॥ भावतें अजिं असें अबळे या ॥ ८ ॥
भाव आप्त सकळी कळवावा ॥ देह एक घडि हा स्थिर व्हावा ॥
ऐकुनी मधुर ती रसवाणी ॥ राज तोषत असे जिवप्राणीं ॥ ९ ॥

( भुजंगप्रयात )

वयें सान भारी विचारें जुनीसी ॥ मुनी कन्यका वाटतें ही मनासी ॥
इच्यानें मनालागिं आनंद झाला॥अजीं शब्द भावें काम तोषें उदेला ॥१०॥
म्हणे सुंदरी पौरजीं गूणकीर्ती ॥ मला जाण दुष्यंत नामें वदंती ॥
जरी ऐकिलासे तरी तोच हा मी ॥मठीं पातलों दर्शना गे मुनी मी॥११॥
मुनी ना मठीं कां अजीं सांग मातें ॥
कसा दर्शनीं योग येईल येथें ॥
विलंबें किं शिघ्रें तपी येति येथें ॥
कळों दे मला भाव हा मानसातें ॥ १२ ॥

( पृथ्वी )

म्हणे नृपवरा पिता मम घरा त्वरें येइ गा ॥
बसा क्षणभरी मनोधृति फळे खरें जाण गा ॥
उताविळ नका गती स्थिर असों कृपा हो करा ॥
अशा स्वगुणें नृपामनिं मदें उजेरा करा ॥ १३ ॥

( इंद्रवज्रा )

ऐकोनि ऐसें नृप बोलताहे ॥ कन्या कशी गे मुनिची तुवां हे ॥
तो ऊर्ध्वरेता मुनि ऐकिलासे ॥ आश्चर्य वाटे अजियां विलासें ॥ १४ ॥
अंधार चित्तीं जडला ययाला ॥ माझा तुझा गे वचनिं पहील्या ॥
लावोनि दीपा मति ज्ञानतेजें ॥ दृष्टीस दावी श्रवणा खरें जें ॥ १५ ॥
कन्या कशी तूं मुनिलागिं होसी ॥ आजीं कळावें मज तें स्वतोर्पी ॥
ऐकोनि ती तें बरवें मनाला ॥ दीसोनि आलें वचनें सुशीला ॥ १६ ॥

( पृथ्वी )

अगा भुमिपती मुनी मुलि मिही अशी जाणतो ॥
पिता मम दुजा मुनी प्रति कथी जुना भाव तो ॥
तये तुज असे पित्या प्रतिरवें विशीं माझिया ॥
विचारित तधीं तयाप्रति कथी तया हो नया ॥ १७ ॥

( इंद्रव. )

ऐकोनि चित्ताप्रति शांतवावें ॥ तातात्वरें ये तंव गोष्टि भावें ॥
राया कथा ही अशि जाण आहे ॥ पूर्वी मुनी गाधिज नाम पाहे ॥ १८ ॥

( शार्दूल. )

त्यानें उग्र तपाप्रती करुनियां झांकेळिलें सर्वही ॥
देवेंद्राचळ सूटला स्थळ हरे तेजें तपाचें मही ॥
तेजानें विधिला कडेस बसवी मंत्रोत्तरें यारितीं ॥
नित्यानित्यविचारसार जमवी नाहीं तयाला भिती ॥ १९ ॥

( शिखरिणी )

करी चिंता चित्तीं अजर नृपती रात्रदिवसा ॥
कसा भंगे गाधीज मुनि भुमि तों तापस कसा ॥

तपाची संपत्ती हरुनि धनि हा रंक करिसा ॥
उपावो योजीसा गुरुवर भला कोण मनसा ॥ २० ॥

( पृथ्वी )

अशा अवदशेमधीं सुरपती पडे तेथवां ॥
तया स्थळिं जमा रमा सखि निधी सुता संभवा ॥
नभांतरिं स्त्रिया सभेमधिं तिथेमधीं मेनिका ॥
प्रवेश करिते नृपा निरखुनी म्हणे शोक कां ॥ २१ ॥

( द्रुतविलंबित )

सुरपती तिजसी मग सांगतो ॥ तुजविणा गति रोग झडे न तो ॥
तपि भुजंगगती धरि डांव गे ॥ अवनिं गाधिज हा गति हारगे ॥ २२ ॥

( शार्दूलविक्रीडीत )

विश्वामित्र तपोनिधी तुजविणा हारीं नये राजसे ॥
मातें हा बहु वाटला भरंवसा दूजा करीं ना असें ॥
मोहोनी मतिला भला कवळि तूं कामोध्दतीचा बळें ॥
माखोनी मद सादरें मजपुढें आणि तया या स्थळें ॥ २३ ॥
बोले नंतर अंगना सुरपती भीती मती तूमची ॥
घेते तो मज जिंकवे कवण तें रूपें वदा साचची ॥
भानूला लपवी तपोनि तपतें वोधी करी खालतें ॥
मूखातें मग काय मीं करूं तया बोला तुमीं जाणतें ॥ २४ ॥

( यूथिका )

कोटि दीप तप तेज करोनि गोळा ॥ काननीं नृपति तो नय आगळा ॥
ही पतंग गतिची अबला तयासी ॥ मोह घालिल कसा दिठिनेंचि लासी ॥ २५ ॥

( इंद्रवज्रा )

ऐकोनि वाणी सुरईश बोले ॥ कोणी असा ना तुजलागिं भूले ॥
आहे तये काम मतींत जागा ॥ भूलसि तूझे बहु होत जागा ॥ २६ ॥

( शार्दूल. )

म्हैसा गाधिजचित्तगोठणिमधीं धिंसान्वयें बांधिला ॥
आलें फार क्षुधानळें करुनियां जो जाग्रती कावला ॥

तुझ्या या कुचमंडळा निरखुनी पेंडी खडे भाउनी ॥
तोडोनी विधिसांकळी तुजकडे येई त्वरें धांवुनी ॥ २७ ॥

( द्रुतवि. )

कमलमूख तुझें मद माखलें ॥ मुनिमती भ्रमरी त्वरी तीं बळे ॥
भिति नसे तुजसी मनमोहते ॥ ऋषिविशकडुनी मद दोहणें ॥ २८ ॥
तप गजावरि तूं नयनांकुशें ॥ वळवुनी बसणें वरि राजसे ॥
तुजसवें अनिळा प्रति न्हेइ जा ॥ ऋतु वसंत बरा करि गे मजा ॥ २९ ॥

( शार्दूल. )

अम्हांसाठिं तुवां बरे श्रम गडे देहाप्रती सोसणें ॥
मार्दा साचाचि राखणें पद वसों सूरक्ष हें मागणें ॥
ऐकोनी मग मेनिकेप्रति बहू दावि अहंभाव तो ॥
माझें आर्जव सूर इंद्र करितो कांता महीकांत तो ॥ ३० ॥

( द्रुतवि. )

मग म्हणे बरवें अजि जातसें ॥ गति न रूप वर्डो घडणें तसें ॥
नमुनियां सुरनाथ चले त्वरें ॥ भुमिवरी उतरे मग सत्वरें ॥ ३१ ॥
वनिं मुनी तप जेथ करी बरा ॥ समुर ये अवला सरिता तिरा ॥
सुमन भार वसंत करीतसे ॥ मदविलेपन भाव मुनी वसे ॥ ३२ ॥

( शार्दूल. )

वाहे मारुत शीतळी रवि घडी राह नभीं अस्तिचा ॥
नारी वासतनूवरील तटिं त्या ठेवी गती मस्तिचा ॥
होवोनी उघडी जलामधिं शिरे पाठीं पुढें पाहतें ॥
कामोद्दीपन भाव भावित बरें मारी मुनी बाण ते ॥ ३३ ॥

( यूथिका. )

गौरवर्ण तनुचा नवतीमधीं ॥ साखली दिसतसे पुरुषामधीं ॥
चोळिते तनु तदा उर हालतें ॥ माधवी तरुवरा विलसे मतें ॥ ३४ ॥
कमळिणी अनिळें निरसंगमीं ॥ नव रवी उदयीं विलसे भ्रमी ॥
नयन गाधिज भृंग तयाकडे ॥ जडति आदर मानुनि वांकडे ॥ ३५ ॥

( शार्दूलविक्रीडित )

वायूनें नवलाव तेथ रचिला वस्त्राप्रती ऊडवी ॥
तेव्हां ऊगडि आडवी कवतुकें कामोद्भवा वाढवी ॥
हस्तें वाम बिजोधृती लपवुनी सव्यें धरूं इच्छितें ॥
वेळीं त्या मुनिला वसंत भर दे मोहें धरी वाढतें ॥ ३६ ॥
लाठेनें तपभावना बुडविली वारी मती धांव घे ॥
भावोनी सरिता भरे मधिं तिये आलिंगना हौंस घे ॥
येकांतीं तनु ऊघडी बलहिना ज्वानी भरें मूरडे ॥
देखोनी मन चालिना नच असा वाक्यार्थ कानीं पडे ॥ ३७ ॥

( यूथिका )

मेनिका नयनि देखुनि वापिका ॥ काम गाधिज करी मधिं ये सुखा ॥
लोटला तनुजलीं मग आवडी ॥ वीरमेरमणिसी मति सावडी ॥ ३८ ॥

( शार्दूलविक्रीडित )

पाणी पन्नग तापसी सुरसती मैलागिरी वेष्टिला ॥
देखोनी स्थिति द्वय भाव मग तें धागा कटीं तूटला ॥
मीळोनी सुरतीं खले किति दिनीं भानावरी ये फुडां ॥
वेडा होउनि राहिला मग पळे दूजा वनीं रोकडा ॥ ३९ ॥

( द्रुतविलंबित )

तपनदी भरपूर भरामधीं ॥ परम सागरभाव मधीं मदीं ॥
चलतसे रुतु वर्षगती रुपें ॥ शशिरुतू सूकवी सति ती तपें ॥ ४० ॥

( शार्दूलविक्रीडित )

पुण्याचा गिरि हारवी मद भ्रमे वार्ता अशी तेथिची ॥
मेनीके कमलीं पडे बिज तदां वाढे बहू जोरची ॥
घेवोनी तप तेज जात असतां स्वर्गांतरीं जाचली ॥
तेव्हां गर्भ सुतेज टांकित तळीं पाहोनियां साउली ॥ ४१ ॥
मोहाची नच बाधकीं मति जिये जावोनियां पोचली ॥
साधे कार्य अहंमती म्हणुनियां चित्तांगणीं जोडली ॥

देखोनी सुर इंद्र तोषत बहू मानी बहू तीजसी ॥
स्तूती आननिं मांडली बहुत ते होवोनियां हो खुशी ॥ ४२ ॥

( द्रुतविलंबित )

तपबळा हरवी मद माखुनी ॥ उतरला अचल तो नृप साधनी ॥
पतन गर्भ भुमीवरि जाहला ॥ हिमगिरी वरतां बहु आगळा ॥ ४३ ॥

( इंद्रवज्रा )

कन्या रुपानें उदरांतुनी जो ॥ दैदीप्यमानीं वनि शोभला जो ॥
शकुंत पक्षीं तधिं रक्षियेला ॥ आणोनि तोंडीं भरती मदाला ॥ ४४ ॥
चंचू भरोनी मद फार जाती ॥ पाळीयलें गा जननी प्रचीती ॥
पंखें करोनी रवि‌ताप नासी ॥ रात्रीं सफेर असती स्वतोषीं ॥ ४५ ॥

( यूथिका )

काहिं काळ गतिनें सरला असे ॥ तेथ कण्व मुनि हो मग येतसे ॥
पाहुनी सदयता वळली मना ॥ बाळ आणित घरीं तिची अंगना ॥ ४६ ॥
जाहले भुमिधरा म्हणुनी पिता ॥ वाढवी सदनिं याहुनि दूहिता ॥
प्रेम पान पिउनी मुनिभाषणें ॥ काळ हा निरखिला फळपोषणें ॥ ४७ ॥
यारितीं मुनिप्रती ममनातें ॥ सांगतां धरियलें मनिं मीं तें ॥
बोलिलें नच कदा दुसऱ्यासी ॥ वोपिलें विनयतें गुणराशी ॥ ४८ ॥
जन्म या रितिं नृपें परिसोनी ॥ मान डोलवि बरा हवशेनी ॥
कन्यका कवळि हे वनिं वाढे ॥ मानसीं मम अजीं प्रित वाढे ॥ ४९ ॥

( शार्दूल. )

मेनीका सुति रत्न हें उपजलें कौसीक वीर्या गळें ॥
वीधीचे कर लागले नच गमे तेजान्वयें आगळें ॥
धात्रीच्या ललनापदीं सकळही दासी इच्या शोभती ॥
देखीलें नच मीं म्हणोनि वदनीं बोलावया ना भिती ॥ ५० ॥
सृष्टीचा प्रति ब्रह्म तो सुरसती रंभा बरी मेनिका ॥
दोघांचें समतेज स्थूळ नटलें सत्यार्थ हा हो निका ॥
शंकेची तम रात्रि ते सरलिसे येकांत येथें दिसे ॥
कामानें मन विव्हळे थरथरे रोमांच ऊभे कसे ॥ ५१ ॥

(द्रुतवि.)

पसरती वर हे मनना कधीं ॥ जननिशा नमती निधि हे तधीं ॥
आजि कसी वरि हे मज वेळ गा ॥ न वरि होइ अशी घडि वेळ गा ॥५२॥
मुनि तपाप्रति जाणत हा असे ॥ करिं दुजा तनु हें कळलें असे ॥
मम मती परते नच येथुनी ॥ तळिं वचे उदकीं दगडावणी ॥ ५३ ॥
विरह झोंबतसे झुरणी करी ॥ वरि रवांमृत आननिं आभरी ॥
वळवितो वचनें मन सुंदरी ॥ मदनभाव दिसे नयनावरी ॥ ५४ ॥

(इंद्रवज्रा)

हो तापशाची नच यावरूनी ॥ विश्वास वाटे मज घे वरूनी ॥
युक्ती करावी अजि ईजसाठीं ॥ बुद्धी नृपाची तधिं हो पिसाटी ॥ ५५ ॥
बोले तिला तें तुजलागिं सांगे ॥ ऐके नृपा तूं पुढिल्या प्रसंगे ॥
औदार्य धीरें करुनो नृपाळें ॥ ऐके धरेशा मतिनें कृपाळें ॥ ५६ ॥

(स्वागता)

भारथी वदलि ते मुनिवाणी ॥ आवडी करुनियां तिचि वाणी ॥
गूणंदोष त्यजुनी मति भावो ॥ हा अनंत रस हो सद्‌भावो ॥ ५७ ॥

---

॥ तृतीय समासः ॥ ३ ॥

(भुजंग.)

मनीं कामबाणें नृपाची भरोनी ॥ वनीं वीसरे सैन्य तें मानसानीं ॥
करी युक्ति नाना मनाचा विकारीं ॥ दिसे दृष्टिकारी स्त्रियेची शिकारी ॥१॥

(शार्दूल.)

लज्जाभाव दुरावला गतितला बोलूं तिसी लागला ॥
कां, गे, दैन्य मुनी मठीं गति तुझे देहीं न कां कांचला ॥
तारुण्यान्वय भाव जाग्रत तनू कांतार्थ इच्छी न कां ॥
कां तो तापस वेष आवडतसे वैराग्य भावो सखा ॥ २ ॥
तातानें तव मानसीं गति कसी योजीयली गे तुझी ॥
कांताचे करि लावणें असलिया माझी असे गे खुशी ॥
येकांतीं तुज पाहुनी मन सखे भारी असे रीजलें ॥
आजीं तूं मज पाहिजे करवळें भोगार्थ आलिंगिलें ॥ ३ ॥

कामानें गाति माखली तुजवरी इत्सा असे गुंतली ॥
मीळोनी सुरतीं रते मम तनू संगें अशी ये भली ॥
लज्जा टांकि नको धरूं अडि तुवां ऐश्वर्य सारें तुझें ॥
पट्टाची वनिता करीन सखये तूझे मती कां रिजे ॥ ४ ॥

( द्रुतवि. )

मग वदे दुहिता मुनिची तया ॥ वदन हांस्य करी नृप आश्रया ॥
नृपति गा पति भाव मती मधीं ॥ तुमचिया जडला परि आवधी ॥ ५ ॥
धरि मनीं क्षण एक मुनी धरा ॥ मम पिता अजि ये बहु सत्वरा ॥
तुजप्रती मज देइल कौतुकें ॥ मम सुखाप्रति घ्या मग हो सुखें ॥ ६ ॥
वडिल तात शिरावरि माझिया ॥ असुनि मी अपवादिं न येईया ॥
जरि करी तव दे मम तात तो ॥ हित करी उभयांमधिं भाव तो ॥ ७ ॥

( इंद्रवज्रा )

कीर्ती गिरी गा कुरुकूळ राया ॥ धात्री वरी तूं अघ तें हराया ॥
कां कर्म खोटें तुज आवडे हें ॥ ना ठीक दीसे मजलागिं पाहे ॥ ८ ॥
कुकर्म डागे फुडतीं कळें हें ॥ घ्या दूरदृष्टी लहरी समोहें ॥
वीचार ना हा मज तुष्टि देहीं ॥ देई दयाळा वदते खरें हें ॥ ९ ॥

( शार्दुलविक्रीडित )

कीर्तीचा गिरि तूं कुकर्म कुलिसें छेदावया इच्छिसी ॥
तूझीया तंव सत्वभाव सगुणा कां गा तमो माखसी ॥
चित्तातें आजिं आकळा घडिभरीं वीचार तो मानसा ॥
मातें डाग न लाववा अवगुणीं वाक्यार्थ हा सत्यसा ॥ १० ॥

( द्रुतविलंबित )

नृपमती परते नच तेथुनी ॥ बहुत होय उतावीळ जाणुनि ॥
म्हणतसे धनि तूं तुझिया हिता ॥ निरखि गे रमणी आजिं या मता ॥ ११ ॥

( यूथिका )

आत्मबुद्धि हितकारणि जाणणें ॥ आत्मभाव सरळा गति राखणें ॥
तात काय मतिचें तव जाणतो ॥ दोष ना मनिं भिती तुज जाण तो ॥१२॥

( इंद्रवज्रा )

भोगी तुवां सगति माझि यागे ॥ श्रेष्ठार्थ वस्तू तुज वोपितों गे ॥
इच्छा पुरीं दे आजिं येथ माझी ॥ मानूं नको हें अघ मानसीं जी ॥ १३ ॥
गंधर्वलग्नें तुजला वरीतों ॥ शास्त्रार्थ न्यायें नच चूकवीतों ॥
ना वेळ ऐसी पुढतीं घडे गे ॥ कां बीघडावें वसती मनीं गे ॥ १४ ॥

( शार्दूलविक्रीडित )

चित्तीं लग्न करोनियां जरि असे कांता सवें राहणें ॥
लाजेनें मग काय फांवसि फळा नाहीं न तूं बोलणें ॥
वेळाही नच पाठिमोरि करि तूं प्रीया अजी हो मसी ॥
देई गे जिवदान सुंदर मुखें होऊं गती ती खुशी ॥ १५ ॥

( द्रुतविलंबित )

नृपति भाषण भाव भरे मनीं ॥ विरलिसे मति ते नय त्यागुनी ॥
तरुण तो तरुणीप्रति मानला ॥ समय हा कुरु भारत बोलिला ॥१६॥
जवळि येउनियां मग बोलते ॥ तधिं नृपा दिसली रुपमानि तें ॥
सरळ नासिक नेत्र सुशोभती ॥ हरिण तेज लपे समतेप्रती ॥ १७ ॥
नग चिराहुनि तीं वनवल्कलें ॥ उपजवीत बरीं मदना कळे ॥
शिरस पुष्पसरीं शिर शोभलें ॥ निरज मूख सुधाकर वाटलें ॥ १८ ॥

( पृथ्वी )

वदे नृपवरा अगा जरि अशी गती आठवे ॥
मती मधिं तुझ्या तरीं वचन दे तुवां गा नवें ॥
जरी उदरिं या सुतोद्भव घडे तुझ्या संघटें ॥
भुमींधर करी म्हणोनि वदणें न जें गा हटे ॥ १९ ॥

( यूथिका )

भाष्य द्या मजप्रती मग पूढती ॥ मानसीं वसत तें घडवी निती ॥
ऐकुनी नृप मनीं सुख वाटलें ॥ धांवला कर धरी वदला भलें ॥ २० ॥
झालिया सुत तुतें अवनीपती ॥ तोच होइल खरें समजे निती ॥
नेम हा न टळवे विधि शंकरा ॥ हात दे करिं तिच्या धरुनी करां ॥ २१ ॥

( शार्दूल. )

आनंदा मिसळे धरोनि वनिते गंधर्व म्हूर्तावरी ॥
दोघे एक गतं प्रती रमति तीं भोगार्थ लाधे वरी ॥
सूखाला नच पार तेथ उभयांमध्यें तधीं कामना ॥
भोगेच्छा भरपूर होउनि गती भीती भरे हो मना ॥ २२ ॥

( मालिनी )

मदन शर सुटोनी जाय तो जेधवां हो ॥ मुनिवर नृप वाहे श्राप देई पहा हो ॥
अभयपण बुडालें लाज आली पुढें ती ॥पळुनि जलदिं जावें सूख तें याच नीतीं २३
मग वदे नृप तो सतिलागुनी ॥ नगरिं जाउनियां मग तेथुनी ॥
मुळ करीन असत्य न हें घडे ॥ त्वरितची समजे सति रोकडें ॥ २४ ॥

( इंद्रवज्रा )

ऐकोनि बोले मुनि बाळि तेव्हां ॥ स्वामी असों दे सम तेंचि जिव्हां ॥
विश्वासुनीयां वचनीं तुझीया ॥ झालें विवाही तुज संगिं राया ॥ २५ ॥
वाट पाहत असे वनिं आतां ॥ फार वेळ नच तो करणें हिता ॥ २६ ॥

( शार्दूल. )

ऐकोनी नृपती उताविळ मती होऊनियां ती प्रती ॥
हाताचे वरि हात मारुनि वदे तूझ्या सुता हे क्षिती ॥
देयीं मीं बहु आदरें अजि त्वरें आलींगना मीळणें ॥
तेव्हां ते उगि राहिली मग नृपें कौटाळिली बाहुनें ॥ २७ ॥
दोघेही सम आकृती स्वरुप तें पाहोनियां लाजवी ॥
कामाला रतिला न वोघ असला तेजासि त्या मालवी ॥
कांहीं वेळ सती सहीत रमतां भोगार्थ ये पूर्ण ते ॥
शांतीतें वरि कामबाण तधिं हो भीती गती बाण ते ॥ २८ ॥

( इंद्रवज्रा )

वैराग्य झालें नृप द्रिष्टि लागीं ॥ वाटे करावें नच जें प्रसंगीं ॥
माझ्या कडोनी अजिं हें घडे हो ॥ विचित्र लीला घडवी विधी हो॥२९॥
आतां पुढें हें पळण्या प्रसंगीं ॥ युक्ती करावी चट हे नृपांगीं ॥
उठावली ते पुढिल्या समासीं ॥ दावीयली गा प्रथमी उदासी ॥३०॥

( यूथिका )

व्यास भारत वदे बहु गोड हें ॥ त्यांतुनीं कथन गाइन फार हें ॥
पुण्यश्लोक नृपती गुणकीर्तिनें ॥ गा अनंतवदनीं प्रित साधनें ॥२१॥१५१॥

---

## ॥ तृतीयः समासः ॥ ३ ॥

( यूथिका )

मेदिनीपति पळे चपळाकृती ॥ भीउनी मुनिभया मति कांपती ॥
सैन्यभार करवी मग तो जमा ॥ सागरू सम तुळे दिसतो जमा ॥ १ ॥
भूपती चलतसे नगरातें ॥ बोधितो मतिप्रती घडकें तें ॥
दुष्ट कर्म गतिनें मुनि कन्यका ॥ भोगिली मति अशी चळली फुका ॥२॥

( शार्दूल. )

तींतें टाकुनि तेथ मीं भरंवसे पत्नी असें सांगुनी ॥
न्हेयीं गे दिन स्वल्प काळगतिनें आतां न येतें मनीं ॥
कैसें ती प्रति मूळ पाठवुं तरी मूनी करी भस्म तो ॥
कूमार्गें बहु नाडलों म्हणुनियां वाक्यार्थ हा भावतो ॥ ३ ॥

( इंद्रवज्रा )

संतोष मानें मुनिं साच देता ॥ वीवाह होमीं करुनी स्वहीता ॥
आतां कसी ते मजलागिं प्राप्ती ॥ ना पूर्ण कामीं रमलो स्वआर्सी ॥ ४ ॥

( यूथिका )

वाट पाहिल सती वदलों भिती ॥ खंति घेइल दिसे मम होति ती ॥
दीसते मज समोर प्रिया असें ॥ तीसही मजविखीं घडणें असें ॥ ५ ॥

( स्वागता )

पाप हें प्रचिती प्रति आलें ॥ दुष्ट कर्म करुनी मन भ्यालें ॥
जाणुनी तमकुपीं पडलों मीं ॥ काय वाट सतिची नकळे मी ॥ ६ ॥

( इंद्रव. )

शापील मूनी मुळिलागिं वाटे ॥ जाईल कोठें त्यजिल्यासि वाटे ॥
हाणी गिरेला जडली भजीं हे ॥ ऐशा स्वभावें नृप जात आहे ॥ ७ ॥

मार्गे मुनीच्या मार्ठि लजिता ते ॥ राहे लपोनी खचली मना ते ॥
कांतासवें जी रमली मदोहे ॥ भीती धरी तात समोह मोहें ॥ ८ ॥

( स्वागता )

तस्कराप्रति जरी जानें कोणीं ॥ देखिला नच तथापि भिवोनी ॥
रात्रभागीं लपुनी जनदृष्टी ॥ चालणें पडतसे बहु कष्टी ॥ ९ ॥

( इंद्रवज्रा )

ज्याचेंच त्याला मन खात आहे ॥ यावीण पापा प्रति ठाव नोहे ॥
जेणें लपाया करणी घडे ती ॥ वीचारवंता प्रचिती जडे ती ॥ १० ॥

( शार्दूलविक्रीडित )

मागोनी ऋषि आश्रमाप्रति बरे येऊनियां पोंचले ॥
कन्या बाहिर नाच ये मग मती वीचार मार्गीं चले ॥
द्रिष्टीला मग ज्ञानयोग जडवी जामात राजा घडे ॥
पूरूषाप्रति भोगिलें म्हणुनियां आतां मुली हे दडे ॥ ११ ॥
दैवानें बहु चांगलें घडविलें केलें मला मोकळें ॥
कन्या राजगृहीं पडे हुरहुरी आतां न ती चावळे ॥
बोले काय शकुंतले करिसि गे बैसोनियां आश्रमीं ॥
लज्जा त्यागि कळे मला सकळही होऊं नको तूं श्रमी ॥ १२ ॥

( द्रुतवि. )

बहु बरें घडलें मज मानलें ॥ नृपवरें तुजला प्रति पाणिलें ॥
विधिघडी घडली तुज डाग ना ॥ भिउं नको मजला समजे मना ॥ १३ ॥

( इंद्रवज्रा )

बाहेर येई लपणें त्यजोनी ॥ ऐकोनि तेथें सुख फार मानी ॥
वंदी पदाला मुनिच्या मुली ती ॥ सांगे वृतांता निति जे घडे ती ॥ १४ ॥
अन्याय पोटीं अजि घालि ताता ॥ ठावेंच आहे सकळीक वार्ता ॥
सौभाग्य अस्तू प्रसवी सुतातें ॥ तेजें करोनी दडवी पित्यातें ॥ १५ ॥
तथास्तु ऐसें सांति बोलली ते ॥ पुढें दिनांतीं कळलें मना तें ॥
स्वातीसुतोयें नृपवीर्ययोगें ॥ सुक्ती ममांगीं पडतां स्वबोधें ॥ १६ ॥
वीर्यें अमोघें तनु गर्भ वाढे ॥ स्वानंत भारी गमती पवाडे ॥
दीनांति पूर्णा सुत जन्म झाला ॥ आल्हाद मूनी मनिं दे उजेला ॥ १७ ॥

सुचिन्ह तान्हें वृषभाक्ष खासें ॥ बाहू अजानू बहु तेज दीसे ॥
सूहांश्य मूखें रवि तेज आटे ॥ सौंदर्यताकोंभ, भुमींत ऊठे ॥ १८ ॥

( यूथिका )

सावधानगतिनें सुत पाहिला ॥ डोळवी मग शिरा तिसि बोलिला ॥
धन्य हे अवनिला तुंचि होसि गे ॥ पुत्रयोग बरवा नच या दगे ॥ १९ ॥

( शार्दूलविक्रीडित )

सांगे जातक कन्यकेप्रति तदां ऐके तुवां लक्षणें ॥
पुत्राचीं तुज सांगतो धरि मनीं आनंद याचे गुणें ॥
याचेंनी बहुनाम पौरज कुळा कीर्ती जगीं भारती ॥
गाती सर्वहि आवडी करुनियां लोकत्रयीं पूढती ॥ २० ॥

( द्रुतवि. )

वळवुनी सुर यानि ममाश्रमीं ॥ मुळपर्णी करणी असली भुमी ॥
वरि तुझा सुत हा करिगे खरा ॥ सुखिवसे गतिनें सुतिं या धरा ॥ २१ ॥

( वसंत. )

वीवेकवंत गुणवंत तसा स्वधर्मी ॥ वाहे समान पदवी न शके अधर्मी ॥
सौंदर्य तेज मदना प्रति लाजवाया ॥ उत्पन्न होत उदरीं आजि गे तुझीया ॥२२॥

( इंद्रवज्रा )

भूमी तनूची नवखंडकारी ॥ हा सूत तूझा नुरवी शिकारी ॥
मारी मृगाला मन योगि जैसा ॥ क्षेत्रीय धर्मी बहु ज्यास धींसा ॥ २३ ॥

( शार्दूलविक्रीडित )

भानूला लपवी प्रकार गतिनें चंद्राप्रती शांत ते ॥
वीसावा वसुला घडे अवनिते जन्मोध्दतीया मतें ॥
दैवाची मम बाळि तूं असलि गे झालें बहू चांगलें ॥
माझेंही मन आभरे वदन हें देखूनियां तानुलें ॥ २४ ॥
ऐकोनी सुत जातका सुख बहु झालें कुशीं कन्यके ॥
वाढे नंतरि सोमसा दिनदिनीं बोलूं तया कौतुकें ॥
भाषा बोबडि आननीं पसरली संतोष तो त्या मुनी ॥
लाडाची बहु चाड पूरत बरी पूढें जडे साधनीं ॥ २५ ॥

वर्षे पंच सरोनियां शिशुप्रती लागे पुढें साहवें ॥
मूनीनें मग त्याप्रती शिकविलें अभ्यास ते हो नवे ॥
चापातें शर जोडणें निरखुनी दूजावरी सोडणें ॥
मंत्रानें मुळ बीजभाव पढवी बाणोनि देई खुणे ॥ २६ ॥

( यूथिका )

जाणता मुल जधीं गति जाहला ॥ खेळण्याप्रति वनीं निघुं लागला ॥
चाप बाण करिं घेउनि एकला ॥ जातसे मृगवधा मुल धाकुला ॥ २७ ॥
काननीं शिरुनियां क्रुर स्वापदें ॥ बाहुंनीं दमवितो घडि आपदे ॥
क्रूर भाव गतिचीं मुनि आश्रमीं ॥ आणितां नच दिसे घडला श्रमी ॥२८॥
पाहुनी मग मुनी सकळीक त्या ॥ ठेविती दमन हें मग नाम त्या ॥
कण्व तेथ मतितें नित आणतो ॥ दूर दृष्टि गतिनें बहु खोल तो ॥ २९ ॥

( इंद्रवज्रा )

बोलावुनी शिष्य तयासि सांगे ॥ आजीं ममांगीं नित होचि वागे ॥
कन्या पतीच्या घरिं पाठवावी ॥ माहेर ठायीं बहु हे नसावी ॥ ३० ॥

( शार्दूलविक्रीडित )

थोरांची वनिता स्वरूपवति ते तारुण्य योगामधीं ॥
राहूं फार न, येत, येश, कधिंही लागे, मली, भ्रष्टधी ॥
सूशीलें शिल राखणें जरि असे बाणोनियां या खुणें ॥
चालावें जग भावनेमाधिं बरें त्यागोनि हीं लक्षणें ॥ ३१ ॥

( यूथिका )

हांसणें निरखुनी परक्यातें ॥ सांवरी वरिवरी वसनातें
कांस घालित उभी भरवाटे ॥ लक्षणें कुलबुडी जगवाटे ॥ ३२ ॥

( द्रुतवि. )

पतिप्रतीं दिठिनें क्रुर पाहणें ॥ दुसरियांप्रति देखुनि हासणें ॥
चकत एकाळि वाटनि जे दुजा ॥ घरिं जिकां बहु वाढविते पुजा ॥ ३३ ॥

( यूथिका )

कास टांकुनि घरीं पर दैवतें ॥ लागिं पूजित जि कां हिन दैवतें ॥
मंत्र घे श्रवाणिं जे गुरुपासुनि ॥ कूलनाश घडणें इजपासुनी ॥ ३४ ॥
गायनादिक कळा कुशळा कृती ॥ दर्पणीं निरखिते मुख आकृतीं ॥
सांवरी पदर जे वरच्यावरी ॥ नेत्र लावित सदां परक्यावरी ॥ ३५ ॥

फार बोल मनमोहन भाषणी ॥ येकटी पर नरा घरिं जाउनी ॥
द्वाड खोडि बहु त्या परि त्यांतुनी ॥ त्यागणे वरिल या गति साधनीं ॥३६॥

(भुजंग.)

जरी लक्षणें कूलवंती मतीचीं ॥ असोनी रमे तात गेहीं सदांची ॥
जगीं जारिणी शब्द ये हो शिरीं त्या ॥ न माने कदां गोष्टि हे श्रेष्ट ज्ञात्या॥३७॥
प्रपंचीक भागीं असों तें कसेंही ॥ सुता माझि हे सूशिला हो असे ही ॥
पतीच्या घरीं पोंचवा जाउनीयां ॥ सुतालागिं लावा नृपा अंक ठाया ॥
मुलीलागिं बोले बहू स्नेह भावें ॥ तुवां कांत गेहीं चलोनी भरावें ॥ ३८ ॥
तधीं पाणि नेत्रीं मुलीच्या पित्याच्या ॥ भरे दाटुनीयां नये शब्द वाचा ॥
सदां एक जागीं पित्याचे गृहीं हे ॥ तदां कंठ हांकेप्रती देत आहे ॥ ३९ ॥
परी जाण ती लक्षणें श्रेष्ठ मानीं ॥ म्हणे सांगता तें मती सत्य मानी ॥
मुळापासुनी वाढवीली दयाळा ॥ परी आजि जाणे गती हो कपाळा ॥
दुजाच्या बळानें तनू चालवावी ॥ असे आमुची जाति हेची स्वभावी ॥४०॥
पित्या टांकुनी आज जाणें घरीं मी ॥ परी माय तूं बापही एकधामीं ॥
समाचारें घ्यावा नका त्यागुं मातें ॥ अजी बोलवेना नमीतें पदातें ॥ ४१ ॥
मुनी नाचि पाहे बहू मोह दाटे ॥ बहू वेळ तो सद्गदी भाव वाटे ॥
मुलाला करानें मुली तात पायीं ॥ तधीं मीळवी चूकवा हो अपायीं ॥४२॥

(शिखरिणी)

करा ठेवी शीरीं दमन सुत तो पोटिं धरुनी ॥
मुखा चुंबीता हे कुमर वयसा जाणुनि मुनी ॥
अरे वत्सा जाई तव जननिचा संग धरुनी ॥
सुखें राहे तेथें नित शिक बरी पित्रुसदनीं ॥ ४३ ॥

(इंद्रवज्रा)

खोडी त्यजोनी सकळीक बारे ॥ गंभीर राहे नृप अंगिकारें ॥
जाती पुढें ते मुनि शिष्य देखा ॥ घेवोनि सूता सतिच्या स्वसूखा ॥४४॥

(द्रुतविलंबित)

गजपुरा निकटीं जंव पोंचले ॥ वदतसे मुनि मेळ शकुंतले ॥
नृपघरीं चलणें अजि जाणतें ॥ सुखकरी गति हे नित भासते ॥ ४५ ॥

संग्रहालय ... 

( इंद्रवज्रा )

बोले सती ते चलणें पुढें रे ॥ मागोनि येतें तुमच्या मिही रे ॥
जाती नृपाच्या पद सन्निधानीं ॥ बैसे सभा ती सकळी विरांनीं ॥ ४६ ॥

( भुजंगप्रयात )

नृपें पाहुनी मान खालीं तदां ती ॥ असे घातकी जाणलीसे मनीं ती ॥
मनां डागला ह्या असे लोकचारा ॥ उभी घेउनी तेथ ती सूत दारा ॥४७॥
म्हणे पाहिली वाट भारी मुलाची ॥ अजीं पातकें तात आज्ञे स्वतांची ॥
सुतालागिं अंकीं धरावें नृपेंद्रा ॥ करी यूवराणा कृपेच्या समुद्रा ॥ ४८ ॥
अगा कीर्तिवंता गती आठवावी ॥ मुनी आश्रमाची मला जी नवावी ॥
तदांचा खरा शब्द भावो करावें ॥ घरीं पातलीं आपुल्या मीं स्वभावें ॥४९॥

( इंद्रव. )

गंधर्वलग्नीं नसतां मुनी ते ॥ सांगोनि गेला तुज न्हे स्वरीतें ॥
आजीं मला द्या सुख ठाव गेहीं ॥ ऐकोनि राजा वरमे स्वगेहीं ॥ ५० ॥
जाणोनि नेणें नृपवाणि बोले ॥ कोठील तूं तापसि मी मिळालें ॥
कोण्या रितीनें पडसी गळां तूं ॥ हे नेणतों मी विपरीत मातू ॥ ५१ ॥
पाहोनि मातें वयसा तुवां गे ॥ खोटेंचि तूफान करूनि हें गे ॥
आजीं रचीलें जगिं डाग लागे ॥ साचें न जाणें कुटिले मिं हें गे ॥ ५२ ॥

( शार्दूल. )

लज्जा वाटत ना कशी कुलहिने श्रेष्टार्थ ते झोंबसी ॥
वीवाही म्हणसी पराप्रति बरी जातीच कां हे असी ॥
साक्षीनें कवणें तुला वरियलें येकांत झाला कसा ॥
आह्मांला नकळे उठोनि चलणें वाक्यार्थ हा घाणसा ॥ ५३ ॥

( यूथिका. )

स्वल्पकाळगतिनें सुत जाहला ॥ कोण न्याय कळवीं अयकूं भला ॥
भूलवूं मजप्रती अजिं येथ तूं ॥ येउनी वदसी हे गुढ हेतू ॥ ५४ ॥

( इंद्रवज्रा )

पत्न्यांगनाचे सरि भाव भारी ॥ दावोनि वाटे करणें विकारी ॥
ना, मानता हे मजलागिं होई ॥ कोठोनि येथें अजिं येत हो ही ॥ ५५ ॥

( शार्दूल. )

बोली हे मज लाजवी जग निती माजीं तुझ्या तोंडची ॥
गोष्टी गे बहुनीच ही वदसि कां वाटे कसी ते रुची ॥
जाई द्वाड अभाषणें वदन हें दावूं नको गे मला ॥
मूनीच्या मठिं जाउनी रमवि तूं देहो बरा आपुला ॥ ५६ ॥
ऐकोनी नृप उत्तरें थरथरे वातें जशी पद्मिणी ॥
पत्राचेंसरि वोंठ हालत्त तिचे बोले बहु कोपुनी ॥
सारे थक्क सभेमधीं नर तधीं आश्चिर्यता मानती ॥
कैसी हे गति नेणवे सति दिसे ज्वाळा जशी चेतती ॥ ५७ ॥

( भुजंगप्रयात )

अगा पापबुद्धे कळें हें मनाला ॥ न कां बोलसी लाजुनीयां जनांला ॥
तुंची साक्ष मातें करी या विचारा ॥ नराधीश तूंवां बरे सत्य सारा ॥५८॥
मला निंदिसी या स्थळीं कामअंधा ॥ बहू शोभला कीर्तीचा तूज धंदा ॥
बरें सूत घेई दिजे राज्य यासी ॥ मुनीपासिं जातें अजीं मीं वनासी ॥५९॥

( स्वागता )

आत्मसाक्षि बरवा सकळांसी ॥ चोरि त्याप्रति कसा करितोसी ॥
धर्म हा तव नितीमधिं वागे ॥ जार चोर गतिचे मति रंगें ॥ ६० ॥

( शार्दूलविक्रीडीत )

भाकेला कर वोढले तधिं कसे कामोद्दिपे काननीं ॥
आतां आननिं ना घडे वदसि तूं मानी नची, गा धनी ॥
थोरांची निति थोर ती तुज कसी येई नृपा या स्थळीं ॥
कंठातें सुरि लाविली अजिं तुवां धात्री असे कांपली ॥ ६१ ॥
बापूडी पतिवांचुनी अबल हे ज्ञाते इसें योजिली ॥
कूकर्में तुझिया स्मरे नच पुढें बोलावया कांवली ॥
दूजाचे अवगूण सान तृणसे गीरीरुपें वर्णिती ॥
आपूलें अघ झांकिती नच दिसे, बूडोनियां, ते धृती ॥ ६२ ॥

( इंद्रवज्रा )

व्यापार साक्षीविण तो घडेना ॥ ऐसें वदंती वदती परी ना ॥
साक्षी विणा कर्म घडेल कैसें ॥ सर्वांतरीं आत्मसाक्षीस बैसे ॥ ६३ ॥

( भुजंग )

खऱ्यामार्ग योगीं असे आत्म साक्षी ॥ दिवा आणि रात्री सदाकाळ लक्षी ॥
सदां इंद्रियाच्या बऱ्या देवता त्या ॥ खरें जाणती त्याग ह्या दुष्ट नात्या ॥६४॥

( द्रुतविलंबित )

सति रमे समसूत तसा तों ॥ रविप्रभे भुजवी नितिमान तो ॥
घरिं जरी चलुनी जडली असे ॥ कवणें मजला नच जाणसें ॥ ६५ ॥

( इंद्रवज्रा )

आरोग्य काया सति कूलवंती ॥ सूपुत्र खासा उगवे स्वजोती ॥
जन्में अनेकीं जरि पुण्यरासी ॥ झाल्या घडे हा समयोग त्यासी ॥ ६६ ॥
प्रारब्ध वणा नच या फळाला ॥ पावे जरी तो जरि श्रेष्ठ झाला ॥
मी कन्यका मेनिकि गर्भसुक्तीं ॥ गाधीज वीर्यें जडलें यथोक्ती ॥ ६७ ॥
राजा वदे कोपुनि हीन मानें ॥ सारें कळे हे अजि सत्य माने ॥
बजोधृतीचे सकळीक चाळे ॥ सत्यार्थ बोलें दिसती निराळे ॥ ६८ ॥

( शार्दूलविक्रीडित )

मातें तें बहु भोगती सुर नभीं ताता अधर्मी असे ॥
क्षेत्री जो मुळचा द्विजोत्तम म्हणे त्याची सुता ही असे ॥
बोलोनी हटवी असा नच दिसे कोणी मला या भुमीं ॥
वियानें बहुतां तनू इचि असे साचा विटें आज मीं ॥ ६९ ॥
घंटा बांधिली देउळीं पुरलिसे विद्यालयीं साण ती ॥
भेरी चावाडियेवरी रचलिया कोणी न घे हो भिती ॥
धर्माचे घरिं रोंविलें उखळ तें बंदी करी कोण गा ॥
कांडावें बहुते न आपपरतें सारे धनी त्यासि गा ॥ ७० ॥
हीचेंही मुळ या रितीं उमगलें मूळें इच्याची बरें ॥
आतां बोलुनि काय भाव इजसीं बोले सभे आदरें ॥ ७१ ॥

( इंद्रवज्रा )

पाहोनि मातें धनवान भारी ॥ शृंगार खोटे रसने उभारी ॥
दाटोनि पाहे पडण्या गळां हे ॥ हा अर्थ आम्हां उचितार्थ नोहे ॥ ७२ ॥

( अतिजगति )

भाषणें नृपतिच्या सति कोपली ते ॥ कालि कोपत जसी अपमंत्रमत्तें ॥
अक्षरें बिजवळीं तालिं चूकतांना ॥ क्षोभणें जसि तितें सति त्याच माना॥७३

( स्वागता )

लाल नेत्र कमळें करुनीयां ॥ ह्राणि शब्द रसनेप्रति राया ॥
दोष कां जननितें रव वाचे ॥ लाविसी अधम ते प्रति साचे ॥ ७४ ॥

( इंद्रवज्रा )

क्षीरावरी गा तुझिया वसे जी ॥ स्वर्गांतरीं वास जिला सुराजीं ॥
सारे नभीचे सुर मानितातीं ॥ निंदा करावी हलकी निती ती ॥ ७५ ॥
जो ब्रह्मयासी तपतेजयोगें ॥ सान बोलवि, मुखें प्रतियोगें ॥
उत्तरें दिन तयाप्रति देसी ॥ योग्यता हिन नरीं गणुं येसी ॥ ७६ ॥

( भुजंगप्रयात )

उण्या गोष्टि श्रेष्ठां प्रती लाविता हे ॥ तुवांची पहावें गती कोण दोहे ॥
अगा पाप हें ताप दे आंत तूं तें ॥ उठे आननीं ज्वाळ अग्नी रुपातें ॥७७॥

( शार्दूल. )

पुण्याचे गिरि माखले नच नरा वाणी अजीं कां तुझी ॥
पापाचा नच डाग त्याप्रति असे चित्तार्थ युक्ती तुझी ॥
कर्मानें भव बांधलें गुणरुपें रीती जयाची तया ॥
राया मात्र सुयेश निंदक कळा घालील नर्कालया ॥ ७८ ॥
निंदीसी मजला यया वरुनियां हीना तुला ना कळे ॥
आजीं जाळिन येश कीर्ति तुझि ते क्रोधाग्निचीया बळें ॥
गर्वोक्ती नृप भावने मदभरें अंधत्व दृष्टी पुढें ॥
ऐसें बोलत तेधवां नाभिं रवो मेघान्वयें वोरडे ॥ ७९ ॥
वाणी ऐकत सर्व लोक जगती माजील थक्काकृती ॥
टांकोनी सकळीक कर्म मतितें आश्चर्य ते हो कृती ॥
रे रे पौरज वंशजा मदगजा अंधत्व टाळी मदा ॥
कांता ही तव कोपली प्रळयिची द्याया तुला आपदा ॥ ८० ॥

जाणोनी गति नेणता मनिं असी वाढे उरीं त्याग ते ॥
प्रीयेला करिं घेउनी सदनिं जा शांती करी क्रोध ते ॥
दैवें ही जडली सुतासह बरी राया तुझ्या मंदिरीं ॥
दोषाची मलि माखसी गति तुवां निंदानुवादा सरी ॥ ८१ ॥
नेमाच्या वचना करोनि बरवे दावी इळा सत्य तें ॥
सूताचे गुण योग भाव न कळे पासोनियां भारते ॥
नामातें निजवंश हा घडवि गा अंकावरी घेइया ॥
साधो बाधकता मतीमाधिं नसो गांवी पडो संशया ॥ ८२ ॥

( द्रुतविलंबित )

विधि हरी हर आण तुला असे ॥ सति धरिं करि गा बहु गोडसे ॥
सकळ लोक सभेमाधिले तदां ॥ नृपवरा प्रति भावित या पदा ॥ ८३॥

( भुजंग. )

अजीं, वेळ, ना लावणें या विचारा ॥ वदे शुद्ध आकाशवाणी उजेरा ॥
कराला धरावी वरावी विवाहीं ॥ ह्मणे साच दुष्यंत कथा बोलते ही॥८४॥

( शार्दुलविक्रीडित )

साक्षी ना घडतां विवाह वनिता लौकीकमार्गीं हिते ॥
ना कोणी मति दाविता सरळ ते हीणोत्तरें निंदिते ॥
रामा हे नवयौवनी निरखुनी राजा भुले ईंजसी ॥
हेंची जाणुनि आदरें दुर करी ठावार्थ सारा मसी ॥ ८५ ॥

( इंद्रवज्रा )

झालें बरें हें अजिं दैवयोगें ॥ होणार तें हो सहजा प्रसंगें ॥
होऊन जातें अजि साक्ष बाणे ॥ बोलोनि हातीं धरि तो सुजाणे ॥ ८६ ॥

( पृथ्वी )

सुताप्रति धरी तनू वरी तदां बरा रावजी ॥
सुहास्य वदनांबु रोह धरिले करा अंबुजीं ॥
म्हणे मम सुता बहूत घडले तुला क्लेश रे ॥
नको धरूं मनीं अदोष असणें पदीं तूंच रे ॥ ८७ ॥

( भुजंग. )

करी राजधानी निती न्याययोगें ॥ तुझें चिन्ह ऐसें मुखीं रंग वागे ॥
करी यूवराजा तदां विप्रयांसी ॥ बहू दक्षणा दीधली रत्नरासी ॥ ८८ ॥

( इंद्रवज्रा )

खंडोनि आशा धन टाकितातीं ॥ वोझें न चाले धन भाव हेतीं ॥
प्रीया धरोनी नृप अंतरंगीं ॥ जावोनि आलींगित प्रेमरंगीं ॥ ८९ ॥

( भुजंग. )

म्हणे चारुगाती प्रितीं काय राणा ॥ त्यजी खेद तूं वीघडी जे पुराणा ॥
तुला निंदिली वंद्य होण्या जगीं गे ॥ अजीं दोषनाला जारभावो ममांगें ९०
हातीं धरोनी बहु गुप्त ठेवी ॥ घेवोनि दीपा तुजलागिं दावी ॥
वस्त्रान्वयानें नग भूषणानें ॥ त्यां तून शोभे नवयौवनानें ॥ ९१ ॥

( शार्दूलविक्रीडित )

शिष्यां तें मुनिच्या भरोनि धन तें देती शिपाइ वरी ॥
साष्टांगें नमिलें म्हणोनि कथणें रायें पदीं सौभरीं ॥
जातानां मुनि भेटती मुनिसुते एतों असें बोलती ॥
या जी हो कळवा वृतांत मुलिची येथिल ताताप्रती ॥ ९२ ॥
आनंदें रमती अदोप मतिनें दुष्यंत हो या भुमीं ॥
कांता सुंदर सूत गांभिर असे वर्णीयलें सार, मीं ॥
भावें कोण पढे जरी कथन हें अर्थार्थ तो पावणें ॥
साचेंची भावि या शकुंतल कथा भक्ती रुपें वाचणें ॥ ९३ ॥

( इंद्रवज्रा )

श्रृंगार न्यायो सुत अर्थ प्राप्ती ॥ श्लोकार्थ येथें स्वहितार्थ दीसी ॥
जन्मे जयातें मुनि सांगता हे ॥ ही कामधेनू जागें दोह ताहे ॥ ९४ ॥

( वसंततिलका )

ऐकोत सज्जन सुखें मति ते रमाया ॥ गाथा अनंतीं अघ तें हराया ॥
न्यून्यार्थ बूधें भरुनी स्वभावें ॥ घ्यावें करोनी सम आत्मभावें ॥ ९५ ॥ २४६

---

## ॥ चतुर्थः समास ॥

# शुकरंभाचरित्र.

( शिखरिणी )

नमो एका नाथा सदय मनसा सद्गुरुवरा ॥
प्रतिष्ठानीं वासा करुनि बरवा गौतमि तिरा ॥
गुरू भक्ती भावो मन सम मता दत्त वरदा ।
वरासाठीं द्वारा वरि वसतसे अत्रिय सदां ॥ १ ॥
सदां गाऊं भावें गिरिं गुरुवरा ऐक्यमतिचा ॥
निजाचा जो ठेवा जगनगभवा प्रेमगतिचा ॥
गती ज्याची ऐसी घरिं हरि भरी कांवडि सदां ॥
सदां रिद्धी सिद्धी बटकुरिमिषें राबति पदां ॥ २ ॥
पदांची या गोडी मधुवर उडी वतसी ॥
जडोनियां चित्ता गिरिं रुचि जडे आंत्र भुकसी ॥
सदां गाथा गातां सदय मतिची नाथ कविता ॥
हिता आली हातां अनुभव मता चित्त समता ॥ ३ ॥

( शार्दूलविक्रीडित )

आदी नाथपदीं करोनि नमना गायीन त्या योगिया ॥
या भूमीवर जो समोह ममते ठायीं नसे व्याप्य या ॥
कामातें जिरवी अनूभव मती नाहीं असा दूसरा ॥
शूकाचार्यकथा यथामति रुपें ऐक्यान्वयीं आसरा ॥ ४ ॥
संसारांतरिं वीटला प्रथमतां माते कुशीं जो लपे ॥
वर्षं द्वादश कर्दमीं असलिया मायामदीं ना तपे ॥
ज्याणें वीषय वीषसे गणितले तत्वार्थबोधें जुने ॥
तापे ज्ञान कळा विधी नव वरीं भक्ती निजीं शोधनें ॥ ५ ॥
ज्याला काननिवास रात्र दिवसा एकांत ठायीं असे ॥
नैराश्यें वटला समूळ सुटला गाऊं तयाचें मिषें ॥

योगेंद्रा प्रतिपादनीं सममती बाणे खुणे ती वदूं ॥
चित्ताला शमण्या उपाय सकळी हारों अनंतीं मदू ॥ ६ ॥

( दिंडी )

बहू झालें नैराश्य परी शूका ॥ भागिं नाहीं या भुमीं कोण तूका ॥
राजयोगी जींकिला काम ज्यानें ॥ कथा त्याची वर्णितों गूण मानें ॥ ७ ॥
तपा पाहोंनी इंद्र मनीं भ्याला ॥ म्हणे घेतो आपुल्या आसनाला ॥
करी चिंता फार तो अंतरीं हो ॥ करूं कैसें अर्थि या गुंतला हो ॥ ८ ॥

( पंचचामर )

अशामधीं तिये सभेसि मेनिकादि उर्वशी ॥
तपी मुनी मती दरी मदोद्भवी घृताग्निसी ॥
थवा जसे कळा गुणी तमाखणी मदा वमी ॥
नरा भुली तपामिषें प्रती विधी पडे तमीं ॥ ९ ॥
भुमी तळीं तपावरी हिची बया महामरी ॥
जरी मती समोहताहि पंडितास कातरी ॥
सुनृत्य गायनादि ताल छंद मांडणी कळा ॥
गळा सभेचि कोकिला रवांश ते सदां तळा ॥ १० ॥

( कामदा )

नृत्य गायनीं भाव दाविले ॥ छंद कूसरीं ताल बांधिले ॥
सर्व हांसले कामीं दाटले ॥ नाक हीं सभे देव हर्षले ॥ ११ ॥
राजआसनीं इंद्र तो असे ॥ चित्तचिंतनीं गुंतलें वसे ॥
शीर ना तुके मूख खिन्न तें ॥ पाहुनी वदे मोहि कामतें ॥ १२ ॥

( विबुधप्रिया )

सासुरीं मग जाउनी विनवीतसे सुरनायका ॥
आयका बुधहो तुमीं किति लाघवी नित बायका ॥
स्वामिजी अजि कां असे दिसतां तरी बहु खिन्नसे ॥
कोणत्या तरि संकटीं मति गुंतली घडलें कसें ॥ १३ ॥
मेनिका रव ऐकुनी सुरनायका सुख वाटलें ॥
दाटले अनुताप ते मग सर्व ही मुखि ऊठलें ॥

प्रेमता मनिं वाटली मग बोलती इस ऊर्वसे ॥
ऐक गे मम मानसी कळ संभवे भुमि तापसें ॥ १४ ॥
मांडिल तप फार तें गत मोहता शुक ताप तो ॥
वीषयी नच वाटला मम मानसा चळ ऊठतो ॥
घेयि गे पद आमुचें बळकावुनी करूं काय या ॥
सांग गे आजि वाटती तप भंगण्या गति योजि हा ॥ १५ ॥

( उमा )

ऐकुनियां मग उर्वशी बोलत गर्वमती मनीं मानुनियां ॥
सोडुनियां भीति निर्भय मानासिं स्वस्थ असां मज जाणुनियां ॥
जाणुनियां मज खिन्न किमर्थजि हीन दिनावरि हो दिसतां ॥
गाधिज धूर्जटि लूटियला वनिं साधन संपति हारुं हिता ॥ १६ ॥
यासम ना दुसरा जगती मधिंश्वानरुपें परि त्या तपसा ॥
काम शरासनिं मोहुनियां मती निर्दळिलें तप साज असा ॥
संभव यापदिं हा असतां मग शुक किडा तप काय करी ॥
व्यर्थ उरीं हुरहूर जडी नड थोडि परी अरिभाव सुरी ॥ १७ ॥
या ललना जग नाड मना मदचेतन संभव गा पुरुषा ॥
ना टिकला कुणिं साक्ष असी तुह्मीं भोगुनियां तनु भोगवसां ॥
गौतुम पत्नि रतोद्भव मानस संगतनूभग शाप जड ॥
चंद्रतसा गुरुकामिनि पासुनि होत कलंकित तेज दडे ॥ १८ ॥
भिल्लिणिनें हर ब्रह्मकुमारिसि नारद नारदि या रितिनें ॥
ना टिकला कुणिं ज्ञानगुणें तप भावमनें भविं शोध मनें ॥
काय कथा शुक हा कुतरा करुनी मम संगति मागुनियां ॥
आणिन मीं मति मोहुनि वोढित येथवरी आजि बांधुनियां ॥ १९ ॥

( दिंडी )

वदे ऐसी मेनिका सूरनाथा ॥ ऐकुनियां मग त्याजि सूखहेता ॥
वदे तीसी इंद्र तो प्रेमवाणी ॥ तुझ्या शब्दें तोपलों साधिवाणी ॥२०॥
आजि साधी काम हें धाम राखी ॥ तपाभंगी योगियामदें माखी ॥
साह्य घेई तूं ऋतु वसंत जाणे ॥ वायुमेघां देतसे त्वरित जाणें ॥२१॥

विडा दीला तीजला तदां चाले ॥ अभीमानें अंतरीं फार डोले ॥
घेउनीयां सर्वही संगितासी ॥ भुमीभागीं पातली भुली साची ॥२२ ॥

( चामर. )

काननीं तपोभुमीसमीप त्या सुरांगना ॥
शूकयोगियास त्रास मोहपाशिं बंधना ॥
अंगना न संग त्या अनंग मान भंगला ॥
जोहरीं रसामृतीं निजात्मतेसि जोडला ॥ २३ ॥
लोभ काम मोह दंभ क्रोध याणिं सोडिला ॥
दृश्यभाव कर्मतंत्र गूण मान फीटला ॥
येम धर्म वर्म पाहि मानसांत तोषला ॥
काळपाश नाहिं यास दूतकाणिं बोलिला ॥ २४ ॥
शूकबाळ सर्वकाळ चित्तिं मानि तें करूं ॥
त्याचि वाट सोडुनीच अन्य सर्व आवरूं ॥
नाहिं आश पाश त्यास कल्पकाळिं ना पडे ॥
योग्य हाचि पूज्य मान मानसांत आवडे ॥ २५ ॥
भ्रांति भूल घालण्यार्थ मेनिकादि अप्सरा ॥
पातल्या नजीक त्या खऱ्यापरी शुका विरा ॥
काय ते सुबोधिका अशा नरासि बाधती ॥
चांदण्या निशीचिया दिवा कशा समावती ॥ २६ ॥

( सवाई. )

जडित जडाव हिरे निळ पांचमणी नग हेमकळा भरती ॥
नयन सुचंचल वासहि चंचल मानस चंचल कामगती ॥
कटितट पाहुनियां हरि लज्जित चाल करी सम वेणिफणी ॥
तिलसुमना सरि नासिक तें जणुं चंद्रमुखांबुज त्या तरुणी ॥ २७ ॥
किति कवळ्या वयसा किति कांतिप्रभा रवि बाळगती ॥
सफळ मनोवृति साध्य समानस काम कळा भुल भावि मती ॥
मुनिवर सांन्निध वंदित येउनि साज वसंत तदां करितो ॥
सुमन सुवासिक लाल गुलाब बकूल जुई दवणा फुलतो ॥ २८ ॥

समभर पुष्पफळीं गिड नम्रपणें लवले असती डुलती ॥
समिरहि शीतल वाहत सोज्वल कोकिल आम्रतरूवरती ॥
रव करि मंजुळ मेघ तयामधिं साह्यचि होउनि तेथ बरे ॥
घडघड शब्द नभांतरिं ऊठत बादल दाटत ताप सरे ॥ २९ ॥

(स्रग्धरा.)

नृत्यालागीं करीती सुरटिप समती तालछंदीं जमावा ॥
सारंगी ही सतारी बिन करपुटिंगा झांज वीणा भरावा ॥
गातीथाटी पदांची बहुत मिति रिति गद्यपद्यादि साची ॥
हांवाभावा करोनी मतिंत मदन तो देति मोहा भराची ॥ ३० ॥
सीमा झाली तयांची परि नच चळली शूकयोगेंद्र दृष्टी ॥
नासीकाची न हाले अमन विषयिं जो तापसी ऐक्य सुष्टी ॥
कष्टी झाली मनीं हो ह्मणत वदनिं या काय आतां करावें ॥
कैशारीतीं वळे हा शुक बहु टिकला शब्द यासी वदावे ॥ ३१ ॥

( मालिनी. )

वदत मग ति रंभा शूक योगेंद्रराया ॥
बहु कटुर मती ही ना दया आणि माया ॥
सदयपण असावें अंतरीं संत याचें ॥
समभुत दिठिं भावो तोहि नाहीं स्ववाचे ॥ ३२ ॥
कुमरपण वयातें ताप कां प्राप्त केले ॥
अरुचि विषयभागीं या भवीं व्यर्थ गेले ॥
नरतनु बरवी ही लाधली भोगभोगा ॥
असुन तुह्मि तपातें जोडितां कांजि रोगा ॥ ३३ ॥
सकळ विषयभागीं कामिनी सार आम्ही ॥
त्रिभुवनिं सुख हेंची वीषयीं श्रेष्ठ कामीं ॥
मतिमधिं कठिणा वा पाहुनीयां अम्हांला ॥
अजुनि वर टिके हा काम कांहो निमाला ॥ ३४ ॥
तनुमधिं हुडहूडी शीत वाजे तपानें ॥
मम तनु सगडीही कामवन्ही रुपानें ॥

लगट सगट व्हावी प्रेमवाणी वदावी ॥
अजिंहुनि दुरिताला ठांकणें गोडभावीं ॥ ३५ ॥
तप करुनि मरावें सार्थका काय येतें ॥
कवण गुरु तुह्मांला जाणतें नाम मीं तें ॥
खचित मतिंत भोळे योगिराया तुम्ही हो ॥
गुरुवर ठक केला चोरटा जार तो हो ॥ ३६ ॥
बहुत सति तयाला भोगिल्या आणि गोपी ॥
तुजप्रति उपदेशा या रितीं देत धांपी ॥
त्यजि त्यजि अजिं साचा मंत्र हा तंत्र पाहे ॥
सुखकर बहु आहे प्राप्त तूला अजीं हे ॥ ३७ ॥
मम मन बहु वांछी आपुल्या संगमाला ॥
समिप मज धरावें मीळ आलिंगनाला ॥
तपफळ समजावें प्राप्त झालें गतीनें ॥
दिठिवरि करि पाहे प्रेमभावें मनानें ॥ ३८ ॥
इह रितिं बहु बोले शूक चित्तीं न हाले ॥
परिवरि मग बोले तेंचि पुढें कथीलें ॥
बुध श्रवणिं धरावी ही अनूताप बोली ॥
किततरि मति ज्ञाती शुद्धवैराग्य खोली ॥ ३९ ॥

( शिखरिणी )

अगे रंभे जाई कलिमलरुपे भूलमति गे ॥
नको कष्टा सोसूं मम समिप हें जाणत दगे ॥
कितीगे हे चाळे तमधृतिबळें येथ करिसी ॥
फुकां जाती सारे नच मति भरे मोह मजसी ॥ ४० ॥
असे ऊरीं जागा अनुभव सगा जाण हरिगे ॥
विवेकाचा भावो क्रुर दिठि भत्रो येन करिगे ॥
गजा त्या मोहाला पळचि सुटला या तनुंतुनी ॥
तुझ्या नेत्रांकूशें नच हरि धरी भीति सदनीं ॥ ४१ ॥

जळों तूझीं सूखें मज सम विखें वाटत खरीं ॥
सदां मोहाब्धीच्या लहरि विषमीं सांचत उरीं ॥
अवद्धा शद्वांचे तम रजनिचे खेळ तुमचे ॥
सदां दुर्गंधींचे पुरचि वपुचें मांस खणिचे ॥ ४२ ॥
मला नाहीं वांटा भुमि भवतटा आगम गती ॥
दिठीं द्वैताठायीं नच धरि चवी भाविक मती ॥
गुणाचें वाटोळें खडबडि धनू सांत तुटलें ॥
शराया कामाचा कळ नच निचा वोढि खुटलें ॥ ४३ ॥
फुकां तूं गे येथें गडवड मतें जाण करिसी ॥
अगे जाई जाई दिन दुबळिया काय वरिसी ॥
तपाच्या संधानें हिन तनु धनें नाच मजसी ॥
तुझी कांती दीप्ती चिर नगभरें वीजाचि जसी ॥ ४४ ॥
तुझ्या तेजापूढें मम मतिरूपे जाण सुनसी ॥
सुशीलांची कन्या श्वशुर घरिं ती पारकि जसी ॥
पतीलागीं मानी भितिच बरवी जाण सकळीं ॥
तसी कांतारूपें मम मति हरी मानित बळी ॥ ४५ ॥
नराचें वाटोळे धन मदबळें जाण करिसी ॥
तळालागीं न्हेसी अघतमसीं तोंडिं पुससी ॥
भवीं यागे देसी जनन मरणें मोहकपणें ॥
न तें येथें चाले भ्रमचि घडती सत्य चलणें ॥ ४६ ॥

(भ्रमरवि.)

ऐशारीतीं शुक मुख रवते ॥ ऐकूनीया मानिं साति म्हणतें ॥
खोलीयाची मति बहु दुरची ॥ शांती माता शुक उरिं स्थिरची ॥४७॥
बोले तेव्हां मुनिवर सदया ॥ कां हो ऐसा विट तरि मादिया ॥
केला तोटा नर तनु माधिं या ॥ भोळे नाहीं तुमसम भुमिया ॥ ४८ ॥
या हो अंगा नच मळ कलिचा ॥ भावो साचा तप फळ गतिचा ॥
तुम्हां चित्तीं भय अघगतिचा ॥ येथें आहे तम हिन मतिचा ॥ ४९ ॥

ज्ञानाठायीं समर्मति असणें ॥ खोटें मोठें नच मनिं धरणें ॥
कार्या अर्थी दिन जनिं कसणें ॥ हे तू पूर्वी तरि सत म्हणणें ॥ ५० ॥
या ह्मो दाना रतिसुखविषया ॥ पापा तापा नच धरि मनिया ॥
इत्सा पुर्वी नहिं तर मरतें ॥ तूझ्या रूपीं मम तनु भरते ॥ ५१ ॥

( स्वागता. )

शुक वदे पुढतीं तिला कसें ॥ समज तूं मनसा अजीं असें ॥
किंतितरी करिसी तुवां कळे ॥ बहुत गोड परी भिं नाकळे ॥ ५२ ॥
करूनियां गुणभूत झोंपडी ॥ मन पुरीं तडि त्याजि वाकडी ॥
नच खरी टिकली परी वरी ॥ धरि, प्रिती असली न दूसरी ॥ ५३ ॥
विषय हे विषसें अनूभवे ॥ रजतमीं भरती मदोद्भवें ॥
शमनसे मग या मना कधीं ॥ अभिमती जडते तमौषधी ॥ ५४ ॥
मम मता ममता द्विवीधता ॥ तळमळी जडतेचि क्रोधता ॥
तनु तुझी बहुगे बरी खरी ॥ परि अरी भय तो तुझा करीं ॥ ५५ ॥
मद शमे नच हा कधींहि गे ॥ दिन दिनीं चढती पराइ गे ॥
श्रम श्रमे श्रमणा भवांत या ॥ नच सरे तनुची कधींच या ॥ ५६ ॥
सुख कसें ह्मणसी अशास तूं ॥ भुळची ही असुनी बरीच तूं ॥
गम नसे स्वरुपीं भवामधीं ॥ कळ तुझी श्रमणेसि औषधी ॥ ५७ ॥
भव असे पदिया तुझ्याचि गे ॥ पडत नाम सकाम भाम गे ॥
मदनिधी नर हा मनोजळें ॥ शशिकळे ळळने तुझ्या तुळें ॥ ५८ ॥
शशि गुणें निधि प्रेम वीरहो ॥ भरतसे मतिवारि भारहो ॥
समपणा दडला चळेवळे ॥ लहरिया अनुभाव गे कळे ॥ ५९ ॥
ह्मणुनियां भव हा तुझी कळा ॥ वळखिली उरिंना तळामळा ॥
दडि दिली वनिया कळोनियां ॥ नच मला रुचि ती ह्मणोनियां ॥६०॥

( पद. )

देह कान वृत्ति मान पाहि हा असा ॥
मम पंथ काननांत भास भूतसा ॥ ध्रु. ॥
तनुराख देहपाक अनुभावनीं ॥
पावकास ज्ञानवास जाग्रती मनीं ॥
रात्रदीन होत हीन काष्ट शोधनीं ॥ १ ॥

नव ठायीं चीर घाई येक तूंबडी ॥
जळवास चित्त खास बोध आवडी ॥
दंडासन ऐक्यमान देतसे दडी ॥ २ ॥
येथ मान अनंता न वरी तूं किळी ॥
निजध्यान आत्ममान देहिं कांविली ॥
देवनाथ ऐक्यसंत बोलि शोधिली ॥ ३ ॥ ६१ ॥

( शार्दूलविक्रीडित )

नर्कांची तनु कोठरी विषम हे आहे मला ठाउकीं ॥
लौकीकीं तुजला, सलोभ मतिनें कामोद्भवी मान कीं ॥
प्रीतींची गठली तुझीच खटकीं कांगे नटो या मठीं ॥
ऊठी सत्वर वारवार झटसी कांगे असी तूं हटीं ॥ ६२ ॥
ऐकोनी मग यारितीं वदत ती रंभा शुकालागुनी ॥
क्रोधानें भरली बहू खवळली बोले तदां ठांसुनी ॥
ऐकेगा तपशा मला दुषण हें नाहीं मलाचें पहा ॥
स्वर्गांची ललना कला अजर ही, दावीत आजीं पहा ॥ ६३ ॥

( द्रुतविलंबित. )

असि वदे ललना वदनें क्रुरी ॥ उदर तें चिरिलें नच मी करीं ॥
नच शिरा नच लोहित मांस तें ॥ सुटत वास बहूरित भाव तें ॥ ६४ ॥
घमघमाट सुटे सम चौंदिसे ॥ दुरिवरी मित कोशाचि द्वादशें ॥
वधि म्हणे तपली तपशास, त्या ॥ तपतसे, अभिमान मनास त्या ॥ ६५ ॥
आजिं तरी तुमची समजी पडे ॥ किमपि ना निट पाहि तनूकडे ॥
मग वदे सदयांश तपोनिधी ॥ भुमिवरी समभाव मनोनिधी ॥ ६६ ॥
कटकटां ठकलों विकलों सुखा ॥ नच मला कळली तुझि कूटिका ॥
श्रम बहू उदरीं जननीचिया ॥ तनुस या घडुनी दमलों बया ॥ ६७ ॥
तव दरांमिधिं काळ सुखें बरा ॥ ठकविला असता आजिं हा बरा ॥
हरहरी स्मरुनी उगें बैसला ॥ दिन जसा धनवंत घरांतला ॥ ६८ ॥

( कामदा. )

ऐकुनी असी शुकवाणि ती ॥ वाणिती मनीं धन्य बाणि ती ॥
धन्य योगिया कामनाशका ॥ शाममानसा प्रेमळा शुका ॥ ६९ ॥

नाहिं देखिली कानिं ऐकिली ॥ बुद्धि हे तुझी आजि देखिली ॥
बाप तूंचि गा तापनाशना ॥ साच बाणली आजि ही खुणा ॥ ७० ॥
घालि पोटिं गा माझि जाचणी ॥ दीन मीं असे दासि जाणुनी ॥
पाहिले बहू योगि तापसी ॥ वीटले नची संसृती घसी ॥ ७१ ॥
नाडिले बहू पाडिले फसी ॥ गर्व मातला तोचिया कुशीं ॥
वासने मधीं थोर वाढला ॥ येथ मान हा ह्याचि शोभला ॥ ७२ ॥
हंस मंदिरीं काक ज्या रितीं ॥ येत मानुनी आपुली गती ॥
कांति वर्णिली आपुली तया ॥ नाहिं लाज ती वाटली तया ॥ ७३ ॥
काक कामिकी माझी ही, मती ॥ राजहंस तूं जाण या क्षितीं ॥
जाच सोसुनी त्रास नाहिंगा ॥ शांति या रितीं प्रेमभाव गा ॥ ७४ ॥
जात आमुची दुष्ट फार ही ॥ जाणली अजीं वाणली मही ॥
तापसी बहू काम वेसनीं ॥ नाडिले अभीमान भावनीं ॥ ७५ ॥
हे दयानिधे प्रेमसागरा ॥ सद्गुरू मुने देइ आसरा ॥
बोलुनी असें पाय वांदिले ॥ नम्र होउनी ध्यान मांडिलें ॥ ७६ ॥

( वसंत तिलका )

संताप नाशक सुखांबुज मानसा रे ॥
आनंदकारक रवामृत तोषकारे ॥
आकर्णनेत्रकमला सुविशालभाला ॥
माला जपूं तवरवे अघनाशनाला ॥ ७७ ॥
गोविंद मानस सख्या सदया मवाळा ॥
लीला अगम्य तुझि, ही, गतिनाचि काळा ॥
वैराग्य ज्ञान निजभाव स्वभाव तोला ॥ माला० ॥ ॥ ७८ ॥
संसार सागर तरोनि मनोघभावा ॥
श्रीकृष्ण भक्ति विधिनें तुंचि सख्य भावा ॥
दासानुदासि पदिं या जिव मोकळीला ॥ माला० ॥ ॥ ७९ ॥
कायामनें करुनियां जिव भाव हेतू ॥
दासीपदीं सतत मीं करि प्रेममातू ॥
जातें अजीं सुरसभे हिचि गाऊं लीला ॥ माला० ॥ ॥ ८० ॥

भंगोनि गर्व मग ती दिनमूखवाणी ॥
वाणीत शूकस्वरुपा निजध्यास वाणी ॥
गेली सभे कळहिना अभिमान गेला ॥ माला० ॥ ॥ ८१ ॥

( द्रुतविलंबित )

सुरसभेप्रति ती मग लज्जिता ॥ उभि असे दिन ते हिन मानिता ॥
नच वदे वदनीं मति भंगली ॥ गळित साज दिसे सुरिं देखिली ॥ ८२ ॥
वदत इंद्र तितें समजोनियां ॥ शुक इसी न भुले म्हणवोनियां ॥
वदन तेजकळा घासि मापती ॥ खचत मानसिं इंद्र हरे गती ॥ ८३ ॥
पुसतसे तिजला सुर ईश तो ॥ हकिगती कथि गे तप शोधतो ॥
शुक कसा धृतिते धरि धारणा ॥ मति मधीं झटतो कवणा-धना ॥ ८४ ॥
सुरपतीप्रति ती कर जोडुनी ॥ नमुनियां वदते दिन ते ध्वनी ॥
ह्मणतसे सुरनाथ सनाथ तो ॥ न च तुमां कळला मनिं मान तो ॥ ८५ ॥
शुकरुपाप्रति माप तपा नसे ॥ गुणि असोनि गुणातित हा असे ॥
वदनिं या नच तें रुप बोळवें ॥ मति अनंत गती रव सानवे ॥ ८६ ॥

( शार्दूलविक्रीडीत )

ऐका सावध मानसा करुनियां आतां शुकाची कथा ॥
ज्याचेनीं पुनितावता सकळिकां शांती सुखाही हिता ॥
होती जी मम मानसीं अभिमती रात्रीं तधीं वाटली ॥
बोधाचीं शुक उत्तरें प्रगटतां बालार्कता भासली ॥ ८७ ॥
संताची सुख संगती अनुभवें हीतार्थ बोली भली ॥
कोणी ना कसणार त्या मति धृती राया तुं कां गा भिसी ॥
नाहीं आस तयास खास तुमची इच्छाच मेली कुशीं ॥ ८८ ॥
नाहीं ताप मता तपा मड भुपा नाहीं नफा त्या दिपा ॥
आपासा ममता जया सदयता दायादता नाहिंपां ॥
ब्रह्मापासुनि कीड मुंगि वरि जो मानी मनीं सारिखा ॥
माया द्वैत जिणोनियां हरि रसें गीतार्थ बोधी टका ॥ ८९ ॥
तो, ना, मानित, मानसीं हरिहरा विष्णूस त्या आगमीं ॥
नांदे नीगम काननीं मति धृती नाहीं जया भाव मी ॥

तूं मी सर्व हि संपलें अभि मती चित्तीं नसे लेशही ॥
आशा काय तया मनीं तव पदीं चित्तीं तया घाण ही ॥ ८९ ॥

( मालिनी. )

कपट पण तमाचें मानिलें या तनूचें ॥
रजमति स्थिति भावो भाविलें भावनेचें ॥
सदय निढल सर्वे तत्व दृष्टी जयाची ॥
तम रज सम तेथें रात्रिला जाग्रतीची ॥ ९० ॥

सिण मिं जि बहु केला गायनीं हावभावा ॥
परि श्रम नच झाला काम मोहीं भरावा ॥
वदनिं हि श्रुत केले शद्ब कामोद्भवाचे ॥
सकळहि विफळावो तेथ शांतीच सांचे ॥ ९१ ॥

इहसम तिहिं लोकीं नाहिं दूजा असाहो ॥
शुक सम मति भावो ऐक्य ते हाचि ठावो ॥
बहु मुनि तपि झाले ऐकिले देखिले ते ॥
परि मति द्विविधा ती तेथ नाहीं जि नातें ॥ ९२ ॥

निज रवि उदयाची वेळ प्राप्ती शुकाला ॥
अनुभव मति आली शांति ते हो पिकाला ॥
भवहित विसरोनी प्रेम ठाया चढे तो ॥
किति तरि वदुं त्याला शद्ब हा सान होतो ॥ ९३ ॥

विधि हरि हर भावो वाच्य वाचोसि फांवे ॥
गुण रुपकळ त्याची शब्दही तेथ धांवे ॥
गुण रुप रस नाहीं भाव हा वासनेचा ॥
मन अमन शुकाचें शब्द हा शोधनेचा ॥ ९४ ॥

परिसुनि अशि वाणी तोषला इंद्र चित्तीं ॥
करित सुमन वृष्टी सर्वही कीर्ति गाती ॥
सुक मुख रव भावो ऐकण्या आर्त झाले ॥
सति सहि नृप तेथें देव ही सर्व आले ॥ ९५ ॥

समज मन तुवां हें बाण येथें स्वकार्या ॥
सदय हृदयि ठेवी नीतही ज्ञान आर्या ॥
जड तनु मति गे तूं शांत होयी अनंतीं ॥
गुरु पद नमि भावें येकनाथीं वसंती ॥ ९६ ॥

॥ पंचम समासः ॥

## सुदामचरित्र.

( शिखरि. )

पदां वंदोनीयां गुरुयति वरा नाथ सदया ॥
दया भावो ठावो सुजन मतिच्या येत उदया ॥
वदों, तोची सुखें, अनुभव सुखें, साधु, कथनीं ॥
निती, नेभार्ची, ही नच दुजि असी या जग तिनीं ॥ १ ॥
असे जाती द्वीजोत्तम शम मनो भाव गतिचा ॥
सुदामा नामें हो दिन हिन गती ऐक्य मतिचा ॥
कुटुंबी लौकीकीं सति सुत सही खोंपटि मधीं ॥
मधीं नाहीं शांती तप, सित, निरावायुहि मधीं ॥ २ ॥
असें आडें एकी गुण धृति निकी जाण खुटिया ॥
वरीं ते हो वांसे भुत कृत मिती साज मठिया ॥
कवाडाची चिंता नच मनिं तया चोर भितिची ॥
भिऊनियां गेले अरि दुरित्वरें तत्त्व न रुची ॥ ३ ॥
नसे पाका थाळी नवठिगळिची एक फुटकी ॥
तिच्या मध्यें सारे रस निपजती त्यांत रुचि, कीं ॥
नसे भिक्षा ग्रामीं गळित कण ते आणि टिपुनी ॥
तया मध्यें सारें अतिथि, मुलही आपण धनी ॥ ४ ॥
सती शांती कांती पति मती धृति योग्य मति ची ॥
सदां चित्तीं गाति गित मधुर तें कीर्ति हरिची ॥

कदां ये के दोन्हीं वदत सति ते जाण पतिसी ॥
बहू गातां कीर्ती सखा म्हणवितां ज्या दिन निसीं ॥ ५ ॥
तया हो मित्राला मिळुनि कळवा दैन्य तुमचें ॥
दिनाचा मायाळू हरिल सकळां दुःख तनुचें ॥
असें ऐकूनीयां सति प्रति वदे विप्र बरवा ॥
मला निष्कामाचा गमत सखये झोंक बरवा ॥ ६ ॥
कसें घालूं मित्रा जडमति मिसें संकट मुखें ॥
असूं सूखें कर्में गति न रुप हें भोगुनि सुखें ॥
गितीं गाऊनीयां नित अनुभवूं आजरपणीं ॥
अनंताचें चित्तीं रुचिकर रितीं शोधकपणीं ॥ ७ ॥

( दिंडी )

वदे कांता तेधवां प्राणनाथा ॥ तुम्हीं जावें द्वारके शीघ्र आतां ॥
नका मोडूं मानसीं वचन माझें ॥ निराशेनें चालणें योग्य साजें ॥ ८ ॥
कार्य कर्मी लाजणें साज साजे ॥ व्यर्थ आतां मानणें भ्रांति ओझें ॥
वाणि वाटे सत्यही ब्रह्मराया ॥ जायिं मीं गे परि भेट नाहिं न्याया ॥ ९ ॥

( वसंत ति० )

सेजारणी घरिं तदां सति जाउनियां ॥
प्रार्थूनियां पृथु मुठी गुण अर्थ माया ॥
साधू प्रती पसरुनी दिन हेत पाणी ॥
पाणींतुनी पृथु घरीं पतिपासिं आणि ॥ १० ॥
बांधावया धड नसे पट भेटि लागीं ॥
सर्वां मिळोनि बहु जीर्ण घरिं एक लुंगी ॥
जंगी मती बहु कठोर निर्ती द्विजाची ॥
काळांत काळ समयीं सुख भाव सांची ॥ ११ ॥
चिंध्या जुन्या मळकटी तिन पांच सोळा ॥
केल्या तिनें हुडकुनी गलितांश गोळा ॥
बांधोनियां गंठडिते पृथु कांत हातीं ॥
देही सती द्विज तदां करिं घेइ, हो, तां ॥ १२ ॥

हाची गमे शकुन गा प्रथमीं सुखाचा ॥
बोले सती प्रति तदां सुखभाव वाचा ॥
बोलें तुझी तुजकडे करि पालनाला ॥
जातों अजीं हरि घरीं सद् द्वारकेला ॥ १३ ॥
बोलोनियां मग उठे चळला तसाची ॥
पथा मधीं प्रथमतां शकुनाव हाची ॥
घेवोनि कुंभ शिरिं तो जळ पूर्ण योगें ॥
सामोर येत कडियेवरि बाळ रंगे ॥ १४ ॥
बोले तयाप्रति तदां सफळीक देतें ॥
आतां घरीं चल बरें स्वसुखांत न्हे तें ॥
ऐकोनियां द्विजवरा नच गेहिं तोटा ॥
संतुष्ट मानस असे सद्भाव मोठा ॥ १५ ॥
वामांकितास चलती समि काक जाती ॥
सामोरिं जंबुक पळोनि नकूळ जाती ॥
कार्यार्थ ग्रंथि दिधली द्विजराज यानें ॥
लाभार्थ हा अवगमे प्रकृतीनु मानें ॥ १६ ॥
गोविंद माधवा हरी मदुसूदनारे ॥
गोपाळकृष्ण मनमोहन अच्युतारे ॥
आनंदकंद सदया नवमेघरंगा ॥
पंथांत आननिं वदे सद्भाव गंगा ॥ १७ ॥
पोंचे बरा हरिपुरीं गुण गात वाचे ॥
द्वारावती मधिं वरा पुरि अंतरींचें ॥
नाहीं मनायि कवणा हरि अंतरंगीं ॥
जावें बरें सकळि कीं परि आत्मरंगीं ॥ १८ ॥
स्वानंद भूवन दिठीं द्विजराज पाहे ॥
शांती सुखोद्भव पुरी निरमोहि आहे ॥
गेला समीप हरिच्या तंव देव ऊठे ॥
येऊनियां नमितसे मग देइ भेटे ॥ १९ ॥

बोले अनंत वदनीं निगमाव भावो ॥
सूदाम नाम सद बोध ममोघ देहो ॥
आनंद भाव भरला स्फुरला अनंतीं ॥
नीती गती गुरुपदीं निज आत्म ज्योती ॥ २० ॥

( घनाक्षरी. )

वदे तदां मेघःशाम ॥ ब्रह्मवर्य सौख्य धाम ॥
कृतकृत्य सर्व काम ॥ पदिं धाम शुद्ध हें ॥ १ ॥
बहू श्रम द्विजराज ॥ असति झालें पंथिं आज ॥
चला आजि महाराज ॥ शब्दसाज सौख्य हें ॥ २ ॥
बैसवुनि मंदिरांत ॥ पदचुरी जगन्नाथ ॥
भाव भक्ति पंथ मात ॥ तेथ साथ सत्य हे ॥ ३ ॥
केली पूजा यथा सांग ॥ वृत्ति सदां अनूराग ॥
पुढें स्नान विधी भाग ॥ मनो मार्गे वृत्ति हे ॥ २१ ॥

( शार्दूल० )

शांती सूखनदी मधीं भरुनियां वारी घडे आणिले ॥
प्रेमाचे सद ते झरे उमटले बोधार्थ हे बोलिले ॥
चौकी आसन ब्राह्मणा यदुपती बैसावया देतसे ॥
मोठा थाट सपाट घांट बरवा स्नानार्थ हा सौरसें ॥ २२ ॥

( स्रग्धरा )

आल्या त्या हो हरीच्या सति बहु रितिच्या अष्ट सोळा हजारी ॥
सख्या मापा श्रुती ह्या निगम सद सुभ्या शांति कांती तमारी ॥
सिद्धी बुद्धी मनोभी अमन मन निधी नीज बोधीं स्वरूपीं ॥
येकांतीचा हरीचा प्रगट सदनिं हा भेटि संतासमोधीं ॥ २३ ॥

( मालिनी. )

सगुण गुण रुपाच्या फांकल्या दिव्यकांती ॥
नयन मिन तुळेचा चंचळे आत्म दीप्ती ॥
प्रगट द्विज सभेला जाहल्या, सर्वही हो ॥
नमिति पद करानें दाटणी नाहिं वावो ॥ २४ ॥

द्विज मति बहु भोळी भ्रांति झाली मनाला ॥
अभिमति विसरोनी ऐक्य तीं बोध आला ॥
दिन हिन मुळचा हा ब्रह्मभावो सुदामा ॥
गुण कृति मतिमाजीं तूटली दश्यरामा ॥ २५ ॥
मुखिं रव नच येती लाजला अंतरंगी ॥
दिठि वरिनच पाहे नाशिकीं ध्यान रंगी ॥
सकळ सति समोर्धी कामिनी बोलती त्या ॥
नमन करित आह्मी स्वामि सौभाग्य दात्या ॥ २६ ॥
वदनिं फुकट शब्दें नाहिं सौभाग्य आलें ॥
निरदय रद याचें तूळणे संत आले ॥
किति ह्मणति द्विजाला भाउजी द्याजि साडी ॥
कितिक ह्मणति आह्मां कंचुकी शीघ्र जोडी ॥ २७ ॥
खद खद किति मूलें हांसती भामिना त्या ॥
पति सख दुबळा कां दीनवाणी कसी त्या ॥
बहु विध बहु भाती बोलती हांसती हा ॥
परि चळनच झाला ब्रह्म राया मनीं हो ॥ २८ ॥
इहरितिं सकळीकीं घेउनी दर्शनाला ॥
मग विधिकृत स्नाना द्वीज तो आणियेला ॥
सगुणगुण हि लीला भावभक्ती मनाची ॥
अनुभवमति अनंतें वर्णिली बोधनीची ॥ २९ ॥

( शार्दूल. )

शांतीचे सदशोधनीं नवविधी गंगाजलें आणिलीं ॥
तैलें चंदन अर्गजा द्विजवरा कृष्णें स्वयें लाविलीं ॥
न्हाणी न्हाणित पाणि पाणि भरुनि अंगावरी अंगना ॥
अंगा चोळित पाद मस्तकवरी तो संसृती मोचना ॥ ३० ॥
चौकीचें समआसनीं बसवुनी कृष्णें द्विजा न्हाणिलें ॥
आले घेउनि मंदिरीं तदुपरी पूज्यासनीं स्थापिलें ॥
केली षोडशभाव मानसपुजा राजोपचारें बरी ॥
वस्त्रालंकारणान्वयें अभरलें जूनें तदा तें घरीं ॥ ३१ ॥

रक्षीलें निकटीं समीप सदनीं चांवी बरी देउनी ॥
आले नंतर भोजना द्विजवरा घेवोनि पाकासनीं ॥
पाकाचे सदनीं समीप बरव्या पंक्ती तदां मांडिल्या ॥
रांगोळ्या बहु घातल्या कुशळ ते वीथीमती आटल्या ॥ ३२ ॥
पक्कान्नें बहु वाढिलीं षडरसीं शाखा बहू लोणचीं ॥
रूचीचीं तिखटें मिठें मिरकुटें आलें वरी तें रुची ॥
सांबारी कथिका क्षिरी पुरि शिरा आपूप लाडू बरे ॥
सांजोऱ्या दळवे वडे चिमणिसीं बोंडें घृतें पक्करे ॥ ३३ ॥
वाढीती प्रथमाविधी नवजणी भक्त्यान्वयादायिनी ॥
मागोनी सुगमा रमा सुखरणी पट्टासनीं स्वामिनी ॥
पात्रीं श्रेष्ठ नृपासनीं सदमुदी वाढी बरा भात तो ॥
सोऽहं जो स्वरुपावभाव मतिचा शांतीवृती भावतो ॥ ३४ ॥
सर्वांचें वरि तें वरान्न बरवें हेमी प्रभा सोज्वळें ॥
अन्नें शुद्ध घृतें करोनि बरवीं चित्ते हरीचे लिळें ॥
स्वादीभाव अपूर्ण पूर्ण करण्या सर्वांवरी मीठ तें ॥
स्वानंदा उमगो मनोवृतिभवो पूर्णासनीं ऐक्यते ॥ ३५ ॥
वीरांचा समुदाव यादवगडे पंक्तीं हरीच्या बरे ॥
मध्यें द्वीज सबोध तो हरिसखा स्वानंदते आभरे ॥
सोडीलें उदकासि भावविधिनें कृष्णार्पणें आननीं ॥
आनंदासि अनंत आदर करी गीतामृतीं शोधनीं ॥ ३६ ॥

( शुद्ध का० )

हरिसखा द्विजो यादवा मधीं ॥ करित भोजना प्रेम तो सुधी ॥
अजर आमरी निर्जरी रुची ॥ भुक शमे तदां शांति ये शुची ॥ ३७ ॥
हरिघरीं क्षुधा सर्व भंगली ॥ मति द्विजोत्तमा ऐक्य लावली ॥
विसरला तदां सर्व आपदा ॥ अभिमतो सरे साम्य ये पदा ॥ ३८ ॥
करित पूर्ण हो मुक्ति चौघि त्या ॥ उठति तेधवां पंक्ति सर्व त्या ॥
हरिघरीं बरें जेविले गडे ॥ निजसुखामधीं भाव आंतुडे ॥ ३९ ॥

हरि जलें करीं मुख धूतलें ॥ अरिभयांतुनी वीर सूटलें ॥
द्विजवरा विडा देत तो हरी ॥ जडित भाव ते अष्ट आभरी ॥ ४० ॥
सुमन मंचकीं सेज नीगुतीं ॥ करुनि माधवो द्विजयाप्रती ॥
धरुनियां करीं बैसवी वरीं ॥ पुसत माधवो गूज त्या वरी ॥ ४१ ॥
अजिं जि पाय हे येथ लागले ॥ सुनम लाभ हा शोक आटले ॥
सुखि किं मंदिरीं अंतुरी असे ॥ बोल बांधवा कोणत्यामिषें ॥ ४२ ॥
सदनिं संपती संतती कसी ॥ कवण आसरा स्वार्थि तूजसी ॥
मजप्रती तुवां सांग ब्राह्मणा ॥ पटवि अंतरा आननीं खुणा ॥ ४३ ॥
हरिमुखांतुनी वाणि या रितीं ॥ सदय मानसीं कर्णि बाणती ॥
मनिं अनुभवी नंतरीं वदे ॥ वदनिं विप्र तो देव कान दे ॥ ४४ ॥
बहुत गोड हें बोलणें द्विजो ॥ वदत अंतरांतील भाव जो ॥
मन अनंत दे येथ आवडी ॥ निगम हे कथा भक्ति सावडी ॥ ४५ ॥

( विबुधप्रिया. )

माधवा मदुसूदना निजमानसा सख सज्जना ॥
का न दे मम वाणिती प्रिति भावुनी मनमोहना ॥
संतती घरिं फार ती परि संपती नच स्वप्निंही ॥
देखिली नच नेत्रिं या न जि वर्णवें जिभ भीत ही ॥ ४६ ॥
काळ ते घरिं नांदती दिन रात्रि गा सम सारिखे ॥
तारके नच मारके बहु घातकी दिन पारिके ॥
अन्न तें नच मंदिरीं सति लेंकरें उपवासि गा ॥
सुख ना परि दुःख या तनुसंगतीं दिसतो दगा ॥ ४७ ॥
हाय हाय मनामधीं सदां मुलें भुक संभवी ॥
पीउनी निर बांधिती उदरास तीं दिन कांटवीं ॥
आसरा तव नाम गा जगनायका मज लागुनी ॥
या जगीं नच दूसरा तुंच जाणसी बघि शोधुनी ॥ ४८ ॥
काय गा मज पूससी तुज ठाउकें मनिं सर्वही ॥
दीन मीं तुज भेटिला हरि पातलों तनुमान ही ॥

ऐकुनी रव यारितीं दिनपालकाप्रति ये दया ॥
या अनंत मतीमधीं निति वागती सद ती गया ॥ ४९ ॥

( वसंततिलका )

बोले हरी मग द्विजाप्रति प्रीतमानें ॥
भेटी मला वहिनिनें दिलि तेंचि देणें ॥
लाजे तदां नच वदे वदनीं सुदामा ॥
गोविंदलाघवमती उपमेसि सीमा ॥ ५० ॥
जाणीव जाग्रतिकळा कळ माधवाची ॥
जाणे मनोघ मतिची रित भाविकाची ॥
कुक्षींमधीं लपविली जिवमानहेतू ॥
दृष्टोत्पती नच दुजा हरिविण मातू ॥ ५१ ॥
झाला करें हरि तदां हिसकोनि घेता ॥
स्वानंदभावमतिनें अमनोघ हेता ॥
सोडोनि ग्रंथि मग ती पृथु एक मुष्टी ॥
भक्षी हरी प्रथमतां निजसत्त्वदृष्टी ॥ ५२ ॥
आली रमा मग वदे मज द्या प्रसादी ॥
तुह्मींच भक्षित असां न कशी उपाधी ॥
आदी अनादी मति मी तुमची जि जाया ॥
टाकोनियां मजप्रती रित ही रमाया ॥ ५३ ॥
बोलोनियां पृथु करीं बरि घेत रामा ॥
धामांतरीं मग शिरे रित हे हरामा ॥
चित्तांतरीं रित असी तिजलागिं वाटे ॥
वाटे हरी द्विजवरा तिनि लोक वांटे ॥ ५४ ॥
देईल साचचि पुढें नच कांहिं चाले ॥
सत्यार्थ हा अवगमे निगमार्थ बोले ॥
घेइ रमा रजतमा पृथुभाव मुष्टी ॥
सत्वांश भक्षित हरी मग होत तुष्टी ॥ ५५ ॥
स्वानंदता मग बरी नगरी सुदामा ॥
द्वारावतीसम रची करि ब्रह्मधामा ॥

काहीं दिनांतरवसें द्विजराजयाला ॥
वाटे मनीं प्रथमतां सतिहेत झाला ॥ ५६ ॥
जावें घरीं अजि स्वरें कसिं काय बाळें ॥
आहेत तीं कळत ना दिनभाव काळें ॥
चाळावलें मन तदां हरिलागिं पूसे ॥
पूसे दिनोक्तिगतिनें मधुरेव सासें ॥ ५७ ॥
जातों घरा यदुविरा बहु दीन झाले ॥
भेटीस अंतर नको पडुं देऊं झोले ॥
ऐकूनियां हरि वदे बहु चांगलें हो ॥
भेटी अशीच वरच्यावरि देत जा हो ॥ ५८ ॥
ठेवा बरी सकळ हीं चिरभूषणें हो ॥
आलेत त्या रितिं बरें परता स्वगेहों ॥
बोलोनिया रितिं पुढें सदसूत चिंद्या ॥
आणीयल्या प्रथमच्या भवभूतवंद्या ॥ ५९ ॥
भावार्थ अर्थ बहु खोल सबोल आला ॥
सुदाम मानसिं बहू तधिं खिन्न झाला ॥
गेला अभाव पहिला मतिचा उडोनी ॥
दिलें नगासह चिरा त्वरिताव मानीं ॥ ६० ॥
पूसोनियां सकळिकां मग चालिला हो ॥
पंथांतरीं करि मनीं बहु रंग भावो ॥
जाऊनियां सतिप्रती वदुं काय वाणी ॥
वाणींत जो निशिदिनीं जिजपासिं वाणी ॥ ६१ ॥
मूलें दिनापरि पुढें मज पाहुनीयां ॥
येतीं तदां नच तयां करि देऊं खाया ॥
मायाश्रमें पुनरुपीं द्विजराजकाया ॥
लीला असी हरि जिची बहुरंग माया ॥ ६२ ॥
ऐशारितीं करुनियां द्विज चालत ना ॥
नाना तरा अनुभवी हिनभानमाना ॥

मंथ १२४६१७५, ०। । १५०७।

0ccc3

आलों तदां स्वनगरीप्रति इथमोर्ग ॥
मानें मनांमधिं हरीपुरिभावमानें ॥ ६३ ॥

चूकोनि पंथ पुनरेव मिं द्वारकेसी ॥
आलों गमें दिसतसे पुरि हेम खासी ॥
लीला अनंत मतिची गति संत पायीं ॥
धायी स्मरोनि हरिचे गुणभाव गायी ॥ ६४ ॥

( पृथ्वी. )

सुदाम भ्रमला मतीमधिं बहू तदां गोधनें ॥
पशूप अवलोकिले मग तया वदे आननें ॥
अगा कवण हें असें नगर गा वदां नाम तें ॥
तदां ह्मणति ते सुदामपुरि ही नवी शोभते ॥ ६५ ॥

३६९३ (स्थळ प्र

खरें नच गमे विनोदमतिनें असें सांगतीं ॥
गति नच बरी पुसों दुसरिया मती बोलती ॥
दुजा अवगमे तया पुसतसे अगा ग्राम हा ॥
महा दिसतसे मला कथन हो मुखीं नाम हा ॥ ६६ ॥

तदां वळखिलें जनीं नगरिच्या नमूं लागले ॥
अगा नृपवरा सदोष हरण्या हिचीं पाउलें ॥
तुम्हां नगरि ही दिली हरिजिनें करोनी दया ॥
चला अजि त्वरा विलंब न करा हरी हो भया ॥ ६७ ॥

तदां नगरिं ती फुटे जनमुखें धनी पातले ॥
मिळोनि सकळीं प्रधानसमुदाव बघूं पातळे ॥
तयार सिबिका स्वसूखमतिच्या तयामाजिं हो ॥
द्विजा बसवुनी वरातसम त्या घरीं आणि हो ॥ ६८ ॥

तदां मनिं बहू द्विजो हळहळे ह्मणे काय हें ॥
मला हरि तुम्हीं दिलें पद महां स्वतोषास हें ॥
अनंतमतिनें निती अवगमे दया भक्तिनीं ॥
बळें घनभुमी तसी सदयता प्रिती भावकीं ॥ ६९ ॥

( शार्दूलविक्रीडीत )

कांता प्राप्त सुखोत्पती करिं वसे नीरांजनें आरती ॥
ज्ञानाची प्रभ फांकली दशदिशा बोधान्वयें वाति ती ॥
ओंवाळीं पतिला मती सुजन ते जैसी रमा कृष्णजी ॥
देवा भक्त मनोघ ऐक्यसम तो वार्ता नसेची दुजी ॥ ७० ॥
नाहीं वोळखी ब्राह्मणा अवगमे देवांगना स्वामिणी ॥
जाणोनीं वदली मुखें सति तदां कां वोळखानां धनी ॥
आहे मीं तुमची सती निजसुखा कांता बरी कांत हो ॥
झाली प्राप्त दशा अशी हरिकृपें शांतीपदीं साज हो ॥ ७१ ॥
स्वानंदें भरले मनोधृतिसमे रामे रमे संगतीं ॥
येकांतीं जन लौकिकीं समसमादृष्टी निती बाणती ॥
नामें हेमपुरी सुबोधनगरी सारी अरी त्यावरी ॥
देई कृष्ण समोघता तदुपरी झाली अनंतीं सती ॥ ७२ ॥

[ संपूर्ण. ]

---

॥ ॐ अनंताय नमः ॥

# सुदामचरित्र.

## श्लोक–द. ४ मधील.

( मालिनी. )

नमन करुनि भावें प्रार्थितों गूण ईशा ॥
गणपति मति देई तोडि या मोहपाशा ॥
करि आजि करुणा गा दातया दीनबंधू ॥
सदय हृदय देवा तूंचि गा सौख्यसिंधू ॥ १ ॥
नमिन मिं निजदेवी शारदा चत्ववाचा ॥
सुर नर वरदा ती माउली शब्दवाचा ॥

निजहित गुण गाया प्रेम दे आदिमाये ॥
सदपद सुजनांची कीर्ति गाया त्वरें ये ॥ २ ॥

गुरुपद नमुनीयां याच रूपें स्वभावें ॥
गुणरुप गुरुठायीं नाहिं हो याचभावें ॥
अजि वदनिं वदों ही प्रेमवाणी सुवाणी ॥
सुखकर रस गाणीं सज्जनांची शिराणी ॥ ३ ॥

गहिंवर बहु दाटे भाविकांचे लिलेनें ॥
इह सम दुसरा तो कोण ना रीतमानें ॥
बहु नृप मुनिं झाले संत साधू भुमीं हो ॥
परि सरि नच याची नाम सूदाम ज्या हो ॥ ४ ॥

हरिसख प्रिति भावो भावना ब्रह्म भावी ॥
द्विज कुळ गुरुरावो ऐक्यता ज्यास ठावी ॥
दिन हिन दुबळा हा लौकिकीं हो प्रपंचीं ॥
निजहिति सद रावो देखणा हा विरंची ॥ ५ ॥

तन मन धन सारें ध्यास ज्या कृष्णजीचा ॥
अभिमति तनुमाजीं नाहिं गा सत्य वाचा ॥
स्वपर नच जयाला ठाऊकें मानसातें ॥
गुरुपदचि अनंता भाव दे मानसातें ॥ ६ ॥

( इंद्रवज्रा. )

नसे वस्त्र अंगीं तनू रोड झाली ॥ नसे पोट तृप्ती सदा आंत जाळी ॥
मुलें लेंकरें संतती फार होती ॥ परी संपती नाहि हो त्यांत शांती ॥ १ ॥
असे ती सती फार सूशील जाती ॥ दरिद्रामधीं तोपत्री जी पती ती ॥
नसे निंद्य वाणी सदा हास्य मूखीं ॥ परी कष्टतां होतसे फार दुःखी ॥ २ ॥
समस्तां मिळोनी नसे येक वस्त्र ॥ कशाचें तया भोजना पाकपात्र ॥
मुलीं तीन आडीं वरी पांच वांसे ॥ कवाडें कशाळा नसे चोर पोसें ॥ ३ ॥
ऋतू उष्णकाळीं बहू ताप सोसी ॥ शिरीं वृष्टि तैसी त्या दिनीं तीहि सोसी ॥
बहू हाल ते वर्णितां दुःख वाटे ॥ हरे दातया काय हें कर्म खोटें ॥ ४ ॥

नसे ग्रामधामीं कदां भिक्षुकी ती ॥ नसे सोयिरा आप्त कोणी विपत्ती ॥
भुमी भागिचे वेंचुनीयां कणांतें ॥ गळीतावरी काळ लोटी बहू ते ॥ ५ ॥
भरे ना कदा पोट तें अल्पही गा ॥ निराची असे फार ती हो तुगी गा ॥
पिऊनी जळा पीळ पोटीं नळांचा ॥ मुलें आक्रुषें होतिं तीं हीन वाचा ॥ ६ ॥
सदाचारयोगें अशा आश्रमातें ॥ अतीथी पुजा पंचयज्ञादि होते ॥
करी आदरें थोर औदार्ययोगें ॥ अनंता मनीं मानसीं ह्याचि वागे ॥७॥ १३ ॥

( शुद्ध कामदा. )

वदत ते सती आपुल्या पती ॥ हरि तुमां असे मित्र हो क्षिती ॥
बहुत वर्णितां बाळकौतुकां ॥ ह्मणतसां बरा आपुला सखा ॥ १ ॥
अजिं मला सुचे स्वामि ऐकतें ॥ वदतसे तुमां हीत आमुतें ॥
सदन स्नेही तो माधवो बरा ॥ अजिं चला तुमीं दर्शना त्वरां ॥ २ ॥
दिनदयानिधी नाम वर्णितां ॥ दिनपणामधीं तुह्मिं शोभतां ॥
अजिं चला कसें दैन्यहारि तो ॥ बहुत तोषवी सर्वसाक्षि तो ॥ ३ ॥
बहुत संपती देइ नगुतीं ॥ हरिल आपदा दैन्य दुर्गती ॥
बहुत चांगलें आजिं सूचलें ॥ पति चला त्वरें फार हें भलें ॥ ४ ॥
वचन ऐकुनी ब्रह्मभाव तो ॥ वदतसे तिला बोल खोल तो ॥
निगम मानसां लक्ष दक्ष तो ॥ आजिं अनंतिं हा पक्ष मानसो ॥ ५ ॥१८॥

( शिखरिणी )

अगे प्रिये ऐके मम हृदयिचें मानस बरें ॥
कसें मित्रालागीं दिनपण कथूं योग्य न बरें ॥
मनीं निःकामाचा सदयपणिंचा मोड उगवे ॥
नसे दृश्याभागीं मति अभिरुची जाण बरवें ॥ १ ॥
कसें घालूं त्याला नरतनुगुणें संकट बरें ॥
बरें नाहीं हीतां अभिमति पदां आजिं घसरे ॥
दुरूनीयां घेऊं वदनिं बरवें नाम हरिचें ॥
नको जाणें तेथें अनुभवपणें भोग सुरुचे ॥ २ ॥
असे निःकामाचा हरि सख बरा स्वात्मभुवनीं ॥
सुखी राहे तूं गे गतिनरुप हे भोग धरणी ॥

असें प्रारब्धीं जें लिखित लिहिलें भोग बरवें ॥
तसें भोगूं सूखें दिन ढकलुं हें जीवें परवे ॥ ३ ॥
क्षणेका वस्तीचें तनुपण असे मृत्युभुमिचें ॥
नसे याला कांहीं हित अनहितीं भेदपणिचें ॥
मनाचे हे धंदे सकळ भ्रमणा भ्रांतिपण गे ॥
अगे मोहाब्धीचें लहरिपण हें द्वैत मन गे ॥ ४ ॥
निराधारें राहूं हुरहुर बहू मानसिं नको ॥
नसे दैन्या ऐसें व्रत महिवरीं प्रेमचि पिको ॥
विपत्तीच्या वेळें भजन घडतें माधव जिचें ॥
असें माचें नातें धवपण मुखा तेथ न रुचे ॥ ५ ॥
सदानंदीं प्रेमा हरिगुणकथासारमथिका ॥
मिळे शांती ठायीं अनुभवरुपें शोधक निका ॥
वदों सूखें मूखें रव, हरिकथा रात्रंदिन हो ॥
अनंताला गोडी जडत बरवी साक्ष सदही ॥ ६ ॥

( वसंततिलका )

कां हो पती निति अशी वदतां मला ही ॥
निष्कामता जरि असे तुमच्या स्वगेंही ॥
निष्कामयोग मतिनें हरिलागिं भेटा ॥
तोटा नसे किमपि तो उभयांत मोठा ॥ १ ॥
जाणें बरें दिसतसे अजि द्वारकेसी ॥
मोडूं नका वचन हें मनिं व्हाच खूषी ॥
सर्वांतरी सम हरी हरिभेटि होतां ॥
द्वारावती अनुभवी निजसूख हीतां ॥ २ ॥
आहे तनू सगुण ही भविं मानवाची ॥
जोडी नसे दुजि असी तिन लोकिं साची ॥
लीला हरी जिचि मुखें सगुणेक गावी ॥
शांतीपदां मिळविण्या सदभेटि घ्यावी ॥ ३ ॥

स्वानुभवास समसाम्य स्वभाव भेटी ॥
भेटीविणा नच दुजें सुख येथ पोटीं ॥
साक्षीविना अनुभवो हरिवीण भावो ॥
जैसी प्रजा नृपविणें अभिमानि देहो ॥ ४ ॥
कांताविणें सति जशी हरिवीण बुद्धी ॥
सिद्धी नसे तपविणा समवीण शुद्धी ॥
शांती पदीं हरि जिचा ह्मणुनीच भेटा ॥
नाहीं अनंतसदनीं किमपीहि तोटा ॥ ५ ॥

(स्रग्धरा.)

पाहे चित्तीं विचारी अनुभवचतुरीं देव सूदाम देवो ॥
कांता श्रद्धा निजाची सतिपण नितिची दाखवी ऐक्य भावो ॥
जावें भेटी हरीच्या सदपदगमिच्या आगमा पैलपक्षी ॥
दक्षी लक्षी सुबोधी नच गम इतरां पंथ संतीच पक्षीं ॥ १ ॥
कांतिलागीं, वदे तो सति बहु बरवें द्वारके आजि जातों ॥
वाणीचा त्या रसानें रव मुख मुसिनें भाव चित्तांत येतो ॥
आहे येथें उणावा दिनपन समयो काय भेटीस न्यावें ॥
साक्षात्कारीं समोधीं हरि करिं बरवें आदरें काय द्यावें ॥ २ ॥
जाऊं कैसा तरीं मीं रित उचित नसे रिक्तशाणी पणाची ॥
बोले आतां प्रिये तूं रुचिकर तुजला वाटतें आजिं तेंची ॥
आहों आम्हीं प्रपंची तनुमन करुनी साधनीं आगमाचा ॥
पाहे पाहे निवाडे बहु अवघड हे बोल गे सत्यवाचा ॥ ३ ॥
सूचे कांते तदां ते शुचिमति श्रुति तें पाहणें आजि पाहें ॥
साधूपाशीं त्वरेनें पदर पसरुनी मागते स्वल्प पोहे ॥
द्यावे आजीं सबोधें सुजनसमपदें काम हें आजि माझें ॥
न्यावें सिद्धी त्वरेनें सदपदवदनें मानणें नाच बोजें ॥ ४ ॥
आणी मुष्टी गुणाच्या तनमयपण तें साधनीं साध्य झालें ॥
सूखालागीं जमावो गुण पृथकपणें हे पृथू येथ झाले ॥
गेलें दूरीत सारें प्रथम शकुन हा थोर भाग्येंचि झाला ॥
जोरा होई गुणानें सकळ कळपणें खोल हा बोल आला ॥ ५ ॥

निर्वीकारीं गुणाची गरज नसतसे प्रत्ययीं वेगळें तें ॥
साकारीं गूण बा हे पृथक पृथुपणें जाणती जाणते तें ॥
कार्याकर्मीं गुणाची बहुत सुगमता भक्ति गूणेंचि पाहे ॥
भेटीलागीं अनंतें सुगमपणमतें जोडिले शब्द जो हे ॥ ६ ॥ ३५ ॥

( भ्रमरविलसित )

पोहे आणी तिन मुठिभर ते ॥ सेजाराचे बहु गुग वदते ॥
पांचाठायीं झटपट करुनी ॥ आली हो ती पतिप्रति सदनीं ॥ १ ॥
स्वानंदाची सुगि बहु वदनीं ॥ संतोषाची घडिमन दमनी ॥
बोले कांता प्रति सति बरवी ॥ ध्यावे स्वामी पृथु भय हरवी ॥ २ ॥
बांधायासी नच पट घरि त्या ॥ पाणीपात्राविण अनुकुळ त्यां ॥
नाहीं कांहीं धड घरिं चिंदिही ॥ दुर्भिक्षाची मुकुट पदवि ही ॥ ३ ॥
बाणा गूणीं मळकट चिंधिया ॥ गोळा केल्या सदसुत समया ॥
गांठोडी ती नवविध ठिगळी ॥ बांधायाला सुत नच सबळी ॥ ४ ॥
गुंडाळीलें लटपट करुनी ॥ शामाभेटी सद्पदमथनीं ॥
संतोषानें मग द्विज वदतो ॥ जातो आतां पथबहु दुरतो ॥ ५ ॥
मूलें बाळें तुझि तुज जवळी ॥ सांभाळावीं निजप्रितिं कवळी ॥
रात्रीभागीं भरभर सगळीं ॥ प्रातःकाळीं द्विज गुग रवळी ॥ ६ ॥
प्रासी बोधां अनुभव समयो ॥ भानू आधीं अरुगचि उदयो ॥
साधी मुहूर्ता विनय समज हा ॥ हाची आहे फळदपप्रद हा ॥ ७ ॥
चाले चाली स्थिरपणिं गतिची ॥ चित्तीं चिंता अभिमति न सुची ॥
अनंताला तळमळ मुळची ॥ गोडी मीळे अनुभवकुळिची ॥ ८ ॥४३ ॥

( स्वागता. )

यदुपती पदिं हेत ठेउनी ॥ द्विज तदां धरि मार्गशोधनीं ॥
शकुन ते बहु चांगले तदां ॥ प्रथम कामिनि शिरिं त्या पदां ॥ १ ॥
नव घडा भरुनी जळें बरा ॥ समुर येत असे बहुत्वरा ॥
मुल कडेवरि हो सुवासिनी ॥ वदतसे कुमरा तुंरे धनी ॥ २ ॥
सकळ देइन रे तुला घरीं ॥ सुखि असे घडि येक रे बरी ॥
द्विज मनीं रव हेत ऐकुनी ॥ बहुत तोषतसे स्वआसनीं ॥ ३ ॥

पुढतिं तास हि वाम जाति ते ॥ बहुत लाभ शकून दाविते ॥
कळप धेनु समूर पातला ॥ अनुभवो समजे निमा तुला ॥ ४ ॥
क्रमित पंथ पुढें सुदामजी ॥ सदयमानस साधु हाच जी ॥
वदतसे हरिनाम आननीं ॥ बहुत मंजुळ येतसे ध्वनी ॥ ५ ॥
पदपदीं स्मरतां यदूविरां ॥ घडतसे मख हा समीं बरा ॥
म्हणुनियां भावें या आनंत हा ॥ स्थुळरुपें नटला गुणाव हा ॥ ६ ॥

( चामर. )

प्रेमभाव ब्रह्मराव देहनांव द्वारका ॥
आद्य देश साधु भेष साधनाख्य साधकां ॥
संत हा सुदामदेव ब्रह्मनिष्ठ मूळचा ॥
भावभक्ति सांख्ययुक्ति नीजशक्ति कूळिचा ॥ १ ॥
सर्व कर्मसिद्धि अर्थ साधनार्थ साधिलें ॥
स्वानुभाव प्राप्त जेथ दृश्य अर्थ आटले ॥
गूण सृष्टि ऐक्यग्रंथि कर्मतंतु साधनीं ॥
बांधुनीच पोंचलें जि बाह्यदेश चालुनी ॥ २ ॥
नंदनंद नीजकंद भावछंदिं ऐक्यता ॥
भक्तिजोर जेथ थोर नाहिं घोर ये हितां ॥
आननीं आनंत हा अनंत नाम गायि रे ॥
संतसाधु पादपाशिं भाववृत्ति ताजि रे ॥ ३ ॥

( शार्दूल. )

पूरी द्वारवती निती निगम ती नेती वदे वेद ती ॥
गूणातीत अतीत बोधकमती शब्दां नसे वाच्य ती ॥
बोलूं बाह्य दशा वना उपवना मूमुक्षुच्या साधनां ॥
घ्या कानांवरि आमना मन जनां शांतीपदां साधनां ॥ १ ॥
आहे हा गड बोधिंचा निजधडा वाडा निवाडा मना ॥
प्राणापान समान व्यान रमती ऊदान ऐक्यीं वनां ॥
स्वानंदें सततीं वसंत ऋतु हा राहे बरा काननीं ॥
संतांचीं सदमानसें स्फुरतिं तीं कोकीळकंवूध्वनीं ॥ २ ॥

गाती सुस्वर गायनीं हरिकथा शोधानुभावा निती ॥
नीती पाहुनि नारदादिक मुनि संतुष्ट होती मतीं ॥
बोधाचा अरुणोदयो सम मनोभावो प्रभा संभवे ॥
प्रेमाचीं कमळें सरोवरिं भालिं अष्टादळीं तादवें ॥ ३ ॥
प्रेमाचे मकरंद सेवित बरे जाती अली षट्पदीं ॥
मूमुक्षु भ्रमरें अमोदरस तो सेवीत रुंजी मदीं ॥
रुंजीचा रव रौरवां मिटविण्या कानीं धरी रे धण्या ॥
लीहीलें निजकागदीं अनुभवीं गूजामृतां बोधण्या ॥ ४ ॥
रावे मोर गिडावरीं बसुनियां ठावो रवो माधवो ॥
वीचारान्वय सांख्यशास्त्र सद तें शाखेवरी संभवो ॥
नाना जाति तरू बरे सरळ ते जाती अनेकां निती ॥
फांदे पल्लव मंडणीं विलसती वायू गुणें डुल्लती ॥ ५ ॥
वृक्षीं माधवि वेष्ठुनी विलसते बुद्धी गती सूक्ष्मीं ॥
गेल्या भेदुनि मानसां नवविधीं कर्मीच त्या आगमीं ॥
रंगे शाम सुवास दायक फुलें आलीं भरां आभरें ॥
शांतीची सद साउली पसरली मध्यें समोर्घी झरे ॥ ६ ॥
कांटे ना गिडते धडे निजगडे स्थीरांश ते शोभती ॥
आंबे नाराळि पोंफळी करदळी पारीजते शेवती ॥
द्राक्षाचे घड पीकले रसभरें पाकें परीपक्क ते ॥
गोडी ही बहुगोड स्वानुभव ते घेती चवी जाणते ॥ ७ ॥
ऐसें हें वन द्वारके समिपचें संतोपदातें मना ॥
सूदामा मनिं पाहुनी हारिखला नावेक हो आमना ॥
शोभा पाहत पूढतीं चलतसे द्वारावती लागुनी ॥
नाहीं वर्णन आननीं घडत हें साक्षी अनूभावनीं ॥ ८ ॥
पोंचे ब्राह्मण द्वारके तदुपरीं ऐके मना पूढतीं ॥
नीतीचें घर हें सबोध कसणी ज्ञानास येथें गती ॥
खाणी नीगम खाणुनी अनुमतें हीरे जडीले गितीं ॥
नाथाचें सदनीं अनंत मतिनें चित्रेंवळी लेप्यतीं ॥ ९ ॥ ६ ॥

( वसंततिलका )

द्वारावती प्रति तदां द्विज पावलासे ॥
द्वारावरी चवथिया दिनभाव वेषें ॥
पारेकरी हुजुरचे मत ज्या पुकारी ॥
तूं कोण कोठिल द्विजा दिससी भिकारी ॥ १ ॥
सूदामदेव वदनीं मग तो स्वभावें ॥
भांबावुनी वदतसे हरि बंधुनांवें ॥
आजीं हरीस कळवा तुमिं जाउनीयां ॥
सूदामनामक असे सद्ब्रह्मकाया ॥ २ ॥
भेटीस येथ बहु वेळ उभा असें मीं ॥
नीरोप मात्र कळवा हरिलागिं धामीं ॥
येईल धांवुनि सखा दिनबंधु माझा ॥
गांजूं नका आजि तुम्मीं नच अंत काजा ॥ ३ ॥
ऐकोनियां द्विज मुखें रव त्या रितीचे ॥
हांसें बहू भरतसे जन मूखवाचें ॥
गाती कृपाळ हरिचे मग ते शिपायी ॥
हिणाविती सकळही दुषणावह घायीं ॥ ४ ॥
कोठें तुला दडविलें दिन येवढें हो ॥
झाला असे उदय काळ बरा अजीं हो ॥
आली दया मग तया कळवीत मातू ॥
सायोज्यतापद समोघ मनोघ हेतू ॥ ५ ॥
देवाधिदेव सहजासनिं बैसलासे ॥
स्वानंद कंद मनमोहन शामदीसे ॥
माळा अपाद रुळते मणिकौस्तुभाची ॥
लावण्यदीप्ति उदयो समता प्रभेची ॥ ६ ॥
वीशाळ नेत्र सहजींपण देखण्याचें ॥
आपापणा रिजविगें गति ऐक्यतेचें ॥
वंदोनियां जलधिजापतिच्या पदातें ॥
वर्णीत ते मग शिपायि सुदामजीतें ॥ ७ ॥

स्वामी अजी दिन बहू हिनकांति देहो ॥
सूदाम नाम वदतो ह्मणतो सखा हो ॥
बंधू असे हरिजिचा अशि वाणि बोले ॥
कानीं पडे तंव हरी भुमि भागिं आले ॥ ८ ॥
झाली बहू गडबडी मग देवरायां ॥
माया बहू दिनजनीं करितो उपायां ॥
आजीं अनंत सदनीं द्विज पोंचलासे ॥
भावी अनंत दिन हा सुखभाव खासे ॥ ९ ॥ ७० ॥

(विबुधप्रिया)

धांवुनी पद वंदिले निजमस्तकीं सद प्रेम तें ॥
कृष्णजी बहु नाटकी मिठि घातली दिनमानि ते ॥
भाविकां प्रतिपालनां हरि सारिखा दुसरा नसे ॥
देतसे मनि मानिते निज सेवकीं प्रिति फारसे ॥ १ ॥
आदरें द्विज आणिला निजमंदिरीं बहु कौतुकें ॥
वाजती बहु ढोल ते सनया तशा करणें तुकें ॥
नाचती बहु अंगना ष्टपदें समीं रव केकिचे ॥
ताल छंद सुबोधनीं सम ऐक्यतें गति आत्मिचे ॥ २ ॥
आसनीं वसवूनियां सद ब्राह्मणा प्रिति भावनीं ॥
नम्रतें कर जोडुनी जनवंदिता हरि होऊनी ॥
वीनवी बहु लाघवी मधुरोक्तिनें द्विजराजयां ॥
भाग्य हें मम आज गा उदयासनीं तव पायिं या ॥
आज हो बहु लाभहा दिठिं देखिलीं तव पाउलें ॥
माउले बहु चांगलें मनिं रूचलें सद प्रेमळे ॥ ३ ॥
नाहिं गा जगिं आणि तो तुससारिखा दुसरा सखा ॥
देखणा निज आत्म तें समसाधनीं तुळणे तुकां ॥
भाविका गुण सात्विका निढळाकृती तुझि ही लिळा ॥
ऐकण्या रून धांवतें गड प्रेमिच्या नव गोडिला ॥ ४ ॥
बोलुनी अशि वाणि ती हरि बैसले समिपासनीं ॥
नाहिं गा हरिलागिं या उपमा महीं बहु शोधनीं ॥

भावची सम ऐक्यता मनिं पाहिजे हरि देखण्या ॥
ऊपमा नच साक्षिची अनुभावनीं चविरे धण्या ॥ ५ ॥
सेविका पदिं बैसवी बहु तोषुनी बरवा हरी ॥
भाविकां वरि प्रेमता सुख सिंधुची लहरी सरी ॥
भक्तिचा निजदादला यदुकूळिचा धणि माधवो ॥
हा अनंत मनामधीं दिनरात्र हो हरि संभवो ॥ ६ ॥ ७६ ॥

( दिंडी० )

तदां आल्या कामिनी कृष्णजीच्या ॥ प्रभा फांके मंदिरीं ऐक्यतेच्या ॥
प्रथम आल्या फार त्या सहस्रसोळा ॥ श्रुती वेदां जवळि त्या होति गोळा॥१॥
तयापाठीं मागुनी महासिद्धी ॥ येति शांती अनुभवीं ऐक्यबुद्धी ॥
जणी अष्टा स्वानंद कारणी त्या ॥ हरीलागीं मिळणिच्या नित्य होत्या ॥
झालि गर्दी मंदिरीं सर्व गोळां ॥ सुदामा तो गडबडे विप्र भोळा ॥
सकळ त्याहो लाविती डोइपायीं ॥ सुचेनाची तेधवां द्विजागेहीं ॥ २ ॥
कोणि घेती तीर्थ तें भावभक्तीं ॥ कोणि पुष्पें वोपिती विविध जाती ॥
कोणि भाळीं लाविती चंदनाला ॥ कोणि नेत्रीं पाहती ऐक्य लीला ॥ ४ ॥
ब्राह्मणाची दृश्य ती बुद्धि धाली ॥ स्वानुभावो प्रेमता दृष्टि झाली ॥ ॥
देह गेहीं हेत ना ब्राह्मणाचा ॥ वाच्य वाचा परादि शांत साचा ॥ ५ ॥
गेलि ममता टाकूनि दूर गांवा ॥ चित्त धालें अंतरी ऐक्यभावा ॥
वदों तेव्हां विसरला बाह्यवाणी ॥ गूणतूटी जाहली अतितवाणी ॥ ६ ॥
ऐसि बाणे साक्षांतकारि साक्षी ॥ अंतरिक्षीं दक्ष तो पक्ष लक्षी ॥
अनंताला लाधली येथ गोडी ॥ साक्ष देण्या अनुभवीं खूण थोडी ॥७॥ ८३॥

( वसंततिलका )

ऐशा रितीं सकळ त्या हरिच्या सुदारा ॥ भेटोनि वंदिति बहू सद त्या उदारा ॥
स्नानास नीर मग तें बहु आणियेलें ॥ घंगाळ रत्नखचितींमधिं ओतियेलें ॥१॥
गंगोदकें भरुनिया घट हेमपात्रें ॥ स्वासीक चंदन बरें निळरामपात्रें ॥
तेलें सुवासिक बरीं दवणा गुलाबीं ॥ जीं काढिलीं निजमुसींतुनि थेंब थेंबीं ॥२॥
चौरंग मांडुनि बरा वरि द्विजराणा ॥ आणोनियां बसविला हरिनें प्रमाणा ॥
लावीयलीं प्रथम तीं सकळीक तेलें ॥ धूळें तसें पट बरें बहु जीर्ण मैळें ॥३॥

अभ्यंग स्नान स्वकरें मग देव घाली॥ खोली असे बहुत येथ रसाळ बोली ॥
जो तापला अनुतपें बहु काळ भारी ॥ वैराग्यशील सदशोधन हीतकारी ॥४॥
झाले बहू श्रम तया हरियाच हेतू ॥ उष्णोदकें करुनियां श्रम हारवी तूं ॥
आधींचभाविक स्वभाव मतींत भोळा ॥ सूदाम नाम बरवें म्हणुनीचं बोला५
चोळीत पाठ उर पोट करें करूनी ॥ चूरियलें पद बरें निज हेतमानीं ॥
नाहीं मळी अमळता मुळचीच देहीं ॥ झाला म्हणोनि हरि हा स्वसुखास स्नेही ६
पूसीयलें सकळ अंग पितांबरानें ॥ वस्त्रें दिलीं बहु बरीं नववीध मानें ॥
नेसोनियां पितपटा उपवस्त्र शेला ॥ संतोषकारक मना बहु होत त्याला ॥७॥

आणीयलें मग पुढें निज मंदिरातें ॥
स्वानंद भूवन बेंर हरिभावना तें ॥
केली पूजाविधि रूपें सदवासुदेवें ॥
गंधाक्षता धुपदिपादि स्वभाव भावें ॥ ८ ॥

नीरांजनें दिप बहू समया जडावी ॥
फांके प्रभा चहुं दिशें बहु ही नवाई ॥
मांडोनि पाट बरवे समअष्ट भावो ॥
ताटें जडीत जडणी रस आत्मभावो ॥ ९ ॥

रांगोळिया सरळ झोंक समोघ वेलीं ॥
चित्रें विचित्र कुशलाव नवाव बोली ॥
पंक्ती तदां बसविल्या विर यादवांच्या ॥
जो आत्मबोधकमती असल्या विरांच्या ॥ १० ॥

घेती मधीं द्विजवरा हरि त्या समीपीं ॥
जो कौस्तुभांकित असे घननीळरूपीं ॥
पाहे अनंत सकळां प्रितभावमानें ॥
गोडी अनंत मतिला निज भक्ति मानें ॥ ११ ॥ ९४ ॥

(शार्दूलविक्रीडित)

अन्नें वाढित शांतिच्या करतळीं मुक्ती बऱ्या चौघिही ॥
दावी भाव स्वभाव सादर जनां नामामृतें जोडही ॥

आणी त्या नववीध भक्ति बरव्या ज्ञानामृतादायिनी ॥
आधांचिया बहु वृद्ध ह्या सदगुणी बोधालयीं वासनी ॥ १ ॥
शाखा वाढित फार त्या बहु तरा भेंडे मुळे दोडकीं ॥
नाहीं वावडि अंतरीं बहु बरी पुष्टीकळा जोडकीं ॥
केळीं कारालिं बांवच्या फणस ते आणीक तीं वांयगीं ॥
रांधीलीं सगळीं अती रसिक हीं सोहंसुखा वानगी ॥ २ ॥
आंब्याची नव लोणचीं खिसमिसीं कोशिंबिरीं रायतीं ॥
नाना पापड सांडगे मिरकुटें क्षारादिकें तीक्ष्ण तीं ॥
मांडे घावन पोळिया क्षिरि तशा लाडू बहूतांपरी ॥
सूरोळ्या गुळपापडी पुरी वडे आपूपलाडू वरी ॥ ३ ॥
दुग्धाचें बहु रायतें भरुनियां वाट्या पुढें ठेविल्या ॥
कानोले बहु चांगले मुरांडिचे आणी जिलेब्या भल्या ॥
येलापांहिब सांदणें उकडिचीं रोट्या शिरा शीघ्रणीं ॥
स्वादाची कुसरी चवी अनुभवी आहे बरी मंथनीं ॥ ४ ॥
सांबारीं कथिका पनें बहु रुचीकारें असे आजरीं ॥
बारीजाक्ष घरीं नसे उणिवता अभ्यंतरीं ही सरी ॥
सोहं सूक्ष्मभात तो नृप असे भोज्यासनीं श्रेष्ठ ते ॥
वेळोनी बहु चांगला सुमनसा मद्धें मुदी ऐक्यते ॥ ५ ॥
केला साखरभात केशरगुणें गोडी हरी जाणता ॥
पंक्तीचें बहु भाग्य हें नवविधी भक्तीगुणें ये हितां ॥
वाढीलें वरितें वरान्न पिवळें दाटे मुदीच्यावरी ॥
तूपें साजुक त्या वरीं पळि पळीं वाढीयलीं सौभरीं ॥ ६ ॥
अन्नें शुद्ध घृतें मनें हरिगितें भावें तनू शुद्ध ही ॥
गोडी येथ बरी असे कुसरिची जेवी तयां ठाव ही ॥
वैराग्यें अनुतापले अनुदिनीं ज्ञानोदया पोंचले ॥
दृश्याचें खटलें तदां मिटुनियां बोधाब्धिला जोडले ॥ ७ ॥
तेथे द्वैत सरे भरे सदयता ऐक्यान्वयो आभरे ॥
स्वानंदें मग भोजना बसवि त्या हा हो हरी सौभरें ॥

भावें, शोध, करा, घरां, निजपुरां सारा धरा, मावरा ॥
वारा, ताप, तपा, मनीं, अनुभवें, जोरा, करारे नरा ॥ ८ ॥
ऐसें, हें, हरिपंक्तिचें, षडरसें, जेवा बरें, अन्न, तें ॥
टांकोनी, ममते, सरा, हरिघरीं, सूदाम पंक्तीस तें ॥
फूकां जन्म नकां गमावुं उगें हा लावा पदीं सार्थकीं ॥
वार्धक्यीं नच काम हें घडतसे बुद्धी तधीं भ्रांतिकीं ॥ ९ ॥
सर्वांमागुनि वाढिलें मिठ बरें पात्रें तदां पूर्ण तीं ॥
सर्वी स्वाद असे म्हणोनि वरि हें वाढावयाची रिती ॥
जैसें वाक्य गुरूमुखें अनुभवां देतें चवी अंतरीं ॥
बाणे बोधखुणे उणेपण नसे सद्भाव पात्रांतरीं ॥ १० ॥
शांतीचे सदनीं मती रमणुके जाई तधीं हें कळे ॥
स्वानंदें मग भोजनां बसति ते येकाग्रतेचें बळें ॥
जेवीतां नच कोण तेथ बहुसें पूरे म्हणे आननीं ॥
वाढी जेथ रमा समानपण तें चिच्छक्ति ही साधनीं ॥ ११ ॥
पट्टाची वनिता अनादि सरिता ताताचि ही कन्यका ॥
आका शेख जिची सकाम भुलि हे नव्हे बरे साधका ॥
दैवी संपति अष्टभावीं बरवी नोहे असूरी भुली ॥
बुद्धी जी दिनरात्र कृष्णचरणीं स्वानंद तें शोभली ॥ १२ ॥
श्रद्धा भूक निमे स्वसूख तार्थे तें देती बरें ढेंकरा ॥
जेवीले हरिपंक्तिला इहरुपीं आरामता आभरा ॥
सर्वेची मग आंचवोनि बरवें संसाररूपीं जळें ॥
केलें हो करक्षाळणादिक तधीं गूणास सोडीतलें ॥ १३ ॥
झालें या रितिं येथ भोजन बरें चिंता मनाची हरे ॥
वारे काम समूहता दुरिं लपे शांती स्वदेहीं भरे ॥
गेलीं तीं दुरितें सकोप मति गा गातां अजाती हरी ॥
नाथाचे पदिं हा अनंत मिळला केलें असें आजरी ॥ १४ ॥१०८॥

( दोधक )

हिंम्मतवाले चित्तिं निमाले ॥ संसृतिधाले बोल अबोले ॥
पानविडे ते मानस हेतें ॥ कर्पुरकातें सौम्यचि नातें ॥ १ ॥

वेळ लवंगा फार सवंगा ॥ अर्थ समोघा भावचि ओघा ॥
बोध सनातें पूगिफळातें ॥ जाइफळादीं पूर्ण सुहेतें ॥
ऐक्य सुरंगीं रंगत रंगीं ॥ काळ सुळाकी काळि तवंगीं ॥ २ ॥
देत हरी जी भक्ति वरी जी ॥ प्रेम रसाळा शक्तिसुता जी ॥
छंद अनंतीं शोधक मत्तीं ॥ सर्वहि सत्ता या भगवंतीं ॥ ३ ॥ १११ ॥

( पद. )

भेटी श्रीकृष्ण सुदामाजीची ॥ अंतर भाव बळें ॥ ध्रु० ॥
सुमनसेजे येकांत ॥ वरी द्विज तो निभ्रांत ॥
पुसतसे हरी मात ॥ परम येकांत जाणोनी ॥ १ ॥
आहे सुखी कीं मम वहिनी ॥ भावभक्तिची भगिनी ॥
कांता तुमची जी सदनीं ॥ आदिं वदनीं सांगा हो ॥ २ ॥
सुशीळ जीचा स्वभाव ॥ नाम ठेवाया न वाव ॥
शांतीसुखाचा जो ठाव ॥ प्रेमभाव भेटवी ॥ ३ ॥
संतति संपत्ति घरदार ॥ वृत्ति भूमि नृपाधार ॥
सांगा सर्वांहि सारासार ॥ काळोद्धार कैसा हो ॥ ४ ॥
बहु भाग्यें तुमची भेट ॥ झाली सन्मुख ही थेट ॥
भक्तिभावाचा हा नेट ॥ अहंवेट तोडुनी ॥ ५ ॥
ऐकुनि बोले सुदाम देव ॥ साक्षी तूंची स्वयमेव ॥
त्रिजगतीं तुझी ठेव ॥ देवाधिदेव अनंताचा ॥ ६ ॥ ११२ ॥

( कामदा )

ऐक कृष्णजी सर्व जाणत्या ॥ काय सांगणें खूण बाणत्या ॥
सर्व भाव हा हेत तुमचा ॥ येथ ना दुजा लक्ष दक्षिचा ॥ १ ॥
संतती असे अष्टवर्गी ती ॥ संपती दुरी आमुतें भिती ॥
तीन काळगा सर्वकाळ ते ॥ नांदतीं घरी ऐक्य त्या मतें ॥ २ ॥
नाहिं भिक्षुकी वृत्ति भूमिका ॥ दीन लीनता कर्मिचा शिका ॥
वस्त्रहीन गा शीत सोसणें ॥ दुःख होतसे बाळका गुणें ॥ ३ ॥
फाटका असे येक तो झगा ॥ गांठी दीधल्या वेदमाप गा ॥
त्यांत तीं मुळें लेंक लेंकि त्या ॥ झोंप घेति गा सार जाणत्या ॥ ४ ॥

भ्रांतिचें नसे लेश वस्त्र तें ॥ लौकिकीं सती नाच जाइ ते ॥
लाजुनी सदा मंदिरीं असे ॥ फोड फूटकी हेम तें नसे ॥ ५ ॥
नाक ऊघडे पोट बांधिलें ॥ ओंठ वाळुनि गाल बैसले ॥
चालतां पथा झीट येत रे ॥ सूखवीषयीं पत्निहेत रे ॥ ६ ॥
कष्टते भुमीं धान्य वेचुनीं ॥ मान्य वेद तें कर्मशोधनीं ॥
यज्ञ आहुती पांचभौतिकीं ॥ त्यात संततीं आणि पांथकीं ॥ ७ ॥
काळ कर्मणा वर्म यापरी ॥ काममूषकू सोडि कोठरीं ॥
वासना घरीं मांजरी नये ॥ नाहिं भक्ष त्या प्रांत ऊभयें ॥ ८ ॥
वाट ना मळे पाय चालिची॥ चाल येकली पाद द्वैतची ॥
येत जात ना तेथ झोंपडी ॥ ल्हानशीं असे गाव ऐलडी ॥ ९ ॥
कोण नेणती ज्ञात आमुची ॥ दैन्य वेळि ना आप्त कोणिची ॥
तोंड ऊघडें नेत्र चौ दिसे ॥ मार्ग लक्षिती पोट जाळ से ॥ १० ॥
हाय हाय रे हाय दातया ॥ काय पूससी देहमान या ॥
बाळ स्नेहि तो भाव जाणसी ॥ मान ऐक्यता सर्व लक्षिसी ॥ ११ ॥
दैन्य पंथिचा देह दीप हा ॥ येथ पातला देख पंथ हा ॥
हे अनंतजी माय लाघवी॥साक्षि देह हा तूंचि गा कवी ॥१२॥१२४ ॥

( पद. )

ऐकूनी दिनहेतवाणी देव तो सद्गदें ॥
नेत्रींच्या जळ समोघें स्पष्ट ते भाव दे ॥ ध्रु ॥
सदयघन करुणेचा हा हरी मूळचा ॥
भक्ति भावें वश होई प्रेमळा कूळिचा ॥
नाम रूप या नाहीं वाच्यतें साक्ष दे ॥ १ ॥
कृष्णजी मग त्या बोला ब्राह्मणा लागुनी ॥
ऐक मम हेत आतां कान ते ठेऊनी ॥
अनंताची बुद्धी ही भक्तीला भाव दे ॥ २ ॥ १२५ ॥

( पृथ्वी. )

अगा द्विजवरा गुरू जगतिचा खरा तूंचि गा ॥
जन्मांतरिं दुजा नसे तुळणिला तुंची एक गा ॥

मला तुंचि सगा दगा पितर तो भुमी भागिं गा ॥
सदां नमन पाउलीं करित मी मना हो सगा ॥ १ ॥
मला अजि बरें स्मरे ह्रदयिं तें अगा खेळ ते ॥
मुलांमधिल आठवे द्विजवरा बहू खोल ते ॥
गुरूघरिं तिघें अम्हीं वसतसों तदांची रिती ॥
आठवें बहुत गा मनामधि सदां दिवारात ती ॥ २ ॥
गुरूसतिरवें वनामधिं सख्या कडे वांकडें ॥
बहू श्रमुनियां शिरावरि धरूं मुळीं लांकडे ॥
खडे उतरुनी तळांप्रति घरीं बरे येतसों ॥
तदां घन बहू पडे चहुं दिशें विजे भीतसों ॥ ३ ॥
भिजोनि सगळे वटातळवटीं जरा राहिलों ॥
तधीं मम शिरावरी मुळि असे बहू भागलों ॥
अगा सदयमानसा किति तुझ्या मनाला कळा ॥
वसे मम विखीं वदों किति मुखीं स्वभावां बळां ॥ ४ ॥
शिरावरिल लांकडें तुवां उतरिलीं अधीं आपुल्या ॥
मला हळधरासही उतरुनी करें आपल्या ॥
बरा मम शिरीं तुवां धरियला स्वतांच्या पटा ॥
तुवां भिजत राहसी द्विजवरां वटाच्या तटा ॥ ५ ॥
श्रमां हरविण्या रमा न बरि ती समीं आपुल्या ॥
तमा हरविण्या वमा तव तनू दुजा केतुल्या ॥
वसों व्रजपुरीं गडे सहित गा वनां जाउं ते ॥
सदां वळवुं गोधनें मन सुगोठणीं विचारा मतें ॥ ६ ॥
मला बसवुनी गिडातळवटीं सुबोधाचिया ॥
कदंब यमुनातटीं मतिचिया करूनी दया ॥
वनीं फिरसि तूं खडे रुतति तैं पदीं ऊघड्या ॥
कड्यावरुनियां सड्यावरि त्वरें तुवां रे गड्या ॥ ७ ॥
वळोनि मग धेनु त्या भरदुपारच्या पारिं गा ॥
अगा मज समीप आणुनि तुवां रहासी उगां ॥

शिरोरि शिकिं कांमळी तुझि तुझ्याकडे रोज ती ॥
गती अनुभवाप्रती निजनिती असे या गितीं ॥ ८ ॥
तुला भिड बहू न बोलसि मुखें कधीं ना असें ॥
सकाम शमनासती सदयता मती हे तसे ॥
अमीं सकळही बसूं गमतिनें तुला रे वना ॥
सुगोधन वळावयां श्रमवुं फार खातें मना ॥ ९ ॥
नसें तव रुपीं तमोगुण कधीं रजाची कळा ॥
अगा अमलसात्विका सरळ ही तुझी गा लिळा ॥
अगा तुजप्रती बहु ह्रिणवुं तें सदां खातसें ॥
मना जडाले ती सदां हुरहुरी नसे जातसे ॥ १० ॥
अजी कितिक आठवूं गुण तुझे सदाचारचे ॥
अपार सदमानसा पयनिधे मला ना सुचे ॥
गुणातित तुं गा मना शमनता सुदामाकृती ॥
सुदामसमता असी पदमतीं गती ही हितीं ॥ ११ ॥
असे बहुत नाटकी वदतसे स्वसूखासनीं ॥
धनी जगतिचा हरी निगम हा सुदासां मनीं ॥
सुबोधक कळा मळा भुमिवरी कथा गोड ही ॥
सई करि अनंत नाथ मुखिंची पढोनि वही ॥ १२ ॥ १३७ ॥

( शार्दूलविक्रीडित )

आलें बोल सखोल नीगमचवी गोडी असे फार रे ॥
बोधाचे सडकेवरोनि चलता दृष्टी बरे येत रे ॥
ज्यासी हिंम्मत फार ती अभिमती त्यातें नसे ही चवी ॥
भावीकांप्रति संभवे सदगती भ्रांती सरे ज्या भवीं ॥ १ ॥
बोलोनी सकळीक तें शिशुपणामाजील हो गूण ते ॥
आले पुर्वस्थळावरी पुनरपी ऐका कथा गोड ते ॥
स्वामी फार श्रमोनियां ममवरी धूळी पदाची बरी ॥
झाडीलो सदया परी भुक असे पोटीं ति गा संहरी ॥ २ ॥
बोले तो मग गा सुदाम हरिला स्तूती नको फार ही ॥
प्रीती मात्र असो सदोदित मनीं लीला तुझी गोड ही ॥

आज्ञाधारक मानसीं मम मती मानी निती जाणसी ॥
वाणीसी मग काय हें नच रुचे वाणी झटे ही कुसीं ॥ ३ ॥
देवा काय तुला असी चट तरी दीनाहुनी दीनता ॥
मंदीरीं बरवी रमा असुनियां दासाघरीं भागतां ॥
दीनाची बहु गोडि गा तव मनां यासाठिं गा रीत ही ॥
संतोषास्तव आदरादिक खरें दैन्यान्वया मान ही ॥ ४ ॥
ऐसे शब्दरवास त्यां समजुनी बोले हरी कौतुकें ॥
तेंची वर्णिन आननीं अनुभवें संतोष येथें तुके ॥
आर्जीं होत असे मला बहुत गा आनंद चित्तांगणीं ॥
वाणी ही दिनवत्सला प्रतिपदीं पावो अनंतागुणीं ॥ ५ ॥ १४२ ॥

( वसंततिलका. )

एकांतठाव बरवा समबुद्धि भावो ॥
सूदामदेव दुसरा हरि वासुदेवो ॥
पूसे द्विजाप्रति तदां मजलागिं भेटी ॥
दीली असे वहिनीनें अजि सोड गांठीं ॥ १ ॥
आहे अजीं भूक बहू तुमच्याच भेटी ॥
द्यावें मला त्वरित गा श्रमतां न पोटीं ॥
लाजे सुदाम तंव तो दिनकाळयोगें ॥
देऊं कसें पृथु तरी अनुमान वागे ॥ २ ॥
संकोच फेड नच ती दिनमानिं झाली ॥
कुक्षींत ती गठडि गा भ्रमबिंदु ओली ॥
लाजोनियां हरिजिचे सदसंपती तें ॥
जी ठेविली लपवुनी हीणवाणि हे तें ॥ ३ ॥
नाहीं ह्मणोनि वदनीं नच शब्द येई ॥
पाहे मुखा हरिजिच्या सदभावगेहीं ॥
झोंबे करीं हरि तदां द्विजराजगेहां ॥
तेव्हां पडे भूमिवरी पृथुगांठि पाहा ॥ ४ ॥

घेई त्वरें करपुटीं मुळ नंदजीचा ॥
वर्णू किती सदयता निजभक्ति वाचा ॥
भक्तीप्रती क्षुधित हा घननीळ आहे ॥
भक्तांमनीं रमतसे सुखशांति पाहे ॥ ५ ॥
गीतेंत हा वदतसे नर अर्जुनातें ॥
पार्था मला प्रिति बहू सद्सज्जनातें ॥
योगीजनीं नच वसे नच त्यां पयाब्धीं ॥
वैकुंठवासि सुख ना मम मानसाब्धीं ॥ ६ ॥
राहें सदां सदनिं गा निजभाविकांच्या ॥
स्वानंदकारक वसे सदशोधनाच्या ॥
आहे मनीं ह्मणूनियां वदनीं मला तें ॥
गाती गितीं रिजाविती मनभूवनातें ॥ ७ ॥
या यूगमार्गिं मन हें हरिनाम बोले ॥
दीनाप्रती क्षणक्षणां तुज बोल बोलें ॥
या हो अनंत सदना श्रवणें करोनी ॥
गीतांतरील अनुमोद अनंत मानी ॥ ८ ॥ १५० ॥

( उमावृत्त. )

घेत हरी करिं ते पृथु लक्षुनि नंतर सोडुनि पहातसे ॥
पाहुनियां मग मारियली मुठ सात्विकता निट हेत वसे ॥
आननिं घालित होत उतावळ सूक्षम सोज्वळ भावबळें ॥
दोन मुठी तार्ळे राहियल्या नग तेथ रमा मग येत बळें ॥ १ ॥
सर्वहि ते पृथु घेत करें वरि संसृति जर्जरि कारण हें ॥
हे रज हो तम गूण भुमीवरि हांवरि ही वरि सत्यचि हें ॥
जेथ रमापति तेथ बरी निति शांतिस बोधक सात्विकता ॥
वास रमा करि तेथ रजादिक जाण तमोन्मुख भ्रांति मता ॥ २ ॥
यारितिं ते पृथु साक्षपकारक गूणत्रियांशक संपविलें ॥
पुर्ण मनोरथ द्वीज मनोगत भाव स्वभावित काळवळें ॥

काहिं दिनावरि राहि हरी घरिं स्वानंदमंदिरीं कृष्णजिच्या ॥
एक दिनीं मग आठवलें वर निर्जर जर्जर आगमिच्या ॥ ३ ॥
सर्वहि आठवि अंतरिं सांठवि घेत असे चवि तेथचि गा ॥
बाळमुलें करिशि काय तरी घरिं खातपितात तिं शोध न गा ॥
आगम सर्वहि लक्षुनियां मनिं वेत करी धनि रोज बरा ॥
जाऊं घराप्रति देइल तें हरि घेउनियां शिरिं हर्षभरां ॥ ४ ॥
मेळि किंवा जिति नाहिंच ठाउक मानस रोषक होत असे ॥
या हरिचें घरिं राहियलों बहु नाहिं दया मनि आलि असे ॥
पोटभरीं तनु येथ मि हा बसलों फसलों स्वसुतांविषयीं ॥
ते सतिवीषयीं हाय मना अजि जाउंच सत्वर यासमयीं ॥ ५ ॥
या रितिं मानसिं बोध करूनिच शोधक तो मग त्या हरिला ॥
पूसतसे दिन भाव मनोगत घ्याजि निरोपचि आज मला ॥
फार दिनांवरिं येथ असें हरि जाइन गा घरिं आजदिनीं ॥
द्या मजलागिं निरोप सुखोन्मुख जाणसि मानस तूंचि धनी ॥ ६ ॥
ऐकुनियां हरि ठीक म्हणे मुखिं अंतरिं नंतर शोध करी ॥
काय तरीं द्विजराजवराप्रति देणगि देउं ति या भुवरीं ॥
सायुजतापद स्वानुभवीमति हेमपुरी वरि यास सजे ॥
भावित यारितिं होत ततक्षणिं सर्वहि लक्षणिं शोभक जे ॥ ७ ॥
साज मनोमय संसृतिहारक हेमकसोटिंत पांचमणी ॥
जोडियले मति शोधकलक्षणिं बोधक तेजस सत्यपणीं ॥
बाळपणामधिं नामरसायण भावबळें घुटका वदनीं ॥
घेउनियां मग वर्णियलें गितिं अर्थ समोघहि तो न मनीं ॥ ८ ॥
बाळक जे रितिं फाल्गुनपूनव लक्षुनियां बहु शंख करी ॥
नाच अनूभव भोग जि संभव कामिनि लज्जित शब्द करी ॥
हौस अशापरि जी जडली मति नामहरीरस पीत असें ॥
तीच अजीं हि अनंतमती अनुमोदनिं कागदिं लीहिलिसे ॥ ९ ॥१५९॥

( इंद्रवज्रा. )

बरा विप्र हा जेधवां द्वारकेसी ॥ असे पातला त्या दिनीं याजपासी ॥
बहू फाटका वीत रुंदीच पंचा ॥ दुबोटीं चिंदी डोइला मान ईचा ॥ १ ॥

बरी बांधुनी गांठुडी पैरण्याची ॥ हरीनें घरीं ठेविली गोप्य साची ॥
जसा चालिला विप्र हा हो घराला ॥ दिलीं आणुनी सत्वरें तीं तयाला ॥ २ ॥
म्हणे चोर भारी सदाचार वाटे ॥ जसे पातलांसे चलां त्याच वाटे ॥
गळ्यांतील माळा कटीच्या पटाला ॥ तसा हाजि शेला करी गा हवाला ॥३॥
बहू दीन झाले चलावें त्वरेनें ॥ मुलें माणसें वाट पहातीं मनानें ॥
असें ऐकुनीयां बहू खिन्न झाला ॥ हरे कर्मदात्या तुझी धन्य लीला ॥ ४ ॥
नसे कोणही थोर तो तुज ऐसा ॥ प्रचीती अजीं आलि हे हेत ऐसा ॥
तदां टांकिलीं वस्त्र भूषांबरें हो ॥ ह्मणे येत आतां असूंदे दया हो ॥ ५ ॥
चलावें असें बोलुनी पायवंदी ॥ हरी हात जोडी जसा कोणि बंदी ॥
चले मार्गे तेव्हां मनीं आठवी हो ॥ कसें मूख दाऊं सतीलागिं हें हो ॥ ६ ॥
मुलें धांवुनी येति तीं देखुनीयां ॥ मुलां तेधवां हाति ना काय द्याया ॥
करूं मीं कसें आजि हें तोंड दावूं ॥ घरीं जाउनीयां तयां काय पाहूं ॥ ७ ॥
जरी रुक्मिणी फाटकें वस्त्र देती ॥ बहू चांगली माणसा गोष्ट होती ॥
असें चालतां आठवी तो मनातें ॥ तदां पोंचलें ग्रामसंन्नीध हो तें ॥ ८ ॥
पुढें देखिली कांचनाची पुरी हो ॥ असे ती मती मानसीं भ्रांतिभावो ॥
ह्मणे चूकलों वाट मीं साच वाटे ॥ पुन्हां द्वारके पातलों तेचि वाटे ॥ ९ ॥
असें चिंतितां हो पशूपाळ तेथें ॥ बरे पातले गाइ घेऊनि पंथें ॥
पुसों लागला त्यांजला ब्रह्मरावो ॥ दिसे ग्राम या नाम सांगा मला हो ॥ १० ॥
वदों लागले गोप ते द्वीजराया ॥ सुदामापुरी नाम गा ग्राम ठायां ॥
असें ऐकुनी वाटली हेळणा ती ॥ वदे मागुतीं तो वदां सत्यनीती ॥ ११ ॥
टवाळी नको नाम सांगा खरें रे ॥ दिले चूकलों पंथ मीं हा अजीं रे ॥
तदां गोप द्वीजा पुसों लागले हो ॥ अहो कोण कैंचे तुमी विप्ररावो ॥१२॥
मुळीं कोण गांवू वदां नाम त्याचें ॥ असां जात कोठें कथा तेंहि वाचें ॥
सुदामा वदे द्वारकेहूनि आलों ॥ पुनां द्वारकां देखुनी भ्रांत झालों ॥ १३ ॥
सुदामा असे नाम या देहभागां ॥ अवंतिपुराचा तुमी मार्ग सांगा ॥
असें ऐकुनी गोप ते बोलती हो ॥ अवंतीच झाली सुदामा पुरी हो ॥ १४ ॥
तुमां ग्रामभावा असे एकनाम ॥ धनीगा तुमीं तूमचें सत्य धाम ॥
नको संशयो गा चला नीटग्रामीं ॥ सुदामा खरें नाच वाटे स्वधामीं ॥ १५ ॥

ह्मणे जाऊं पुढें पुसों दूजियासी ॥ बरें तो वदे होउं त्या मार्गवासी ॥
मनीं या रितीं जाण तो भाव केला ॥ पुढें चालतां जाहला गा स्वलीला ॥१६॥
बरा पातला ग्रामद्वारीं तदां तो ॥ जनीं ओळखीलें अहा:कार होतो ॥
वदों लागलें सर्वही ते स्ववाचें ॥ नृपा आमुच्या सज्जना शांत वाचें ॥ १७ ॥
नमूनी पदां पादधूळी शिराला ॥ बहू लादिती पूजिती विप्रभाला ॥
पुढें मात गा राजवाड्यामधीं हो ॥ तदां शीबिका घेउनी मंत्रि ये हो ॥१८॥
असें मंत्रि तो गा विवेकान्वयाचा ॥ करी सैन्य गोळा अनूभाव साचा ॥
भली भालदारीं तदां हांक केली ॥ चलों आस्ति आरते निगा राखुं बोली ॥१९॥
सदाचारयोगें पुढें सर्व आले ॥ सुखी लोक झाले मनीं हो निवाले ॥
बहू आरत्या घेउनी नागरीच्या ॥ स्त्रिया पातल्या त्या कळाकुंकुमाच्या ॥२०॥
बरे दासदासीं शिपायी पक्याचे ॥ तसे शेट वाणी बरे नागरीचे ॥
मिळोनी असे सर्वही चालिले हो ॥ सुदामाप्रती जाऊनी मीळती हो ॥२१॥
बहू भ्रांति अंगीं भरे द्वीजराया ॥ कशी कोण लीला हरीजीचि माया ॥
असे नाटकी कौतुकी लौकिकीं हा ॥ नभामाजिं सारा पसारा बरा हा ॥ २२ ॥
पुढें मंत्रि आला पदीं भाळ ठेवी ॥ करा जोडुनी तो वदे नम्रभावीं ॥
चला स्वामि बैसा शिबीकास्थळीं हो ॥ धरीलें शिरीं छत्र तें तन्मयी हो ॥२३॥
स्त्रिया आरती तेधवां त्या करीती ॥ बहू नम्रभावें कटीं वांकताती ॥
असा साज स्वानंद आनंदकारी॥अनंता मनीं संसृती हाचि हारी ॥२४॥ ८३॥

( शार्दूलविक्रीडित. )

तासे ढोल तुते वरी चत्रघडे शिंगें तुतारे बहू ॥
घंटा झंगट झांझ ताळकर ते वीणे सतारी जहू ॥
कोणी गात स्वतोषतां नवविधी भक्तीरुपें छंद ते ॥
कोणी नाचत कौतुकें करुनियां ताळासनीं मानतें ॥ १ ॥
यंत्राचे भडिमार फार उडती उल्हाटयंत्रें तसीं ॥
जाती बाण नभांतरीं झटुनियां कामामदाची घसी ॥
आले द्वारसमीप राजसदनां तेव्हां प्रिया पातली ॥
जातीची सुशिळामती पतिव्रती राखीत चित्तीं भली ॥ २ ॥

मराठी ग्रंथ संग्रह ... अनुक्रम ... दि: ७५ ... नों: दि: ...

आली आरति घेउनि चमकते जैसी नभीं वीज ते ॥
आले सर्वहि भाव ते हरिकृपें अंगीं वरे आयते ॥
लाजोनी बसली पुढें घुडतती शोधान्वयें सज्जनीं ॥
बुद्धी आत्म सबोधनी बरवि गा जेवीं रवी बोधनी ॥ ३ ॥
पूर्वीचें रुप संपुनी नवकळा आली असे आननीं ॥
पौर्णेंदूकळ फांकली चहुं दिशें साक्षी नये ती जुनी ॥
कांती हेमनगांबरें करुनियां दैदीप्यमानें भली ॥
चित्रींची जणुं रेखिली गमत हे दूजा विधीं बाहुली ॥ ४ ॥
वीधीचा जनिता असे पुरविता तेथें नसे न्यूनता ॥
कांता शांतमता अशा स्वरूपिं हो कांतास आनंदता ॥
तेव्हां ब्राह्मण माणसामधिं बहू लज्जावता सारिखा ॥
नेत्राचा पडदा जडोनि बसला पाहे तदां नासिका ॥ ५ ॥
भावीकेरितिचा स्वभावमतिचा याचा तसा हो तिचा ॥
दोघांची समसाम्यता प्रथमतां आतां दिसे भेदिचा ॥
वंदोनी चरणा स्मरोनि वदते गुणान्वयां आद्य त्यां ॥
गूणातीत पती अतीत मुळाचा संबोधनां मींच त्यां ॥ ६ ॥
बोलावें परतें रुचे नच रुचे जाणें कसें कोण तें ॥
रूसावें नच संभवें पतिमनीं नीती जुगी ऐक्यतें ॥
ऐसा हेत परंत बेत करूनी बोले तदां आननीं ॥
ऐका तेंच अनंत भावबळ हो द्या कान तें लक्षुनी ॥ ७ ॥१९०॥

सुदाम चरित्र संपूर्ण.

---

## ॥ दामाजीपंताचें चरित्र ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥

॥ दिंडी. ॥

असे देवा गोडि ती भक्तिकाजें ॥ पाळित हे संकटीं भाववोजें ॥
असे पंढरि माजिं तो विठूराणा ॥ पुंडलीकासांठि गा वीठठाणा ॥ १ ॥

बहू तारी भक्त ते नीज भावें ॥ वदो कीर्ती कौतुका हरीनांवें ॥
दिनासाठीं घेतसे सोंग बापा ॥ हारि जो का त्रीगुणादुःखतापा ॥ २ ॥
असा नाहीं दूसरा जगीं दाता ॥ खरा हाची भाविकां नीजताता ॥
कथा बोलूं गोड ती करुगाथारा ॥ रसा प्रेमा ओतवूं सदाधारा ॥ ३ ॥
कथे कानाला करा मनाठायीं ॥ भाविकांचा प्रेम तो मुखें गायी ॥
भरो अंगीं तूमच्या सुखासाठीं ॥ चुको यातायात ती उठाऊठीं ॥ ४ ॥
बेदरामाजीं असे कारभारी ॥ पंत दामाजी भक्त नीरधारी ॥
धर्म भागवती सुशील दीनदाता ॥ नेमनिष्ठा सांगती विधोमत्ता ॥ ५ ॥
बादशाई राजधानि ते भारी ॥ असे जोरा येवनी हुजुरदारीं ॥
अधीकारी मुलुख तो मोंगलाई ॥ जबरदस्ती फीरती ते सिपाई ॥ ६ ॥
ब्रह्मकुळीं वास गा पंत याला ॥ सती कांता सूशिला प्रीति त्याला ॥
जमाबंदी काम तें धान्य घेणें ॥ विकोनिया नाणेंच पाठवीणें ॥ ७ ॥
हुजुराला नाणेंच जमा होतें ॥ प्रतीसालीं जातसे हिशोबातें ॥
असा लोटे काळ तो बहू दीनीं ॥ चुकी नाहीं जाहली राजमानी ॥ ८ ॥

( घनाक्षरी. )

काळ आला देश ओस ॥ मेघ नाहीं जनसोस ॥
दुकाळ हा नाहीं मोस ॥ लोक त्रास पावती ॥ १ ॥
पंढरीला पडे काळ ॥ भूके मेली मुलें बाळ ॥
नाहीं कांहीं तथ ताळ ॥ दाणादाण उठतें ॥ २ ॥
बहु मेले द्वीजलोक ॥ गेला भजनाचा झोंक ॥
मग कैंची माळे नोक ॥ ठाक बूडवि नीतितें ॥ ३ ॥
वारकरी झाले दूर ॥ पोटासाठीं हुरहूर ॥
चिंतेमाजीं सदां चूर ॥ बाह्य देश हिंडतें ॥ ४ ॥ ॥ १ ॥
मोले न मीळेचि धान्य ॥ रुका नच कोणा मान्य ।
कोणा नसे घरधान्य ॥ तळमळ उठलिसे ॥ १ ॥
बाळें विकी आई स्पष्ट ॥ किती भुकें झालीं नष्ट ॥
सोसोनिया भुकें कष्ट ॥ ना संतुष्ट वसवसे ॥ २ ॥
कठीण पातला काळ ॥ वर्णाश्रमें सुटे ताळ ॥
दुर्भिक्ष ची हा दुकाळ ॥ सुकळ ते प्रेतवसे ॥ ३ ॥

मांग म्हार दारोदार ॥ कठोर ते गृहचोर ॥
बुडवीती निरधार ॥ करती वार तामसी ॥ ४ ॥ ॥ २ ॥
नारी सितें वेची दारीं ॥ बहूरंगी ते भीकारी ॥
पोरेंबाळें मारामारी ॥ दंगा दरीं सदां असे ॥ १ ॥
हाकाहाकिं घरोघर ॥ आला भिकेलागीं दर ॥
जातीवरी ना नजर ॥ हरहर घोष असे ॥ २ ॥
सुगीमगीं गा विठ्ठल ॥ दुकाळांत तोंडी विठ्ठल ॥
पोळ्यावरी तें पटल ॥ कसा नटल अंतिं तो ॥ ३ ॥
अंतकाळीं हरहर ॥ स्मशानवासिं शंकर ॥
काळ ज्याचा तो किंकर ॥ धुरंधरचि मानवा ॥ ४ ॥ ॥ ३ ॥
हरी मनीं प्रीत कर ॥ वारिळ तेचि अजगर ॥
शांती धृती बोधभर ॥ इहपरची साधीते ॥ १ ॥
फळ आशा तेथ हर ॥ निष्कामी हरी भर ॥
पूर्णानदीं जया भर ॥ सुगम तर तयाचा ॥ २ ॥
असो असी देशधाड ॥ झाल्या चारबाजु द्वाड ॥
ठाकी मारि दांडोदांड ॥ बंड भांड करीति ते ॥ ३ ॥
बडवे गेले देशांत ॥ बेदरामधीं तशांत ॥
माध्यान्ह वेळ न शांत ॥ त्या अंगणांत पंताच्या ॥ ४ ॥ ४ ॥

( दिंडी. )

भले आले द्वीज ते त्यां वाड्यां ॥ हातपायीं जाहले शुष्क काड्या ॥
हाक देती तेधवां ठोकोनिया ॥ आहो आलों ब्राह्मण लांबुनीया ॥ १ ॥
असो भिक्षू द्वारांत उभे आह्मी ॥ दयानीधे दाद द्या आज तूह्मी ॥
भुकें भारी पीडलों थोर बापा ॥ नेत्र झालें पांढरे अग्नितापा ॥ २ ॥
देई अन्ना लौकरीं प्राण जातो ॥ राखि आतां तापलों तुमा गातों ॥
अनाथाच्या पालका अजी तारा ॥ दुकाळाला आमुच्या तुम्ही मारा ॥ ३ ॥
नसे पोटीं अन्न गा बहू दीनीं ॥ सदां आह्मां होतसे हरीदीनी ॥
जीवदाना दे धण्या आमुचीया ॥ दया पोटीं ठेवि गा तुवां माया ॥ ४ ॥

पंढरीचे लोक हे दुबळ सारे ॥ किर्ती ऐकोनि तुमचि आलो वारे ॥
घरीं पोरें माणसें उपवासी ॥ मेलिं किंवा आहेत काय कैसीं ॥ ५ ॥
असी अरळि ति ऐकोनि पंत यांणीं ॥ बहु तळमळ वाटली दयावाणीं ॥
वदे दामाजी तयां विप्रलोकां ॥ बसा स्थिर सोडुनी मनीं शोका ॥ ६ ॥
वदे कांतेस समजलीस कायीं ॥ विप्र उपवासी त्रासले बहू ही ॥
अन्न दीलें पाहिजे तयांलागीं ॥ पाकसिद्धी होउं दे त्वरित भागीं ॥७॥१९॥

( घनाक्षरी. )

संध्याविधीचीच वेळ ॥ माध्यानसमय वेळ ॥
पंत झाले उतावेळ ॥ हळहळ देखुनी ॥ १ ॥
भूतदया मनी फार ॥ आप पर ना विचयार ॥
जाणतची सारासार ॥ सुखसार प्रेमानी ॥ २ ॥
पाकसिद्धी झाली मग ॥ पात्रें मांडुनी सुभग ॥
येकंदरी तेथ नग ॥ द्वीज मग मोजुनी ॥ ३ ॥
वृद्ध मोठे आणि सान ॥ धरुन बैसती पान ॥
मोठी झाली दाणादाण ॥ अभीमान नाहिं त्या ॥ ४ ॥ ॥ १ ॥
पंक्ति वाढीयल्या सात ॥ भाजी वर्ण सिद्ध भात ॥
वरी घृत ते सनाथ ॥ जोडी हात दामाजी ॥ १ ॥
पंत ह्मणती झाला वेळ ॥ नको आतां उतावेळ ॥
स्वस्थ होउं दे सुवेळ ॥ यथा मेळ आहे जी ॥ २ ॥
भात्रा मन बोले साथ ॥ तुमीच पंढरीनाथ ॥
आहे मि गा अनाथ ॥ जोडी हात नेणत ॥ ३ ॥
पुढें झालें कृष्णार्पण ॥ करीती देवा अर्पण ॥
भुके वेळीं कां दर्पण ॥ मग तर्पग ना ह्मग ॥ ४ ॥ ॥ २ ॥
विठ्ठलध्वनि संपूर्ण ॥ हेंची रोगनाशा चूर्ण ॥
त्रैमात्रा बीज पूर्ण ॥ हो उत्तीर्ग तुमानी ॥ १ ॥
द्वीजजातींत भिक्षुक ॥ तेथें कैचें स्थिर सुख ॥
सुकाळीं ही भूकभूक ॥ दुकाळीं सुख नाइक ॥ २ ॥

बहु दिनां मिळे अन्न ॥ चालेना ते झाले खिन्न ॥
प्रकृती त्यांत ही भिन्न ॥ खाती अन्न दाबुन ॥ ३ ॥
कोणी देती त्यांत हाक ॥ वाढावाढा अशा शाख ॥
कोणी मागे मला ताक ॥ देती हाक धीर ना ॥ ४ ॥ ॥ २ ॥
भोजन झालें तें सांग ॥ कोणी टांकी भुमीं आंग ॥
किती झाले तेथ दंग ॥ रंगारंग या रितीं ॥ १ ॥
बाहेर आले उठून ॥ चुळ घेती गा झटून ॥
नंतर तक्या टेकून ॥ सर्व येऊन बैसले ॥ २ ॥
विड दिले ते पंतान ॥ दक्षणा सर्वां समान ॥
कर जोडी करी ध्यान ॥ ब्रह्मभाव जणुनी ॥ ३ ॥
स्वस्थ पडा क्षणभर ॥ विश्रांति तुमचें घर ॥
उन्हाचा असे तो भर ॥ व्हावें स्थीर क्षणभरी ॥ ४ ॥ ॥२३॥

( सवाई. )

देखोनि दिन द्विजासि वदे मग काय तदां समजा मनिं हो ॥
आज बरा दिन दर्शन विठ्ठल लाभ अशां बहु थोरचि हो ॥
देउनि दर्शन संतविलें मन याहुनि तें धन नाहिं दुजें ॥
आसिरवाद करा दिन घ्यां पदरामधिं हो पद दाखविजे ॥ १ ॥
ब्राह्मण बोलति पंतजि संत तुमी गुणवंत असे गमता ॥
का नमिता दिन हो दुबळया निज भाविक सामचि तोषविता ॥
तूंचि दयाळ खरा सकळांमधिं वाटत मानसिं आमुचिया ॥
आज दवा बहु केलित घालुनि भोजन तोषविलें सखया ॥ २ ॥ ॥२४॥

( दिंडीवृत्त. )

अहो सुजन भाविका पंतराया ॥ मात ऐका आमुची दीनकाया ॥
घरीं नारी बहू क्षुधित भारी ॥ मुलें बाळें गांजली क्षुधा कारीं ॥ १ ॥
मेलि असतील त्यातुनी बहू वाटे ॥ बहू दीनीं अन्न ना कंठ दाटे ॥
दयाळा गा देइ तूं कांहिं दाणे ॥ काळ तोंडा आमुचा हेंचि गाणे ॥ २ ॥
असी ऐकोनि ती गा दीनवाणी ॥ पंत दामाजी द्रवे नयनिं ये पाणी ॥
सदनिं कांतेपासि तो जात तेव्हां ॥ पुसत तिजसीं काय गे करूं येव्हां ॥ ३ ॥

मागताती ते द्विज आजीं धान्या ॥ देश झाला पंढरीं दीनदैन्या ॥
धान्य पेवांमाजलि गे यांस द्यावें ॥ दयां भूतांठायिं हें यश घ्यावें ॥ ४ ॥
बाकि पाहूं पूढती हुजुराची ॥ नाथ पंढरीं करील सोय त्याची ॥
आजीं देतों फोडोनी तयांलागीं ॥ कसें माने तूजला मनालागीं ॥ ५ ॥
वदे कांता ज्यारितीं बरें वाटे ॥ मना तूह्मा तेंचि हो करा नेटें ॥
दिनाठायीं ठेविल्या दया पाहे ॥ वीठु नाथालागिं तें पोचताहे ॥ ६ ॥
त्वरा व्हावी द्या चला धान्य त्यांसी ॥ मान्य झालें माझिये बुद्धिपासीं ॥
असें ऐकोनी पंत तोषला तो ॥ बरा झाला फोडिता पेंव हो तो ॥ ७ ॥
द्विजालागीं दाविलें एक वेळां ॥ लोक झालें संतुष्ट ब्रह्ममेळा ॥
धांवताती तेथवां द्वीज भारी ॥ धान्य न्हेती लूटुनी दिशा चारी ॥ ८ ॥
कांहिं गेले पंढरींमाजिं ते हो ॥ घेउनीया जोंधळे घरीं जे हो ॥
ग्रामिं फूटे मात ती पंतजीची ॥ लोक सारे धावती त्या क्षणीची ॥ ९ ॥ ३४ ॥

( घनाक्षरी. )

आले सर्वहि ते लोक ॥ लुटी केली बीनधोक ॥
नाहिं माप यथा भोंक ॥ गर्दि फार झालि असे ॥ १ ॥
आडकांठि नाहीं तथ ॥ केवळ घरचे सेत ॥
शिरीं खांदीं पाठिं घेत ॥ बहू तेथ नेट असे ॥ २ ॥
कांवकांव उठे घण ॥ कोणा बहु कोणा मण ॥
शेष नाहीं मूळ कण ॥ धणीपण भाविकंसे ॥ ३ ॥
धान्यावरी रुखवात ॥ वर येथें पंतनाथ ॥
कीर्ति वधु माळीं हात ॥ उभी गात तेथ असे ॥ ४ ॥ १ ॥
द्वीज जाती कीर्ति गात ॥ धन्य धन्य पंतनाथ ॥
अनाथावरी सनाथ ॥ पंढरीनाथ पावो या ॥ १ ॥
लोकां झालें बहू सूख ॥ नसे पोटीं हुकहूक ॥
शांत झाली जन भूक ॥ साधे टुक तयासची ॥ २ ॥
बहु धान्या झाली लूट ॥ पंता नाहीं हुटहुट ॥
कारकुना चुटपुट ॥ पोटीं झुट भरतसे ॥ ३ ॥
जातीचा असे यवन ॥ तया नसेचि मोहन ॥
द्वेषपाप असे घण ॥ तमोगुण जातिचा ॥ ४ ॥ २ ॥ ३६ ॥

( सवाई )

यारितिं देखुनि त्या यवना मनिं चूगल हूजुर लावुं असे ॥
लीहुन कागद गुप्तचि जासुद पाठविला दरबारिं असे ॥
सर्व हकीकत जी खरिं वर्तत लीहुनिया कळि पाठविला ॥
त्या दरबारिं सिपाइ सकाळिंच जाउनि पोचत दे चिटिला ॥ १ ॥
कारकुने मग फोडुनिया अवलोकनिं आणुनि त्यावरि गा ॥
हूजुर दाखवि वांचुन माहिति पंतनिती जुलुमावरगा ॥
बदरचा अधिकारि खराबि करी बहु धान्य बरें लुटलें ॥
पंढरीचे द्विज सर्व समाज जमाउनि हूकम त्यां दिधलें ॥ २ ॥ ३७ ॥

( दिंडी )

पंत दामाजी बंमन ज्ञातीका ॥ लूट कीया मंगळवेढा नीका ॥
बहुत हूवा खराबा गया गल्ला ॥ बंमन बडा बेफाम करा हल्ला ॥१॥ ३८ ॥

( साखी )

ऐसें सुनके बादशाहनें वजीरकू बुलाया ॥
बोले बहरने हकिमने गल्ला सब लुटाया ॥
स्वार पटाकर उसकूं बांधो हूजुरकु ले आना ॥
बदलामी बंमन दंगाकीझा बडा हराम समाना ॥ १ ॥ ३९ ॥

( घनाक्षरी )

ऐकुनी ऐसी मात ॥ स्वार तदां जलद जात ॥
सिपायि बरोबरि सात ॥ फारचि तामसी ते ॥ १ ॥
जात आधीं मुसलमान ॥ त्यामधीं हुकूमीं मान ॥
चालतसेच बेमान ॥ झाले तदां धिट ते ॥ २ ॥
वेदरामाजिं जाऊन ॥ वेढा दिला घर बघुन ॥
बसले दारचि धरून ॥ दामाजी हकिम ते ॥ ३ ॥
पंत देवपुजा करीत ॥ तेथ झाली असी रीत ॥
पुढें कसी होइ नीत ॥ घेत भीत मनातें ॥ ४ ॥ १ ॥
सिपायि बोलाते क्रुर ॥ पंतकांते हुरहूर ॥
आतां नेतिल हुजूर ॥ काय देवा केलें जी ॥ १ ॥

पंत आले बाहीर ॥ स्वार बोले धर धीर ॥
आलों काळ अजीं वीर ॥ आतां काय रावजी ॥ २ ॥
हुजूर चला अजी झट ॥ भला केला तुमी हट ॥
धान्य लुटून ही घट ॥ कीती फट जिरेजी ॥ ३ ॥
तलब आहे तुह्मास ॥ उठा चला अजीसांस ॥
देति हातिं कागदास ॥ वांचुनिया पाहिजी ॥ ४ ॥ २ ॥ ४१ ॥

( दिंडी. )

वांचुनीया तेधवां कागदासी ॥
पंत दामाजी समजला मनासी ॥
कठिण वाटे तेधवां तयालागीं ॥
विघ्न आलें चालुनी कर्मभागीं ॥ १ ॥
मनीं चिंती पंढरी पुंडलीका ॥
वरद दात्या विठ्ठला धांव नाका ॥
पाळि दासा आपुल्या अजी ताता ॥
जग्‌तपाळा पूरातना जि नाथा ॥ २ ॥
लाज माझी राखि गा दीनदात्या ॥
नसे काळा जोर गा नामगात्या ॥
लिला दावी आपुली चक्रपाणी ॥
नाहिं तुझ्यावांचुनी मला कोणी ॥ ३ ॥
आजि न्हेती हे मला ओढोनीयां ॥
काय सांगों तेथ मी जाउनीया ॥
कसी देवा ती गती होइ आतां ॥
कळेनाची काय तें जगन्नाथा ॥ ४ ॥
असे चित्तीं आठवून सीपाया ॥
सांगताहे जाऊं गा धरा माया ॥
मि अपराधी आजचा हुजुराचा ॥
साच आहे जाण त्या गा धन्याचा ॥ ५ ॥

जरा थांबा येत मी घरांतूनी ॥
मूख गेले तेधवां ऊतरोनि ॥
हुजऱ्यांसी नाहीं त्या दया कांहीं ॥
शब्दें मारीती तयालागीं पाहीं ॥ ६ ॥ ४७ ॥

( साखी. )

आज हरिदिनी मजला आहे ऊपवास नेमाचा ॥
उपहार जि करून मी येतो धरि धरा तुमी साचा ॥
ऐकुनी ऐसें बोल त्यांचें अविंद चढले भारी ॥
तापुनी बोलती मग त्याला मगरूरी कां भारी ॥ १ ॥
कँयरे बंमन ढोंग लगाया बेमान कैसी जाती ॥
इजत नही कैसी जी तुमकूं नमिक हरामी ज्ञाती ॥
नीकल चल तूं नही तो पकडले जाऊ तुमकूजी ॥
तूमकुं पंता हुजुर हुकुमनें खेचुचि हं है गाजी ॥ २ ॥ ४९ ॥

( घनाक्षरी. )

ऐसे बोलति ते जन ॥ लागती उरींच घण ॥
कांता करी फणफण ॥ भीत बहू ती मनीं ॥ १ ॥
वाटे तिला तोचि काळ ॥ करें पिटी ती कपाळ ॥
काय हें गा जगत्पाळ ॥ शोक करी ती मनीं ॥ २ ॥
पंत झाले भयाभीत ॥ गाथि हरी मनी गीत ॥
नच चुके ती हो नीत ॥ भावबळें मानुनी ॥ ३ ॥
मन शांतिला कारण ॥ प्रेमानंद तेथ घण ॥
वाटे तोचि जीव प्राण ॥ विठ्ठलची हा मनीं ॥ ४ ॥ १ ॥

( दिंडी. )

आलि होती दया त्या पठाणाला ॥ चलो पंता करोजी प्रसादाला ॥
जलदि होनादे बखत वहू हूवा ॥ अबी चिंता कायकू दिल्ल सोत्रा ॥ १ ॥
घरामध्यें जाऊनी पंत तेव्हां ॥ वदे कांते शोक हा नको जीवा ॥
बरा आहे तो धणी शिराठायीं ॥ पंढरीचा पाटील बाप आई ॥ २ ॥
सोड चिंता संकटापासुनीया ॥ दयानीधी राखील माझि काया ॥
ऊपहार करूनी पंत चाले ॥ वाणिमूखीं संकटीं हरीबोले ॥ ३ ॥ ५३ ॥

( साखी. )

इकडे पंढरीमाजीं विठू संकटीं पडे भारी ॥
चळचळ कांपे मुख उतरे ते देखे भिमककुमारी ॥
वदती झाली नाथा सांगे कवण संकटामाजीं ॥
पडला स्वामी सांगा माते उसिर नको गा आजीं ॥ १ ॥ ५४ ॥

( पद )

ऐक प्रिये मम वृत्तांत ॥ संकट हृदयोचें ॥ ध्रु० ॥
मम सखा तो भक्त पंत ॥ भाविक दयाळची संत ॥
प्रीतीकर मजला महंत ॥ त्यासी अत होऊं पाहे ॥ १ ॥
धान्य वांटिलें दुष्काळांत ॥ वृत्ती समे ज्याची बाळांत ॥
भूतदया असे भाळांत ॥ भवबोळांत नाहीं तो ॥ २ ॥
दामाजी माझा सम बाळ ॥ गांजिती तया दुष्ट काळ ॥
केला पाहिजे सांभाळ ॥ आतां माळ रुचेना ॥ ३ ॥
साधुजनतारणार्थ ॥ दुर्जनासी मरणार्थ ॥
हाची अवताराचा अर्थ ॥ धरूं समर्थ कारणा ॥ ४ ॥
वारीन त्याचें संकट ॥ केला असे जा वेंकट ॥
कसें करूं मी मन घट ॥ नाहीं हट भाविकांचा ॥ ५ ॥
आतां करीन यशवंत ॥ माझा लडीवाळ पंत ॥
आग्रहीं नसे ज्या पंथ ॥ हा अनंत शाखि त्या ॥ ६ ॥

॥ वृत्त संख्या ॥ ५५ ॥

( दामाजीपंताचें चरित्र संपूर्ण. )

## ॥ ध्रुवचरित्र ॥

( मंदाक्रांता. )

हा गा देवा जळत हृदयीं भारि माझा उदारा ॥
कां गा आजून नच मजला पाहसी हे उदारा ॥
रंगों गा ही मति तव गुणिं हे रमेचा पति रे ॥
तोडी बंधांतुनि भवपुरी देई शांतीसुखा रे ॥ १ ॥

( मालिनी वृत्त. )

सकळ गुणइशा गा दातया येकदंता ॥
गणपति मति दे तूं दुःख हारी महंता ॥
भजनपुजन नेणें कोटि अन्याय माझे ॥
पदर पसरितों मीं पोटिं घाली भवोझें ॥ १ ॥
दिनहिन मतिचा गा नेणता मी सनाथा ॥
वरद कर असों तो माझिया जाण माथां ॥
तव गुणकथनातें दे मती या अनंता ॥
वदवि घडघडां तें राम माझा बदंता ॥ २ ॥
नमु गुरु तुजला गा येकनाथा दयाळा ॥
सदय हृदय संता दीनदात्या मवाळा ॥
तव पदिं शिर राहों होउनी ऐक्यगूणीं ॥
वदवि कथन तें जो भक्तिलीला सगूणी ॥ ३ ॥
निज रस मित ठेवा वाणगी आत्मनीची ॥
वरि सुजनकथा ती रंगुं दे अंतरूची ॥
पदपदिं रस छंदें पोसवी गा समर्था ॥
बळ तुजविण हो तें ना अनंता सनाथा ॥ ४ ॥
नमिन मि जि कुमारी वाग्वरी शारदा ती ॥
रसन धवल अंगीं या जगीं रंगली ती ॥
मनिं भर गित माझ्या आननीं नाच तूं गे ॥
झडकरिं वदते गे गोडि रंगें असों गे ॥ ५ ॥
रविकुळमणि तो गा भूप उत्ताननामें ॥
कृतयुगनिति पाळी पाद सत्पादकामें ॥
सुशिळ गुण मराचे राज तो सार्वभौमा ॥
जनहि सकळ तें गां पाळितें ज्या हुकूमा ॥ ६ ॥
सतिधृतिसम कांता सूनिती नाम तीसी ॥
वडिल हि पटराणी शांतिची खाण खासी ॥
सुरुचि दुजि असे ती धाकुटी प्रीत तीसी ॥
कुनितिंत कुशळा ते वीषयीं सार नासी ॥ ७ ॥

बहुत प्रित मनाची धाकुटे भूलला हो ॥
चलत नित तिच्यागा बोलण्या सारखा हो ॥
नच प्रित वडिलेची टांकिली बाटती गा ॥
कधिं नच तिस पाही भूलला दुष्टिणी गा ॥ ८ ॥
कुनितिंत भडवा तो जारिणी भूलतो हो ॥
धरिं निज सति सोडी गोडि नाहीं तिची हो ॥
भुलुनि भवभ्रमानें तो अहं या पदातें ॥
कवळुनि धरि पोटीं मीपणा आपदा तें ॥ ९ ॥
जरि नित बरि होती संगतीं नासते हो ॥
म्हणुनि बरि असावी सोबती या जगीं हो ॥
सुमन परिमळातें ठेविल्या पात्रि देती ॥
कुशल निपुण ते हो शोधिती सार रीती ॥ १० ॥
सुनिति सुशिळ भावें पाळती आवडीनें ॥
बहु सुफळित हें गा बोधनीं पुत्र दानें ॥
मनमुखणि इच्यानें ही बरी सूखदाती ॥
परि जन भुलले त्या वीषयीं जारनीती ॥ ११ ॥
भुप गमत तसा तो जाणुनी नेणता हो ॥
निति चुकत बरी ती सूरुची संगती हो ॥
परि कुळरुपभावें वंशि तो बोध आला ॥
ध्रुव निज मुखनामें सूनिती श्रेष्ठिणीला ॥ १२ ॥
कधिं नच मुख त्याचें राजयें पाहिलें गा ॥
वचन न धरिं तीच्या स्वामिंही भूप तो गा ॥
सुरुचि उपवरी ती जाहली जेधवां हो ॥
तधिंच विसरला हा सूरुची संगती हो ॥ १३ ॥
प्रथम भुपबिजानें गर्भ हा राहिलेला ॥
सुनितिस ध्रुवनामें बोधनीं साच लीला ॥
जनलिखित नाहीं जाण केलें भुपानें ॥
मुलपणरितिं लेणीं घातलीं ना सुखानें ॥ १४ ॥

हळहळ करि आई बाळ देखून तानें ॥
दिनानीशीं रडते ती ना घरीं वस्त्र जूनें ॥
उदरभरति दाणें येति तें कोठिचें हो ॥
घृत मग नच तेथें पूसती कोण ती हो ॥ १५ ॥
मद दिठिं भरला तो मातळी सूरुची ती ॥
भुलवुनि बुडवीला भूप ती दुष्टिणी ती ॥
तिस सुत उपजे त्या नाम हो उत्तमातें ॥
प्रितिकर बहु वाया आवडे जीवनातें ॥ १६ ॥
अधमजनस्वभावा नींदकाची प्रिती हो ॥
खुळसर गमतो तो मीपणा मानि जो हो ॥
दिनभरिं जननिंदा चावडी हीच ज्याची ॥
भुलत मदिरमोहें यांजसी येम जाची ॥ १७ ॥
गतभुतागित सांगे गेलिये संपत्तीचें ॥
दिनहिनदुबळ्यांला मारितो शब्द ठोंचे ॥
बुडवित वडिलांची कूळनीती जुनी ती ॥
जपुन फुकट माला अंतरीं ती कुनीती ॥ १८ ॥
मदभर धन डोळे कामिनीचे प्रितीच्या ॥
दिनभर मुख पाहे हांसणें गंमतीच्या ॥
अबलबळरितीनें चालतो बायक्या हा ॥
समजत नच याला कामश्वानापरी हा ॥ १९ ॥
करि नच जननिंदा वीरळा या जगीं तो ॥
दिनानिसिं हरिनामें अंतरीं घोंकि जो तो ॥
दिनजन बघुनीयां दुःखि होतो मनानें ॥
किति वदुं सुजनाला जाणता जाणतो तें ॥ २० ॥
वदत रुप अनंतीं मालिनीछंदरूपां ॥
मिनालि मननरूपें संगतीच्या स्वरूपां ॥
वदत दुजि पुढें ती नाम जीला असे हो ॥
शिखरिणि गुणछंदें आननीं बोलती हो ॥ २१ ॥ २२ ॥

( शिखरिणी. )

वयां झालीं सालें गणितमित पांचामधिंच तो ॥
मुलांसंगें खेळे विदबिदिं तदां गा निपुण तो ॥
कळेना तो पीता कवण जनिता देखतचि ना ॥
दुजीं मूलें त्याला दुखविति बहू बाप तुज ना ॥ १ ॥

कसा रे झालासी सुत तुं असला कोण रितिनें ॥
नको आम्हांसंग बसुं उठ कसा चाल रितिनें ॥
अशा त्या शब्दानें फुटत हृदयीं बालक तदा ॥
जयाच्या नामाला वदति ध्रुव या हो जगिं सदा ॥ २ ॥

निघे तेथूनीयां रडत घरिं तो बाळ ध्रुव गा ॥
अगा ज्याच्या अंगीं नच भरलि ती हो नवति गा ॥
सकूमारी कांता वदन सुकलें कोमळपणें ॥
हरी ज्याला मानी निज मुल सखा भक्तिचगुणें ॥ ३ ॥

कसी देवा तूझी न कळत लिला अंतरिंचि ती ॥
जया तूझा प्रेमा कसविसि तयां आगमनितीं ॥
जसा टांकीं घायीं दगड परि तो देव बनतो ॥
तसा त्रासा सोसी जन कुटिल खोडी सुजन तो ॥ ४ ॥

घरीं आला तेव्हां बघुनि जननी फारच रडे ॥
पुसे माता कां रे रुदन करिसी तोंड मुरडे ॥
तुला कोणीं बाळा दुःख बहु दिलें वाटत खरें ॥
अरे ऊगें राही दिन मजवरीं हे नच बरे ॥ ५ ॥

तुला पाहूनीयां बहुत दुखतें अंतरिंच मी ॥
कशाला बाळा तूं मम उदरिं आलासि करमीं ॥
वदे आतां मातें कवण रितितें दुःख करिसी ॥
उगीं राहें आतां वद जलदि ऐकूं तरिं कसी ॥ ६ ॥

वदे तेंव्हां तो गा ध्रुव मुक तिसी आइ मज गे ॥
पिता कोठें आहे कवणसुत मीं सांग बरि गे ॥

मला मूलें सारीं ह्मणविति बहू बाप पुसती ॥
नसे ठावा मातें उगिंच असतो सोसुं ग किती ॥ ७ ॥
मुलाच्या शब्दानें हळहळ उठें माय हृदयीं ॥
म्हणे बाळा ऐकें भुपसुत तुरे याचचि भुयीं ॥
धराधीशाचा तूं सुत परि कळा माझि उणि ती ॥
नसे प्रीती बारे मजवरि जरा भूपतिच्चि ती ॥ ८ ॥
असें दीनावाणी सतत घरिं मीं लाजत जनां ॥
कसें दाऊं तोंडा ह्मिनपण गमे अंतरमनां ॥
असे दूजी कांता भुलुनि तिजला नाडित मला ॥
कसी देवा नाहीं कळत्रळ जरा हे श्रम मला ॥ ९ ॥
असें ऐकूनीयां ध्रुव समजला बोलिलि सती ॥
ह्मणे जातों आतां बघिन पितया आज निगुतीं ॥
नसे वैरी चित्तीं समगुण कळा बाळकाचि तो ॥
भरे प्रेमा ठायीं समजुनि पिता भूपतिच तो ॥ १० ॥
वदे माता बाळा पुनित सुशिळा जाउं तुं नको ॥
तुला कोणी तेथें नच पुसति गा दाखवुं नको ॥
असे मोठी खोटी सुरुचि पतिला आवड तिची ॥
नको दीना वाणी वचुं तिथ तुरे धीर धरची ॥ ११ ॥
तया दीनीं राहे बसुन घरिं तो लेंकुरपणें ॥
दुजा दीनीं ऊठे उदयसमयीं भानुकिरणें ॥
रवीच । वंशातें कुळदिपमणी हाचि पहिला ॥
वदों कीती प्रेमा हरिभजनिं जो साच रिजला ॥ १२ ॥
मुळाच्या छंदानें वसत सुजनीं बोधाचि गुणी ॥
फळे शांती पोटीं सुनितिउदरीं शोधनगुणीं ॥
तयाचे नीतीला मिपणिं रमते नावडाति गा ॥
भिती निंदेठायीं जनभिति हिंची साचपणिं गा ॥ १३ ॥
पती छंदें नांदे बघुनि तिजला जारिण निती ॥
करी निंदा तीची परि जनिं तिला मानिति सती ॥

जयाची हो बुद्धी विषयीं रमली जारिण खरी ॥
सदां जारालागीं भुललि दिननिशीं या षडअरी ॥ १४ ॥
भरे द्वैताछंदीं खुसमुसि सदां मानसिं उगी ॥
कुळालागीं डागा इजजवळुनी होत तिगुणीं ॥
अनंता या ऐसे मतिगुण जनां आवडत ना ॥
वदे छंदें त्या हो शिखरिणिरुपें साधन मनां ॥ १५ ॥ ३८ ॥

( शुद्धकामदा. )

चलत तेथुनी बाळ तो तधीं ॥ नच असे जया लागिं आवधी ॥
सुदिन भासला तेधवां तया ॥ विषयिं त्यागुनी जेविं योगियां ॥ १ ॥
सुदिनिं पोंचला राजमंदिरीं ॥ धिट बहू असे मूल अंतरीं ॥
भुपति बैसला ज्या स्थळीं असे ॥ समिप जाउनी हा उभा असे ॥ २ ॥
सकुमरास त्या पाहुनि तदां ॥ प्रित भरे मनीं मोहिनी पदा ॥
उचलुनी वरी घेई बाळका ॥ बसविला पदीं सूख कौतुका ॥ ३ ॥
वदतसे पिता मूल रीतीनें ॥ सदगदे मनीं प्रेमप्रीतिनें ॥
खरचे तदां कंठिं भूपती ॥ वदन न्याहळी चुंबितो प्रितीं ॥ ४ ॥
कळत कामिनी सूरुचीस तें ॥ निकट पातली पाहि मूल तें ॥
क्रिडत राजया पाहुनी दिठीं ॥ खवळली मनीं तोंड हिंपुटी ॥ ५ ॥
वसवसे तदां दंत खातसे ॥ ढकलिला मुला लात देतसे ॥
म्हणत काय रे ठाव हा तुझा ॥ बससि रे कसा ऊठ नीघ जा ॥ ६ ॥
भुपति नष्ट तूं दुष्ट सौतिचा ॥ मुलिं कसा बरा भास प्रीतिचा ॥
नच तुला असे लाज वाटते ॥ मीं बरी नसे साच दीसतें ॥ ७ ॥
हिणसुनी वदे बाळकोत्तमा ॥ पुढति ना चढे राजआश्रमा ॥
वनगती तुला फार चांगली ॥ लिखित जाणती मीं असे भली ॥ ८ ॥
मम सुतास रे राजआसनीं ॥ विभुति माखुनी जाय तूं वनीं ॥
अचळ साधि रे ठाव नीगुता ॥ विषय गाधि ही नातळे हिता ॥ ९ ॥
जननि रे तुझी या पदा तुटे ॥ उगिंच आज तूं बाळ धाकुटें ॥
नच तुला भिती वाटली कसी ॥ कवण कौतुका बुद्धि ही असी ॥ १० ॥

निगम काननीं जाउनि तपा ॥ बहुत आचरें तूं कुळदिपा ॥
हरि गुणांमधीं निपुण तूं बरा ॥ कुशल बोधनीं आमरी जरा ॥ ११ ॥
रव तिचे असे ऐकुनि पुढें ॥ बहुत दुःख तें वाटलें कुढें ॥
वदनखालतें घालुनि रडे ॥ कळवळा कसा सौतिला घडे ॥ १२ ॥
वदलि साचची वाणि ती निकी ॥ वचन बाण ते भेदि नेमकीं ॥
उठुनि चालिला मूल तेधवां ॥ कठिण वाटलें तात तेधवां ॥ १३ ॥
अनुतपें जसा तापसी निघे ॥ तदनुसार हा मूल हो निघे ॥
जवळ पातला माय ज्या स्थळीं ॥ रडत आक्रुषें धाय मोकली ॥ १४ ॥
वदन पूसती माय तेधवां ॥ धरित हो कडे बाळ तेधवां ॥
पुसत तानया सूनिति तदां ॥ रुदन कासया बोल रे सुधा ॥ १५ ॥
गतिहि कामदा बोलुनि असी ॥ सुख अनंत घे आपुले कुसीं ॥
धन मनामधीं हेंच वाटतें ॥ मननशील ते येथ जाणते ॥ १६ ॥ ५४ ॥

(चामर.)

काय रे मुला तुला असेंच गांजिलें दिसे ॥
बोल काय तें मला तुवां भला मुखामिषें ॥
तो वदे तिला तदां अजीं मि गे पित्या घरीं ॥
जाउनी उभा असें तदां मला पदावरी ॥ १ ॥
घेतला प्रितीं बहू करूनियां धरीं धरां ॥
कामिनी तदां घरांतुनी भली असे क्रुरा ॥
लोटुनि मला पदांनिं गे तळां भुमीवरी ॥
टाकिला असे तदां बहू हिणावुनी बरी ॥ २ ॥
बोलली किती वदूं दटावुनी भुपापुढें ॥
तात ना वदे तिला जरा भिये तिच्या पुढें ॥
रोदना करीत मीं ग पातलों असें अजी ॥
दीसतें बहू बुरें नको पुरी मला अजीं ॥ ३ ॥
ऐकुनी अशा रितीं ह्मणे सुता तिनें बरी ॥
देवपूजना विधीनरूप आपुल्या करीं ॥
दानधर्म याग वापिकूप तोच भोजनीं ॥ ४ ॥

कर्मरूप देणगी हरीचि ही लिला खरी ॥
शोक टाकि शांत होई देव पाहिं तूं उरीं ॥
सोड आश मोह फांश दुःख कां तरी सुखी ॥
राहि आजपासुनी वदे हरीकथा मुखीं ॥ ५ ॥
याविणें जगीं तुला नसे दुजा मुला बरा ॥
ध्यानधारणा गुरूमुखें बरी करी त्वरा ॥
कोण बाप माय मोह फांश काळ जाण रे ॥
वास भ्रांति त्रास मानसीं बहू उगीं भरे ॥ ६ ॥
थोर जे समां गुणीं धना तुटी करूनियां ॥
काननां मुळें फळें सदांच खाउनी कथा ॥
भाव नीजकाज साधि आज तूंचि साच रे ॥
घे करूनि हा धनी भवांमधीं त्वरा बरें ॥ ७ ॥
काळमान सारि बा तुं थार बोध पाडि जा ॥
नाथ एक पाद सेवितो अनंत या निजा ॥
चामरा वदे अशी मुखीं कळा तळां ध्वनी ॥
दूसरी उठे बहू बरी मणीच बंधनीं ॥ ८ ॥ ६२ ॥

( मणीबंध. )

बोलत तेव्हां तो मुल सान् ॥ रहात कोठें गे भगवान् ॥
पाहिन वाटे आज मला ॥ बोलच तूं गे त्या हरिला ॥ १ ॥
भेटल कैसा गे जननी ॥ वास असे कोण्या सदनीं ॥
साधन याला काय रुचे ॥ मूल मि साना नाच सुचे ॥ २ ॥
जाइन तेथें आज बरा ॥ मागिन ठावा गे निबरा ॥
ना मज कोणीं ओढिल गे ॥ तें पद त्याला मागिन गे ॥ ३ ॥
सावध झालों आजि बरा ॥ हा उपदेशा योग्य खरा ॥
जो अनुतापीं तापत गा ॥ काळ तयाला कांपत गा ॥ ४ ॥
संगम हा प्रेमा भरतो ॥ बोधक जाणे या निगुति ॥
रंग नवांवीधीं भरला ॥ हा भव त्याला हो सुटला ॥ ५ ॥

सावध झाले ते रमले ॥ वीपयिं गुंते ते भ्रमले ॥
येम तयाला घालि गळां ॥ फांस जरेला खास गळां ॥ ६ ॥
भार भराचा नौति मधीं ॥ घे सुख वारे ना अवधी ॥
ध्यान धरावें या रितिनें ॥ अंतरि शोधा बोधनिनें ॥ ७ ॥
लावुनि राखेला तनुतें ॥ चालत बाळा ना भित तें ॥
पूसत कां रे या रितिला ॥ सान तुं तान्या घे भितिला ॥
वर्ष तुला रे पंच भलें ॥ कोमल अंगा जां न भलें ॥ ८ ॥
योगि भले ना पार तयां ॥ सिद्धमुनी गा साधु जयां ॥
तूं तर पोरावाणि बरा ॥ काय सुचे रे तूज तरा ॥ ९ ॥
बालक बोले गे जननी ॥ ना हरिलागीं सान मनीं ॥
भाव भुकेचा तो इश गे ॥ मंत्र भुकेला ना भुलगे ॥ १० ॥
जाइन आतां पाहिन त्या ॥ सोड तु माते मोहन त्या ॥
देइन तूला ठाव बरा ॥ तोषेल तो गे ईश बरा ॥ ११ ॥
बाण जसा तो हो सुटतो ॥ त्या धनुपासुनि ऊजू तो ॥
धांवत त्यांच्या हो गतिनें ॥ कानन वाटें शोध मनें ॥ १२ ॥
मातहि फांके राजघरीं ॥ बाळ पळाला फार दुरी ॥
शोक तया हो भूपतिला ॥ वाटत तेव्हां फार भिला ॥ १३ ॥
निंदुनि तेव्हां सूरुचिला ॥ चालत हा गा भूप भला ॥
मोह बरा झाला मननां ॥ सोडुनि चाले त्या भुवनां ॥ १४ ॥
आज अनंता भेटल गा ॥ मोह जरा ही फोडिल गा ॥
माधव गा हा गोविंद गा ॥ या मणिबंधा सत्वर गा ॥ १५ ॥ ७७ ॥

( शिखरिणी )

पिता तेव्हां गेला हुडकित मुला काननिं तदां ॥
उठे चित्तीं ज्याचे हळहळ बहू बालक पदां ॥
भरे प्रेमा अंगीं कळवळ करी भूप बहु तो ॥
असे आधीं ताना वरि मुलसखा वंशदिप तो ॥ १ ॥
वनामाजीं पाहे तंव सुत पुढें चालत असे ॥
असें देखूनीयां वदत कुमरा थांब तुं असे ॥

नको जाऊं बारे मज दुखवुनी काननिं दुरी ॥
फिरे आतां मागें पुरविन तुझी मानसपुरी ॥ २ ॥
असें ऐकूनीयां वदत ध्रुव तो या रितिं बरें ॥
बरे बाबा ठेवी मन भुवनिं तूं त्या सुरुचिरे ॥
नको आतां कांहीं घरधन तुझें बालक न मी ॥
तुझा आहे दूजा सुरुचिसुत तो गा दिनचि मी ॥ ३ ॥
पदां लोटीयेलें तुज समुर तें आइसवतीं ॥
तदां कोठें गेला हळहळ तुझा सांग निगुतीं ॥
भला प्रीती चित्तीं प्रितकर बरी तीजवरिगा ॥
अगा दीनाचा मी तुजसम नव्हे तोलरितिं गा ॥ ४ ॥
बरा आलें वाटें सदनिं चल गा येत मिं नसें ॥
नसे माझा अंगीं भर नवरसीं सूखचि नसे ॥
असें जातों मी गा नरहरिघरां मागिन तयां ॥
दुजा ना शीवे हो स्थिरचरिं मला देवऋपि या ॥ ५ ॥
असें ऐकूनीयां मुलवचन तें भूप द्रवला ॥
खरी झाली माझ्या करि चुक सख्या बोल रुचला ॥
नको टाकूं आतां मज जि ममता तातपणिची ॥
तुला देतों गांवां सुखरूप वसे घे बरि रुची ॥ ६ ॥
तदां बोले ताता मि अजिं रघुनाथा पदिं बरा ॥
सुचे तें गा मागें रुचिकर मला जाच तुं बरा ॥
धरेचा बोले तो पति ध्रुव पिता देत नगरें ॥
अरे आतां मागें चल झडकरी तूं फिरचि रे ॥ ७ ॥
मला देता आहे वदत पितया बाळक तदां ॥
रमारंगापासीं बहु धन असे बोधनि पदां ॥
बरें देतों देशा फिर झडकरी आज निगुता ॥
असे देता ताता मनिं हरि बरा वाटत मता ॥ ८ ॥
धरा सारी तूझी पटअभिषका तूज करितो ॥
सुता चाले आतां ऊठ तुट नको भूप वदतो ॥

पुढें बोले ताना ध्रुव कुळमणि आइक पित्या ॥
मनाची झाली गा भवपुरिं तुटी आस नच त्या ॥ ९ ॥
नको आतां मोहामधिं मज भरूं आयकत ना ॥
सुखें राही भूपा प्रित मजवरी ठेविच तुं ना ॥
नसे आशा कांहीं जननि पितया आज बरवी ॥
रवीवंशालागीं दिप उजळि गा साधनभवीं ॥ १० ॥
सुटे ओढीचा तो शर पुनरपी फीरत नसे ॥
गतीरूपें जातों बहु त्वरित तो नेम सरसें ॥
मनाच्या ओढीनें मिंहि चलत गा त्याच रितिनें ॥
न थारें आतां मीं परत चळ गा शीघ्र गतिनें ॥ ११ ॥
रवां या ऐकोनी भुप मग निराशा करि मनीं ॥
म्हणे दैवी कां हें मज हरि तुवां भाळिं लिहुनि ॥
खरा मीं पापी गा स्त्रिसमजुतिनें ठार बुडलों ॥
कुळां लावियेलें दुषण बरवें साच विरलों ॥ १२ ॥
बरा डावा साधी घर बुडविलें या सुरुचिनें ॥
दगा झाला फंदें नवति भुललों रूप तरुणे ॥
खरी जाती नष्टी नरकीं पचवी रौरवपुरीं ॥
नसे इला माया स्वहितिं फसवी वीषयपुरीं ॥ १३ ॥
वदे पाहूनीयां पुनरपि मुला देखुनि तया ॥
अरे जातो आतां मजजवळि ये याच समया ॥
मला भेटोनीयां मग चळ तुवां काननिं बरा ॥
असें बोलोनीयां रडत भुप तो मोहचि बरा ॥ १४ ॥
दया आली तेव्हां मुल जवळ आला त्वरित तो ॥
मिठी मारी राजा हळहळ उठे फार मनिं तो ॥
मुका घेता झाला वदन कुरवाळी निजकरीं ॥
भरे प्रेमा तेव्हां जळजळ उठे जाळत उरीं ॥ १५ ॥
वदे तातालागीं ध्रुव नव पुढें शोधन रिती ॥
भरी शांती चित्तीं शितळपण तें जाण निवृत्तीं ॥

त्यजी शोका राया सरि बरि मिं गा साधिन अर्जी ॥
कुळांतं दीपाला उदय करि गा साचचि मिं जी ॥ १६ ॥
असों द्यावी माया सदयहृदया गा पुढत ती ॥
असें बोलोनीयां उठत मग तो सत्वर गतीं ॥
फिरे मागें राजा कळवळ बहू अंतरिं असे ॥
घरालागीं आला पुढतिं ध्रुव तो काननिं वसे ॥ १७ ॥
विवेकाच्या ठायीं अनुभव शिरे त्याच रितिनें ॥
बनामाजीं गेला मुल सगुण तो ऐक्यगतिनें ॥
अनंताला माने हिच रित बरी भागवत हा ॥
जडों पायीं याच्या मन प्रति दिनीं योग्य भर हा ॥ १८ ॥
मुखामाजीं वाणी शिखरिणीरुपें या रितिं वदे ॥
सदां येकानाथा पदकमलिं गा थार मज दे ॥
अगा दीनाच्या तूं सदयहृदया माधवप्रिया ॥
असों माझ्या माथा कर तव वरा प्रेम भर या ॥ १९ ॥ ९६ ॥

( पंचचामर. )

वनाप्रती चले तदां उदासता मनीं बहू ॥
मुखावरी कळा नसे सुके तनू उनें बहू ॥
उपास त्रास ध्यानिं ध्यास नाम घोष आनना ॥
हरी अनाथ मी दया करी पतीतपावना ॥ १ ॥
मुरारि रे रमापती गती मला तुझी नसे ॥
कसा तुं गा दयाळु बा रळीसरा दिठीं दिसे ॥
बहूत लागली तुझ्या पदीं गुणानिधी प्रिती ॥
स्वसेवकांमधीं मला गणी अर्जी दिगा निति ॥ २ ॥
कसी तुझ्या सनाथजी रुपा सिमा करू मिं ती ॥
दिनामधीं मि गा असें मुलासरीं तु दे गती ॥
न मंत्र जाणता न तंत्र ठाऊकें गितामधीं मती नसे ॥
करूं कसें कुठें बसूं तनू कसूं सुचे कसें ॥ ३ ॥

अनूतपें बहू तपे निरामयीं वसे तदां ॥
चकोर ज्या रितीं निशीकरावरी दिठी सदां ॥
मयूर त्या धनावरी प्रिती बहू वनीं करी ॥
तसा हरी पदीं ध्रुवा वसे मनांत अंतरीं ॥ ४ ॥
पडे रडे उठे बसे कळाहि ना दिसे तदां ॥
न आठवी दुजा धनी तुझ्याविणा अहंमदा ॥
असों दया दिनाचिया भरें उरीं धिरा जरा ॥
त्वरा करा शिणा हरा भिकारि गा मुळीं खरा ॥ ५ ॥
भुकेमधीं घसा बसे सुखें मुखीं थुकी नसे ॥
पिसें जसें तयापरी वनामधीं ध्रुवा असे ॥
स्वभाव हा अशा रितीं सुभाविकीं कळे हरी ॥
परी तया गुरू नसे म्हणूनियां मनावरी ॥ ६ ॥
विचार तो करी तदां वदे ऋषीस नारदा ॥
सख्या भुमीतळांवरी ध्रुवा मुला चला वदा ॥
उगां श्रमे बहू दिनापरी असेच वासरां ॥
बरा तुं जाउनी बिजासनीं तया खरा करा ॥ ७ ॥
बहू मुनी तयावरी प्रिती असे मनांतुनी ॥
परी तया गुरू नसे अगा तुम्ही फुकां ध्वनी ॥
करा निजीं पुरा गुणी चला त्वरें असां तसें ॥
बसूं नका उठाउठीं मला बहू तयां असे ॥ ८ ॥
असें हरीमुखांतलें स्वां धरी मुनी तदां ॥
मनामधीं कळे कळा तया ध्रुवीं मुळा पदां ॥
बरें म्हणूनियां चले वनां ऋषी मुनेंद्र तो ॥
गळां विणा पुरातना वदे हरीलिलाचि तो ॥ ९ ॥
वनामधीं तदां बरा गुरूमुनी त्वरें चले ॥
ध्रुवासमोर जाउनी उभा असे मुला भलें ॥
बघीतलें परी नसे कुडीवरी गळे मतो ॥
दिठीस ते मिठी पडे भुमीवरी निचेष्टि तीं ॥ १० ॥

असा तया बघूनियां दया बहु भरे मनीं ॥
कसा तरीं वयीं मुला अनूतपे बरा गुणी ॥
पुढें वदे तयास गा मुनी गुरू तरा बरी ॥
अनंत रे मनामधीं धरी सदां शिरीं उरीं ॥११५॥ १०७ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

जो या भूवनत्रैंत फीरत असे बोधी जनां स्वात्मनीं ॥
दीसे चंचळ थार ज्या नच घडीं ये कां असे भूवनीं ॥
चाडीची बहु गोडि ज्या नितिमधीं नासी बरा तामस ॥
जो भक्तासनिं श्रेष्ठ होउनि बरा वागे मना गोडिस ॥ १ ॥
जो नारायणनाम गायक बरा गूणान्वयें शोभला ॥
विष्णूचें प्रिय पात्र यास्तव असे जाणे कळा तो भला ॥
द्वैता नासुनि शांति दे भवपुरीं नाहीं दुजा या रितीं ॥
साचा भागवतमूळपीठ गुरु हा तारी जना दे रिती ॥ २ ॥
वीणा ब्रम्ह स्कंधनीं चिपुळिया हातांमधीं शोभत ॥
नाचे गावत नाम तें क्षणक्षणीं गीतांतरीं रंगत ॥
शीखा ऊडत शीरिंची तडतडां पायीं बरे घुंगुर ॥
सोहंभाव भला असे रवघणी नादें भरे अंबर ॥ ३ ॥
ऐसा नारद पातला वनिं तया जेथें असे तो ध्रुव ॥
पाहूनी मुल तें वदे मग तया ऐका तयाची सेव ॥
रे रे बाळक कोण तूं निजसुरा किंवा असे मूर्छित ॥
बोले वेळ नको करूं झडकरीं ऐकूं बरें वाटत ॥ ४ ॥
कोणाचा सुत तूं बरा धिट कसा या काननीं येकला ॥
आशा काय मनीं तुझ्या जडलिसे बोले बरें तूं मुला ॥
सोडी शोक मनांतला सकळ तो होई बरा सावध ॥
ऐसें बोलुनियां करीं ढळवि त्या बाळा मुनी नारद ॥ ५ ॥
झाला सावध तेधवां ध्रुव बरा बैसे उठोनी त्वरां ॥
पाहूनी मुनिला भरे धिर मनीं आनंद भासे पुरा ॥

स्वानंदाश्रुभरें तदां नयन ते जैसे झरे वाहत ॥
पायीं त्या मुनिच्या असे धुत बरें तेव्हां गुरू तोषत ॥ ६ ॥
मूखीं शब्द फुटे न तो तनु असे कंपे बहू फारची ॥
साष्टांगें प्रणिपात घालुनि ध्रुवें भावा मिळे साचची ॥
जैशी माउलि देखुनी चुकलिला मारी मिठी बाळक ॥
स्फुदों स्फुंदत फारची गहिंवरें कंठामधीं आटक ॥ ७ ॥
बोले नारद तेधवां उठ मुला बोले तुवां आननीं ॥
कां रे तिष्ठसि बा उगां भवपुरीं एकांत या काननीं ॥
बा रे तूज पिता वदे कवण तो ऐकों तरीं सत्वर ॥
बोले बाळक तेधवां स्ववदनीं ऐका भलें उत्तर ॥ ८ ॥ ११५ ॥

(मंदाक्रांता.)

बोले तेव्हां ध्रुव मुनिवरां ऐक बा मूळवार्ता ॥
पीता माझा रविकुळमणी पाद उत्तान ताता ॥
दोघी कांता सुनिति सुरुची द्वेष त्यांच्यामधीं हो ॥
रायाला आवड सुरुचि श्रेष्ठ सुनीतीस मी हो ॥ १ ॥
जन्मा आलो परि ममवरी प्रीत ना राजयाची ॥
नाहीं पाहे वदन कधिं ही जन्मपत्री कशाची ॥
पीता ठावा नच मज बरा गा मुनी राजयोगी ॥
खेळे पोरामधिं कुमर ते टोंचितो अंतरंगीं ॥ २ ॥
पूसे माते कवण जनिता सांग गे या तनूला ॥
बोले तेव्हां जननि मजला भूप हा साच मूला ॥
ऐकोनीयां जवळ पितया पोंचलों एक दीनीं ॥
प्रेमा राया उपजत बरा घेत अंकीं त्वरेनीं ॥ ३ ॥
मारी लाता सवत जननी शब्दबाणें उरातें ॥
फोडी धायीं रडत परतें माउली सांगिलें तें ॥
बोले माता मज तदुदरी नाहिं देवा पुजीलें ॥
यासाठीं मी वनवन फिरें देवभेटीस भूलें ॥ ४ ॥

आहे इच्छा मनिं बहु मला देव भेटावयाची ॥
मार्गो ठाया नढळवि दुजा हांव ही मानसाची ॥
यासाठीं काननिं फिरतसें रात्रदीनीं दयाळा ॥
नाहीं शांती मनभुवनिं ही तारि गा तूं कृपाळा ॥ ५ ॥

देखोनी आज मुख तुमचें प्रेम दाटे मनाला ॥
संतोषें मीं बहुत बरवा शांति सूखासनाला ॥
स्वामी आतां मज पदरिं घ्या दीन मी गा सनाथा ॥
सांगा कैसें करूं मि तरिं तें देवभेटीस आतां ॥ ६ ॥

बापा तारी समज बरवा मानसीं सांठवावा ॥
चिंता फेडी रव कळवि ते प्रेम पोटीं असावा ॥
जाऊं सारी कलिमलमता ताप हाः मीटवी गा ॥
भेटीं दे तो हरि मज बरा आननीं वाक्य सांगा ॥ ७ ॥ १२२॥

( दिंडी. )

असें ऐकोनी मुनी वदे त्यासी ॥ अरे बाळा सान तूं त्रासलासी ॥
उगां कां रे हट्ट हा तूजलागीं ॥ कसा होसी तापसी मुला जोगी ॥१॥
देवभेटी फार ती दूर आहे ॥ भले गेले शोधितां तया पाहे ॥
हट्टयोगें तो हरी नाहिं भेटे ॥ उगां त्राता सोसिसी दुःख वाटे ॥ २ ॥
बरें ऐकें सांगतों रीत ती रे ॥ धरी ध्यानीं पूरती कान दीरे ॥
जया नाहीं रूप तें गुण पाही ॥ निराकारी वास ज्या सत्य पाही ॥३॥
वेद ज्याला वर्णिता शीणले ते ॥ सदा शास्त्रें भांडती आपमत्तें ॥
नसे शब्दां ठाव तो वाच्यवाचे ॥ भुतांठायीं गूण ते दृश्य साचे ॥४॥
हरी माया वीलसे तीन लोकीं ॥ येथ नाहीं सत्य तें तूं विलोकीं ॥
यासि बाळा साधनीं साधिती जे ॥ वदूं तेंची रूप रे ऐक वोजें ॥५॥
सकळ झालीं साधनें पूर्ण ज्यांचीं ॥ जन्मजन्मीं सोसुनी त्रास त्यांचीं ॥
पुजावीधी नेमनिष्ठ ते साचे ॥ सदां नामीं भावनीं ऐक्यतेचें ॥६॥
ज्ञान ध्यानीं योग जे साधितातो ॥ जया चित्तीं ना मळी भवाची ती ॥
विवेकानें अंतरीं शोधिती जे ॥ तेचि जाती मीळोन रूप तेजें ॥७॥१२९॥

( घनाक्षरी. )

मुला ऐक खरें तूज ॥ सांगतसें मींच आज ॥
भावबळाचें हें काज ॥ बाळपणीं साधलिया ॥ १ ॥
आगमवीधीच कर्म ॥ नाहीं स्वरूपाचें वर्म ॥
वेद जाणे नाचि वर्म ॥ सत्यधर्म आत्मनिया ॥ २ ॥
विवेकचि येथ दोर ॥ बोधरवि धैर्य थोर ॥
डेरा शांती शीरजोर ॥ आगमदधी चाळिया ॥ ३ ॥
नीगम ते नवनीत ॥ तेथ ठेविं सारि प्रीत ॥
गुरूघरीं हीच नीत ॥ भवामधीं लाभ तया ॥ ४ ॥
भाव पाहिजे तो नीट ॥ वीषयीं असावा वीट ॥
ज्ञानबोधें मन धीट ॥ बाह्य उपाधि टांकुनी ॥ ५ ॥ १ ॥
गुणत्रयाचें हें जग ॥ साजें दृश्यभास सोंग ॥
आद्यकर्म रूप भोग ॥ भवरोग हा साचची ॥ २ ॥
तमचि हा पशु स्थीर ॥ रजाचें कामिक वीर ॥
इच्छि स्त्रीपुत्र ना धीर ॥ मायिक हा लुब्धची ॥ ३ ॥
तिजा सत्वगुणराज ॥ ज्ञानविवेकाचें काज ॥
शांतीसुखा बरा साज ॥ पाप नाहीं आवडेची ॥ ४ ॥ २ ॥
याहुनी तो गुणातीत ॥ अलक्ष असे ती रीत ॥
निरामयीं गुंते प्रीत ॥ मीतहीत जाणता ॥ १ ॥
कर्म करुनि अकर्म ॥ मर्म जाणुनियां धर्म ॥
काळभीतिस हें वर्म ॥ तोचि निपुण जाणता ॥ २ ॥
भूतदया अनुष्ठान ॥ मीपण तें ठेविं घाण ॥
शांतीधृतीवरी ठाण ॥ विवेकवंत पूरता ॥ ३ ॥
आपपर द्वैतभान ॥ नसे जेथें अनूमान ॥
अशास कशास ध्यान ॥ ब्रम्हानंद आनंदिता ॥ ४ ॥ ३ ॥
शोकमोह गेले दूर ॥ कामीं नसे हुरहूर ॥
अभीमान केला चूर ॥ हाचि थोर जगीं या ॥ १ ॥

आत्मबोधीं झाला रत ॥ आभरली निजीं नीत ॥
भव वाटे जगन्नाथ ॥ यमाच्या भीत ना भया ॥ २ ॥

निर्विकल्प निर्दोष ॥ अहंपणीं नाहिं सोस ॥
हरिकीर्तनांचा घोष ॥ सदां संतोष साच या ॥ ३ ॥

देव ज्याचा बंदीजन ॥ गुलाम मुशाऱ्या बीन ॥
वर्ते सेवकारितीन ॥ धन्य जगति कीर्तिया ॥ ४ ॥ ४ ॥

मुला तुज आहे हांव ॥ घेई येथवरी धांव ॥
त्वरा करी बरा ठाव ॥ धांवधांव झडकरी ॥ १ ॥

उरीं धरी हरी ध्यान ॥ नको धरूं अनुमान ॥
वृत्ति वागों रितीं सान ॥ आत्मध्यान अंतरीं ॥ २ ॥

देव तुजसी भेटेल ॥ इच्छा मानसीं पूरेल ॥
काळ देखुनी पळेल ॥ हरि वळेल मंदिरीं ॥ ३ ॥

ऐसें वदोनियां कर ॥ मुनी ठेवि शिरावर ॥
बीजमंत्र दे नीबर ॥ द्वादशसम अक्षरी ॥ ४ ॥ ५ ॥ १३४ ॥

( दिंडी. )

असा बाळा देउनी बीजमंत्रा ॥ निजानंदें मीळवी बोधमात्रा ॥
गुरू नारद थोर गा कृपाळू हा ॥ नासि कामा अहंतें दुःखमोहां ॥ १ ॥
निगम सांगोनी मुनी गुप्त झाले ॥ ध्रुवाअंगीं बोधनीं तेज आलें ॥
सुखी झाला तेधवां भजे देवा ॥ ऐक्यभावें अंतरीं वासुदेवा ॥ २ ॥
सर्वांभूतीं भासतो भास तेव्हां ॥ नसे दूजा भाव तो सख्य जेव्हां ॥
रमाकांता आटवी वेळ सारा ॥ साधियेलें सौख्य तें भक्तिसारा ॥ ३ ॥
निजीं लागे ध्यास तो बाळकाचा ॥ हरी भेटे तेधवां रंग साचा ॥
चहूं भूजीं ध्रुवाला धरी पोटीं ॥ प्रेम दाटे तेधवां मुला पोटीं ॥ ४ ॥
मिठी घाली पायिं त्या बाळ ताना ॥ तोषला गा भक्तिचा देवराणा ॥
ध्रुवा बोले तो हरी तेधवां गा ॥ माग पोटीं वांच्छिता फळाभागा ॥ ५ ॥
अरे बाळा तोषलों गुणा तुझ्या ॥ चित्तिं माझ्या रीजली ऐक्यपूजा ॥
माग देतो लोक हे तीन तूंतें ॥ सार्वभौमा स्थापितों हीतमातें ॥ ६ ॥

असें ऐकोनीयां वदे हरीला ॥ बाळ तो गा ऐक त्याच रीतीला ॥
गुरुवाक्यें बोधिला बोध जो कां ॥ अनंताला प्रेमळा सुटे धोका॥७॥१४१॥

( शार्दुलवि० )

हें नारायण वासुदेव कमलाकांता तुला मी नमी ॥
दे थारा तवपायिं गा मज बरा राहों मती ही समी ॥
मागूं नेणत आणि तें सुरवरा शांती बरी फार दे ॥
दे ठावा मजलागिं गा नरहरी ना दूसरा वास दे ॥ १ ॥
सर्वां अंतरभूत तूं धननिळा जाणीव ती तूं कळ ॥
कीती वर्णुं तुला नसे गति मला ध्यानास नाहीं बळ ॥
दीनाची करुणा तुलाचि अरुणा बोधामृतादायका ॥
वर्णूं तें किति गा जगीं रूप तुं गा चैतन्य तूं साम्यक ॥२॥
ब्रीदा पाळिसि दीन वत्सलपणीं भक्तास तूं गा धनी ॥
मानी जें मनिं तें करी निति भिं तें सांगूं किती आननीं ॥
पूजा नेणत ध्यान ही गमत ना नामा असें घोंकित ॥
तारीं मार तुला रुचें करतसें बोलूं किती गा गित ॥३॥
ऐसें बोलत तो इशास ध्रुव गा संतुष्ट झाला हरी ॥
प्रेमानंद उठे मनांतुनि बरा आलिंगनीं सांवरी ॥
आदीं बाळक त्यांत भक्त निजरुपीं गुरू बरा नारद ॥
ज्ञाना काय उणें असें मग तया शांतीसुखें शारद ॥४॥
बोले अच्युत तेधवां ध्रुव मुला शाबास तूं रे भला ॥
संतोषें तुजला बघोनि आजिं मीं देतों पदा घे भला ॥
ना कोणी तुज ऊठवी सुरनरी किंवा मुनी सिद्ध ते ॥
ना रे किन्नर अष्ट ते वसु बरे स्थाना तुझ्या सीवते ॥ ५ ॥
चाले सत्वर तूं अजीं अढळ तें देतों पदा बैस गा ॥
ऐसें बोलुन न्हेत तो हरि तदां देतो पदाला मगा ॥
ना ठावें कवणा नसे गति बरी जाया तया हो स्थळा ॥
तेथें स्थापुनि बाळकां कर शिरीं ठेवी बरा कोमळा ॥६॥
तारा सोम रवी ग्रहांदिक बरे फेरा जया घालिती ॥
सूरांच्या ललना पतीसह बऱ्या देखों तया पोंचती ॥

पुष्पें वृष्टि करोनियां बहु परी कीर्ती मुखें वाणित ॥
लोकां तीन असे सदां अढळ जो भानू कुळीं शोभत ॥७॥
मातापीतर त्यासही गति हरी देतो बरी पूढतीं ॥
वैकुंठाधिपतेस या बहु दया भावीक त्यां दे गती ॥
यासाठीं भजनीं मती रुप हरी गातों सुखें किंकर ॥
गोविंदा गरुडध्वजा दिन अनंता ठेवीं शिरीं तूं कर ॥८॥१४९॥

॥ ध्रुवचरित्र संपूर्ण ॥

---

# सुभद्राहरण.

ॐ अनंताय नमः

( शार्दूल० )

गौरीच्या तनया हरी भवभया देवा करी गा दया ॥
येऊं दे उदया दया सदयता टाळी अरीच्या भया ॥
कामादीक अरी उरांतुनि दुरी आर्जीं करी आजरीं ॥
सौंसारांतुनि मोकळी सदपदीं प्रेमा मतीतें भरी ॥ १ ॥
चत्वारी जननी मनीं सतत ये गीतामृतादायिनी ॥
प्रेमाची खण खाणुनी सदमणी चित्तीं सुजी बोधनी ॥
शब्दाला मुळ ठाव तो तव मती भावो भवो अंबिके ॥
गूणातीत अनंत हा अवगमों ज्यासी दुजें ना तुके ॥ २ ॥
सद्गूरू पद वंदुनी निजमती गीतीं मती फांकली ॥
बोली नीगम कौतुकी कलिमली धूण्यास पाथूरली ॥
आहे शांति नदीतटीं सुजन ते धूती विचारान्वयें ॥
बाकीं प्राकृत लौकिकीं कथनता सूभद्र लग्नान्वयें ॥ ३ ॥
येथें अर्थ सखोल बोल भुमिका बोली सदां प्रेमता ॥
भावार्थार्थ समर्थ भाव समता घेतां जडे ऐक्यता ॥
बोलूं तेंचि सुधा समोच मतिनें दीले गती पासुनी ॥
सद्गूरूपद संभवीं उठाके जे फूटे अर्जी आननीं ॥ ४ ॥

निर्गूणी जग चाळवी गुणबळें भक्तीबळें चेततो ॥
भावीकामननीं सदां वसतसे द्वारावती येइ तो ॥
वेदां पार नसे अपार महिमा गाती पुराणांतरीं ॥
लीलानाटक संसृति शमविण्या बोधार्थ हा आजरी ॥ ५ ॥
संताच्या पदिचा कणाव धुळिचा स्पर्श बरा मस्तकीं ॥
त्याची जी कळ पोंचली मतिमधीं वाणी वदे तेंचि कीं ॥
कर्ता भाव नसे मिषें दिन असे लेशें गुरूच्या स्फुरे ॥
आनंदास अनंत आदर करी चित्तांतरीं आभरे ॥ ६ ॥

(पृथ्वी.)

मती सदनिती गती निगम ती सती आकळे ॥
तया धृतिप्रती सदां सुजन ते मती भाळले ॥
भुमी निधिमधीं भवांबुजतटीं नटी येकली ॥
कलीरहित सांउली श्रमशमा सदां फांवली ॥ ७ ॥
अगाध महिमा भुमीतळवटीं लिलानाटकी ॥
सगूणमिषगायनीं कळवळे मुलीं मायकीं ॥
असा नच दुजा सखा निजसुखा सिका आगमीं ॥
सखोल निगमीं मती मिळतसे हरी ऊगमीं ॥ ८ ॥
घनाहुनि दया जया मतिमधीं सदां भाविकीं ॥
निकी नच ति येकही निरनिती मती शोधकी ॥
रमापदिं श्रमें करीं चुरितसे सदां दासिसीं ॥
उमापति जपे सतापशमना दिवा हो निशीं ॥ ९ ॥
जया उदरिचा सुबोध उगवे भवीं मोडतो ॥
चकोरमतिला निती अवगमे सदाचार तो ॥
अशा हरिपदीं मती नमुनियां गितीं वाणितों ॥
सदोष हरण्या मनामाधिं हरी जगीं जाणतो ॥ १० ॥
अपार महिमा भुमीधर शिणे गिरा चीरल्या ॥
अशाहि प्रभुला भवीं सुजन घे चत्री मासल्या ॥
गुणातितरुपें स्वतोषमतिनें उरीं स्थापिला ॥
मिळोन मिळणी द्विवीधमति ती करी वांतिला ॥ ११ ॥

बहू मुनि तपी जपी सकळही जया ध्याति गा ॥
निशीदिनिं मुखें परी समुळ हा नसे ऊगमा ॥
तया हरिजिची कथा मति यथारुपें वर्णितो ॥
अनंतमतिची अनंत कळ ही असें जाणतों ॥ १२ ॥

( वसंत० )

द्वारावती वसवुनी हरि राहिला हो ॥
सिंधूमधीं मतिचिया नवरंग भावो ॥
शांतिसुखें सुखि सदां अरि नाहिं कोणी ॥
ठाणें असें रचि बरें नच येइ वाणी ॥ १३ ॥
स्वानंदकंद मुळचा हरि तोचि झाला ॥
वैराग्ययुक्त निजज्ञान हलाख्य बोला ॥
दादा बराच बळि हा तम नासण्याला ॥
आज्ञेमधीं हरि वसे बळिभद्रलीला ॥ १४ ॥
याची असे भगिनिती वदती सुभद्रा ॥
भद्रासनीं बसविण्या वरिजे नरेंद्रा ॥
एकांग वीर नर तो सख कृष्णजीचा ॥
वीचार लग्नघटि ती प्रथमीं तयाचा ॥ १५ ॥
पार्थास नोवरि बरी भगिनी सुभद्रा ॥
संकेत भाव मतिचा हरिहेत मुद्रा ॥
ऐसें भविष्य असतां बळिभद्र याणें ॥
दुर्योधना कुमतिला दिलि भाक ज्याणें ॥ १६ ॥
वीचार बेत करुनी मधुसूदनाला ॥
पूसे सुबोध बळि तो मतमान बोला ॥
दुर्योधना नवरि ही वसुदेवसूता ॥
हीतार्थ हा अवगमे मजला अनंता ॥ १७ ॥

( कामदा. )

ऐकुनी मनीं हेत या रितीं ॥ खिन्न होतसे रुक्मिणीपती ॥
नेति बोलती वेद तो हरी ॥ मानसीं वदे नोवरी नरीं ॥ १८ ॥

पार्थ मानसा पासुनी खरा ॥ आवडे परी नावडी तरा ॥
आननीं वदे ज्येष्ठबांधवा ॥ आवडे तसे वेत आठवा ॥ १९ ॥
आदि अर्जुना ती सुयोधना ॥ शब्दभाषणा द्वैतदूषणा ॥
अर्थ सार्थकीं पक्ष आदला ॥ कां जि दोषिला ऊर्फ जोडिला ॥ २० ॥

ऐकुनी असें ज्येष्ठ बोलती ॥ काळ मानती जाणती गती ॥
काळ साह्य गा आज कौरवां ॥ पांडवां असें दैन्यवाणवा ॥ २१ ॥
लौकिकीं बरें तेंचि आचरूं ॥ काळमानि हा अर्थ सांवरूं ॥
ऐकुनि असें सांवळा हरी ॥ मानसामधीं शोध तो करी ॥ २२ ॥

योग्य येथ हा लग्नसंभवी ॥ वीर अंतुरी व्यर्थ लाघवी ॥
पार्थची सखा सोयिरा खरा ॥ नाहिं साधणें लग्न ईतरां ॥ २३ ॥
पार्थ आमुचा काननीं असे ॥ तीर्थपंथिं तो दीन फारसें ॥
आजिं मात ही त्याजला कसी ॥ श्रुत होइ गा युक्ति कोणसी ॥ २४ ॥

क्षुधित भक्तीचा माधवो खरा ॥ त्वरित पाठवी प्रेम सत्वरा ॥
द्विज रुपें बरा वेष घेउनी ॥ हेत पातला सख्य भावुनी ॥ २५ ॥
सेतुबंधनीं हेत द्वीज तो ॥ पार्थ लक्षुनी मात बोलतो ॥
खोल अर्थिचा बोल पातला ॥ भावि प्रेम तो साह्य पातला ॥२६॥
नीजभक्तिचा सख्य पूतळा ॥ पार्थसार्थकीं भाव आगळा ॥
चंद्रमौळिचा सख्य आदला ॥ शीव सद्गुरू नीतिं पूजिला ॥२७॥
भक्तिजोर तो थोर होउनी ॥ सख्य माधवो जो जगा धनी ॥
ऐक्यभावनीं चित्ति बांधिला ॥ जो धनंजयो नाम पावला ॥२८॥

या भवांबुधीं गोड ही लिला ॥ गाउं मानसा शोध घे भला ॥
दास संसृतीमाजिं येत हा ॥ हा अनंत गा हांक दे महां ॥२९॥

( भुजंगप्रयात. )

पणीं हारला धर्मरावो भवीं हो ॥ कलीसंसृतीतें मतीपासुनी हो ॥
सभे कौरवांच्या हरे आत्मदारा ॥ असे ना कधीं जेथ शांती निवारा ॥३०॥
जरासंध मोहो तमापासुनीयां ॥ शकूनी करी पाश ते साधुनीयां ॥
तया हड्डिचे घांसुनी चौक साधी ॥ असे वैर याचें म्हणूनी उपाधी ॥३१॥

हरे जी बरा राज्यसंसार सारा ॥ वनीं पातला बांधुनी पाश बोला ॥
हरींचिंतनों राहिले भावयोगें ॥ बरे काननीं बंधुपत्नीसमोघें ॥३२॥
तदां येक दीनीं असा योग आला ॥ असे धर्म एकांत सतीहित बोला ॥
नितीं नेमिल्या दीवशी दीवसा हों ॥ रमे मंदिरीं सुंदरी संगतीं हो ॥३३॥
असे पार्थ तेव्हां दुरी काननीं तो ॥ बरा द्वीज तेथें तधीं प्राप्त होतो॥
बहू आक्रुषें हांक मारीत आला ॥ अगा पार्थवीरा मला रक्ष बोला ॥३४॥
अरीच्या घरीं गोधनें सर्व गेलीं ॥ अमोली असे मोल ना येत बोली ॥
भजीं धांव मारी अरीलागीं बापा ॥ नृपा वीजया सूख देईं प्रतापा ॥३५॥
नसें चाप तेव्हां करी अर्जुनाचें ॥ त्वरेनें तदां जाउनी तेथ पोंचे ॥
असे धर्मपत्नी धृती एकवासा ॥ तया मंदिरामाजिं हो अस्त्रवासा ॥३६॥
असे द्वारभागीं उभा म्हूर्तवेळू ॥ विचारान्वयें पाहि तो गा मवाळू ॥
नये आंत जाया नये तें बसाया ॥ पडे संशयामाजिं तेव्हां बरा या॥ ३७॥
बसावें तरी ब्राह्मणा शोक होतो ॥ जरीं आंत जावें तरीं बोल येतो ॥
अशा संकटाच्या पडे चापणीला ॥ परी अंतरीं तेधवां जोर केला ॥३८॥
करें ढूकली द्वार तें जोरयोगें ॥ भिडोनी सती ऊठली भोगत्यागें ॥
अधोमुख झाला असे धर्म तेव्हां ॥ न बोले करीं घेतलें चाप तेव्हां ॥३९॥
तसा चालला मागच्या पाउलीं हो ॥ मनीं बैसला डाग तो शास्त्रभावों ॥
वनीं जाउनी मारि त्या तामसाला ॥ द्विजा गोधनें देउनी बोळवीला ॥४०॥
तया पापभावें करी तीर्थयात्रा ॥ शमे मानसीं तापसी हेममात्रा ॥
विचारान्वयें येकटा पंथ चाले ॥ बरा रामनाथीं जपे स्वार्थमाले ॥४१॥
मना पाहि आतां वदे द्वीज तें हो ॥ तुला सांगताहे धरीं वानवा हो ॥
अनंतीं गुणें गायिल्या कृष्णराणा ॥ तुटे यातना बाणते साक्षिखूणा॥४२॥

( द्रुतवि. )

यदुपतीकडुनी सुहेत तो ॥ जवळि येउनियां नरास तो ॥
पुसतसे तुमिं कोण तापसी ॥ बहु उदासमती असी कसी ॥ ४३ ॥
समदिठी मिठि देइ नासिकीं ॥ नच दुजा समजे मनास कीं ॥
आजिं असे बरवा विवाह गा ॥ यदुपतीभगिनी समोघ गा ॥४४॥

( द्विज वरें विर फार दाटिगा )

नभतळीं असली नसे मजा ॥ उठ चले असि ना दुजी पुजा ॥
सकळ अर्थ बरें तुझे अरे ॥ पुरति कामिक जाण हें खरें ॥ ४५ ॥
रव असें श्रवणीं नराचिया ॥ जडाणितें जडलें मनाचिया ॥
चळ उठे तंव अंतरांत तो ॥ दिठि वरी करितो तदांच तो ॥ ४६ ॥
नमुनियां मग त्या द्विजास हो ॥ वदतसे सकळीक बोल हो ॥
कवण गा नवरा विवाहिं त्या ॥ मज वदा स्वमुखें करोनि त्या ॥४७॥
तुमिं बरे वसतां सुदेश तो ॥ मज कथा सकळीक भाव तो ॥
आजि अनंतमतींत ही कथा ॥ मथन होत असे स्वभाविता ॥ ४८ ॥

( दिंडी )

कथा बोले तेधवां ब्रह्मरावो ॥ बरें ऐके गा तापसी हेत भावो ॥
हरीभगिनी सुभद्रा नाम जीसी ॥ तिचेचीं हें लग्न मा नृपापासीं ॥
सुयोधन तो नोवरा बळीरामें ॥ नेमियेलासे काळमानकामें ॥ ४९ ॥
हरीचित्तीं हेत तो अर्जुनाचा ॥ वहू वाहे अंतरीं सत्य साचा ॥
परी नाहीं अर्जुना ठाव कोठें ॥ असे झाला तापसी तीर्थवाटें ॥ ५० ॥
असे चित्तीं खिन्न तो कृष्णरावो ॥ नसे कोठें शोध तो नरा भावो ॥
अजीं आलों द्वारकेहूनि मीं गा ॥ तीर्थयात्रा करितसे मनोभंगा ॥ ५१ ॥
हरीचित्तीचा हेतभाव सारा ॥ ठाव मातें सर्व तो ना पसारा ॥
सदां राहें मीं निकट कृष्णजीच्या ॥ बहू एकांतीं असे अंतरीच्या ॥५२॥
असी ऐके जेधवां पार्थ वार्ता ॥ द्विजामूखें करुनियां सारि गाथा ॥
तदां झाला शोक तो फार चित्ता ॥ दुःख भावीं नाडलों आत्महीता॥५३॥
मनीं भावें द्वारके आज जावें ॥ कृष्णभेटी घेऊनी जाणवावें ॥
परी नाहीं पूर्णता तपाची ती ॥ कमीं वर्षें द्वादशीं कांहिं होतीं ॥ ५४ ॥
लाग्नीं हेतू गुंतला मनाचा या ॥ बहू लागे तळमळी मानसाया ॥
करूं कैसें काय तें सुचेनाची ॥ मतीमाजीं रोग हा जोडलाची ॥ ५५ ॥
काय देवा टाकिली वाट माझी ॥ कैसि भेटी होय ती मला तूझी ॥
दीनदात्या सर्वही जाणसीं तूं ॥ नको विसरूं मला आजि गा तूं ॥५६॥
सखा नाहीं दूसरा आणि देवा ॥ तुवांवीणें या जगीं वासुदेवा ॥
नको टाकूं मानसामधीं मातें ॥ दीन आहे ह्मणुनियां तुझें नातें ॥ ५७ ॥

आशा भाँब चिंतुनी मनीं आधीं ॥ वदे वाणि ब्राह्मणा हितबोधी ॥
लग्नतीथी घटित कोण मासीं ॥ कोण दीनीं कोणती वेळ त्यासी ॥ ५८ ॥
वदे तेव्हां द्वीज तो पार्थराया ॥ तुमांलागीं एवढीं कां जि माया ॥
बरें तुम्ही तापसी तीर्थवासी ॥ कशासाठीं येवढी मती देशीं ॥५९॥
चोर दृष्टी चंचळी मान काया ॥ कोण, योगी पंथ हा येथ राया ॥
सांग लागे सर्व ही मती:भावो ॥ अनताला नवलाव हाचि भावो ॥६०॥

(चंपकमाला.)

आज तुमाला लोभ मनाला ॥ फार उरीं गां देत दशोगा ॥
काय कळेना आजजि ध्याना ॥ पार्थ असावा अर्थचि माना ॥६१॥
चंचळता ही दाविं नवाही ॥ हेत विवाहीं मान न गेहीं ॥
साच दिसा हो अंतर भावो ॥ कोण तुं वीरा बोल जि भावो ॥६२॥
यापरि मूलें तो द्विज बोले ॥ प्रेमळ रावो अंतरिं डोले ॥
सर्व जगाचा जाणिव साचा ॥ भाव हरीचा लक्ष नराचा ॥ ६३ ॥
आत्मसबोधी बोधक शोधी ॥ तोडि उपाधी अंतर रोधी ॥
ताचिजि साधी प्रेम सुगादी ॥ येर नराला सर्व उपाधी ॥ ६४ ॥
भक्तिरसाचा राव जि साचा ॥ शामक रावो प्रेमपुराचा ॥
भाव उराचा कृष्णप्रितीचा ॥ हेत हरीचा तेथचि रूचा ॥ ६५ ॥
कल्पतरू हा कल्पक पाहा ॥ आदि जगाचा सारचि आहा ॥
माधव मोठा लाघवि गोटा ॥ नीगम सोटा बोधक मोठा ॥ ६६ ॥
बोलत पार्था वोळख दावी ॥ सांग खरें जी कोण विराजी ॥
चोरुं नको गा बोल बरें जी ॥ साज तुझा हा भास सुराजी ॥ ६७ ॥
हेत द्विजाची वाणि सुखाची ॥ कानिं भरोनी घेत बराची ॥
अर्जुन साचा होय पाहतां ॥ साक्ष.वरी घे अंतरहीता ॥ ६८ ॥
हाचि सखासा वाटत भासा ॥ प्रेम चढे तो फार तमासा ॥
जाणुनि पार्थी त्याजि समर्थी ॥ भाळ पदातें लावित हीता ॥ ६९ ॥
देत मिठीला घट्ट दिठीला ॥ तो हरि याला प्रेमभरेला ॥
याजि अनंतीं भेद निमाला ॥ लाभ भला हा थोर मनाला ॥ ७० ॥

( उमा० )

दावि तदां रुप कृष्णसखा नरिं देत मिठी वरि प्रेम भरीं ॥
कंठ भरे रव नाठवती तंव रौरवसंभव देवनरीं ॥
आठव नाठव हांव न भाव स्वभाव तदां वसला बरवा ॥
बोध गडा झगडा मिटण्याकरितां करितो मनिं तो बरवा ॥ ७१ ॥
खोल अमोल समोघ मनाघ वदे द्विज तो बरवे रितिचा ॥
आनन हांस्मित शामसुलोचन कोमल राजिव हा मुळचा ॥
स्वार्थपरांगपरा अघनाशन तापसताप त्यजी अजि रे ॥
स्वार्थ नसे परमार्थ बुडे मग अर्थ कसा तुज तो अजरे ॥ ७२ ॥
पंथ चतुर्थ समर्थ भवार्थ समोक्त धरोनि मनोघमतीं ॥
चाल त्वरें बहु द्वारवतीमधिं ग्रामसिमेवरि ओघगतीं ॥
राहि बरा दिन दोन रुतू बरसांत करी निति ऐक भुमी ॥
नीत समेमति होत सुबोधित तोडुं नये मम वाणि तुमीं ॥ ७३ ॥
यारिति बोलुनि वाणि द्विजोत्तम तेथुनियां मग जात असे ॥
पार्थ मनामधिं स्वार्थचि जाणुनि पंथ धरी रित तीव्र असे ॥
होत यतीवर छाटि कडासन दंड कमंडलु साज करी ॥
स्वार्थ मनीं परमार्थ जनीं नित दावितसे बहु सौख्यकरी ॥ ७४ ॥
चित्त उदासिन लग्नकळेमधिं जोडत घोंकणि नित्य नवी ॥
नाहिं चवी दुजि वांछित मानस हेत वधूवरि घेत चवी ॥
योग असा जव प्राप्तबळे गति कर्मभुमींतुनि जो जडला ॥
भोग बरा मग भोगुं ह्मणूनिच योग तनूवरि जोडियला ॥ ७५ ॥
हा नडला नच गा अडला चळला मग पार्थहि सत्वगती ॥
पोंचत येउनि द्वारवतीमधिं तो दिन मानित सूखमती ॥
ग्रामसिमेवरि मंदिर सुंदर त्यांत यतीवर आसन दे ॥
पाहि विलोकुनि सर्व दिशा मग आगमशोधक भावमर्दे ॥ ७६ ॥
सोंग वरी परि ढोंग मनामाधिं रोग जडे तनुलागिं बरा ॥
सर्व तरा वितरागित मानस चिंतित भावनिं भाव बरा ॥
शोध अनंत मनोघभरें करि रोग जरा तुटण्याकारितां ॥
देव दयानिधि यादवनायक प्रेम भरों मनिं दीनमता ॥ ७७

( शिखरिणी. )

फुटे वार्ता ग्रामीं यतिवर वरा आज नगरीं ॥
असे आला मोठा उतरत मठामाजिं लहरीं ॥
बहू जाती पाह्या मुल सति बया हेत धरुनी ॥
किती भावें येती किति उगिंच ते निंदक मनीं ॥ ७८ ॥

फळें पुष्पें पूढें प्रथम बरवी ठेवुनि पदां ॥
सभीं वंदोनीयां म्हणति हिरवी आपदमदा ॥
नसे दृष्टी पाहे धरित वदनीं मौन्य बरवें ॥
दिसे भोळा साधू जननयनिं तो केवळ नवें ॥ ७९ ॥

नवे ऊमेदीचा प्रथम मुळचा त्यांत विर हो ॥
उदासहि भारी मुखकमळिं तो देत विरहो ॥
गुणातीता ऐसा वरि परि मनीं लग्न झुरणीं ॥
कळा कापड्याची जगनयनिं ती योग्य करणी ॥ ८० ॥

नदीच्या हो कांठीं बक टपतसे लावुनि दिठी ॥
दिसे सत्वांगीचा परि मिनरसा मानस मिठी ॥
वरी ढोंगें सारीं वसति जयंतीं अंतर मुळीं ॥
नसे शुद्धी बुद्धी भ्रमत भ्रमणीं मानसकळीं ॥ ८१ ॥

निराशेचीं सोंगें जरि बनविलीं सांग रितिनें ॥
तरी वैराग्याचा पावन न भरें, आगममनें ॥
जयाचें त्याला ते नच दुसरियां साधन बरें ॥
अघोऱ्यांची सत्ता अरिभय मता केउतें जिरे ॥ ८२ ॥

यती होऊनीयां कपट मतिनें पार्थ बरवा ॥
मठामाजीं बैसे मतिमधि असे अर्थ परवा ॥
जनालागीं मोठा बहुत महिमा वाणिति मुखीं ॥
सदां दाटी द्वारीं हिमठखटही वंदिति सुखी ॥ ८३ ॥

करातें जोडूनी बहुत लवती शास्त्रनिपुणी ॥
असा आला नाहीं अजिवरि कुणी सत्पार्थ गुणी ॥

किती स्तूती गाती कितिक पडती थेट धरणीं ॥
विसावा तो नाहीं भरत जतरा पेटभरणी ॥ ८४ ॥

यदूवंशीं सारे सति मुल पती वृद्ध चळती ॥
नसे ठावो वाटे कितिक घसणीं ठेंच पडती ॥
कितिकांचीं वस्त्रें पडलिं गळुनी आठव नसे ॥
बहु दंगादंगी असुर मुळची जातिच असे ॥ ८५ ॥

तदां वार्ता गेली यदुप जवळी राजसदरे ॥
असे आला कोणी यतिवर बरा सत्पथ धुरे ॥
हरी जायी पाह्या हलधरसही त्या मठिं तदां ॥
नमोनीयां पायां वसति बरवे पाहत पदां ॥ ८६ ॥

दिसे शांती अंगीं तगमग दिठीं नाहिं मुळिं ती ॥
न पाहे दूजाला बहुत बरवा साज घुडती ॥
हरी जाणे सारें कपटनिपुणी अंतरमती ॥
वरी बोलांमाजी तुकवित शिरा तो यदुपती ॥ ८७ ॥
बळीरामालागीं पडत बरवी भूल मतिला ॥
ह्मणे कृष्णालागीं बहुत बरवा योग मथिला ॥
नसे साधू ऐसा सकळ अवनीं साधकगुणी ॥
बहू शांती अंगीं जडत बरवी शोधकपणीं ॥ ८८ ॥
अशीं थोरा भाग्यें नगरिमधिं हा येउनि बसे ॥
जळालीं तीं पापें सकळ दुरितें दर्शनामिषें ॥
घरीं न्हेऊं स्वामी हरि तुज कसें आवडतसे ॥
वदे मातें आतां झडकरिं तुवां शोधकवसें ॥ ८९ ॥

असें ऐकूनीयां वदत बरवें माधव मुखें ॥
वदों आतां तेंची अवगत मती आननिं सुखें ॥
अनंताला गोडी जडलि बरवी माधवगुणीं ॥
सदां चिंतूं नामीं श्रम शमविण्या जाणुनि धणी ॥ ९० ॥

( वसंत० )

बोले हरी हलधराप्रति नम्रवाणी ॥
वाणी सखोल मतिची निगमार्थ काणी
दादा तुमांप्रति जसी रुचि होय अंगीं ॥
तैसें करा मम मतामधिं तेचि रंगीं ॥ ९१ ॥
जाणीव भाव बरवा तुमच्या मनीं हो ॥
शास्त्रार्थ जाणत असे सदसंगदेहो ॥
खूणा बऱ्या पटलिया घरिं न्याजि स्वामी ॥
वीचार मात्र करुनि वळवा जि तूमी ॥ ९२ ॥
नाहीं मला अभिरुची तुमच्या मतीनें ॥
वागे न हा पथ असे मम भाव मानें ॥
कांहींच तें कळत ना बरवें किं खोटें ॥
कैसें करूं तरि मिं गा करि हीत वाटे ॥ ९३ ॥
बोले तदां हरिजिला बळिभद्र पाहीं ॥
तूझ्याविणें मजप्रती नच युक्ति गेहीं ॥
आहे तुझी निति बरी बहु खोल वाणी ॥
पूसे म्हणोनि बरवे तव हेतवाणी ॥ ९४ ॥
न्हेऊं घरां यतिवराप्रति आदरानें ॥
पूजूं बरा नवविधी गुरुभक्तिमानें ॥
सेवेप्रती भगिनिला बसवूं स्वभावें ॥
सौभाग्य हो नवरिला यतिभक्ति भावें ॥ ९५ ॥
ऐसा करोनि मग बेत स्वहेत रामें ॥
आले घरीं उभय ते मग गा रिकामे ॥
केला खरा परि तकूब करोनि बेता ॥
न्हेऊं दुज्या दिनिं म्हणोनि स्वभाव हेता ॥ ९६ ॥
पूंजी घरोघरिं सदां यतिराजयाला ॥
आनंद भावमतिनें जन देति त्याला ॥

नाहीं उणाव किमपी हरिभक्ति गेहां ॥
खोटें खरें जरि घडे हरि सोसि गेहा ॥ ९७ ॥
या ही रितीं करुनियां सख माधवाचा ॥
राहे सुखामधिं परी अनुताप साचा ॥
चित्तांतरीं झुरणि घे निजलग्नहेतू ॥
संन्यासभाव घडला न बरीच मातू ॥ ९८ ॥
बोलूं कथा तिच अजीं अनुताप भावीं ॥
आत्मानुभाव मनसा कथुं तो स्वभावी ॥
लीला अनंत वदनीं वदवी हरी ही ॥
जो भक्तवत्सल प्रभू दिनहितभावी ॥ ९९ ॥

( चामर. )

पार्थमानसांत हेत फार दाट वाढला ॥
नीजलग्नकारणार्थ अर्थ पंथ जोडला ॥
चित्तिं ध्यास हाचि न्यास रात्रदीन सारिखा
कोण मीं जि काय कर्म काळ मान रोडका ॥ १०० ॥
मोक्षपंथ ढोंग येथ मांडुनी मिं नाडलों ॥
स्वार्थअर्थ साधनार्थ या जनांत वीटलों ॥
कामअर्थधर्म यासि सत्य जाण मूकलों ॥
थोर घात वोडलाजि आसलोकिं सूटलों ॥ १ ॥
बंधु सर्व शोकपर्व मानुनीच आटती ॥
मानसांत झूरणीस ऐकूनीच लागती ॥
याज्ञसेनिलागिं त्रास फार होइ चित्तिं तो ॥
माय प्राण ऐकतांचि सोडि सांच जाण तो ॥ २ ॥
काय कर्मयोग येथ मीं जि सोंग मांडिलों ॥
मानसांत भाव नाहिं कोण अर्थे जोडलों ॥
फार ताप अंतरांत अर्जुनास होतसे ॥
शून्य सर्व देश त्यास द्वारकेंत होतसे ॥ ३ ॥
या रितीं मनामधीं अनूतपें जो तापला ॥
नीजध्यास लग्नआर्थी सर्व भावें जोडला ॥

कृष्णनाथ सर्व अर्थ चिंतितार्थ जाणतो ॥
या अनंतमानसांत रात्रदीन वागतो ॥ ४ ॥

( दिंडी. )

कृष्णचित्तालागीं हें कळों आलें ॥ पार्थ आहे संकटीं अर्थ बोलें ॥
मनीं नाहीं भाव तो साच झाला ॥ वाटताहे काळ हा व्यर्थ गेला ॥ ५ ॥
तयालागीं जाऊनि भेट द्यावी ॥ चित्तचिंता सर्वही बोळवावी ॥
मजवीणा आधार आणि दुजा ॥ भुमीभागीं भक्त हा सख्य माझा ॥ ६ ॥
मनीं ऐसें भावुनी जगन्नाथें ॥ करी प्रयाण तेधवां शीघ्र तेथें ॥
गुप्तरूपीं हरि निश्चित येकटा तो ॥ येउनीयां पोंचला पाहुनी तो ॥ ७ ॥
पार्थ पायीं घालुनी मिठी लोळे ॥ धरूनि हातीं कृष्ण त्या तदां बोले ॥
प्राणसखया काय रे पंथ केला ॥ व्यर्थ कां रे घोर हा जोडियेला ॥ ८ ॥
मनीं जाणे सर्वही भाव त्याचा ॥ वरी पूसे लाघवी शब्दवाचा ॥
नाटकी हा चाळकी सूत्रधारी ॥ दासभावे आकळे प्रेमचारीं ॥ ९ ॥
पार्थ देहा आलिंगनास देतां ॥ देव झाला घावरा भाव हेता ॥
प्रेम अंगीं स्फुरतसे कंठ दाटे ॥ भक्तिभावो मीळणी याच वाटे ॥ १० ॥
पुढें वैसे आसनीं भक्तराणा ॥ बद्धपाणी विनवितो पार्थ जाणा ॥
काय देवा टांकिली दयामाया ॥ दीन झालों ह्मणुनियां यदूराया ॥ ११ ॥
सर्व भाव तुं जाणसी अंतरीचा ॥ काय बोले आननीं दीनवाचा ॥
सारसाक्षी व्यापका जगाचीया ॥ नसे वाणी साम्य ते तुला गाया ॥१२॥
काय आतां करुं तरी गोपिनाथा ॥ प्राप्त झाली ही दशा जी अनंता ॥
मानसाचा भाव तो नाहिं येथें ॥ गोड नाहीं चित्ति हा पंथ मातें ॥१३॥

( शार्दूल० )

बोले माधव तेधवा कवतुकें स्वामीरुपें वेष हा ॥
घेवोनी बरवा मनोधरितिनें झाला गुरू कोण हा ॥
सांगे सर्व कथा मला समजुदे कार्यार्थ चित्तांतला ॥
पार्था वीर तुवां असोनि असला कां वेष हा घेतला ॥ १४ ॥
बंधूला त्यजुनी वनीं सातिम ही माता असोनी बरी ॥
म्हातारी ति घरीं रडे तुजविखीं नाहीं दया अंतरीं ॥

संसारीं विटलासि कां निकट ही संन्यास योगान्वया ॥
बोले कौंकारिं आननीं हित तुला वाटे मनातेंचि या ॥ १५ ॥
ऐकोनी रव या रितीं हरिजिचे चित्तीं म्हणे चोर हा ॥
सारें खेळ करोनियां नकळतां कोणा नसे ठाव हा ॥
बोले माधवरावजी तुजप्रती सांगूं तरी काय मीं ॥
तूझेची सकळीक हे मनलळे जाणें बरें हेचिं मी ॥ १६ ॥
आतां तूं मजला नको सततुं गा ऊगां बरा बैस तूं ॥
सांगे मात्र रितीं धरूं पुढतिं तीं देई मला येश तूं ॥
नाहीं जी यति जाहलों मतिमधीं वीवाह वागे सदां ॥
धंदा ना दुसरा मनोधरितिला हा हे सुभद्रापदा ॥ १७ ॥
साधे लग्न तरीं बरें हरि असे नाहीं तरी प्राण हा ॥
जाईसा मज वाटतो घननिळा शोकार्थ वाढे पहा ॥
नाहीं गोड मला दुजें हित जनीं हेतू तुला सांगतों ॥
देई गा भगिनी विवाह करुनी आणी नसे मागतों ॥ १८ ॥
ऐकोनी नरवाणि तोषत हरि बोले परी तो वरी ॥
हे जी काय मुखेंकरोनि वदसी रूची नये अंतरीं ॥
माझें चित्त कसें असें म्हणुनियां आजीं असें बोलसी ॥
शोधावीण नसे यती अनुग्रही बुद्धी मला ना पिसी ॥ १९ ॥
बोले बोल असा हरी परिसुनी बोले तदां पार्थ तो ॥
शोकानें स्फुरतो दिठीं जळभरें झाला म्हणे अर्थ तो ॥
जातों त्यागुनियां स्वदेश तुमचा आतां तुझी भेटही ॥
पायाला तुटलों अजीं दिनहुनी वाणी वदे दीन ही ॥ २० ॥
प्रेमाची खुण गांठली हरिमनीं बोले तदां सद्‌दें ॥
वत्सा धीर असों मनामधिं तुला आतां त्यजी आपदे ॥
येती दीनपणें मुखें रव तदां तेथें वळे श्रीहरी ॥
बाणे खूण अनंत मानसिं बरी चिंता हरी संहरी ॥ २१ ॥

( घनाक्षरी. )

हरी वदे ऐक पार्थ ॥ तूजवीण आणि अर्थ ॥
नाहिं नाहिं गा समर्थ ॥ लग्नम्हूर्त तूजसी ॥ २२ ॥

घेई घेई माझि भाक ॥ शोक आजि त्वरें टांक ॥
तूंचि जगीं वीरनाक ॥ टाकि धाक मानसीं ॥ २३ ॥
साधि बरें हेंचि वर्म ॥ विधी राक्षसीच धर्म ॥
सिद्धी पावे तव मर्म ॥ यथाकर्म जाणसी ॥ २४ ॥
तुमाठायीं बळीराम ॥ भक्तिभाव धरी साम ॥
दावि त्वरें सत्य धाम ॥ मन आराम पावसी ॥ २५ ॥
राहि स्वस्थ मानसांत ॥ हेत पुरे जाण मात ॥
असों पंथ हा जगांत ॥ गुप्त मात ठेवीं ही ॥ २६ ॥
ऊदयीक मंदिरांत ॥ न्हेति तूज बळीनाथ ॥
पुढें होई जी कां मात ॥ आहें साथ हा मिही ॥ २७ ॥
ऐकुनियां हरीमात ॥ सूख होत अंतरांत ॥
वाटतसे जगन्नाथ ॥ मनीं गात नाम ही ॥ २८ ॥
अनंतासि मोठि आस ॥ तोडण्यासि मोहपाश ॥
करी बोध मानसास ॥ प्रेमवास नाम घे ॥ २९ ॥

( साकी. )

वार्ता ऐसी ऐकुनि चित्तीं ॥ गडबड बहु झाली ॥
सुभद्रेला काळचि वाटे ॥ सूचेना कांहीं बोली ॥
दुर्योधन हा नवरा मजला ॥ ठरवी दादा मोठा ॥
खोटा वाटे तोटा मोठा करीन मीं तोटा ॥
( दादा वाटे ॥ आरिसा मनिं मजला ) ॥ ३० ॥

( भ्रमरावि० )

बोले तेव्हां रुक्मिणि वहिनी ॥ दादाजीला कळवि तुं सवनीं ॥
बोधी चित्ता वळवुनि वदनीं ॥ नीसीमाजीं मम हित कथनीं ॥ ३१ ॥
सांगे ऐस तुज अजि कथितों ॥ देई काना निगमचि मथितों ॥
पट्टाची तूं हरिमनसुरणी ॥ आहे चित्तीं निजसदतरणी ॥ ३२ ॥
वेणी झाला हिनगुणि गुणिगे ॥ माते तूझी नवघन कळगे ॥
तूझ्या बोलांमाधें हरि वसतो ॥ जाणूनीयां हृद रित वदतों ॥ ३३ ॥

आहे तेथें अनुभवकरणी ॥ स्त्रार्थार्थींही निगमचि अरणी ॥
खुणेविणें गम नच गितिया ॥ जाणे त्याचेचि पद मनु गया ॥ ३४ ॥
आहे सत्ता जगतिंत मतिची ॥ नांदे व्यापीं गुणिं समपणिचीं ॥
दूजें नाहीं हरिघरिं वसण्या ॥ आनंताला सदहित भरण्या ॥ ३५ ॥

( दिंडी. )

सांग दादालागिं हें बरें तूं गे ॥ अर्जुनाला आणवी शोधमार्गें ॥
मला नवरा दूसरा पार्थवीणा ॥ मनामध्यें दुःख दे हेत दूणा ॥ ३६ ॥
सुयोधन हा मजलागिं आवडे ना ॥ काय केला बेत हा येथ लग्ना ॥
माळ मीं या घालिना जीवभावें ॥ त्यजिन प्राणा अर्जुनावीण नांवें ॥३७॥
त्वरित दूतां दवडवी तीर्थपंथा ॥ शोध करवीं मजलागिं तूंचि माता ॥
वाहिनीबाई येवढें काम माझें ॥ करी आजीं सांगुनी फेडि ओझें ॥ ३८ ॥
असें बोले विनयतें दीनवाणी ॥ काढि नेत्रीं ढळढळां अश्रुपाणी ॥
रमा बोले तेधवां तीजलागीं ॥ अजीं पार्था मीं आणवितें वेगीं ॥ ३९ ॥
शोक टांकी बैस तूं उगीं आतां ॥ कार्यसिद्धी जाहली सोडि चिंता ॥
अनंताची भावना ऐक्यभावीं ॥ लग्न हेंची साम्यता आत्मभावी ॥ ४० ॥

( वसंतति० )

झाले असे सकळही उभयानुभावो ॥
अर्जुन हेत नवरी मन ऐक्यभावो ॥
देवो तयामाधिं असे सहजेंकरोनी ॥
नीती असे निगम ज्या जलभाव मानीं ॥ ४१ ॥
रामें तया दिनिं दुजा यतिराजयाला ॥
जाऊनियां विनवुनी घरिं आणियेला ॥
कांता तदां हरिजिच्या बघुं पातल्या हो ॥
वंदोनियां यतिपदां स्तविता मती हो ॥ ४२ ॥
लक्ष्मिला सकळ हें हरि बोलिलासे ॥
पाहोनि हास्य करिती वळखीचभीषें ॥
नाहीं दिली वळखि ती परि नेत्रभावें ॥
णीतलें असि तरा नर यास भावें ॥ ४३ ॥

आनंद मंदिरमधीं दिपवाळि दूजी ॥
पूजा यती प्रति पदा बळिरामदाजी ॥
भावीकभावमतिचा यति सत्य वाटे ॥
भेटे मनामाधिं बरा सद्प्रेमवाटे ॥ ४४ ॥
केली पुजा विधिरूपें बळराम यांणीं ॥
गंधाक्षतासुमनषोडशभाव यांणीं ॥
पादोदकें करुनियां तनु प्रोक्षियेली ॥
प्राशोनियां सकळिकें घर प्रोक्षियेलीं ॥ ४५ ॥
वाढोनि पंक्ति बरव्या षढवीध अन्यें ॥
स्वामीस बैसविति तेमाधिं श्रेष्ठमानें ॥
आपोषणासि जल तें करिं राम घाली ॥
तेव्हां बरी नवरि ते हरिलागिं आली ॥ ४६ ॥
पाहोनि दृष्टि चळली यतिराजयाची ॥
चित्तांतरीं चळ उठे हरिलक्षि साची ॥
कृष्णार्पणें करुनियां मग ग्रास घेती ॥
नारायणा नरहरी यति हांक देती ॥ ४७ ॥
नाहींच लक्ष यतिचें पुढच्या स्वठाया ॥
स्वादास ठाव न जिभे विसरेचि काया ॥
क्षीरींत लिंबु पिळिकें घृत वोति सारीं ॥
सारांत सार गमळें भगिनी मुरारी ॥ ४८ ॥
कामें तदां दरदरां तनुभागिं केला ॥
क्षूधातृषा विसरला भुतभाव झाला ॥
पाहोनियां हलधरें यतिराजरीती ॥
प्रीती बहू करितसे नवलावरीती ॥ ४९ ॥
मोक्षार्थ हा म्हणुनियां सकळांसि सांगे ॥
डोळे बहू सतपथीं प्रितिभाव वागे ॥
दादाच साच सजला सरळावभावें ॥
भावें दिसे तदनुतें दुसरें न फांवें ॥ ५० ॥

तृप्ती बरी सकळिकीं हरिगेहिं झाली ॥
ऊठोनियां कर धुती सदसंगबोली ॥
देवोनियां करिं विडे मग बैसवीलें ॥
त्या दीनपासुनि घरीं यति राखियेले ॥ ५१ ॥
बोलावुनी जवळिं ते भगिनीस रामें ॥
सांगीतली प्रितिभरें करि स्वामिकामें ॥
सेवा सदां करि बरी मनभावहेतू ॥
हेतू पुरे सकळ तो तव भावमातू ॥ ५२ ॥
सांगोनियां भगिनिला इहरीतिं रामें ॥
दीलें बरें पृथक आसन ऐक्यधामें ॥
पाहे अनंतमतिनें निजभक्तियोगें ॥
एकांतवास जडला नववीधयोगें ॥ ५३ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

एकांतांतरिं काम तो खवळला ऐसा वरी व्याघ्रसा ॥
शांती ना मनसा करी वसवसा पीसा तसा फारसा ॥
सूभद्राविरहो भरें मनिं बहू दीसे घडी वर्षसी ॥
वाटे भेट तिची अशांत घडणें जैसा चकोरीं शशी ॥ ५४ ॥
आली ते मग तेथ हो शशिकळा कांती अरूणाकृती ॥
कृष्णाची भगिनी यती समजुनी भावें पदीं लागती ॥
चित्तीं भाव तिचे यतीवरकृपें पार्थास मीं अंतुरीं ॥
होयी सत्य गमे म्हणोनि मनिं तें पार्थी करानें चुरी ॥ ५५ ॥
सेजारीं बसली भली उमगली स्वामीमनीं भेदली ॥
मूखांतें चढली कळा टवटवी गेली मनाची भुली ॥
अंगानें सरळी कळी कवळि ती माजामधीं पीवळी ॥
भाळीं शोभत टीकली जडलिसी कुंकूम रेखा भली ॥ ५६ ॥
बाळी बूगडि कांप भोंकर कुडीं वेणीवरी रांकडी ॥
फिर्की जोड जडाव मौक्तिकमणी मध्यें मुदाते जडी ॥
वेणीच्यावर चंद्रकोर वसवी तेव्हां नसे तांतडी ॥
भांगी शेंदुर मोहिनी पुजिलिसे दीलीच कामें दडी ॥ ५७

कंठीं हारसरी जडीत मणि ते हीरे बरे कोंदणी ॥
बाजूबंद करीं सुगोठ बिंदलीं वांकीं बहू कंकणीं ॥
वाळे घुंगुर नेपुरें पादिं बरे देखोनियां नेत्रिं तें ॥
पार्थाला सुख वाटलें मतिमधीं शांती मदा पात्र तें ॥ ५८ ॥

स्वामीची दिठि बैसली तिजवरी जैसीं सरोजीं अली ॥
सेवी प्रेम मनोघभावरितिनें कोणें मती फांकली ॥
संतुष्टें यति बोलतो तिजप्रती वीनोदयोगान्वयें ॥
एकांताभाधिं सुंदरी शशिकळे स्वाभीपदीं निर्भयें ॥ ५९ ॥

कौमारे सदये वदे मजप्रती निर्भीड तें आननीं ॥
ऐकोनी यतिभाषणें इह रितीं संतोष मानी मनीं ॥
बोले ती मृदुभाषणीं यतिवरा दादाजिनें या पदीं ॥
मातें पाठविली प्रितींकरुनियां सेवेस दासी पदीं ॥ ६० ॥

आहे सान वयें करोनि कुमरी प्रासी पदीं तुमच्या ॥
सेवा घ्याजि मनोगतींकरुनियां भाग्या उणें नामुच्या ॥
पायातें अवलोकिलें म्हणवुनी चित्तीं बहु तोषलें ॥
गेले दोष दुरीत तें सकळही शांती मनीं पावलें ॥ ६१ ॥

ऐकोनी इह भाषणें हरिसखा सूखावला फार हो ॥
स्वानंदें भरला मतींत स्फुरला झालें म्हणे कार्य हो ॥
ऐसें लग्न अनंतमानसपुरीं पार्थासनीं नोवरी ॥
आली चालुनियां कळा हरिजिची नेणेंच कोणी बरी ॥ ६२ ॥

( दिंडी. )

असे बोले दीन ते कितीएक ॥ नसे वळखी दधिली आगभीक ॥
कांहिं दीनीं भीड ती झालि तूट ॥ तदा बोले साक्षपी नवरि नीट॥ ६३ ॥
एक दिनीं एकांतवासठायीं ॥ उभय असतां काम तो यतीगेहीं ॥
संचरोनी उन्मदें बोलताहे ॥ सखे बोले मानसीं तुजसी बाहे ॥ ६४ ॥
तुला नवरा कोण तो आवडीचा ॥ प्रास होई बोल तूं सत्य वाचा ॥
टाके लाजे भीड ती दूर ठेवी ॥ ऐकण्याला चित्त हें फार भावी ॥६५॥

प्रेम वाटे मानसीं तुझा मातें ।। म्हणोनीयां पूसतों तुला मीं तें ॥
दृष्टि झाली फारसी चंचळी गा ॥ सुभद्रा ती भीतसे मानसीं गा ॥६६॥
अहो स्वामी तूमची आज ऐसी ॥ दृष्टि दीसे चंचळी चावरीसी ॥
काय चित्तीं प्राप्त हा योग झाला ।। भिती वाटे मानसीं कंप आला ॥६७॥
रोम अंगीं तूमच्या उभे झाले ।। ओष्ठ थरथर स्फूरती नेत्र ळाले ॥
शब्द मीठे नच कधीं असे आले ।। लग्नहेतू पुसतसां अर्थ खोलें ॥६८॥
ऐकुनीयां या रितीं तिची वाणी ॥ पार्थ बोले ढंचकोनि शांतवाणी ॥
का ग भीसी व्यर्थ तूं मनीं मातें ।। हेतु न्यारा मम मनीं ऐक तूंतें ॥६९॥
लग्न तूझें नेमिलें बळीरामें ।। ऐकिलें मीं आननीं शब्दग्रामें ॥
प्रथम हेतू लग्न तें कुंतिसूता ॥ पार्थसवें असुन तें नाहिं आतां ॥ ७० ॥
कोण हेतू मोडण्या पार्थ याला ॥ लग्नकाळीं तूझिया कोण झाला ॥
अनंतासी साउली येथ झाली ॥ चित्तशुद्धी ऐक्यता होत आली ॥७१॥

( मालिनी. )

नववधु सुकुमारें कृष्णनूजे सुभद्रे ॥
हकिगति पुसण्याला भाव हा हेत भद्रे ॥
मम सख नर तो गे तीर्थपंथें समोधीं ॥
बहु दिनवरि राहूं ऐक्यते द्वैतओघीं ॥ ७२ ॥
प्रित बहु मज त्याची ना दुजी आणिकाची ॥
दिनानीशीं मुखें त्याच्या वर्णनीं जाण तूंची ॥
तुजवरि बहु प्रीती मित्रयाची ह्मणोनी ॥
कळवळ उठली ते फोडिली लग्नमानीं ॥ ७३ ॥
इहरितिं परिसोनी मानसीं तोषली हो ॥
यतिवरपद भाळीं वंदिले साच भावो ॥
वदनिं वदत स्वामी कोण धामी तुमीं ते ॥
दिनमिति किति झाली आजि बोला खरें तें ॥ ७४ ॥
हकिकत मज सांगा त्यांचिया योगमार्गा ॥
कवण स्वरुप भावें कंठिती काळवर्गा ॥
मम मन हुरहूरी दूर आजीं करावी ॥
मति यति वळवीसे येथ त्या हो नरावी ॥ ७५ ॥

ममवर नर तोची सख्य ज्या कृष्णदादा ॥
बहुत करित शोधा रोध ह्याची ममोघा ॥
हरिसख नवरा तो दूसरा ना वरीं मीं ॥
किमपिहि यतिराया आण पायीं स्मरें मीं ॥ ७६ ॥
मधुर रव असे हे बाणतां शांत झाला ॥
द्विविधमति निमोनी ऐक्यतां बोल आला ॥
वदत तिजप्रती तो तेधवा पार्थरावो ॥
तव मन जरि ऐसें दावितों शीघ्र ठावो ॥ ७७ ॥
म्हणुनि करिं धरूनी बोलिला पार्थ मीं गे ॥
खुण मग तिज दावी आपुली वीरअंगें ॥
नरपण चुण दावी दाखले बाळलीले ॥
सकळहि सम दावी खेळ तोही स्वलीले ॥ ७८ ॥
सुख बहु मनिं झालें लाजली बाह्य दृष्टी ॥
हितकर बहु वाटे सूटलों कष्टकष्टीं ॥
मन अमनपणातें पावली प्रेमदृष्टी ॥
क्षणभरि उभयांसी भान नाहींच सृष्टी ॥ ७९ ॥
श्रमशम फळ दृष्टी इष्ट दृष्टीच भक्ति ॥
कुळ अभिमतिलागीं पुत्रकामें सुखोक्ति ॥
हरिगित गुणगाणीं अर्थ प्रेमासि आणी ॥
निगममति पसारा द्वैत नासी कुवाणी ॥ ८० ॥
घननिळ घनरूपें प्रेमरूपें स्वभावें ॥
अभिधृति मनिं माया मांडुनी हा पसारा ॥
उभरुप नर भद्रीं सूजलें ऐक्य सारा ॥ ८१ ॥
सुख बहु मतिलागीं वीरभद्रीं सुभद्रीं ॥
गुणभुतच विभानें राहिलीं दक्ष रंध्रीं ॥
तव यदुकुळ यात्रा शैलजा सांख्य सत्ता ॥
निगमगमगतीची माउली ऐक्य मत्ता ॥ ८२ ॥
उदय दिन सुबोधीं पातला साच तोची ॥
सकळहि नटती ते दाटि सूनामुलींची ॥

पतिसति नितिनेमें अन्नपात्रीं भरोनी ॥
शिरिं धरुनि किती ते पोंचले अर्धरात्रीं ॥ ८३ ॥
हयगजरथभारें ते गडे यादवांचें ॥
सकळहि चपळे गा वीर जाती हरीचे ॥
गडबड बहु ऐसी दीन आनंदकारी ॥
पळपळ चढताहे शोध भागे तमारी ॥ ८४ ॥
इह रितिंमाधिं कृष्णें अर्जुना खूण केली ॥
असुरविधि मलोभी नेइ रे सांख्यबोली ॥
चपळ पळ त्वरेनें बाणमापें करोनी ॥
नवरि वर नरा तूं स्यंदनीं ऐक्य मानीं ॥ ८५ ॥
हरिमुखरव ऐसे ऐकुनी धूर्त पार्थें ॥
कळविलि नवरीला स्वार्थबोधें भवार्थें ॥
यतिवर पळतानां नोवरी सारथी ती ॥
हकि हय समिराचा वेग चालीच पंथीं ॥ ८६ ॥
जग चकित तदां तें दृश्यदृष्टी न पोंचे ॥
नर दुर जनलोके पासुनी बाह्य पोंचे ॥
हरिमतिस अनंतीं नोत हीतानुभावें ॥
मन अमनकळा ही अंतरीं रोज भावे ॥ १८७ ॥

## ॥ सुभद्राहरणचरित्र समाप्त. ॥

---

# ॥ कालियामर्दन. ॥

## ( पूर्व भाग. )

( उमावृत्त. )

येक दिनीं हरि गोप बरोबरी चालतसे निट ते यमुने ॥
बोधित गोपाचि निगमकाननिं आगम टांकुनि वस्त्र जुनें ॥
गोधन ते धन बोधानें शोधित निर्जर तें वनिं पोंचत तो ॥
वाकि समूहाचि त्या यमुनातिरीं मागुनिया मग येतचि तो ॥ १ ॥

वसंतकाळजि सद्बोध बाळक फार तृषाकुल तें निर हो ॥
प्रीति यथेष्टचि नेणुनिया मनिं काळचि काळिय सर्पंचि हो ॥
ही मति येमुनि कामद त्या फणि वीषचि ऊदरि हो जडलें ॥
आत्मस्थितीवर नाहिंच कोणिहि ते धरणीवर हो पडले ॥ २ ॥

गोधन गोपहि यारितिं हो तिरीं काळचि गांठित तीं पडलीं ॥
मागुनि तो हरि येउनि पोंचत ती मति हो मग जी चिडली ॥
मानसिं पाहुनि जाणितलें मग दुष्टचि हा अरि येथ असे ॥
क्रोधित होउनि ओंठजि चावित नेत्रकमानहि ओढितसे ॥ ३ ॥

गोधन ऊठवि गोपहि त्या रिति जागृत ते करितो हरि हो ॥
जो जगपालक नंद चि बाळक कामचि तो अरिनाशक हो ॥
तेथचि मांडित खेळत चेंडुचि गोप बरोबरि घेउनिया ॥
मानसिं तो बहु द्वेष जि वाढत तो अरि काळिय जाणुनिया ॥ ४ ॥

कायचि तें विष नाश करी वन आसहि पासचि झाडि नसे ॥
वाडि कसी मग राहिल तेथचि द्वादश गांवजि वाफ घुसे ॥
तें वन दग्धचि होउन राहत पक्षिहि कोणिच नाच बसे ॥
चूकुनिया कधिं अंडज त्यावरी ऊडत जे गति ते मरती ॥
यारितीं धाकचि सर्पजिचा जगिं दुःखचि कारक येमसरी ॥ ५ ॥

जाणुनिया मग खेळत खेळचि उडत चेंडु जि त्यावरता ॥
बोधकदंबचि वीप न बाधक तो गिड आमर ना मरता ॥
कारण येथिल तो खगराजजि नाम गरूडचि ज्यासि असे ॥
अमृत घेउनि वृक्षिंच त्या घट येक घडिभर राखतसे ॥ ६ ॥

नाम सुधाकर तो खगराजचि आमरकारक भासतसे ॥
भावचि चेंडु जि त्यावरता मग ढाळिंत घूसुनि राहतसे ॥
ते घडिं त्यावरि तो गडि चंचळ खोलमती गति तो चढतो ॥
ऊमर साळचि आठ जयासजि पीतपटा निट खोवित तो ॥ ७ ॥
हाटक तो पट जो कटिं वेष्टित हार हि खोवित त्यामधिं गा ॥
हा मणि गा निज कौस्तुभ कीरणिं खोंचितसे धणि नीगमिं गा ॥

सावळि गोमटि मूर्तिहि धाकुटि वाढत मानिं धवावेच हो ॥
हें मन आननिं गायिं सदोदित भावबळें कस मानसिं हो ॥ ८ ॥
टांकितसे उडि तेथुनिया मग त्या जिवनांतरिं दाटुनिया ॥
पाणिहि तें बहु उसळलें अति बाणचि योजन साक्षिस या ॥
पाहुनिया मग गोपमुलें मनि फारचि दुःखित हो रडती ॥
धेनुहि त्यासरि नाम न काननिं फारचि ओरडती ॥ ९ ॥
तें स्तनपानहि तीं बचडीं नच पीतचि गा वरिभासतसे ॥
वाटतसे मनिं दुःखचि तें बहु खासपणीं अतिभाति तसे ॥
ते गडि हो मनिं चिंत्तिच चिंतिति गोकुळिं जावुनि ते जननी ॥
कोणति हो रिति सांगु यशोमति तो हळ मारिल सत्यपणीं ॥ १० ॥
घोंगडि कांठिहि काळिच ते तटिं हार गळ्यांतिल टांकित हो ॥
पाहुनि ते मग फारचि दुःखित घाबरलें मुल गोपचि हो ॥
या रितिं शोकचि तो हरि ऊदकिं आंतजि जाउनि पाहतसे ॥
तो मग नागिणिकाभिनि पाहुनि बोलत साजणि खास असे ॥ ११ ॥
हें शिशुबालक कोमल शामल रूप मनोहर शोभत हें ॥
माय तरी तुज कोण हि व्यालिसि धन्य ति माउलि भासत हें ॥
काळचि हा अरि खाइल तूजसि जा निघ बाहिर सत्यपणीं ॥
नाश नको करुं आपुलि ही तनु शोकचि माय ति दीनपणीं ॥ १२ ॥
तो मग बालक बोलत त्याजसि काळअरी मिच हें समजा ॥
नाशक दुर्मति हा अवतारचि मारिन हा अरि पाहि मजा ॥
बोलुनिया मग मारितसे उडि भूमिच ती बरि कांपतसे ॥
सर्पहि तो मग जागृत होउनि नेत्र वटारुनि पाहतसे ॥ १३ ॥
तो फुसकारत नाग मनामधिं तामसवृत्तिच दुष्टगुणी ॥
येउनिया मग त्या तनु झोंबत अंगहि वेष्टित धष्टपणीं ॥
दंशहि फारचि तो अरि त्या हरि दंत उरीं चुरी चावुनिया ॥
या रितिं ऊदकिं त्या हरिलागुनि तो फणि आवळि टोंचुनिया ॥ १४ ॥
बाहिर मात ति गोकुळिं फांकलि ओरड हो रडि होत बहु ॥
नंदयशोमति फारचि दुःखित घालित धूळ ति डोइ बहु ॥

आणिक कामिनि त्या बहु मीळति शोकचि तो बहु कोण गणी ॥
नाहिंच त्या मित मोहित ही नित बोल नये मुखिं खासपणीं ॥ १५ ॥
तो बाळिराम जि बोधि तयाप्रति का भिति मानसिं बाळगिता ॥
तो अरिछेद्क मारक दुष्टचि भक्तजि तारक नीजगितां ॥
त्या भय नाहिंच साचपणें मनिं राखुनि शांतचि कांतरिना ॥
या जागिं होताचि ना तुमि कां तरि शोक फुका करितां मनना ॥ १६ ॥
बावरि कां मति बावरि फीरत व्हां रत नामिंच साजणि हो ॥
आइ तुं वेडिच कां त्यज शोकचि तात तुमीं उगि राहचि हो ॥
पाहुं चला आजिं राजिवलोचन शाम मनोहर आमळ तो ॥
काय मजा तुज सांगु मि आइ ग पाहसि सद्यचि पुत्रचि तो ॥ १७ ॥
या रितिं बोधुनि त्या यमुनातटिं नारिनरासह पोंचलि हो ॥
दोहिं तटांकित गोप समूहचि दाटणि दाटलि पाहति हो ॥
त्या उदकामाधिं तो घननीळ मनोहर श्यामजि वेष्टितसा ॥
पाहुनि मागुति भ्रांतिंत पोचलि मागुति तो बळिराम कसा ॥ १८ ॥
शोक नको अरि नासिल शीघ्रचि भेटल येऊनि आजचि गे ॥
ऐकुनियां मग स्तब्धचि राहुनि पाहूं चला गति त्यासचि गे ॥
तो हरि वेढित जो अरि त्या तिरिं काय करी मग हें समजा ॥
स्थूळचि फूगवि विश्वचि तें रुप भीउनि सर्प परी उमजा ॥ १९ ॥
सोडित वेष्टण पावुनिया क्षिण नाहीं तरी अरि हा मरता ॥
मागुन त्यावरि स्वारचि तो हरि नृत्यचि हो करि त्यावरता ॥
नाचतसे शिरिं तांडव मंडित सूरहि पाहति तें नभिं हो ॥
पुष्पचि वृष्टि हि होत असे बहु त्या स्मरकामिनि पाहति हो ॥ २० ॥
भूभर सर्वहि तो हरि त्यावरि घालुनि नाचत रंगचि तो ॥
भंगचि होउनि ती तनु भागलि नाहिंच ती गति जाणत तो ॥
तामस तो फुसफूस करी मनिं दुःखचि तें बहु सोसचि ना ॥
नेत्रहि मीचकि लागत ऊचकि कूंचलि डोचकि तोलत ना ॥ २१ ॥
यारितिं जर्जर काळ धुरंधर काळजि अंतर ना उरला ॥
ती रितिं देखुनि त्या मग कामिनि येति समोरचि घेत मुला ॥

यावरि कामिनि बोलति जे रव खोल रिती ध्वतिही अयकागा ॥
गोड कथामृत हा हरिवंशाजि नाशक तो अरि काळचि गा ॥२२॥

( गावुनिया मनिं ध्याउं सदोदित प्रेमचि हा पिउं सत्यचि गा ) ॥
हे मधुसूदन माधव अच्युत शाम रमापति सत्वर ये ॥
देइ मला गति या तुझिया गितिं दीनचि मी हरि जाणुन ये ॥
अनंत पामर पार्थिंच किंकर हा भव हो दुर तूं करि गा ॥
हे गुरुनाथजि हे करुणार्णव हारवि हा भव सत्वर गा ॥ २३ ॥

॥ समाप्त ॥

---

# ॥ कालियामर्दन ॥

## ( उत्तरभाग )

( उमावृत्त. नं. २.)

श्रीगजसोंडविराजित त्यामधिं मोदक दीसत मंडितसा ॥
हालत चंचल ती उदरावर वाहन उंदिर सर्प कसा ॥
तो कटिबंधचि नीजअनूभव नाभिंच वेष्टितसा दिसतो ॥
हा करिं अंकुश कामवधास्तव पाशहि मोहचि छेदक तो ॥ १ ॥
आइच या मनसा भवमोचक राघव भक्तिच दायक ही ॥
मूळ इचें घर तीच परा रहिवासिनि नीजरतासचि ही ॥
ते गित सुस्वर वागविलासिनि रंगित रंगणिं दावित हो ॥
देत असे पद भाविक सज्जनिं रामरसायण आनंद हो ॥ २ ॥
हे गुरुनाथजि हांजि अनाथ मि पोंचवि धामिंच या मजसी ॥
जें पद निर्जर ना भव तेथ जि प्रेमचि तो मज ठाव कुसीं ॥
भूतदया मनिं ध्यास निज्यासनिं आसहि पूरवि गा बरवी ॥
तो तुमचा कर मस्तकिं हो मज ज्ञानहि केवळ तोचि रवी ॥ ३ ॥
यारिति तो गुरु भावुनिया मनिं तीच गती मग मागिल हो ॥
जो हरि कालियमर्दन त्या जळिं नाचतसे शिरीं त्या फणिं हो ॥

कामिनि नागिणि तो पति दीनचि पाहुनिया मग त्या पुढती ॥
एक ति आरति घेऊनिया करिं दूजि बरोबर ती युडती ॥ ४ ॥
घेउनिया मुल त कडियेवरि घाबरि ती मति चालतसी ॥
कोणि बद्धांजुलि येकति नुसति ही उर फोडित गूर्जरिसी ॥
यारिति कामिनि तेथचि येउनि तों नमिती यदुनायकसा ॥
दीनमती गतिहीनपण बहु जोडुनिया कर सेवकसा ॥ ५ ॥
स्तव्यहि त्या मग नीजबळावरि गातचि ते रव मोहकसे ॥
हे जि हरी सुरनाशक विघ्ननिवारण यापरि ध्यान असे ॥
हा भवसागरतारक तूं दिनदायक बोधजि ऐक्यपणा ॥
नाहिंच दूसरि या जगिं तूजसि माप करी असि साक्षिगुणा ॥ ६ ॥
शेष हि तो ठकला गुण वर्णुनि या रिति ही महिमाच तुझी ॥
सूरवरा वरदायक नायक नीजचि तें पद चित्तभुजी ॥
साधुहि सज्जन आणिक ते मुनि सिद्ध अनूभवि हो बहुतें ॥
ज्ञानि विवेकिहि ध्यानि तपोनिधि योगि अघोरिहि गातचि तें ॥ ७ ॥
तीनहि लोक धराधिश आसहि पादसरोजिच ही जडली ॥
काकुळती हरि बापचि मानुनि तापचि कां मग अहि मुळी ॥
हा पति दुष्टचि कर्महि तामस उरगज्ञातिच दोषमये ॥
ब्रीद तुझें हरि जे शरणागतरक्षण कर्म हें सोडुं नये ॥ ८ ॥
हा दमला पति कांपत हो तनु घाबरलि मति सोडिंच हो ॥
होइल ती परलोकगती मग वैधव या सति ठायिंच हो ॥
दूसरि ते मग मूल कडेवरि घेउनि बोलत माधवजी ॥
हा पति सोडुनि याचि चुडे मज दान मला हरि आजिच जी ॥ ९ ॥
हा अपराधि खरा परि घालिं जि पोटिंच तूं करुणाकर हो ॥
भूतदया तुज फार असे मनिं बोलति ते मुनि सत्यचि हो ॥
हाचि तमोगुणि कर्महि तामसि नाहिंच या रसभावचि तो ॥
सत्वहि तें नच याउरगांमाधिं पाहुनिया जिव फार भितो ॥ १० ॥
सत्यपणीं जरि रीत ति पूसासे नाहिंच दोष जि या उरगा ॥
कर्मि धणी तुंच दायक ही मति वागविता तुंच या भुजगा ॥

हा अभिमान उरामधिं तो रज केवळ नाशक कर्म तसें ॥
हा समभाव मला गमतो तुजठायिंच वासक जाणतसे ॥ ११ ॥
शत्रुहि मित्रचि त्या गति या गति सारखि देणगी या रितिची ॥
कोण तुला अरि नाहिंच जागत या भुवनीं तुं दया करची ॥
हा फणि भक्तचि वाढत मानसिं ज्या फणियाचरणा रमती ॥
काय जि काळिय दुष्ट कसा वदुं स्पष्टचि नीजहि भक्तिरिती ॥ १२ ॥
पाय तुझे हरि जो दिठि देखत त्या गति उत्तम दायक तूं ॥
हा तरि पायिंच चेचुनि वीकळ नाससि तो तम खासचि तूं ॥
उत्तम या गति देसिल वाटत सायुज तें पद सारचि गा ॥
यामधिं भेदचि ना मज वाटत साचचि देइं तुं कुंकुमगा ॥ १३ ॥
लोक मिगा तुज तातचि तूं मज घालि चुडे करि या परिचें ॥
ही तनु काळिच सूयश सूलभ जोडिहि सूगम मांडणिचे ॥
हा नवरा फणि दे तुं बरा मज गा मद हा हरि अरिया पतिचा ॥
जीव नको हरुं संजिव सोडजि द्वेषचि तोडि तुं या तनुचा ॥ १४ ॥
सत्य करिं हरि ब्रीदजि जें तुज जो शरणांकित तारक तें ॥
डाग नको जगिं घेउं शिरावरिं मारक पायचि या रितितें ॥
फार किती वदुं देचि अहेव पणा मज हा वर पूर्ण असो ॥
सोडि दयानिधि राग मनांतिल शांतचि ही मति गोड असो ॥ १५ ॥
जातचि ही अबला प्रबला नज या पतिवांचुन या बळ ना ॥
हा समुदायचि नारि किशोरहि सर्वहि नीमति तोषघना ॥
जोडित हात मि शाम मनोहर अच्युत केशव हो सदया ॥
पाहि विलोकुनि हा गत वाटत सोडचि हा पति बोधुन या ॥ १६ ॥
हे भगवंत तुं संतजनाप्रति पालक बालक या रितिचे ॥
दुष्टजनासहि सुष्टचिकारक मारक ते अरि हो मुळचे ॥
जें मनिं ते षड हो रिपु काममदादिक दाटणि झाडि असे ॥
बोधानें शोधक अस्त्रचि हें करिं तें अरिनाशक खास असे ॥ १७ ॥
हेंचि सुदर्शन दृश्य विलक्षण नीजचि लक्षण वाटत हे ॥
बोधगदा अरिनाशक ते उरिं तोडित पाशचि घातक हे ॥

यास्तव तूजसिं नाम विराजित हे अरिछेदक या रितिचे ॥
नागहि त्या रितिं छेदुनिया अरि मोकलि मानस बोधनिचे ॥ १८ ॥
त्या पद्रासाचि ती पसरी मग मागत दानचि भावबळें ॥
ते रव ऐकुनि तो गडि गोपाचि नृत्याचि आटपि प्रेम वळे ॥
ऊतरला तळि तो मनमोहन देखुनिया दिन त्या ललना ॥
या बळ ना फणिकामचि तो हरि हा हरि हो हरी जो बुधना १९ ॥
केवळ प्रेतचि तो मुनिभागिंच जो जड ना बळ हो पडला ॥
हीनमती दिन जो दमला बहु नांचवुनी हरि जो जगला ॥
ज्यारितिं सज्जन तें रघुगीताचि नाचुनि आनानें हो शमला ॥
येक अहंपण टाकुनि केवळ भावबळावरि जो जडला ॥ २० ॥
मोहमदासिचि कामचि संगम मीपणबंधनि जो सुटला ॥
तो विटला मग हा खटला सुटला प्रेमिच हो झुटला ॥
ज्या रितिं ती सति हीन पति दीनारिती जसि दीसति त्यारितिं हो ॥
हाहि तसा फणि निर्मम होउनि तो अनुतापिंच जोडत हो ॥ २१ ॥
सावध होउनि तो मग हो फणि आननिं तोषवि त्या हरिला ॥
जे रितिं बाळक बापचि पाळक जाणुनि चालकसा गमला ॥
ते नयना चळ पाहुनि चंचळ हारपला मळ आमळसा ॥
कोमळ तो मुख फूलतसे फुल नीगम शीतळ सोम जसा ॥ २२ ॥
बोलत तो हळु हीन जसा वळु गोपसखा वनसावळिया ॥
हे भगवंत तु अनंत तारक कामविमोचक या सदया ॥
माधव अच्युत केशव श्रीधर हेजि मुरारि तुं तारिच हो ॥
दुष्ट मिगा खल त्या तमज्ञातिंत जन्म असे मज यास्तव हो ॥२३॥
क्रोधित मानस तामस तो गुण हीणमती गति रोजचि हो ॥
हा तव दोषजि सर्पचि संपतिदायक तूं गति साचाचि हो ॥
काय मला मग बोल तुं लाविसि दोष नसे मजलागिंच हो ॥
कारण कर्मजि दायक तूं गति नायक हो भवहारक हो ॥ २४ ॥
मंद मि भागिंच ते नच जाणत तूजसि गा गुरुभावबळें ॥
कामिं सदोदित चित्त हें वांसत मोह हि हो वरि त्याच बळें ॥

विषयिं वाढित अहंपणा गुणिं ही ममता बरि नाहिंच हो ॥
तारि दयानिधि पार करी मज दे पदि ठावचि सत्वर हो ॥ २५ ॥
काय दयानिधि धन्यचि मी जागें एक रिति मज वाटतसे ॥
कारण तूं शिरिं नाचुन हा मद साचचि तो रज तूटतसे ॥
ही मति उत्तम नासुनि दुष्ट ति दीधलि हो हरि गा मजला ॥
हें जि उदारपणा तरि कोण रितीं तुझि सांग दयावहिला ॥ २६ ॥
या रिति बोलुनि स्तब्धचि होउनि तेथ उभा कर जोडुनिया ॥
तो हरि त्या मग काय वदे नित हात कटीवर ठेवुनिया ॥
हा परिवार तु घेउनि सागरिं जाच कसा चल शीघ्रगती ॥
वेळ नको करूं ऊठचि लौकर जा तुजला दिधली वसती ॥ २७ ॥
ऐकुनिया मग ऊरग बोलत सागरिं तो अरि हो मजलागीं ॥
नाम गरुडाचि काळ आह्मास बहू भित मी अजि या अरिभागीं ॥
याच भितीस मि फार भितों मनिं या जळिं राहिन कारणची हें ॥
या निरभागिं गरूड नयेचि हरी समजा मनिं बोलन गा, हें ॥ २८ ॥
कोणि दिनांतरिं हा खगराजजि या यमुने जिवनीं मिन हो ॥
भक्षित तो खग रोजचि येउनि तेथ मुनीवर वासक हों ॥
त्याजसि जावुनि सांगति ते जळवासि किं हे मुनि तारि असे ॥
दीन जळोघमधीं मिनकूळ खगेंद्र अरी बहु त्रास असे ॥ २९ ॥
मारक हा अरि दूर करी देवजि दान मिनासचि दीनचि हो ॥
देइ कृपानिधि थोर तुमी गरिबावरि मेहर होउंच हो ॥
ऐकुनियां मग तेथचि फारचि मोहित होउनिया वदले ॥
या उपरीं खग तो यइ या जळभागिं मेरलाचि बोलियले ॥ ३० ॥
या रितिं तो खग शापुनिया मग तोषविते मिन हा मुनि हो ॥
त्याकरितां मि समूहसहीतचि या जळिं राहत साचचि हो ॥
ऐकुनिया मग तें फणिभाषण तो मधुसूदन काय वदे ॥
जाइ तूं येथुनि नाहि तुला भय कारण हें पद भावचि दे ॥ ३१ ॥
या तुझिया शिरिं पादचि जे बसलेचि खरें मग तो खग गा ॥
नाहिंच तो तुझि वाटचि सोडिल मानिल भीतिच हा तुझि गा ॥

ते रव ऐकुनि तेथुनि चालत त्या समुहासह शिघ्रगती ॥
सागरिं जाउनि पोचतसे मग वास करूनचि राहति तीं ॥ ३२ ॥
ही यमुना मति कामद हा फणि अंतर अर्थ असा गमतो ॥
जो निज भाविक अभ्यंतरीं सम आत्मचि चिंतित पाहिल तो ॥
गोड कथा बहु नाम सुधा हिच काम मनांतील नाशक हो ॥
हा रस घेइल त्याजसि हो हरि देइ समागम सख्याचि हो ॥ ३३ ॥
हें मन सावध तूं निसिदिन हरीच कथेमाधें सूखचि घे ॥
मोह जनामाधें ठेउ नको चल प्रेमभरें हित साधुन घे ॥
संग नको करूं बंड जनामाधें दंडाचि भोगिसि हो पुढती ॥
अनंत माधव सुंदर शामळ नाथाचि हा येक पंथ गिती ॥ ३४ ॥

# कालियामर्दन.

नं. २

॥ ॐ अनंताय नमः ॥

( वसंतति० )

वंदोनियां पदनिधी तनुजापतीतें ॥
वर्णीन भागवतभाव सनातनातें ॥
गूणें करोनि हरिच्या गुणभाव जाई ॥
भावार्थ अर्थ निगमीं मतिभावना ही ॥ १ ॥
गोकूळग्रामिं अवतार धरी हरी हा ॥
भक्तीरुपें गवळि ते सकळीक पाहा ॥
झाले गडी निजरुपें बहु पुण्ययोगें ॥
हारी हरी भवभया वदुं त्यां प्रसंगें ॥ २ ॥

( शार्दूलविक्रीडित )

काळिंदी रविआत्मजा भगिनीही येमाजिची धाकटी ॥
कामीकी मति भाव ते सम इसी नातें प्रमाणी घटीं ॥

ज्याळें डोह धरोनि नीर विषसें केलें असे कालियें ॥
कामानें मति अंबु हें विषम गा साक्षी अनूभावयें ॥ ३ ॥
येमाचे सदनीं मती अवगुणीं न्हेती खरी बांधुनी ॥
प्राणाते त्यजुनी निरावभ्रमणा देहो निमे येथुनी ॥
झाली ही नड सौंगड्या सकळिका कोणीं न जातीं बरें ॥
डोहातें त्यजिलें भलें सकळिकें जाणे हरी तें बरें ॥ ४ ॥

( द्रुतवि० )

समजला हरि मानसिं ती कळा ॥ कळवळा भरला करि तो कळा ॥
घडि जमा करुनी रविचे प्रभे ॥ अरुणबोध सुबोध तये प्रभे ॥ ५ ॥

( भुजंग. )

गडी गोप गाई हरी घेउनीयां ॥ वनीं जाति सारे सुखानें रमाया ॥
त्वरें चालतानां गडी चूकवोनी ॥ वनीं माधवो राहिला हो लपोनीं ॥ ६ ॥

( कामदा. )

गडि बहू तदां शोधिती हरी ॥ नच मिळे तयां शोध अंतरीं ॥
बहुत कष्टले जाति पूढतीं ॥ वळुनि धेनु हो साउली प्रती ॥ ७ ॥

( शार्दूलवि० )

आले बोध कदंब हो तळवटीं सारे जमा होऊनी ॥
वाणीनें हरि बोलती तृषित ते झाले भले शोधनीं ॥
वारी देखुनियां गडे पिति तदां गायी तशीं वत्सहा ॥
वोढी ऊठति तेधवां विषरुपें प्राणांत झाला महा ॥ ८ ॥

( द्रुतवि० )

असुविणें सकळीं तनु त्या तटीं ॥ पसरती मग ये जगती जटी ॥
हरिवरी उपचार रुपेंगडी ॥ नयनिं पाहत आंत असे कडी ॥ ९ ॥
रित असी कवितेमधिं आंतुडे ॥ कडि असे म्हणुनी वरिले कडे ॥
गुढमता प्रतिमा कडि बोलणें ॥ हरिमती निगमें कळ चालणें ॥ १० ॥

( वसंत० )

मायीक मानसरुपी मति ही भ्रमाची ॥
स्थूळाव भाव भरती जगती रितीची ॥

येथें असे अरिभिती म्हणुनी यमूना ॥
नामें गमे विषरुपी नरभाव माना ॥ ११ ॥

( द्रुतवि० )

विषय हे फणि कामजि काळिया ॥ अभिमती जलडोहमधींच या ॥
अरातिचें जल हें वयसामती ॥ फणफणी फणि हा क्रुरआकृति ॥ १२ ॥
तनुवनीं स्थिरतांश न झाडिती ॥ सकळही जळली तमराखती ॥
सदतरू अजरी तटिं या असे ॥ नित कदंब तया निजभावसे ॥ १३ ॥
उतरतां सद्‌बोध सुधारुपें ॥ अनुभवें गरुडें वहुतां तपें ॥
कदन मांडुनियां सुर वांकडे ॥ घटभुमीप्रति आणि तयाकडे ॥ १४ ॥
म्हणुनियां अमरीसरि यांजला ॥ सितळता तळिं या वसती छिळा ॥
गडि तटीं मतिचे मृत पावले ॥ परि तळीं सकळी तरु साउले ॥१५॥

( मालिनी. )

निगमघननिळानें पाहिलें हो दयेनें ॥
कळवळ मनिं आली भक्तिभावें रुपानें ॥
समदिठि अवलोकी दृष्टि हे अमृताची ॥
गडि उठति तदां ते नीजले जाग्रतेची ॥ १६ ॥

( वसंत० )

धेनू गडी सकळही उठती प्रतापें ॥
पापें हरोनि सकळीं शुचिभावमापें ॥
तापो शमे मग हरी रित काय योजी ॥
ऐके मना समज घे अजि हो सुराजी ॥ १७ ॥

शुद्धकामदा.

समरुपीमते भाव खेळ तो ॥ त्वरित मांडिला शोध साच तो ॥
बहुत खेळती कृष्णसंगतीं ॥ गती न भावतें साधवी मनी ॥ १८ ॥

( शार्दूलविक्रीडित.)

चेंडू तो अडके कदंब वरि त्या ढाळीमधें जाउनी ॥
पाहूनी हरि कास घालि कसुनी माळा पटीं खोउनी ॥
ठेवी धोंगडि कांठि शिंकि तळिं हो जाई तरूच्यावरी ॥
वारी संकट सर्वसंतमतिचें तोची गडी हा हरी ॥ १९ ॥

( पृथ्वी० )

गडी सकळही तदां वदति ते नकोरे हरी ॥
वरी बहुत जाउं तूं उतर गा अम्हीं बावरीं ॥
अगा पडसि तूं तळीं मग दुखें तुझें अंग गा ॥
अमां मग घरीं तुझा हल बरा बहू मारि गा ॥ २० ॥
बहू विनविती गडी परि हरी नची आयके ॥
म्हणे उगिं असां नका भिउं तुम्हीं करीतो निकें ॥
तदां धरुनि फांदि ती करपुटीं बहू हालवी ॥
कळा नित असे बहू ठक जया मती लाघवी ॥ २१ ॥

( वसंतति० )

चेंडू पडे जळिं तया विषडोहिं पाहें ॥
मागोनिया हरि उडी निरिं देत आहे ॥
ठोकोनियां भुज करें मग आरळी दे ॥
पाहा गडे हरवितो त्रिपभाव नादें ॥ २२ ॥

( विबुधप्रिया. )

टाकिली ऊडि तेधवां तनु सान गा बहु कोंवळी ॥ (अपूर्ण.)

# ऋषिपत्न्याख्यान.

( भुजंग० )

मो मोरया एकदंता दयाळा ॥ मला तारि गा तूं अनाथा कृपाळा ॥
हरी चिंतनीं प्रेम वाणीअसावी ॥ मती मायिकी सर्वथा ही नसावी ॥१॥
नमूं शारदे गूण माये कुमारी ॥ गिरे वाग्वरे वर्णि तूं गे मुरारी ॥
तुझी योगमाया तया वेद बोली ॥ रुपा अन्वया शब्दभावो स्वबोली॥२॥
शुकादीक वाणी विलासे स्वबोधें ॥ रुपा दाविते आत्मया नीजबोधें ॥
ह्मणोनी तुंची जाणण्या मार्गदाती ॥ तुझीची कळा संसृती भावना ती ॥३॥
नमो सद्गुरू येकनाथा दयाळा ॥ सदा शांति भावा दिनाच्या मवाळा ॥
अगा निर्विकल्पा गुणातीतवासा ॥ मला पायिं थारा असों गा निवासा॥४॥

तुझ्या नाममात्रें सुखावा मिळाला ॥ हरीगूणयोगें तुझी सर्व लीला ॥
तुंची वाणि ठायीं करोनी प्रभावो ॥ रुपा वर्णिसी या दिनाला नवावो ॥५॥
शिशू गोपलीला कथा कौतुकाची ॥ असे आत्मबोधा समत्वा तुकाची ॥
हराया मळी संसृतीभावबुद्धी ॥ असे औषधी नाममात्रा प्रबुद्धी ॥ ६ ॥
हरीनाम गातां हरे शोकचिंता ॥ जडे शांति अंगीं समाधानि चित्ता ॥
तुटे द्वैतभावें मती ऐक्य होयी ॥ टळे यातना नामयोगें नवाई ॥ ७ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

गोकूळीं अवतार धारण करी गोविंद हा कौतुकी ॥
भक्तीचा बहु भाळला वृजजनीं दूजा न कोणी तुकी ॥
गोपाळांप्रति घेउनी वनवनीं गायींसवें हिंडतो ॥
गाऊं तो इतिहास आननिं अजीं भक्तीरुपें भाव तो ८ ॥
कोणी एक दिनीं गडी हरि असे आले वनीं गोधनीं ॥
खेळा मांडिति काननीं मति तटीं चेंडूफळी बोधनी ॥
मोठा लाघवि सूत्रधार जगती पाहे निती लौकिकीं ॥
कोणां भाव किती मती धृति कसी कार्यार्थ हा भाव कीं ॥ ९ ॥

( कामदा. )

गोप सर्व ते प्रेमभक्तीनें ॥ माधवाप्रती भाळले मनें ॥
ज्यारिती हरी सांगिजे गती ॥ चालती तसे सर्व नीगुतीं ॥ १० ॥

( दिंडी. )

भाव भक्तीकारणें भूक भारी ॥ भुमीभागीं भावना हा मुरारी ॥
कथा ऐका गोड हे प्रेमलीला ॥ जाति आवला ब्राह्मणी वर्णशीला ॥११॥
नाहिं मंत्रा अधिकार जयालागीं ॥ पतीआज्ञा श्रेष्ठ ज्या अशा भागीं ॥
भक्ति वागे माधवीं मनीं भारी ॥ परी भेटी नाहिं त्या पतीकरीं ॥ १२ ॥

( वसंततिलका. )

जाणे हरी सकळ तो मतिभाव त्यांचा ॥
भेटीस योग उभवी इतिहास त्याचा ॥
अध्यात्मभाव वाळिनें कविता रसाची ॥
साक्षीस कारण हरी सुरभीच साची ॥ १३ ॥

शांतीविणा हरिकथा नच गोड वाटे ॥
शांती जडे मजप्रती हरिप्रीत वाटे ॥
वांटेकरी सदपदीं अबलागती या ॥
नाहीं पती अभिमती गति लागती या ॥ १४ ॥
याती नसे हरिमतीप्रति मान तेही ॥
भ्रांतीभवो म्हण असें प्रतिमाच तेही ॥
ज्ञातीकडोनि अभिमान मतीस होई ॥
जाणोनियां त्यजि मना नच यांत सोई ॥ १५ ॥

( द्रुतवि० )

हरि असी करितो गतिभावना ॥
दिनिं तया विसरोनि गडी वना ॥
शिकें शिदोरि घरीं विसरोनियां ॥
सकळही वानिं त्या हरिभाविंया ॥ १६ ॥
दिन चढे घडिनें घडिये वरी ॥
गडि तसें तरणें थडियेवरी ॥
भुक जडे उदरीं मति चाळवे ॥
सकळ ती रित खेळणिं माळवे ॥ १७ ॥

( शुद्धकामदा० )

वदत तेधवां सर्व गोप ते ॥ क्षुधित मानसीं कृष्ण गोप ते ॥
हरि बहु क्षुधा लागली असे ॥ समिप नाहिं गा खावया असे ॥ १८ ॥
गडबडी तुवा फार लाविली ॥ घरिंहुनी वना सर्व धांवलीं ॥
शिकें शिदोरि रे आज ना हरी ॥ बहुत पीडलों भूक ही हरी ॥ १९ ॥

( पृथ्वी० )

वदे गडिसमूह तो मति दिनाकृती त्या हरी ॥
कळे नच महीधरा गुण असा गडी हो हरी ॥
सदां मुनि तपी वनीं बसुनियां मनीं आणिती ॥
किती भजनभावनीं सतत गा गितीं वाणिती ॥ २० ॥
तया मतिमधीं नसे उगम हा असा गौळियां ॥
घरीं वळत हा प्रितीकरुनियां बहू भाग्य या ॥

गड्यांप्रति वदे अरे सकळ या करूं युक्तियां ॥
नकां भिउं तुह्मी करा वदत हें बरें वर्कि या ॥ २१ ॥

( शिखरिणी० )

गड्यानों आतां या द्विजयजनशाळेमधिं चला ॥
तयापासीं मागा क्षुधितमतिनें सत्वर चला ॥
दिनाचे ते दाते न परतति गा विन्मुखपर्णी ॥
धणी वर्णाठायीं ध्वनि परिसुनी देतिल गुणी ॥ २२ ॥

( द्रुतविलं० )

गडि तदां हरिला ह्मणती असें ॥ नच असें गमतें मतिमानसें ॥
बहुत ते गतिचे मति सोवळे ॥ गडि अमीत हरी निति गोंवळे ॥२३॥

( उपचित्रा० )

रुचते नच हें मति आमुतें ॥ वदती नच गा मुखि आमुतें ॥
मुळें हें सकळां इतरांकडे ॥ मतिते गतिचें तटिं वांकडें ॥ २४ ॥

( पृथ्वी० )

वदे हरि वरी सुगोपशिशुला चला रे तुमीं ॥
वदां वनिं हरी क्षुधीत ह्मणुनी तयां रे तुह्मी ॥
करा पसरुनी वरा लिनमती त्वरा रे करा ॥
द्विवीध मतिला असें नच तुमीं मथीळें करा ॥ २५ ॥

( दिंडी. )

तदां जातीं लेंकरें गौळियांचीं ॥ यज्ञशाळेसमिप ते पातलेची ॥
बहुत झाले घांबरे मानसीं हो ॥ देखुनीयां ब्राह्मणांलागि ते हो ॥२६॥
यज्ञि देती आहुती ब्रह्मरावो ॥ वेदवाणी गर्जना शब्द ठावो ॥
अहंधूम्रें कोंदले नेत्रलाली ॥ मतीमाजी त्रासले कर्मढोलीं ॥ २७ ॥

( शार्दूल० )

देती आहुति कर्मकांडमतिनें वासाविखीं नाकिंच्या ॥
वासा नेणति दांडगे घननिळा श्वासा धरी नाकिच्या ॥
कर्मानें मति नाडले अभिमतीमाजीं रमूं लागले ॥
शांतीचा कधिंही सुवायु घतिला मत्ता असे लागले ॥ २८ ॥

कोणीं पोथि धरोनियां करिं बरें मध्यें तरीं बैसले ॥
कोणीं तांत्रिक शोधनीं रमति ते श्वासान्वयें केतुले ॥
गौळ्यांचे शिशु देखुनी वदति गा आधीं बरें आपणा ॥
मागावें तरि काय यां प्रति अर्जी दाता नसे देखणा ॥ २९ ॥

( भुजंग० )

तदां एक बोले तयांचे मधीं हो ॥ अरे मागुं अन्ना कशा लाज हीहो ॥
दिलें अन्न यांणीं तरी फार खासें ॥ न देती तरीं त्याहुनी फार खासें ॥३०॥
हरीलागिं जाचूं बरी मोडूं खोडी ॥ करी तांतडी आमुतें अन्न गोडी ॥
लबाडी नको आमुचें काय जातें ॥ फुकांच्या मुखें मागतां वांकडे तें॥३१॥

( विबुधप्रिया० )

आपसांमधिं या रितीं निति बोधुनी सरसावले ॥
येउनी मग पूढती धिट आकृती वदुं लागले ॥
बोबडे किती शेंबडे कटिं वांकडे किती ठेंगणें ॥
धन्य ते प्रति यां सिमे जनलौकिकीं नच देखणें ३२ ॥

( भद्रिका० )

वदनिं ते वदती द्विजां तयां ॥ अजिं धनी गुरुजी क्षुधीत यां ॥
सकळिका हरिनें तुमाकडे ॥ कथुनियां मतिला अमांकडे ॥ ३३ ॥

( वसंततिलका )

बोलोनिया रितिं उभे गडि राहती ते॥ कोणी जबाब न करी अभिमाननातें॥
कोणीं वरी नच बघी अवलोकुनीदां ॥ तेव्हां वरी पुनरुपीं गडि फोडिठाया॥३४॥

( पृथ्वी० )

अगा त्वरित द्या सुअन्न द्विजहो अजी लेंकरां ॥
हरी क्षुधित तो वनीं तळमळे कृपा हो करा ॥
वनाहुनि गडी हरीकडुनियां अमीं पातलों ॥
बहूत थकलों वदा तरि मुखें भुकें व्यापिलों ॥ ३५ ॥

( शु० कामदा )

वदति या रितिं गोपबाळ ते ॥ द्विजवरांमनिं द्वैतभाव तें ॥
नच मुखें तया कोण बोलती ॥ मतिमधीं बहू त्रास मानिती ॥ ३६ ॥

( भुजंग प्रयात )

कराच्या खुणे सांगती ते चला रे ॥ नसे येथ कांहीं उगीं कां उभे रे ॥
वदे एक तेव्हां तया लक्षुनीयां ॥ दुज्या ब्राह्मणापासिं तो तापुनीया ॥३७॥
बहू माजले अष्ट गौळी वनींरे ॥ अरे शब्द कानीं नकां घेउं सारे ॥
करावें पडे स्नान आणि दुजानें ॥ कशी हीच वेळा धरीली मुलानें ॥३८॥

( वसंतति० )

कैंचा हरी वदति हे नच जाणुं आह्मीं ॥
त्रासास कारण उठे गडि हे हरामी ॥
वाणी न यावि श्रवणीं मुलि आमुच्या ही ॥
कोठोनि आलि कुणबीं अजि स्नान होई ॥
ठावा नसे द्विज अमीं बहु सोंवळे हो ॥
आले कसें जवळ हे मुल गोंवळे हो ॥ ३९ ॥
धरा पोर सारे हणा मारि लाता ॥
उगीं काय हो ते तुमीं सर्व होतां ॥
कसें ओंवळे आंत आले मधीं हे ॥
करावें तरी काय आतां अशां हें ॥ ४० ॥

( द्रुतविलंबित )

क्रुर दिठी करुनीं दटाविती ॥ बहु हिणावुनियां तयाप्रती ॥
वदति ते द्विज हो नसे दया ॥ सकळ तामसि ते जुने वया ॥ ४१ ॥

( शुद्धकामदा )

दगड मारिती कोणि दे शिव्या ॥ मतिंत संचरे क्रोध हो तयां ॥
गवळि पोर तो चोर रे हरी ॥ बहुत मातला आमुचे वरीं ॥ ४२ ॥

( शार्दूल० )

अन्नादान करा असें वदति हे गौळी अजीं आमुतें ॥
मोठें सार्थक होई हें मग दिसे कमें लया न्हेति ते ॥
कोणी धांवत पाठिं काठि धरुनी ओंठाप्रती चावुनी ॥
तेव्हां ते पळती गडी हरिजिचे गेले वनीं तेथुनी ॥ ४३ ॥
भूकेनें बहु व्यापिले न चलवे पायीं उठे पेटगे ॥
आले त्यांतहि तांतडी करुनियां कोणी सुखा ना तगे ॥

धांपी टांकित पातले घननिळें देखीयले लोचनीं ॥
चित्तीं जाणत सर्वही परिवरी पूसे तयांलागुनी ॥ ४४ ॥

( वसंत० )

आलेंत जाउनि तुम्हीं गडि द्वीजशाळे ॥
अन्नें दिलीं किमपि ना मजलागिं बोले ॥
ऐकोनि गोप वदती गडि आजि पूरे ॥
काढींच वेगळिं तुझीं सकळीक त्रूरें ॥ ४५ ॥
झाली पुरे रित तुझी मरतों फुकारें ॥
दैवें करोनि जगलों घरिं जाउ सारे ॥
ऐसें नसें कधि घडे अमुतें मुरारी ॥
मारावया सकळ ते द्विज येति भारी ॥ ४६ ॥

( इंद्र० )

कोणी तुला ते नच जाणतीरे ॥ झाली फजीती हरि आमुचीरे ॥
आलों जगोनी बहु भाग्ययोगें ॥ झालें असें हें तव गुणयोगें ॥ ४७ ॥

( भुजंग० )

बहू ओंवळे मानिलें आमुतें हो ॥ न घेतीच कानीं कुणीं शब्दही हो ॥
तयाठायिं अन्ना तुला कोण देई ॥ मुळीं द्वीज ते सोंवळे कर्मगेही ॥ ४८ ॥

( द्रुतवि० )

परिसुनी असि ते रित तो हरि ॥ वदतसे मग त्याप्रति सत्वरीं ॥
बहुत रे दमलां आजिं हें खरें ॥ परि धरा मतिनें तुमि टेकरे ॥ ४९ ॥

( शिखरि० )

द्विजानें अन्नाला तमधृति गुणें नाहिं म्हणुनी ॥
भरोनीयां रागें विनमुखपणें हीणवचनीं ॥
बहू गांजीयेलें कठिण मतिनें कांहिं भुलुनी ॥
गड्या तुम्हां ऐसें घडत सकळी विप्रसदनीं ॥ ५० ॥

( विबुधप्रिया. )

शाहणे सकळीक रे तुमि गोप हो आजि वाटलें ॥
पूढचें कळलें कसें मज ना कळे रुप आंतुलें ॥

भूक रे मज फार ही अजि लागली करुं कायरे ॥
चालवें न जि पाउलीं नच बोलवें मति कांवरी ॥ ५१ ॥

( वसंत० )

सांगा गडे मज कसें करुं काय आतां ॥
लागे नची भुकशमार्थहि काय आतां ॥
अर्थांतरा विरहितीं तनुभाव माझा ॥
आर्जी गडे चहुकडे बहु जीव माझा ॥ ५२ ॥
तोडूं नका मजप्रती वनिं एकल्याला ॥
तोंडू नकां गडिगडी समजावि लाला ॥
आतां कसें तरि करा परि राग टांका ॥
वारे मनीहुनि कधीं मजला न टांका ॥ ५३ ॥

( इंद्रवज्रा. )

गोपाळबाळें अडि घेतिं भारी ॥ नाहीं मुरारी तव गोडि सारी ॥
तुझ्या गुणें रे बहु कष्ट होती ॥ संसार बूडे गमते अनीती ॥ ५४ ॥

( शार्दूल० )

कोणी मारिल आमुतें नच बेंर संगा नको आमुच्या ॥
राहूं रे निजचोरट्या अजि चले मार्गा धरी ग्रामिच्या ॥
तूं रे बैससि साउलीं प्रतिदिनीं रानीं गड्या धाडिसी ॥
कामें सर्व करूं तुझीं उगिच तूं उठाबसी काढिसी ॥ ५५ ॥

( भुजंग० )

नको कार तुझा नसोसे हरीरे ॥ अजीं नाच ऐकूं तुझी गोष्ट बारे ॥
न बोलूं कधींही जरी जीव जायी ॥ नको रे करूं वावुगी व्यर्थ घाई ॥५६॥
तुझ्या द्वाड खोडी बहू रे अनंता ॥ तुला नाहिं ती मानसीं रे अहंता ॥
नसे ताल कांहीं तुझे आकृतीला ॥ खरी नाच वाटे अह्मां वाह्यलीला ॥५७॥
न लागेचि कांहीं तुझा अंत आह्मां ॥ मुळीं चोर तूं पोरटा कार आह्मां ॥
दुधा तूं पिसी मार बैसे आह्माला ॥ सदां कान कर्णीं वरी रे हमाला ॥५८॥
नफा नाहिं कांहीं गफा आननीच्या ॥ सदां ऐकतां कार्णि मंदत्व सांचा ॥
असें ऐकुनी कृष्णचित्तीं स्वतोषे ॥ परी वाह्य दावी रुपातें वितोषें ॥ ५९ ॥

( वसंततिलका. )

तेव्हां हरी सकळिकां प्रति सांगताहे ॥
जातों ह्मणोनि वदनीं जळनेत्रि वाहे ॥
प्रेमाप्रती भुलुनियां हरि राहिला हो ॥
सांख्यान्वयें समतसे मतिरंगभावो ॥ ६० ॥
बोलोनि या रिति तदां हरि जात आहे ॥
बांधा तगो धृतिपणा श्रवणीं धरा हे ॥
तेव्हां भिती गडि मतीमधिं आपुले हो ॥
कृष्णाविणें नच गती तरणोउपायो ॥ ६१ ॥

( मालिनी. )

गडि मग हरिपाठीं लागले धोंगडे ते ॥
परत परत कृष्णा दावि गोपा मुखातें ॥
गडि आजि अवलोकी मागुतीं पाहि बारे ॥
करूं नच क्रुरदृष्टी येइ तूं गा मुरारे ॥ ६२ ॥
तुज बहु छळियेलें नेणतां राग तूझा ॥
आजिहुनि नच बोलूं सांवळ्या येई बोझा ॥
सलगिनरुपवादें वाट तूं बा धरावी ॥
तुजविण पर आम्हीं बापुडीं वां धरावी ॥ ६३ ॥

( उपचित्रा. )

परते हरि तूं अजिं ये कसा ॥ नच ये गुणता दुसऱ्या कसा ॥
जरि नाघडि एक तवां गड्या ॥ तनु ह्या सगळ्या मग ऊघड्या ॥ ६४ ॥

( माल्यभारा. )

वदती सकळी तदां हरी ॥ परते परि तो बसे वरी ॥
गडि जाति तयाकडे तदां ॥ समजावित फार सूपदा ॥ ६५ ॥

( पृथ्वी. )

वदे हरि वरी बहू कपटि मीं तुम्हां वाटलों ॥
अजीं भित कशासही वरिवरी बहू भागलों ॥
तुम्हीं सकळही बरे गांठिपणें भि रे एकला ॥
कसा वनिं बसूं क्रमे नच मला असे बोलिला ॥ ६६ ॥

( शिखरिणी. )

तदां सारे झाले समपणि गठी एक मतिची ॥
मिळोनीयां कृष्णा दृढतर मिठी देत बरिची ॥
गड्या कानूं अम्हा नच रुचि असी माय भितरीं ॥
तुझ्याहूनी भारी शपत तुझिची सत्यजि हरी ॥ ६७ ॥

( भुजंगप्रयात. )

सखो राग रे टांक आतां मतीचा ॥ वदे सूख गोष्टी रुचीच्या सुवाचा ॥
कसी काय आज्ञा वदे आमुतें तूं ॥ करूं रे तसें आमुतें तोचि हेतू ॥ ६८ ॥

( सवाई. )

कृष्ण वदे शिशु गोपमुलांप्रति क्षूधित मीं बहु येथ अर्जी ॥
अन्न मिळे तरि फार बरें गडि युक्ति करा तुमि येथ दुजी ॥
ते ह्मणती धनि तूंचि सख्या वदसी मुखिं गा मग तेंचि करूं ॥
बोल जि सत्वर स्थीरपणें गति मानस भावित नेट धरूं ॥ ६९ ॥
ऐकुनियां मग यारिति तो हरि बोलत आननिं सौंगडियां ॥
मानतसें जरि चित्तिं तुह्मां तरि जाइ अणी घरिं त्या द्विजयां ॥
सोडुनियां भय निर्भय मानसिं त्या अबलाप्रति जाउनियां ॥
क्षूधित माधव काननिं तिष्ठतसे दिन भावनिं बोलुनियां ॥ ७० ॥

( वसंततिलका. )

देतील अन्न बहु मान करूनियां या ॥
तुह्मांप्रती द्विजसती चळणें उपाया ॥
दायाद ते पति परी नित वाग्रकांची ॥
भक्तीच साचि गडि हो अमुच्या पदाची । ७१ ॥
नाहीं ह्मणोनि नच बोलति आननीं त्या ॥
माझेंच नाम जपणें नित आननीं त्या ॥
जावें त्वरें करुनियां भुक नाच सोसे ॥
चित्तांतरीं कलकलें उठती असोसे ॥ ७२ ॥

( पंचचामर. )

गडी तदां हरीप्रती बरें असें वदोनियां ॥
उठोनियां चालती सतीप्रती दिनीं तया ॥

मनामधीं नसे परी वरी भिडेच चालती ॥
परस्परें विनोद ते मतीमधेंचि भांडती ॥ ७३ ॥
पाकशाळ सन्निधानिं गोप सर्व पातले ॥
अन्नसिद्धि सर्व होत कामिनीनिं देखिलें ॥
बायका मनीं बहू सुखावती तयांकडे ॥
पाहुनीच अंतरांत त्या पतीस वांकडे ॥ ७४ ॥

( द्रुतविलंबित )

गडि तदां वदती सतिलागुनी ॥ हरिवनीं श्रमतो भुकभावनीं ॥
सकळ गे हरिचे गडि कामिनी ॥ क्षुधित हे अवलोकित या जनीं ॥ ७५ ॥

( शिखरिणी. )

सतीनों आह्मांला घननिळ हरी धाडित बरा ॥
अगे तुह्मांपासीं कथुनि दिनता या दिनिं बरा ॥
क्षुधा अंगीं व्यापे पडत धरणी काननिं हरी ॥
हरी जो तापातें करित शमना सिंधुलहरी ॥ ७६ ॥

( इंद्रवज्रा. )

अन्नार्थ आह्मीं वनिहूनि येथें ॥ धांवोनि माते दिनभाव हेतें ॥
द्यावें असें वाटत की कसे तें ॥ सांगा बग्रानें मतिभावना ते ॥ ७७ ॥
गोविंद वृक्षातळिं बैसलासे ॥ क्षूधेकडोनी पिडला पडोंसे ॥
वांचेल कीं काय न ये मुखानें ॥ बोलावयाला अवसान मानें ॥ ७८ ॥
आलों शिदोऱ्या घरिं वीसरोनी ॥ नांदे हरीच्या सकळीक रानीं ॥
येई दया गे तरि द्याच अन्ना ॥ सांगा मुखानें नमगेच अन्ना ॥ ७९ ॥
देतील अन्ना असि आश कृष्णा ॥ वाटे मनीं गे शिण होत उष्णा ॥
टाकोनि त्याला वनिं एकल्याला ॥ आलों गडी हे दिन फार आला ॥ ८० ॥

( मालिनी. )

पसरुनि कर बाळें द्विजपत्न्याप्रती हो ॥
बहु दिनवचनानें मागती अन्न ते हो ॥
परिसुनि द्विजकांता फार त्या प्रेमयोगें ॥
मतिमधिं भरुनीयां बोलती त्या प्रसंगें ॥ ८१ ॥

हळहळ करुनीयां आननीं द्वीजजाया ॥
मतिमाधिं पतिलागीं सिद्ध झाल्या त्यजाया ॥
क्षुधित हरिवनीं तो टांकुनी यज्ञशाळे ॥
यजन करित कर्मे भोगती दुःखशाळे ॥ ८२ ॥

( शार्दूल० )

कर्मे नाडुनियां मती भुल पडे वेडे खरे दादले ॥
नेणोनी हरि सारसाक्षि अवनीं क्रोधान्वयें व्यापिले ॥
अंधानां गम ना सुमार्ग गतिचा जाती परांच्या करें ॥
ज्याचे पाय शिवादिकां बहु दुरी ऐशास हे वीसरे ॥ ८३ ॥
दैवानें मति नाडले अभिमती कैचें अशा सोंवळें ॥
आहे ठाउक आमुतें सकळही होऊं अजीं वोंवळें ॥
जाऊं कानानें अन्न घेउनि बऱ्या पाहूं जगज्जीवना ॥
संधी फार सुकाळ योग गतिची आजी असे या वना ॥ ८४ ॥

( शिखरिणी. )

चला बाई जाऊं वनिं हरिकडे याच घडिये ॥
नये ऐसी पून्हां किमपिहि सये जाण घडि हे ॥
अगे आजी आजी परवणि बरी षष्ठि कपिला ॥
नसे ठावें त्यांना द्वति पति तुळे येत कपिला ॥ ८५ ॥

( विबुधप्रिया. )

आपसांमाधिं या रितीं सति बोलुनि मग त्या गड्या ॥
सांगती प्रिति भाउनी मुल हो तुम्ही चलणें कड्या ॥
घेउनी आजिं अन्न गा वनिं येतसों अम्हि बायका ॥
भेटिला मति इच्छिते दिठिं पाहुं त्या यदुनायका ॥ ८६ ॥

( हंसी. )

सांगा आतां तुम्हि वानें हरिला ॥ जावा बारे बहु तुमि श्रमलां ॥
अम्ही आणूं आजिं बहु जलदी ॥ येतों बारे नच मुळिं अवधी ॥ ८७ ॥

( कामदा. )

ऐकुनी असें गोप तोषले ॥ प्रेमभापणें सूख वाटलें ॥
चालले पुढें त्या हरीकडे ॥ वांकडे कडे चाल नीकडें ॥ ८८ ॥

( दिंडी. )

हरीपासीं पोंचले गोप सारे ॥ वदति वदनीं माधवा ऐक बारे ॥
अजीं अन्नें अमुप तीं येथ येतां ॥ तुझ्या रूपा पाहण्या भाव चित्तीं ॥८९॥
बहु गोप्या ब्राह्मणी कृष्णनाथा ॥ तुझ्या रूपीं गुंतल्या गोपिनाथा ॥
वस्य तूला बायका फार होती ॥ बाप येते निंदिति जाण नीति ॥ ९० ॥
येति आतां धांवुनी नाहिं वेळू ॥ असे सारे सांगती गोप बाळू ॥
सर्व झालें ऐक्यते तेथ थाटीं ॥ गड्या चित्तीं शांतता बहू दाटी ॥ ९१ ॥

( शार्दूल० )

पात्रें कामिनि प्रेम भावमतिचीं अन्नें भरूनी बरी ॥
जाल्या सिद्ध वनाप्रती हरिकडे जाण्या मती हांवरी ॥
कांता तें उपवासि टाकुनि घरीं नारी कड्याच्या वरी ॥
जाती सर्वहि आतुरा मतिमधीं भीति नचा ज्या उरीं ॥ ९२ ॥
कोणी मध्यवनीं किती शिखरिं त्या कीती घरां बाहेरी ॥
कीती तांतडि चालती किती घरीं पात्रें करीं हो घरीं ॥
भक्तीच्या सुवड्या न कांप बुगड्या वाळ्या कड्या घालुनि ॥
प्रेमानें बहु धांवती नित असी भावार्थता ज्या मनीं ॥ ९३ ॥

( भुजंगप्रयात. )

तया यज्ञशाळेमधीं द्विजयांसी ॥ कळे सर्व भावो तदां ये उदासी ॥
बहू क्रूर भावें घरांमाजिं आले ॥ नसे चित्त ज्यांचें कधीं ही निवाले ॥९४॥

( इंद्रवज्रा. )

टाकूनि यज्ञांतिल सारिं कामें ॥ मध्यंतरीं येति घरा रिकामे ॥
कामें करोनी बहु व्यास झाले ॥ भ्रांती भवाळा खिरलेंचि झोले ॥९५॥

( वसंततिलका. )

आले घरांमधिं तदां कुलुपें कवाडा ॥
पाहूनि चित्तिं वदती बहु या दुवाडा ॥
रांडा कशा घरडुब्या अघभीति नाहीं ॥
गौळ्याप्रती भुलुनियां रमल्या स्वगेहीं ॥ ९६ ॥

( शार्दूल० )

सारे ब्राह्मण घाबरे मति झुरे वारें भ्रमें बावरें ॥
क्रोधे व्यापियले सकाम खवळे आधीं मुळीं बावरे ॥
कांतेचे अवगूण ते पतिमतीं छेदावया बाण ते ॥
ना कोणीं टिकला स्वबोधपठणीं साक्षी खुणे बाणते ॥ ९७ ॥

( वसंततिलका. )

आधींच कर्मठपणा मतिमाजि जेथें ॥
कामादि ते सकळही मतिमाजि जीते ॥
काळावले द्विज बहू मतिभान ऊडे ॥
डंकास काम करितो उर तें धडाडें ॥ ९८ ॥
वाडे गडे विसरले पिचताति हाडें ॥
चित्तांतरीं वसवसी करितेति हाडें ॥ ९९ ॥

( भुजंगप्रयात. )

वदों लागले एकमेकांप्रती ते ॥
अहो काय हें हो वदावें नितीतें ॥
करावें कसें जातगोतीं बुडावें ॥
कुळालागिं नारी रितीचे सुढावें ॥ १०० ॥
उनाचे तडाके कडे ते सिडे हो ॥
चढोनी पहा जाति या वांकड्या हो ॥
दटावीति हांकें तिखें शब्दभाळें ॥
परी चित्त त्यांचें मुळीं नाच भ्याळें ॥ १०१ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

कांताचे रव ऐकुनी चपळता कांता करीती बहू ॥
जाती धांवुनि सत्वरें सकळ त्या भीती नची त्या जहूं ॥
तेव्हां अंतर फाटलें परि मतीलागीं दगे भासले ॥
बारे येथुनि शांतिचे भरंवसे अर्थांतरीं सूटले ॥ २ ॥
गौळ्याला भुलल्या सिनाल मतिच्या रांडा लबाडा कशा ॥
ज्ञातीचा दर ना कुळा भितचिना झाली असी कां दशा ॥
छाती फोडित पाणिनें धपधपां जाळीतसे वीरहो ॥
कोणीं फोडित मस्तकां प्रति बरें त्रासें सतीसंभवो ॥ ३ ॥

कृ. प्रकाशन विठ्ठल चुरी, गा. डांगी


संग्रहालयास देणगी.

( वसंततिलका. )

येकाचि ते सति घरीं भरि अन्नताटीं ॥
पाहोनियां पति करीं बरि घेत कांठी ॥
मारीत पाठिवरि ते म्हणतो अगेगे ॥
कैसे तरी सुचति हे मतिला दगे गे ॥ ४ ॥
रांडे कुळाप्रति नितीमधिं वागवेना ॥
कामोधृती सदनिं यां नच भागवेना ॥
जासी कशी उठ बरें चल पाहुं आतां ॥
बोलोनिया रितिं सतीप्रति हाणि लाता ॥ ५ ॥

( भुजंगप्रयात. )

सती नाच थांबे उठोनी चले ती ॥ मनी आवडे त्यांपुढें नाच भीती ॥
असे रंगली कृष्णनामें मनीं जे ॥ स्मरे अंतरीं भावनीं माधवा जे ॥ ६ ॥

( मालिनी. )

धरुनि पति करानें बांधली धारणाला ॥
विसरुनि सति गेली लौकिकी कारणाला ॥
तनुंतुनि मतिभावो पावला कृष्णपायीं ॥
जड शव पतिपासीं राहिलें उपायीं ॥ ७ ॥

( शार्दूल० )

सर्वांआधिं हरीकडे सति बरी पोंचे जिला बांधिली ॥
अंगीं मीळालि प्रेमतेकरुनियां सायुज्यता पावली ॥
आल्या ईतर कामिनी कवतुकें अन्नें बरीं घेउनी ॥
पाहोनी गडि हर्षले बहुत ते शांती जमे हो मनीं ॥ ८ ॥

( कामदा. )

पाहुनी हरी लोचनीं सती ॥ कृष्णनायका तोषती मती ॥
अन्न ठेवुनी पाय वंदिले ॥ नेत्रकज्जलीं पूर चालिले ॥ ९ ॥

( भुजंगप्रयात. )

करा जोडुनी ध्यान द्याचे करीती ॥ स्त्रिया जातिच्या नीति थोराहुनी ती ॥
बहू प्रेमयोगें रुपा माधवाच्या ॥ भुली चित्तभागीं तया बायकांच्या ॥ १० ॥

( कामदा. )

शामसुंदरा हे परात्परा ! वारिजाक्ष हे लक्षुमीवरा ॥
शांतमानसा निर्मळा हरी ॥ आम्हि बायका मूढअंतरीं ॥ ११ ॥
गोपपालका गोपिमानसा ॥ नंदनंदना भक्तभावसा ॥
धेनुपालका कौस्तुभाधरा ॥ आपदाहरा रक्षि पामरा ॥ १२ ॥
मोरमूकुटा प्रेमजीवना ॥ पायिं थार दे हे कृपाघना ॥
तूज नेणती मूढ ते पती ॥ तामसीच त्या अंतरीं निती ॥ १३ ॥

( शार्दूलवि० )

गुंजांचे बहु हार ते नवलता आपाद माळा गळां ॥
पांवा कांठि करीं मनोगशमनीं गोकूळवेषा भला ॥
पाहूनी नयनीं तुला घननिळा आजीं सुखा पोंचलों ॥
झालें सार्थक सर्वही इहवरीं ऐशा मता भाविलों ॥ १४ ॥

( वसंततिलका. )

ब्रह्मादिकां गम नसे पद हेंचि साचें ॥
प्राप्ती वडे गतिरुपें बहु हें सुखाचें ॥
इच्छा तुझी जशि हरी जनिं वागताहे ॥
भेटी कृपा करुनियां तुंचि देसि पाहें ॥ १५ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

गोविंदे सदये दया करिं तुं गे थारा घडो या पदीं ॥
संसारांतुनि मोकळी जिवकळी घालूं नको दुर्मदीं ॥
जातीच्या अबला पराधिन सदां संतापता नास गा ॥
तुम्हांवांचुनि आणखी नच दुजा आम्हांप्रती गा सगा ॥ १६ ॥
गोपीचें बहु भाग्य गा नित हरी खेळे घरीं कौतुका ॥
वाणुं काय मुखें नसे अवनिं हे कोणा सरीला तुका ॥
आम्हां भाग्य नसे म्हणोनि दुरलों ज्ञातीमधीं आंचलों ॥
भाग्यें आज सुखाप्रती गंवसलों अर्थार्थ हा भावलों ॥ १७ ॥

( वसंततिलका. )

गोपें असें सतिमती रव ऐकुनीयां ॥
आनंद मानित बहू बहुधन्य बाया ॥

कृ. भ... ग्रंथालय



संग्रहालय... कुर्ली

गोपीहुनी मति हरीवरि यांचि भारी ॥
प्रीती कसी मनिं असी सतिच्या उभारी ॥ १८ ॥

पाहोनियां हरि तयांप्रति तोषला हो ॥
बोले वरी प्रिति बहू मुळिं बायका हो ॥
आजीं क्षुधा शमविली सतिनों बरी गे ॥
शांती घडे तवकृपे मम मानसीं गे ॥ १९ ॥

( इंद्रवज्रा. )

हीं म्हणोनी पतिनें मला गे ॥ गोपांस रागें फिरवीत मागें ॥
तुम्हीं दिलें गे बहु प्रेमयोगें ॥ नाहीं कधीं हें विसरें स्वअंगें ॥ २० ॥

( द्रुतविलंबित. )

अजि तुम्हीं घरिं गे जलदीं चला ॥ पतिकडे रमणीं रमणें चला ॥
द्विजसत्या तुमि गे बहु सोंवळया ॥ नच रमां रितही गाडि ओंवळया॥२१॥

( उपचित्रा. )

पतिचें गतिनें मति वागवा ॥ सतिच्या नितिला नच बाटवा ॥
हृदयीं धरणें भजणें मला ॥ बहु हें बरवें दिसतें मला ॥ २२ ॥

( वसंततिलका. )

ऐकोनियां इहरितीं घननीळवाणी ॥
वाटेच छाति फुटली हरिशब्दवाणी ॥
गेल्या भरोनि मतिला विरहानळानें ॥
व्यापीयलें जळजलोचन आननानें ॥ २३ ॥

( पृथ्वी. )

तदां वदति त्या अगा दिनदयानिधे मानसा ॥
कसा तरि असा मुखांबुरव हा उठे घाणसा ॥
दयाघन हरी असी मति नसे मना आमुच्या ॥
तडीस पति सोंवळीं बुडवुनी गठीं तूमच्या ॥ २४ ॥
नसे रुचि हरी घरावरि अमां मनोमानसीं ॥
निशीदिनिं तुंची मती वससि गा गडी हे खुशी ॥
नको दुर करूं अगा सुरहरा रमेच्यावरा ॥
धरीं पदिं बरा नराधिशवरा प्रती सांभरा ॥ २५ ॥

स्वामी ... ग्रंथालय ... कुर्ली
अनुक्रम...

( इंद्रवज्रा. )

सोडूनि जाऊं नच शामअंगा ॥ राहूं सुखानें निजभावसंगा ॥
रंगामधें या नच तूट घालूं ॥ कार्यार्थ हा साधनभाव मानूं ॥ २६ ॥

( वसंततिलका. )

सोसीयलें अजिवरीं बहु जाच देवा ॥
आतां पुरें सकळ तें सुख वासुदेवा ॥
जाऊं नची हरि तुला वानिं टाकुनीयां ॥
भीती नची सदनिंची धरिती कुणीं या ॥ २७ ॥
आतां घरीं नच पती हरि थार देती ॥
कोण्यारूपें घरिं चला ह्मणसी वदे ती ॥
रीती तुला कशि सुचे सखया मुरारी ॥
कांता अम्हीं नवतिच्या न्हवती कुमारी ॥ २८ ॥

( द्रुतविलंबित. )

बहु ते पति जाचति मारिती ॥ नित कशी करणें मति मानती ॥
यदुपती वदती आजिं लौकरीं ॥ भिति भवो मतिचा दुर गा करी ॥ २९ ॥

( पृथ्वी. )

मुळीं तुजसि वांकडें सकळ ते पती आमुचे ॥
तशामधिं असे गुणोद्भव गड्या बरें आमुचे ॥
घरीं करुनि कूलुपें सकळ ही बऱ्या पातलों ॥
नको त्यजुं अम्हीं सख्या सतिस या मती आटलों ॥ ३० ॥

( शार्दूलविक्रीडित. )

टाकोनी उपवासि गा घरिं पती आलों तुटोनी कुळा ॥
येऊं संगतिं तूमच्या यशुमती संगो धृती गोकुळा ॥
टाळाटाळ नको फुकां सकळही जाऊं नची गा गड्या ॥
साचे मानस भाव तें इहरितीं जाती मुली बावड्या ॥ ३१ ॥

( वसंततिलका. )

ऐकोनियां मग तदां घननीळ बोले ॥
जावें घरीं पति कधीं नच दुष्ट बोले ॥

तुह्मांप्रती बहुरीती सति मान देती ॥
पादोदकें किंतिक ते स्वकरेंच पीती ॥ ३२ ॥

( भुजंगप्रयात )

नका मानुं दूजी मतीमाजिं भीती ॥
निती वर्णिती सर्वही येथुनी ती ॥
जनीं कीर्ति गाती पुराणें सतीनें ॥
खरें नदंभाणे वदें देवतानें ॥ ३३ ॥
असें अंतरीं सर्वदां तूमच्या मीं ॥
म्हणोनी तुह्मां आवडे प्रीत धामीं ॥
वदां आननीं गूण माझे सुकाळीं ॥
असों सर्वही आजच्यानीं सुकाळी ॥ ३४ ॥

( द्रुतविलंबित. )

गुण असे तुमचे मुखिं गाति जे ॥ यमभिती नच या कुळीं बाधिजे ॥
घरिं रमा भरिया नित पाणिगे॥सति खरें मीनें भावत यासिगे ॥३५॥

( उपचित्रा. )

इकडे द्विज ते सकळीक हो ॥ बसुनी करिती रितभाव हो ॥
सतिप्रेत विलोकोनि मानसें ॥ बहु गा दुखती मति तापसें ॥ ३६ ॥

( मालिनी. )

कासि तरि प्रित यांची अंतरे देह धामा ॥
हरिवरि रिजली जे प्रेतही येथ रामा ॥
मिळुनि सति हरीला कामसंसार सारा ॥
गति किति तरि दैवी अंत ना पारवारा ॥ ३७ ॥

( शार्दूल. )

कर्मानें मति नाडलों अवगती दैवी खरी आमुचा ॥
ज्ञातीच्या भरिला पडोनि हरिला भावो नसे आमुचा ॥
वेदानें बहु वर्णिला परि नसे ज्याचा तया शोध तो ॥
भक्तीनें सति पोंचल्या सकळही कर्मान्वयें भाव ता ॥ ३८ ॥

नागाची सम जात ही द्विजपणा संतापता द्वैतता ॥
ताठा मोह सलोभ काम सकळही ठावो करीती हिता ॥
आतां येतिल काय त्या परतुनी आम्हांकडे पापियां ॥
कैसें भाग्य असे नसें दिसतसे दैवावरी भार या ॥ ३९ ॥

( वसंततिलका. )

मोठा घडेच अपराध भवामधीं या ॥
भूलोनियां धनमदीं पडलों अपाया ॥
गर्वें करोनि फुगलों नच पायमार्थीं ॥
कृष्णा तुझें अधिं तया भरुनीच सार्थीं ॥ ४० ॥
लौकीक भाग मतिनें गति नाडलों गा ॥
आतां पुढें तुज कधीं जरि आठवूं गा ॥
कर्मं असें मतिमधीं तुंचि बांधुनीयां ॥
माया समोह मधिं या भरसीच राया ॥ ४१ ॥

( द्रुतविलंबित. )

मुळिंच निंदक हें कुळ गा हरी ॥ सकळ जातिवरी तमता खरी ॥
सदयता उदरीं तधिं बूडली ॥ भृगुपदाब्ज उरीं कळ सोशिली ॥ ४२ ॥
अभिमती प्रति गा मुळ हें हरी ॥ पडतसों अघ तेमधिं लोकरीं ॥
हरहरा मुकलों हरिच्या सुखा ॥ सति बऱ्या पतिच्या हिति हो मखा॥४३॥

( शिखरिणी. )

कशा दृष्टीभागीं पडति अमुच्या गौतमिरितीं ॥
सती गंगा गोदा प्रवरि यमुना मानित मती ॥
तयांच्या पुण्यानें अगणित अघें नासुनि धुणीं ॥
खरी होई वाटे तृग सकळही अग्निच धुणी ॥ ४४ ॥

( भुजंगप्रयात. )

बहू भाग्य यांचे नसे या सरीला ॥ भुमीभागिं कोणी नरा मानवाला ॥
लिला भक्तिची ही नसे कर्मकांडीं ॥ असी भावना कोणही योगभांडी ॥४५॥
कसें काय होतें कळेनाचि आह्मां ॥ अहो सर्व जावें हिता येत आह्मां ॥
नका वांकडें मानसीं या हरीचें ॥ धरूं हो तुह्मी सारसाक्षी गुणाचें ॥ ४६ ॥

वनीं गाइ राखी हरी काम जो कां ॥ चला पाहुं या त्या सदाचार लोकां ॥
नको सांवळें वोंवळें तें पुजूं या ॥ वरी बोलती हो परी भीत काया ॥ ४७ ॥
अभीमान अंगीं असोनी द्विजाला ॥ कधीं नाच जाती परी हेत झाला ॥
बहू भाग्य हें यरितीं यावयाचें ॥ मतीमाजिं होती सुधाभाव साचे ॥ ४८ ॥
तरोनी परां तारि त्या नारि या हो ॥ सुशीला मुळें अंतरीं प्रेमभावो ॥
खरें आज वाटें नको कर्म आह्मां ॥ जरा पातली वृद्धता काळ अह्मां ॥ ४९ ॥
कसी काय ती गा दशा होइ आतां ॥ अगा दीनबंधू अमां तूंचि ताता ॥
नसो रोग बापा अगा तामसाचा ॥ फुकां सर्वही मायिकी मानसाचा ॥ ५० ॥
जसें बाळ तानें करी कर्म खोटें ॥ करीं बाप त्या हाणिना कर्म खोटें ॥
तुझीं सर्व बाळें जगज्जीवनारे ॥ नको तोडुं आतां तुवां जीवनारे ॥ ५१ ॥
तुझ्या गोपबाळांप्रती जाचियेलें ॥ सदां डाग तें मानसीं हें चियेलें ॥
कसी कर्मयोगें पडे भूल तेव्हां ॥ बरा काळ जाची वदों काय तेव्हां ॥ ५२ ॥

( मालिनी. )

इहरिति द्विज सारे तापले अंतरंगीं ॥
उपरति मति झाली प्रेमता ये नरागीं ॥
कुळिहुनि सति गेल्या भीवल्यां कृष्णवासा ॥
तनुसुमनसुवासा पावल्या ऐक्यवासा ॥ ५३ ॥
परपण मति कांती होति जे आधली हो ॥
सदयघनप्रसंगें सर्व गेली लया हो ॥
सकळहि हरिभावो दृश्यदृष्टी भरोनी ॥
समपण मतिपासीं पातलें कोसळोनी ॥ ५४ ॥
नितिरव हरिमेघे भीजल्या ब्रह्मकांता ॥
सितळपण मतीला पातलें सीतवार्ता ॥
जननमरणबंधापासुनी त्या निवाल्या ॥
पतिध्रतिसम झाली ऐक्यते आंतुल्याल्या ॥ ५५ ॥
कुळिहुनि जरि कोणीं एकटा कृष्ण पायीं ॥
गतिनरुप जडे गा जो बहू योग पायीं ॥
कुळ सकळ तरे तें तारया हाचि होई ॥
सति पति मति ऐक्यीं होतसे कृष्णठायीं ॥ ५६ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

वाटे तेव्हां सतींना पतिघरीं चळणें सत्य आज्ञा हरीची ॥
भाऊं चित्तीं स्वतोषें भिति नच धरणें कांत ना सत्य जाची ॥
ठेवूं पायीं शिराला यदुपतिहरिचा भाव विश्वास सारा ॥
ताराकांता सुशांता किरणपतिमता भक्ति होयी उदारा ॥ ५७ ॥

( वसंततिलका. )

वंदोनियां जलधिजापतिच्या पदातें ॥
वर्णीयलें सकळ ते तनुसंपतीतें ॥
स्वानंदयोग भरती भरली मतीला ॥
नेत्रोदकें पद हरी भिजवी स्वलीला ॥ ५८ ॥
जातों ह्मणोनि वदती नच मूखवांटें ॥
वाटे अकांतसमयों पतिमार्ग वांटे ॥
कंठांतुनी नच फुटे रव कामिनीचा ॥
भक्तीविणा सकळही भव कामनीचा ॥ ५९ ॥

( भुजंगप्रयात. )

सती नोवतीं मंदिरां यावयाला ॥ नभीं सूर शीरें तुकी हो बयांला ॥
सुरांच्या सती भाविती मानसाला ॥ रमा नाच टीके अशांचा कसाला ॥ ६० ॥

( विबुधप्रिया. )

मस्तका करुनी तधीं बहु ठेंगणें सुरनायका ॥
वंदिती सति ब्रह्म त्या बहु भाविती मनिं कौतुका ॥
बायका शुकमानसाहुनि मानसामधिं भाविकां ॥
तोडुनी नित आगमीं रत माधवा भव लौकिकां ॥ ६१ ॥

( दिंडी. )

तदां येती कामिनी ग्रामठाया ॥ सोडोनियां माधवा बाह्यठाया ॥
गाती गूणा आननीं प्रेमवाणी ॥ कथा ही हो प्रेमता सदनवाणी ॥ ६२ ॥
समिप आल्या जेधवां पाकशाळे ॥ जरा चित्ता बैसके खेदजाळें ॥
हरीशब्दें भाव तो वागवीतां ॥ शांति येई अंतरा प्रेमहीता ॥ ६३ ॥

(इंद्रवज्रा.)

पाहोनि त्या कामिनि कांत सारे ॥ धांवोनि जाती गति प्रेमसारें ॥
वंदोनियां त्या द्विजकांतवाणी ॥ आणीत नेत्रं सकळीक पाणी ॥ ६४ ॥
कांतेप्रति ते पति बोलती हो ॥ केलेंति धन्या कुळ आमुचें हो ॥
भावीक चित्तींतरिं बायकांनो ॥ कांताप्रती या भवि तारकांनो ॥ ६५ ॥

(शार्दुलविक्रीडित..)

झालों पूनित कामिनी तव गुणें मुक्तीच गे या तुम्हीं ॥
कांहा ग भिति ना चला सदनिं या नाहीं भवा या तुम्हीं ॥
ना भीती कळिकाळ बाधक कधीं तुम्हा प्रती साजणी ॥
रीणी हाचि अनंत भावमतिचा आनंद चित्तांगणीं ॥ १६६ ॥
नारींनो बहु प्यारि गे हरिजिची भाग्योदयें आपणा ॥
आम्हीं ही सुखि जाहलों सदनि या मानू बहु आपणा ॥
केलें पावन या कलीमळितुनी आम्हांस तुम्ही धणी ॥
रीणी हाचि अनंत भावमतिचा आनंद चित्तांगणीं ॥ ६७ ॥
ऐकोनी पति उत्तरें सतिमति शांतीप्रती पावल्या ॥
कांता पाहुनि कांत अंतरिं तदां वृत्तीच दीपावल्या ॥
जेथें माधव बोळला मग तया भाग्या उणे काय गा ॥
साक्षी पारचि ना अशाप्रति उगां वाणी गुणें काय गा ॥ ६८ ॥

(भुजंगप्रयात.)

जि कां प्रेत झाली सती मंदिरीं ती ॥
हरीसंगती यांत हो तेथ होती ॥
मथी नाम तीचें परी नाहिं वाटे ॥
तिची आद्य गोष्टी नसे कर्णवाटे ॥ ६९ ॥
कळे मृत्यू तीचा पती आननानें ॥
सतीलागुनी तें खरें नाचि मानें ॥
पतीलागि नारी बऱ्या सांगती त्या ॥
हरीपासिंच्या सर्वहि हो गती त्यां ॥ ७० ॥

मथी आमुचें आर्थ मीळे हरीला ॥
बरी पाहिली लोचनीं ते सतीला ॥
पती नाच कोठें खरें सांगतों हें ॥
हरीला मिळे मीठ जेवींच तोयें ॥ ७१ ॥

( मालिनी. )

पतिसति उभयांची गांठ झाली तदांही ॥
गति समजत साऱ्यां भावना मात देहीं ॥
चुटपुट सकळीकां वाटली मानसातें ॥
सतिपति कळ वाहे शोक घे अंतरातें ॥ ७४ ॥
सकळहि बहु दैवी मींच भागीं हिनाचा ॥
सकळहि घरबूडे घात झाला दिनाचा ॥
सति प्रति उगिं गा मीं बांधिली धारणाला ॥
मम मति रुपनाशा काळही मारणाला ॥ ७३ ॥
सकळहि समजूती त्या पतीची करीती ॥
सतिगुण नित गाती आननें प्रेमभाती ॥
द्विज भजन कराया लागले प्रेमयोगें ॥
उपरति सम भावो होतसे तो वियोगें ॥ ७४ ॥
यदुपति सदयाला मीळसी देहत्यागें ॥
पुनरुपि नच आली भीळशीला न त्यागे ॥
घननिश्चस्वरूपातें मीळणी तेथ झाली ॥
पुनरुपि तनुभावो भावना ते त्रिझाली ॥ ७५ ॥
परि वरि उपचाराकारणें लौकिकांते ॥
करित हरि उभारा जें नसें लौकिकां तें ॥
सतिशव सजिवंती होतसे थोर ख्याती ॥
करित इशकळा हे वाढण्या भक्तिनीती ॥ ७६ ॥
सकळहि करि कामें त्रास सोसूनि अंगीं ॥
परि जड किमपीं तें घाळीना भक्तभागीं ॥

इहरितिं नच दूजा या भूमीभागि साचा ॥
हितकर निजदासां नाहिं गा सत्यवाचा ॥ ७७ ॥
मन करिं तुंहि भक्ती या रितीं माधवाची ॥
नच धरुं बहु गोडी संसृती या भवाची ॥
नरतनुमाधिं हेचि जोडी जोडे सुखाची ॥
विषायिं दवडुनी कां नासणें हो फुकाची ॥ ७८ ॥

( इंद्रवज्रा. )

गातील कोणी जरि भावयोगें ॥ लीला स्त्रियांची हरिसंग भोगें ॥
तारील त्यांना दिननाथ साचा ॥ भावें करोनी मिळणी सुवाचा ॥ ७९ ॥
देईल सारें गितगायकांसी ॥ नामाहुनी ती नच थोर काशी ॥
दासीं समानी जगतींत ठावो ॥ तीर्थें बरीं हो हरिरंगभावो ॥ ८० ॥

( वसंततिलका. )

आनंदकारक कथा सतिभावयोगें ॥ स्वानंदकारक जडी भवनाशबोधें ॥
शुकादिकें कथियली तिच प्राकृतीं ही। वर्णीयली गुरुकृपें रुप आकृती ही॥८१॥

( इंद्रवज्रा. )

श्रीक्षेत्रकृष्णा मुळबिंदुठायीं ॥ स्वानंदभूमी शिववास पाही ॥
ग्रंथास ठावो मुळ वासुदेवो ॥ काया अनंतीं मिळवी प्रभावो ॥ ८२ ॥

( भुजंगप्रयात )

सती द्वीजयांचा मती ऐक्यतेचा ॥ गती आत्मबोधामधीं ज्या रुचीचा ॥
कळा भक्तिभावो जडाया मनाला॥ अनंतीं मती प्रेरणा या दिनाला॥१८२॥

॥ ऋषिपत्न्याख्यान संपूर्ण ॥

# अथ करुणाबत्तिसी.

( सवाई. )

प्रथम नमीन नमी गणनायक गौरिहरानुज सिद्धिसखा ॥
विधितनया नमुनी पुढतीं नमिला गुरु सत्पदिंसाम्यसुखा ॥
रव करुणाकर सादर मावर आभरला भर मानसिं या ॥
अनुभव संभव संभविता जिव राजिवलोचन साधनिं या ॥ १ ॥
तळमळ चंचळ चंचळि हा जिव चंचळ संभव भ्रांतिमुळें ॥
मनमद चंचळ आकृति चंचळ नास्थिर कारण याचि मुळें ॥
धनगमनागमनीं भ्रमणीं भ्रमता मन मोहमदीं रस सेवुनिया ॥
तळमळतां तळि मीळवी हे वळवी चळवी मळवी असु या ॥ २ ॥
असुपण नाहिंच भासक भासच भासत भावनिं भ्रांति पहा ॥
मृगजळ नाम तमाम भ्रमांत मृगास स्वभावि तृषार्थ पहा ॥
भ्रमि भ्रमुनी भ्रमुनी भ्रमणा सरतां ठकती दमती स्थिरती ॥
नच निरसंभव शांत तृषा नच तद्वत संभव हीहि मती ॥ ३ ॥
कर करुणा अरुणा उदया सदया तुमि या तिमिरा हरि गा ॥
गुण रजनी रजनीचर हे अरि काममदा सविता तुंचि गा ॥
सरसदया उदया सदया आजि या तनुची भ्रमणा सुटवा ॥
पद नमितों शमनार्थ समागम सज्जन मानस साक्ष भवा ॥ ४ ॥
धनसुत कामिनि मानित ना मति ना धृति तेथ ति या तनुची ॥
सुखकर सज्जनसंग मनोरम रंग प्रबोधित दंग शुची ॥
समजुनि यारितिं चातकसी मति ठाह करीत मि निर्धनची ॥
रसभरिता कविता जडता हरण्या सरिता मति छंद तुची ॥ ५ ॥
दिनहिनमानसि मानवि ही तनु प्राक्तनसंभवि संभवली ॥
भालि घडली परि ही नडली विषयीं जडली भ्रमली फसली ॥
मदमदिरा पिउनी सवदा सद तो स्वपगागतिला मुकलों ॥
हरहर मी फसलों चुकलों ठकलों हकनाक जनें तुटलों ॥ ६ ॥
आजि गिरकी नरकीं सरकी उरकी समते मिळवी हरिरे ॥
हरिहरब्रह्म न जाण मि जाणत जाणत चेष्टित सूत्र बरें ॥

जगनगरक्षण भक्षण शिक्षण संभव विद्रव भृंगमतें ॥
गुणभुत कारण वारणविश्व जि साक्ष भुतें मतिनें नमितें ॥ ७ ॥
नच सदुपाय उपाय मतींत अनीत समे जि भवांबुधिता ॥
क्षुधित असे दिन मी तुझिया पदरातळिचा तुचि गा जनिता ॥
मति नच साधन जाणत जाणिव जाण जि माधव मानसिचें ॥
जड तनु नास्तिक ना ठिक ना स्थिर जाणुनिया मति नाम रुचे ॥ ८ ॥
नरतनु मीपण मीपण जाणिव जाग्रति जाग्रत चेष्टविते ॥
द्विविधमनोद्भव संभव संसृति संचित प्राक्तन संभवते ॥
अभिप्रातिबंधन बंधित होउनि कंद सुगंधित वीसरलों ॥
तळमळलों बहु लौकिक पद्धति भ्रांतित नाडुनि गा चुरलों ॥ ९ ॥
अजि विरलों दमलों मतितें वमलों तुझिया चरणीं फिरलों ॥
जनिं जनिता पुनिता तुंचि गा स्वहिता रविसा अवलोकियलों ॥
पदकमलोद्भव संभविं संमत संमत हे जडलें वहिलें ॥
तुज अजिं वाटल तेचि करी हरि मागत नाहिं जि आजि भलें ॥ १० ॥
मज नचि आसर आणिक या जगिं आण तुझी पदिं भृंगमती ॥
रुचल तुतें कर तें परि हें वद गा तवनामरसीं दि गती ॥
तुज करुणा करुणाकर तूं नाम भवामधि गाजत या जगतीं ॥
दिनहिन देखुनि तूं द्रवसी नवनीत उंगे तुकि जाण गती ॥ ११ ॥
समय सुचीत उचीत दि लाघव चंचळता भव हारिव गा ॥
बहु वदतो म्हणुनी नच राग तुला हरि येउ न तो उगिगा ॥
तळमळला जिव जाणिव लाघव पाहुनि संभव या भविचा ॥
मति नच मानित मानवि हें हित खेळचि हा हरि सांभविचा ॥ १२ ॥
सदय दयाघन तूं सदवासर तूं जगनायक चालक गा ॥
तवपदसेवकिं सेवक अर्भक बाप तुला ह्मणि वाळ भि गा ॥
भव तरता तरतां तरवे नच हा कवणा रितिनें मतिनें ॥
नच परपार अपार समोघ जमाव पुराणकथानितिनें ॥ ॥ १३ ॥
विधि हरि शंकर संभव ऐक्य तुं संसृति कारण गूण रुपें ॥
निज जननीं गति निर्गुण निर्भय संभव चेष्टित आत्मरुपें ॥

जगनग चंचल गूण कृतोद्भव आत्मसमागम पंचभुतीं ॥
गुणकृत चेष्टित शक्तिहि जाणिव आकळितां इसि नाच गती ॥ १४ ॥
बहु ठकले हटयोगि जटाधर योगि अघोरिंहि शोधभ्रमें ॥
परि अनुमान समान न होत न शांतपणांत सवाद गमे ॥
किमपिहिं मीपण नाच सुटे घण सिद्धपणा मनिं वागतसे ॥
सुखकर हा हरि ना करि गा अरि कामचि या घरिं पूर्ण वसे ॥ १५ ॥
फणि सदनांतरिं वागत देखुनि रात्रित झोंप नये मग ती ॥
चडफडती गति काळ भयें मग चंचलता बहु ना स्थिरती ॥
घर मग सोडुनि देई ततक्षणिं सेज करी दुजिया घरिं ती ॥
तदनुरुपाकृति काम जि संभव जाग्रत तोंवरि नाहिं धृती ॥ १६ ॥
भजन न जाणत पूजन नाहिंच साधन जोडित ना घुसलों ॥
सहज समागम देहचि जाणुनि ना स्थिर यास्तव गा रुसलों ॥
तवपदभागिंहि जाग्रति ठेवुनि मानसिं नेणिव भासवितो ॥
समसुख वांच्छित मानस यास्तव गीत रुपें तुज जाणवतो ॥ १७ ॥
नरतनु शाश्वत नांहिंहि जाणुनि अर्ज असे तुजपासिं हरी ॥
हकिगत सर्वहि घेइजि ऐकुनि तोष रमापति याउपरी ॥
चरणरजोद्भवसंभविचा कण मस्तकिं स्पर्शवि गा निगुती ॥
पुनित करा अघिता शुचि वास मनामधिं द्या मजलागिं हितीं ॥ १८ ॥
बहु कविनें गतकाळ दिनें दिधले मतिनें कविते मधले ॥
हरिगुणगायक जे तरले ह्मणुनी लिहुनी जनिं दाखविले ॥
शुकसनकादिक नारद तुंबर अंबरिषेश्वर हे बहिले ॥
सनकसनंदन वाल्मिक शौनिक व्यास पराशर दाखविले ॥ १९ ॥
कलिमधिं शोभत संतवसंत भले पदिं जे जडले टिकले ॥
सदपद सेवुनि शांतकुलोद्भव संसृतिपासुनि जे सुटले ॥
शिरिं जडिले टिकले जडिते मुकुटावरिं कोंदणि जे निळसें ॥
अनुभवखाणिस खाणुनि अर्थ विवेकिं सबोध सुसंत असे ॥ २० ॥
तव भजनीं महिमा महिला सुनितीकरसा मजला दिसला ॥
ह्मणुनि मना अजिं ध्यास बहू पदिं प्रेमपुरस्कर हा जडला ॥

मम हरि लाज तुला असणे गरिबावरती सदयाउदिता ॥
मिळवि सुखाब्धिस त्या लवणा जळसे समते विरते जडता ॥ २१ ॥
मयुर तृषार्थ समान मनामधिं पामर हा तव पादजला ॥
सदघन तूं अजि बोल बरा हरि वाट मि पाहतसे बसला ॥
अजि करुणाकर सागर सत्य तुं मीन मि गा जलसंभविचा ॥
लहरिसमागमिं फेंकु नको मज प्राणचि संभव हा जलचा ॥ २२ ॥
मुल जननीकडियेवरचे सुटलें जतरेमधिं ते मगते ॥
अरभक चंचल रोदन मांडित मार्ग न सूचत त्या मतितें ॥
चहुं दिशी दृष्टि विलोकित तें जननीस जसें अपुलें वहिलें ॥
तदनुरुपें मजला मतितें दिसतें सदया वदतों रुचलें ॥ २३ ॥
अरिदमना भवनाशन कारण अंबुधि या पदिचे तुझिया ॥
सुख सम शांत सबोध बरा जगती मधिं वाटत गा सदया ॥
दिनाहिन जे जन आठविती तुज त्यावरि गा तुझि पूर्ण दया ॥
किति सदया स्मरुं मी दमलों अजि गा असुं दे तुजलागिं दया ॥२४॥
जगनगसूत्रकळा सकला तिनलोक समान जमाव गति ॥
मतिरुप त्या गति देउनिया जागिं खेळविसी जड स्थूळमती ॥
सम सकळांमधिं जाणिव जाग्रति गूण तुझा रज हा मुळचा ॥
अरिभयसंभव याजसि वेढित चंदनकाननिं तो फणिसा ॥ ॥ २५ ॥
नरहरि केशव माधव यादव अच्युत वामन शाम हरे ॥
उरगवहान पयांबुधिवासक गोपिपयोधर गोपति रे ॥
सुखकर संगति सज्जनमानसहंस मुरारि रमापति गा ॥
अभय तुझा कर पामरि या धर शांति मनामधिं या भर गा ॥ २६ ॥
मदुसुदना तुजवांचुनिया मजला जगिं गा नच कोण बरें ॥
झडकरि धांव स्वभाविक मायसि संकट नीरसि आजि बरें ॥
कमलसुलोचन हा स्मित आनन भाल विशाल सुशामल तें ॥
मजप्रति दाखिव मानसतोषक स्वानुभवामृत गा पुरतें ॥ २७ ॥
तनु ठकली विटली उठली तुटली घडि ही अजि आगमिची ॥
निजगति लक्षण लक्षित मुद्रित आत्मचराचर ऐक्य तुंची ॥

प्रिति न रुची जगतीं दुसरी तनुची असुची जडली पदिं तीं ॥
मम मन भावस्वभाव तुं जाणसि काय वदूं अजि गा पुढती ॥ २८ ॥
पदिं शमतां ममता हितसें मजला गमतें सदया बरवें ॥
नच दुसरें समते समती रिति या जगतीं बहुतीं परवें ॥
जपतप साधन सर्वहि यास्तव योगि मुनीवर हे महिला ॥
बहु ठकती परि पार नसे हरि कोणच जाणत ना वहिला ॥ २९ ॥
अभिमति नाडुनि ढोंग जगाकृति सत्यमती विरळा विरळी ॥
स्वमदशमार्थ जमाव सुसंत नभांत अमोघ सदास वळी ॥
मति कवळी विरली स्थुळ ही दिठि गा मग शांतचि आभरली ॥
हरिरासें भीनत पूढति जाग्रति संसृति सर्वहि नासियली ॥ ३० ॥
सुजनसमागम रोज असो हरि कूजनसंगति दूर करी ॥
गितरवभाषण प्रेमळ आमळ कानिं पडो मज अंतवरी ॥
मलिनमती जड ही झडवी दडवी मजला पदिं गा निजिचा ॥
अरिभयनाशक ठाव बरा मज हाचि गमें भविं या मुळचा ॥ ३१ ॥
इति करुणा अरुणा सगुणाकृतिनें दिधलें मतिनें गायियली ॥
तंळतंळती मति ही ह्मणुनी कविता वदनीं जडली वहिली ॥
घुडालि भली रसना तुझिया गितिं गा प्रिति दे मज या पुढतीं ॥
अनिति अनंति न ती रुचती ह्मणुनी वदनीं वदती सुगती ॥ ३२ ॥

॥ इति श्रीमदनंतसूरिविरचिता करुणाबत्तिसी समाप्ता ॥ हरिः शरणं ॥

## ॥ मानसपूजा ॥

( वसंततिलका.)

पीता जगा जगतिचा जगअंतरारें ॥
तूझी लिला न वदवें दिनवत्सलारे ॥
कांता तुझी उदधिजा पदभागिं दासी ॥
कैसा पुजूं तुज मिं गा न सुचे मनासी ॥ १ ॥

आहे दिनांमाधिं जमा धनहीन देवा ॥
वीधी कसा सम घडे मज वासुदेवा ॥
देवा तुझ्या भजनिं गा विधि हात जोडी ॥
तेथें नरा तुज रुपीं धन केविं जोडी ॥ २ ॥

नाहीं मला समजुती तव तंत्रमंत्रीं ॥
नाहीं गती अवगमे षडकोण यंत्रीं ॥
भावा भरी दिनपणें मनमानमाने ॥
सेवा रुचे मज असी समभागतानें ॥ ३ ॥

## ॥ आसनविधि ॥

( स्रग्धरा. )

विष्णूपत्नी भुदेवी अजिंच मम मनीं आसनीं साह्य व्हावें ॥
भूतें जीं कां पुजेला समकुळ नसतीं येथुनी दूर व्हावें ॥
शांती व्हावी मनाला मिपणमतिचि ही कल्पना नास माते ॥
आद्यें तूवां अनादी स्थूळ निजजनिते इच्छिलें सिद्धि ने तें ॥ १ ॥ ४ ॥

## ॥ शिखाबंधन ॥

देवी तूं ऊर्ध्वमूले जगनगसुरुपे पाळके वीरुपाक्षे ॥
आहारार्थे तुला गे प्रितिकर जननी मांसशोणीतभक्षे ॥
तुष्टे देवी शिखाबांधि सदगति सुदी शुद्ध ही बुद्धि देई ॥
देतों ग्रंथी तुलाही विरगुठिंसमते दुष्टनाशार्थ येई ॥ १ ॥ ५ ॥

## ॥ भस्मोद्धारण ॥

( शार्दूल. )

त्रैलोकीं त्रिगुणें तुवां वससि गे प्रीये शिवाचे गडे ॥
वीभूतीरुप संभवे तनुसुते नासी अघें औघडें ॥
ललाटीं शिरिं कंठिं सर्व तनुला लावूं अजीं सौभरीं ॥
हारावी मति दुष्ट ही जडरुपी शांती सुखा आभरी ॥ १ ॥ ६ ॥

## ॥ मानसबोध ॥

आतां सावध मानसा स्मर तुवां विश्वंभरा केशवा ॥
ज्याच्या ध्यानिं रमोनियां मुनिजनीं संतुष्ट केलें जिवा ॥
दीनाचा कनवाळु जो सद हरी ध्यानीं अजीं सांवरी ॥
देई तो तुजला भली गति जगीं कामादिकां संहरी ॥ १ ॥ ७ ॥

## ॥ तीर्थध्यान ॥

( वसंततिलका. )

स्थापीयला घट बरा निजहेमकांती ॥
सिंधू कुशीं वसति ते मुख विष्णुज्योती ॥
कंठे हरा स्मरुनियां मुळ ब्रह्मवासा ॥
मध्यें दिसे गग सखा नमिला सुवासा ॥ १ ॥
भागीरथी शरगु गे यमुने सुगोदे ॥
भीमे प्रभे तुं प्रवरे निजहीतबोधे ॥
कृष्णे गडे घटप्रभे मळनाशनार्थें ॥
यावें अजीं सकळही हरिपूजनार्थें ॥ २ ॥ ९ ॥

## ॥ ध्यान ॥

द्वंद्वांतका गुणहिता निजसूखधामा ॥
शामा रमा पदिं रमे समवृत्तिकामा ॥
शांतीसुखास्तव तुझी सगुणाकृती ही ॥
नांदे जगीं गुणरुपें हरि आपदा ही ॥ १ ॥
गोविंद माधव हरी मदुसूदनारे ॥
दामोदरा नरहरी नरपाळका रे ॥
कृष्णा मुकुंद घननीळ सुआनना रे ॥
हारी अरी मद्गजा करुगाकरा रे ॥ २ ॥
कीरीट कुंडल धरी वनमाळ कंठीं ॥
कौस्तूभमंडितमणी निजतेज भेटी ॥
सायूध मान करतें चहुंवेदखाणीं ॥
वेदांतसिद्ध मतिते निगमावखाणी ॥ ३ ॥
पाणी गदाधृत अरीमदकंदनाशा ॥
अंबूज शंखवरदा सदचक्रवासा ॥
पीतांबरा धर कटीं लघु घंटिकांची ॥
पंक्ती वळी अमनतें सदमौक्तिकांची ॥ ४ ॥

भेटे अजि मम मना झड झेंप घाली ॥
भावा भरोनि रमणें निजहीतझोळी ॥
दीनाहुनी दिन मिं गा दिनदातयारे ॥
देई मला तवपदीं सुखशांतवारें ॥ ५ ॥ १४ ॥

## ॥ पूर्वासन ॥

( विबुधप्रिया. )

मांडिला गुण आगमीं चवरंग हा चवकोनिचा ॥
रेखिले रविसोमते षडद्वादशी कळ दीप्तिचा ॥
भावनें करुनी मनें सगुणोक्तिनें वरि बसला ॥
रक्षिता निजसेवकां मति बाळकें मनिं रेखिला ॥ १ ॥
कूळ तूं गुरु रूप तूं निजहेत तूं मनमोहना ॥
मोहनाकृति शोधना हितबोधना पयदोहना ॥
तेजसा हृदमानसा सदकोमळा असुवाहना ॥
पाहि मां दिनवत्सला निधिवासका सुख दे मनां ॥ २ ॥ १६ ॥

## ॥ पाद्य ॥

( कामदा. )

शांति जान्हवी नर्मदा शुची ॥ वृद्धगौतमी त्र्यंबकी भुची ॥
कृष्णि चंचला ताम्रपर्णि ही ॥ बोध आत्मनीं सज्जनीं मही ॥ १ ॥
दृश्य हेम हे कुंभ साजिले ॥ ऐक्यते जळीं पूर्ण सांचले ॥
सच्चिदापदीं सर्व ओतिले ॥ शांतिकारणें अर्थ गोंविले ॥ २ ॥ १८ ॥

## ॥ अर्घ्य. ॥

( शार्दूलविक्रीडित. )

तीर्थें सर्वहि साम्यते मिळुनियां उष्णोदकें संचलीं ॥
पाणीमाजिं सुबोध अर्घ्य वदनें भावोनियां ओतिलीं ॥
स्वामीनें कर धूतले मळिनसे मोहाब्धि ज्याचें कुशीं ॥
आनंदें कर पूसिले निळपटें हास्मीत पाहे मसी ॥ १ ॥
खंडे चंदन पक्षरी परिमळी मैलागिरी सात्विकी ॥
कृष्णागीर अहंमती उगळुनी सोहंमती सूक्तिकीं ॥
पुष्पेंगंधसुअक्षता सकळही ऐक्यान्वयाच्या विधीं ॥
सिध्दीबुद्धि समागमें विधिकरें घेई प्रितीचे सुधी ॥ २ ॥ २० ॥

## ॥ आचम्य. ॥

( मालिनी. )

नवविधिजडिताची आणिली पंचपात्री ॥
विधिकृत पळि साची ओतिली हेमयंत्रीं ॥
करिं करपुटिं तेव्हां सिद्ध गोकर्ण मानें ॥
सुखकर हरि घेता अर्घ्य हें आचमानें ॥ १ ॥

## ॥ मधुपर्क. ॥

भरुनि कनकवाटी शर्करें गोरसानें ॥
दधिदुधमधभारें सुघृतें साध्यमानें ॥
विनवणि बहु केली मानिली स्वामिनीनें ॥
दिनजनकनवाळूं तोषला भक्तिमानें ॥ १ ॥ २२ ॥

## ॥ पंचामृतस्नान. ॥

( वसंततिलका. )

प्रार्थोनियां बसविले मग स्नानयोगा ॥
पंचामृतें दधिदुधादिक सर्व भोगा ॥
पर्वापरीसरि नद्या सकळीक आल्या ॥
शांतीजलें करुनियां समते मिळाल्या ॥ १ ॥
न्हाणीत पाणि मधुपर्क समोघयोगें ॥
योगांत योग कपिला अजि षष्ठि ओघें ॥
पर्वामधीं मिसळलें मन शुद्ध केलें ॥
संतोषयुक्त मतिनें मज धन्य केलें ॥ २ ॥ २४ ॥

## ॥ अभिषेक ॥

वैडूर्यमाणिक निळ मुक्त सुपुष्कराजा ॥
रत्नादिकी नवखणी असुरी भुभूजा ॥
आणीयले अभिषका मग प्रार्थुनीयां ॥
केली दया मजवरी तम झाडि काया ॥ १ ॥

केला अभीषक तदां नखशीखमानें ॥
मानें दिसे सगुण तें निगमार्थ पानें ॥
ज्याला दया बहु असे निज सेवकांची ॥
पूजा करीं अभिषकें अजि मीं तयाची ॥ २ ॥ २६ ॥

## ॥ स्वच्छीकरण. ॥

( कामदा. )

वस्त्र आणिलें अंग पूसण्या ॥ मोलमाप ना श्रेष्ठ देखण्या ॥
वास रेशमी भास भक्तिचा ॥ हे मृदू बहू तंतु निष्ठिचा ॥ १ ॥
पूसिलें करें मस्तकीं अर्धी ॥ अंग त्यावरीं ऐक्यते विधी ॥
हस्त देउनी भाव भक्तिचा ॥ श्रेष्ठ ऊठवूं पंथि युक्तिचा ॥ २ ॥ २८ ॥

## ॥ वस्त्रधारणा. ॥

कटतटीं बरा उंच रंगिचा ॥ अरुण कांतिचे तेज दीप्तिचा ॥
सुपट पविळा देव नेसले ॥ मम मनामधीं सूख सांचलें ॥ १ ॥

## ॥ उपवस्त्र. ॥

जरिचि उत्तरी शाल जोडिहि ॥ बुटविधी नवी सुक्षमी सुही ॥
जाडित जोडणी स्कांधि जोडिली ॥ सुख करा उरीं दिव्य शोभली ॥ १ ॥

## ॥ यज्ञोपवित. ॥

निजमुसीमधीं हेम ताविलें ॥ दिठिंत सूक्षमीं अर्थ गुंतले ॥
त्रिवळि तंतुचें ऐक्य ग्रंथिनें ॥ सुगमजानवें ओपिलें मनें ॥ १ ॥ ३१ ॥

## ॥ अलंकाराचा मंत्र ॥

( वसंततिलका. )

वेदांत सांख्य मति कुंडलिं भव्य दीप्ती ॥
भानूशशीहुनि बरी सम आत्मज्योती ॥
वैराग्यज्ञान उभयाकृति ऐक्य सूक्ती ॥
मुक्तें बळें उपजलीं नवबोध युक्तीं ॥ १ ॥

तूरा करोनि वरवा शिरपेंच झेला ॥
माणीक पांच निळ जोडगी कोंदणाला ॥
हीरे जडीत मुकुटावरि जोडियेले ॥
ज्ञानामृता पिउनियां पुनितेव झाळे ॥ २ ॥
कंठीं सरी घडविली निज खाणिमाजीं ॥
माळा गळां सजविली अनुभूतकाजीं ॥
मुद्रांकिती सद मती दश अंगुळी तीं ॥
श्रीदायळी मणकटीं चिद्‌कंकणें तीं ॥ ३ ॥
वैराग्यपेठिं घडली बरि मेखला हो ॥
संधी मनाचि सुख शांति समोघ ते हो ॥
स्वानूभुतें नियकरीं नग ठायिं ठायीं ॥
जोडियलें प्रिति मनें श्रम तोषवाई ॥ ४ ॥
आनंदला मग वरी मज दोठिं पाहे ॥
प्रेमास मानस मिळे तधिं हेत धाले ॥
केली कृपा मजवरी अरि दूर केले ॥ ६ ॥ ३६ ॥

## ॥ प्रतिष्ठासन. ॥

सिंहासनीं जडियले मणि अस्ति भाती ॥
साजे प्रभावळिवरी घड त्यास मोतीं ॥
छत्रें निशाण विंजणें बरिं सूर्यपानें ॥
अब्दागिरें सकिरणीं जडलीं मनानें ॥ १ ॥
स्वामीस हातिं धरुनी वरि बैसविलें ॥
पद्मासनें बसति ते समध्यान तोलें ॥
पाहोनियां हरि प्रभा स्थुळभूक धाली ॥
केली कृपा मजवरी द्विमती निमाली ॥ २ ॥ ३८ ॥

## ॥ चंदनविधी. ॥

( शार्दूलविक्रीडित. )

केलें बारिक वाटुनी सुरभिचें स्त्रासीक तें केशर ॥
रेखीलें बरवें करोनि सखया ते सांकळी सुंदर ॥

कस्तूरी रगडोनियां ऊटि दिली टीळा वरी चंदनि ॥
मैलागीर सुलाल चंदन तसा पन्नीर श्रेष्ठी धनी ॥ १ ॥

## ॥ पुष्पाक्षता. ॥

जाई मोगरि सेवती बकुल ती जूई अणी मालती ॥
चंपे तेगर कांचनी कणरिणी नाना तरा शोभती ॥
केळे हारतुरे बरे तुळसि त्या माजीं बऱ्या गोंविल्या ॥
साम्याच्या नव अक्षता सकळही कुंकूमयोगें भल्या ॥ १ ॥
नाथाला पुजिलें भलें निरखिलें संतोष झाला मना ॥
गेली सोडुनि वासना मम मनापासोनि आजीं वना ॥
शांती आलि मनामधीं प्रित जडे पायीं हरीच्या बरी
संसारांतुनि सोडवी हरि खरा साक्षी अजीं आभरी ॥ २ ॥४१॥

## ॥ धूप. ॥

( वसंततिलका. )

गुग्गूळऊद्धूप साज दशांगुलीं हो ॥
उद्बत्ति ऊद बरवाच जनार्दनीं हो ॥
स्वामीपुढें नवविधी रितियोगमार्नें ॥
लावीयला धुपाणिला सदपद्धतीनें ॥ १ ॥
सूगंधकार हरिची तनुही अमोघी ॥
वोघीं सबोध चुर चंदन अग्निओघीं ॥
स्वानंदयोग भरला धुपस्वास तेथें ॥
संतोषमान बरवें अजि देव येथें ॥ २ ॥

## ॥ दीप. ॥

जोडीव जोड जडिती समया बहू त्या ॥
निरांजनें कुरवड्या नव वाति हो त्या ॥
सत्वेंच शुभ्र मुळच्या घृतयोगमानें ॥
दीपीं प्रभा बहु जडे निजआत्मज्ञानें ॥ १ ॥

कापूरमेणबतिफानसचंद्रज्योती ॥
ज्योती बऱ्या नवविधी निजतेजवाती ॥
आनंद आज मतिला बहु देत देवो ॥
भावावरी प्रित खरी नवलावळेवो ॥ २ ॥ ४९ ॥

## ॥ नैवेद्य. ॥

ताटें जडीत बरवीं सद्प्रेमयोगें ॥
रत्नें जडाव जडणी नववीधभागें ॥
वाट्या भरोनि षडरसें समिपानुभागीं ॥
ठेवीयल्या अनुभवें स्वपणानुभागीं ॥ १ ॥

शाखा बहू क्षिरवडेपुरिफेणिया त्या ॥
सीरा बरा घट असे कण मोकळा त्या ॥
स्वादिष्ट आमटि बरी कढि सांडगे ही ॥
मूदी सफेत बरव्या नृप भात तोही ॥ २ ॥
केल्या घड्या चवघड्या बरव्याच पोळ्या ॥
आपूप लाडु घिवरादिक सर्व पोळ्या ॥
कोशिंबिरीं मिठ मिरीं बहु रायतीं तीं ॥
मंत्री वरान्न वरि असे शिखरीच भातीं ॥ ३ ॥

स्वामी पुढें प्रितिकरें मन हेतमानें ॥
ठेवीयलें अनुभवें नववीध ध्यानें ॥
प्रार्थीयलें दिनपणें मग वासुदेवा ॥
आली दया सदयता मुळचीच देवा ॥ ४ ॥

हातें निजीं करुनियां मुखिं ग्रास दीले ॥
जेवीयले स्वसुखिं हो पुनिताव झाले ॥
संतोष आज मजला बहु थोर झाला ॥
हा लाभ लाभत अजीं अनुमोद भेला ॥ ५ ॥ ५० ॥

## ॥ हस्तप्रक्षाळण. ॥

(शार्दुलविक्रीडित.)

तृप्तीला करणार जो जग तिला तो भाव योगें हरी ॥
जेवीला मम हस्तकें कवतुकें आनंद झाला उरीं ॥
स्वामीचे कर धूतले मुखहि तें उष्णोदकें स्वासिकें ॥
पाणी पूसुनि पालवीं कर चिरें आणीयलें कौतुक ॥ १ ॥
शांतीच्या सुख आसनीं बसविलें स्वामी बरे बैसले ॥
तेव्हां मीं कर जोडुनी नमियलें वाटे बहू चांगलें ॥
माझी प्रीत बहू हरी करितसे शांती करी मानसां ॥
झालें सूख बहू मनां अजि खरें सांडीन या सौरसां ॥ २ ॥

## ॥ तांबूल. ॥

पानें चांगलिं नागवेलिं वरि तो लावोनियां हो चुना ॥
सूपारी करपुर घोळित बरी कंकोळ वेळा मना ॥
खैरी कांत लवंग जायफळ पत्री वर्ख सोनेरि तो ॥
वीडा देत हरीकरीं मम करीं घेती बरा मान तो ॥ १ ॥
केली आरति कूरवंडि बरवी नीरांजनीं कर्पुरीं ॥
दीली ती मग दक्षणा निजहर्षे सोनें हिरे आभरीं ॥
प्रार्थिलें अधिकोत्तरें क्षम असो माझी पुजा श्रीहरी ॥
मानोनीच अनंत हा अजि दिनीं सप्रेमता आभरी ॥ २ ॥ ५४ ॥

॥ इति मानसपूजा समाप्ता. ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 60663 दि: 9/1/24
क्रमांक 2702 नों. दि. 8/2/42

# अथ नवविध गोपी.

## नवविध भक्ति.

१ श्रवणं २ कीर्तनं ३ विष्णोः स्मरणं ४ पादसेवनं ॥
५ अर्चनं ६ वंदनं ७ दास्यं ८ सख्यं ९ आत्मनिवेदनं ॥ इति

## भक्त्यनुक्रम

१ अर्चनं २ दास्यं ३ स्मरणं ४ पादसेवनं ॥
५ वंदनं ६ श्रवणं ७ कीर्तनं ८ सख्यं ९ आत्मनिवेदनं ॥

॥ इति नवविधी अभ्यासपद्धति ॥

ॐ नमः परमहंसास्वादितचरणकमलचिन्मकरंदाय भक्तजनमानस निवासाय श्रीरामचंद्राय नमः ॥

( शिखरिणी. )

गुणा ईशा देवा गणपति मला फार मति दे ॥
भवार्ते नाशाया कलिमल हरी बुद्धि बरि दे ॥
ति दे गा तूं विद्या जि उचित मना मोहन करी ॥
करी शांतीं चित्ता गुण गितिं मती घोळवि बरीं ॥ १ ॥
वदायां गूणातें मूळ रवि परें तूंचि असती ॥
भले साक्षी देती भुवनिं कवि ते वाल्मिक ऋषी ॥
जयाचे लीलेचा उघड महिमा राघवगुणां ॥
गुणांच्या छंदाला करित शत तीं कोटि गणना ॥ २ ॥
दयाळां दे थारा तव पदिं बरा सारकथनीं ॥
विवेकाची बाजू अनुभव घरां बोधमथनीं ॥
दया शांती चित्ता सतत वसवी काम मिटवा ॥
तुझ्या या सोंडीनें निजपय सदा तूप उडवा ॥ ३ ॥
गुरूनाथा एका मजवर करा पाखर दिठी ॥
फिटो आशा तृष्णा वदवि भजना अंतरिं उठी ॥
दयाळा दे आजी सुनिति सुफला ही नवविधी ॥
विधी ज्याला गातो सदपदकथा सागर निधि ॥ ४ ॥

निधी शेषा भागीं शयन पयधीमाजिं करि जो ॥
रिजों चित्तीं माझ्या रव वदविगा अंतर रिजों ॥
कथेलागीं कान्हा रिजवि मननां रंग भर गा ॥
निजाच्या हो हातें सुरस गित तें तूं भरिव गा ॥ ५ ॥

( मालिनी. )

नमन करुनि एका नाथ पायीं कथेला ॥
मतिनरुप पसारा गोपती गोपबाला ॥
वदानें रवसुधा ही बाळलीला मिषानें ॥
पसरिन जग कानीं घेऊं दे तें सुखानें ॥ १ ॥
वद तुं वदनीं जिव्हे वेळ कांगे करीसी ॥
सटसट तुष झाडी शारदे ब्रह्मवासी ॥
नमुनि सति पुढें हो या हरी शामरंगा ॥
मतिधृतिगुण ऊठे तोचि बोलू सुरंगा ॥ २ ॥
शिशुपणिं सगुणी हा नंदगेहां वसे हो ॥
व्रजजनसमुदायीं वाढतो कौतुकें हो ॥
सुजननगरि ही गा गोकुळी गौळियांची ॥
मुळपाणीं रस ओतां बोधळीला हितीची ॥ ३ ॥
सुपथनिति बरा हा नंदराजा पुरी हो ॥
सुनिति रुचिकरी ती राणि नंदा सती हो ॥
अनुदिनि अनुतापी पुत्र झाला विचारी ॥
मदुसुदनरसाचा सांवळा हीतकारी ॥ ४ ॥
तव वय गत साठीं नंदजीला असे ती ॥
निगम उपजला गे बोध हा जारनीतीं ॥
श्रुतिसम निति नारी फार त्या चाळवीती ॥
मथन कालिनिषानें लाविती चेतना ती ॥ ५ ॥
अवसर दिन होतां काळ सूकाळकाळीं ॥
उदय समय बोधा आरसा हा सकाळीं ॥

मुळ समिप बसोनी रीजवी माय ते हो ॥
तदि तिन वरुषांचा कानु हा बोबडा हो ॥ ६ ॥
मनसिंदळ घरतीचा तो चोर पोरांमधीं हो ॥
विदिंगळिं फिरतो गे गोरसा नागवा हो ॥
तळतळति तमासे पाहुनी गौळणी त्या ॥
झगमग गडणीया सांगु येती कळी त्या ॥ ७ ॥
जननिजवाळि होता पारखी चारि वाटां ॥
स्थिरनच घडि येका सांवळा धीट मोठा ॥
तव नाजिक थवा तो पोंचला येउनीयां ॥
उगिच बसत माते त्यांस हो पाहुनीयां ॥ ८ ॥
मनिं गडबडला गे नाहिं हा सारसाक्षी ॥
परजनरितिरूपें देखणा सर्वसाक्षी ॥
सुजन निति हिची गा काळमानाप्रमाणें ॥
वसति जनरितीतें शांतिचे बोधराणे ॥ ९ ॥
चपळहि तळपे हो मालिनी वृत्तरूपें ॥
बिजळिच जणुं भासे अंतरीं शब्दरूपें ॥
सदयघन अनंताचे रमायास येते ॥
पुढति भ्रमरि विलासें रवां आयका ते ॥ १० ॥ १५ ॥

( भ्रमरविलसित. )

गोपी दाटी मिनलि निकटि ते ॥ देखूनीया हरि सति बघिते ॥
डोळे झांकी मग उगिं बसला ॥ हातीं मीठी निजदिठि कमळां ॥ १ ॥
दृष्टी ती चंचळ बघि वरतां ॥ वेष्टी कज्जळ जळजसरीता ॥
भाळीं शोभे कुरळ निळ टिळा ॥ शांमा बाळा तूं नव घननिळा ॥ २ ॥
दादा याचा उगिं घरिं बसतो ॥ ताता वाड्यामधिं निर्ति गुततो ॥
बोधा भागीं अनुभव दिसतो ॥ ३ ॥
टाळायाला भवभयमदना ॥ साधां आधीं तुम्हि मदुसुदना ॥
नंदाबाळा सुरमुनिवरदा ॥ भावासाठीं मुळपणसवदा ॥ ४ ॥
सानां गोपां भ्रमरसभ्रमकां ॥ बोला आतां मति शिखरिणिका ॥
रोपा टाका निजनिति सरका ॥ बोधा बांधा कटिं सुट नरकां ॥ ५॥२०॥

## ॥ अर्चनविधी ॥

( शिखरिणी. )

बहू या हो नारी सदनिं हरिच्या त्या मिळति गा ॥
कळीची ती साथी वदनिं वदनी ते सतिस गा ॥
असे राणी नंदा मुल हरि जिचा मोहन धरी ॥
तिला लक्षूनीयां म्हणति सति त्या मोह न धरी ॥ १ ॥
पुढें आली ती हो जिस मुल नसे हारिणगती ॥
गती जीची मोठी निपुण कुशळा शोधनरितीं ॥
बरी चौताळे हो घडित सुघडी बोलत कसी ॥
बरी धांवा घाली परी मनिं तयाला जडलिसी ॥ २ ॥
अगे माते तूझा कुमर उमरीं सान परि गे ॥
बहू खोडीवाला बुडवि कुळिला गोकुळि हि गे ॥ ३ ॥
अगे आला माझ्या गतदिनिं घरां हा मुल तुझा ॥
बघूं लागें दृष्टीं चलत पवना हा नट तुझा ॥
घरीं तेव्हां कोणी पति श्वशुर आणि दिरहि नसे ॥
उनाच्या तापानें घरिं लपुनियां गा तहिं बसे ॥ ४ ॥
नसे देहाभागीं हळुच लपुनी मागुनि बरा ॥
धरी नेत्रां माझ्यां दपटुनि करीं जोरहि बरा ॥
दिसे पोरावाणी परि सरि जि थोराहुनि भली ॥
भली केली होळी विटवि बहु हा घालुनि भुली ॥ ५ ॥
तदां माझ्या बाई मनिं बहु चिडी गे जडली ती ॥
उठें तेव्हां मीं गे धट तव तुझा काय पुढतीं ॥
करी चेष्टा भारी म्हणत मजला धांगडि तुं गे ॥
नसे तूझा तो गे पति सति बरा मीच वर गे ॥ ६ ॥
मला घाली माळा रिजविन तुला बोधनरितीं ॥
मुलें बाळें पूढें बहुत बरवीं होतिं सुनितीं ॥
रमे माझ्याठायीं जडित प्रितिनें अंतर धरी ॥
घरी आहें संधी नसति अजि बापे रिपु घरीं ॥ ७ ॥

कसा चाळा याला मुलपणिं रती बोलत मुखीं ॥
नसे देण्या साक्षी त्रिभुवनिं दुजी या समतुकीं ॥
बडा बाब्या नष्टा रचालें मडकीं फोडित करीं ॥
करीं होती कांठी बडवित पळे सोंगची हरी ॥ ८ ॥

जसा भावीकांच्या मनिं निजरती बोध उठतो ॥
निजध्यासा अंतीं घडत बरवा साक्षि निज तो ॥
पुढें बोधालागीं वरिति तनुभागीं अनुभवां ॥
भवातें टाळाया हरिगितीं निती साज बरवा ॥ ९ ॥

असी होती नारी कलिरव वदे सारमितिनें ॥
वदे छंदें नारी शिखरिणिरुपें गोडवदनें ॥
दुजी ऊठे तेव्हां मतिंतुनि बरी चामररिती ॥
अनंताला लुब्धे धरुन बसली जे ति पुढतीं ॥ १० ॥ २० ॥

## ॥ दास्यविधी ॥

( चामर. )

पाहुनी यदूमणी सखी दुजी मनीं जिच्या ॥
खोड गोड अंतरीं परी बरी धडा सुचा ॥
बोलते रसा मिळावया सखोल बांवरी ॥
सांवरूनि पाटवास ते नवा रसावरी ॥ १ ॥

भक्ति दूसरी नवांतुनी बहू पतीपदीं ॥
सेवना धनासमान मानिती रतीमधीं ॥
काळवेळ जाणती निगा बरी सरे पुढें ॥
बोलती ति नंदराणि पाहुनी बरें कुडें ॥ २ ॥

काय गे तुझ्या मुला जरा भिती नसे दिसे ॥
पोर तीन ते बरोबरीं हरी सिमा असे ॥
वाणसी मधीं पती बरोबरी सुखांमधीं ॥
येवढ्यामधीं रवी दुपारिं वास दे दधी ॥ ३ ॥

हात पुसले मुखावरी मळी बहू तनू ॥
हांसतो बहू मुलांमधीं तरा बरी तनू ॥
राहिला दरावजीं उभा तदां बघी घनू ॥ ४ ॥
धारणा घरामधीं बरी असे ळळे मुलां ॥
जातिभागिं प्रीत मोठि हा ग चोर देखिला ॥ ५ ॥
नंदनंदनासि फंद फार गे सदां वदे ॥
या रितीस बोलतो तया धन्यास कान दे ॥
भाविकी स्वभाव तो घरामधीं बराचि ना ॥
त्यास ऊठवी त्वरा म्हणे करा चला वना ॥ ६ ॥
पांच वाघ गाइपाठिं लागले असीं मुलें ॥
हांक मारिती निरामयीं तिसीं मिं गा भुलें ॥ ७ ॥
जात भोळि त्यामधीं खुळा स्वभाव जांतिते ॥
वंदना बरी मिं नामिका घरीं अगाध ते ॥
सांगतां जळों घरें सती तुमीं मला वरा ॥
सांडुनी रतीपणास या मळा रतीं धरा ॥ ८॥
गे वरासनीं धरा मनीं सबोध तो धणी ॥
या भवा तरावया वयामधीं मिं गे धणी ॥
धांकुटा नको मला म्हणूं बरा उरीं धरी ॥
सूख घे पतीहुनी निरामयीं नसे सरी ॥ ९ ॥
कां उगीं गमाविता भरां निजासनीं तरा
आसरा बरा तुला पटो मनीं जरा चुरा ॥
या रितीं वदे पुढें घरामधीं बरा सिरे ॥
गोरसां शिक्यावरी तळीं हरी उडे त्वरें ॥ १० ॥
फोडिलीं ग गाडगीं दुधामधीं दधी मिळे ॥
लोणि त्यांतुनी बरा हरी मुखीं त्वरें गिळे ॥
कालवी भुमीवरी पडे मुतेच त्यामधीं ॥
आयिके न गे मला खराबि थोर यामधीं ॥ ११ ॥
सात्विका मती पया निती विचार ते दधी ॥
शोधनीं रसांतुनी बरा नवा निती निधी ॥

द्वारवावया भवा तरा बरी दिसे हिची ॥
कानिं थ्या भरोनियां रिती दुजी नवी रुची ॥ १२ ॥
चामरा वदे निती बसे तदां वरी दुजी ॥
स्वागता उठे पुढां उभी परा भुमी रिजी ॥
आवडी अनंत साधनीं धणी हरी करी ॥
पाय साधनींच वंदनीं रिती हिगा बरी ॥ १३ ॥ ३० ॥ ४१ ॥

## ॥ स्मरणविधी. ॥

( स्वागता. )

बारितों वदनिं बोलुनि ती हो ॥ बैसली जवळि ते जननी हो ॥
दुसरी उठत घाबरि भारी ॥ चंचला नयनि गोरटि पोरी ॥ १ ॥
भाव तो पतिपदीं निजदासी ॥ तीसरी रिति नवांतुनि खासी ॥
बोलते रसिक साजुक खासे ॥ गांठिल्या मनिं बहु सुख भासे ॥ २ ॥
बाइ मीं घुसळितां दधि तें गे ॥ वासरें मन तुझा मुल हा गे ॥
सोडितो पळवि गे मग त्यासी ॥ पाठि लागुनि हरी दिनतासीं ॥ ३ ॥
येउनी मग घरीं मजला गे ॥ सांगतो सुटलिं हीं बचडीं गे ॥
बाहिरी मग मिं ते घडियेला ॥ पाहतें तव नसे ममतेला ॥ ४ ॥
सूटलें पळत मीं निजरानीं ॥ मागुनी हरि तुझा करि धूनी ॥
खाउनी नवनितासि घडा गे ॥ वासनारहित भाविकसा गे ॥ ५ ॥
येउनी मग बसे सदरेला ॥ तोंड पुसुनि बरा रसलीला ॥
घेउनी बचडि ती मग आई ॥ पातले घरिं ग मीं मुल गाई ॥ ६ ॥
तोंड मोडित उभा दरवाजीं ॥ नीत ना अजिं तुझ्या दरवाजीं ॥
बांधुनी घातिसुख्या मन तें गे ॥ पातलें निजघरीं रसभागें ॥ ७ ॥
पाहुनी नवनिता धुणि कांपें ॥ चित्त गे तधिं बहु रवितापें ॥
आंबलें करुं कसें म्हणुनीया ॥ लागलें तवं बघूं हरि गे या ॥ ८ ॥
पाहुनी मग मला दुर गेला ॥ जाउनी मग दुरीं स्थिर ठेला ॥
बोलतो दुरुनि हा मजला गे ॥ खादलें नच बरें दधिं मीं गे ॥ ९ ॥
बाळकें बहु घरीं तुझिया गे ॥ मागुनी तव तुझ्या शिरलीं गे ॥
खाउनी दधिदुधा पळतीं तीं ॥ सांगतो बरि धरी मज रीती ॥ १० ॥

सोडुनी घर तुं गे बहु दूरी ॥ काननीं फिरुं नको भवपूरीं ॥
आजपासुनि बसे निजगेहीं ॥ साधि तूं परम सोय मजा ही ॥ ११ ॥
वासना नवनितावरि सारा ॥ काढुनी नवनितांतुनि सारा ॥
चाळवी धृतिरवीमधिं सारा ॥ चालि गे निजरुपीं भवसारा ॥ १२ ॥
टाळि हा मद मनांतुनि सारा ॥ कामना धनि बरा मज सारा ॥
ओळखी धरि जुनी धडपूढीं ॥ कांग तूज बसलि हे हुडहूडी ॥ १३ ॥
चोर ते मजपुढें पळती गे ॥ काळंही झुरत तो भजना गे ॥ १४ ॥
माक्षिया भजनिं जे रिजले गे ॥ कामना दवडिली मनिची गे ॥
होउनी रत रवी समभागा ॥ साधिला निजहिता पद जागा ॥ १५ ॥
चालिती प्रथमतां मननीकें ॥ बोध ही रवि सुदोर विवेकें ॥
आत्मनी घटधृती दधिसारा ॥ चालिती अनुभवां बुध सारा ॥ १६ ॥
थोर, ते मजहुनी मित याला सोडुनी नच रिजे ममतेला ॥
भाविकी नति मला घर साजे ॥ तेथ मी वसतसे रित भाजे ॥ १७ ॥
मीळसी जरिं तुं गे समभागीं ॥ ऐसियांतचि भली मम भागीं ॥
यारितीं वदुनि तो चपळा गे ॥ फार तो पळतसे सगुणी गे ॥ १८ ॥
तूं तरी जुनि बरी दिसतेसी ॥ हा फिरे दिननिशीं घरघूसी ॥
लावि या भय तुं गे समजावी ॥ गोकुळी बुडविली मुळभावी ॥ १९ ॥
बोलुनी रिति असी स्वगता तो ॥ बैसली मग तदां भुवरी ती ॥
शुद्धकामनि उठे मनि तेव्हां ॥ हा अनंत भरला रस तेव्हां ॥ २० ॥ ६३ ॥

## ॥ पादसेवनविधी ॥

( शुद्धकामदा. )

वदत चाथि ते पादसेवना ॥ अहंपणापती जो पुरातना ॥
सलगि फार ती त्यासमागमें ॥ तरुण वास हा सारितां क्रमें ॥ १ ॥
नविच नौति ती प्राप्त जाहली ॥ भिति फिरावया वाट एकली ॥
नणंद धाकुटी धारणाधृती ॥ वय मुली परी बोलकी निती ॥ २ ॥
असत सोबती ऊजदारिं ती ॥ निजलि गे तदां ना मला भिती ॥
अवचिता तुझा सूत पातला ॥ हंसत आंत तो येत येकला ॥ ३ ॥

न्हवाति सासु ती तेधवां वरीं ॥ घरधणी वनां सांधे ते बरी ॥
पुसत पोरिला चोरटा तुझा ॥ दुजि ति कोण गे येकली निजा ॥ ४ ॥
नच ति बोलली एकद्दोन ही ॥ धरित तेधवा पोटिं गे सही ॥
मुलगि ते रडे ओरडे बहु ॥ उठत तेधवां धावरी वहू ॥ ५ ॥
बघुनियां मला चोर हा पळे ॥ वदन मोडुनी दावितो बळें ॥
त्वरित मागच्या दारिं पातला ॥ बडवि दार तें नाच तो भला ॥ ६ ॥
वदत तेथुनी दार काढिगे ॥ नच भिर्थे तुला हा उभा मिं गे ॥
तुज मि गोष्ट ती फार चांगली ॥ कधिंच ऐकिली नाहिं ती भली ॥ ७॥
बरवि गे मला रीत लागली ॥ खटपणा सुटे देवि पोंचली ।
नवस आईनें फार चांगला ॥ गुणहि तेधवां प्राप्त हो मला ॥ ८ ।
वदुनि यारिती दीनवाणिसा ॥ वसत तेधवां ओरडी घसा ॥
बघुनियां तया पातली दया ॥ कडिग काढुनी घेतला तया ॥ ९ ॥
बसत येउनी चंचलाकृती ॥ वरति खालती मान हालती ॥
मग तयास मी बोलली असें ॥ सुटत रे तुझें वाटतें पिसें ॥ १० ॥
वडिभरी उगीं तेथ हा बसे ॥ अवचितां पुढें वेड भूनसें ॥
घुमघुमी बहू शब्द अंतरीं ॥ तनु ति कांपवी काल गे घरीं ॥ ११ ॥
भय बहू मला वाटला तदां ॥ म्हणत देव मीं वास या पदां ॥
कुळिं मि तूमच्या फार दिनिचा ॥ वसत पिंपळीं ठाव मूळचा ॥ १२ ॥
मज कसा तुमीं सोडुनी दुजां ॥ भजतसां बहू देउनी पुजा ॥
भुक मला असे फार लागली ॥ बहुत काळ गे वाट पाहिली ॥ १३ ॥
मज तुं घालि गे खावया दही ॥ दूध तुझ्या असे काय तें गृहीं ॥
मज खरें तदां वाटलें मनीं ॥ भिउन आणली तेथ विझणीं ॥ १४ ॥
घटघटां पितो सांवळा तुझा ॥ वदत पूढतीं ऐक ती मजा ॥ १५ ॥
अजर आमरीं ठाव आमुतें ॥ षडरिपूपिसें नाहिं जेथ तें ॥
गुणरुपाविणें वास मीं करीं ॥ मरण जन्म ना माझिया घरीं ॥ १६ ॥
तिन्हिहि काळ ते कांपती सदां ॥ पद चराचरीं वास दुर्मदां ॥
बहुत पातकें माझिये निर्तीं ॥ नच तयांसि गे पूनरावृती ॥ १७ ॥
सुजन भाविका खूण बाणती ॥ पर मि गे परी जाण बांधिती ॥
चळवळा नसे ज्यास कामिनी ॥ तरति ते भवीं जे निका मनीं ॥ १८ ॥

रसरसीक ते पावले तिरां ॥ मननशील ते धारणा उरां ॥
मनमळींतुनी पार पोंचले ॥ मज सभोंवते ते गडी भले ॥ १९ ॥
भुल भवाचिही तूमच्या शिरीं ॥ अजुन काय ती सूट ना बरी ॥
धन मदास गे फार लुब्धता ॥ हित नये मनीं फार सांगतां ॥ २० ॥
मज बघा दिनींनीशितें मनीं ॥ घरधन्याहुनी मीं असे गुणी ॥
वर करी बरा सूख होउं दे ॥ रिजत वाक्य हें काय काम दे ॥ २१ ॥
निगम बोल हे गोड वाटती ॥ अनुभवी सदां पाठ घोकिती ॥
मद सरावया सार वोतिलें ॥ भिति भवीं जयां त्यांस हें भलें ॥ २२ ॥
निति असे जुनी फार दीनची ॥ सरि इच्या दुजी कोण ना रुची ॥
मिळ मला तुंगे टांकुनी मदा ॥ भिपण सोडुनी ये वरी पदां ॥ २३ ॥
वदत हें कुडें लागलें मला ॥ पळत तेथुनी नाहिं थारला ॥
ननंद पाठिसी लागली तदां ॥ फुकत कान हा हारवी मदा ॥ २४ ॥
मथुनि या रितीं पादसेवना ॥ रवरसामृतीं बोधिलें धना ॥
बसत शुद्ध ती कामदा पुढें ॥ उठत दूसरी ऐक ती पुढें ॥ २५ ॥
सखि उठे तदां पंचचामरी ॥ गित वदे उरीं रंगणीं बरी ॥
सुरस गोड तें सूखसाधना ॥ संव अनंत घे आपुल्या मना ॥२६॥ ८९॥

## ॥ वंदनविधी ॥

( पंचचामर. )

वदे पुढें तदां दुजी कळी हरी वरी मुखें ॥
मनीं बरा ळळा परी वरी क्रुरी जसें तिखें ॥
जिला बहू अहंपणा रितींत वंदना नवी ॥
विधींतुनी सखी बरी सरे पुढें रसीं सवी ॥ १ ॥
मि या पुरींत चांगली कुळामधीं बहू दिनीं ॥
खरेंपणा धरूनियां वसे गृहीं अशांतुनी ॥
पती हि गे न जाचितो सुसासुबाइ माझि ती ॥
कधीं अगे विणा न बोलली खरीच आइ ती ॥ २ ॥
दिरां सही करावया निजीं मती नसे जरा ॥
परी पती पुरे हिशोबि सार राखिता खरा ॥

नगांभुषांबरा बहू घरांमधीं सराप ते ॥
पती पिताकृती उणी चिकूपणा सरे न ते ॥ ३ ॥
असी घरांमधीं रिती पुरातनी वहीच ती ॥
तिताळि सांवरी गुणांमधीं उरीं शिरीं मिती ॥
निशींत मीं निजे पतीपुढें मला ति झोंप गे ॥
बरीच लागली न जाग्रती जरा निजीं सुगे ॥ ४ ॥
भरामधीं गुणाचिया भवांत मीं निजे खरी ॥
अहंपणापती निजे मधींच घोरती भरीं ॥
तशांत कोठुनी ग मूल ह्या निशीमधीं घरीं ॥
बरा त्वरा करूनियां शिरे घरांत भीतरीं ॥ ५ ॥
नकूळ घेउनी विचारतो समा वरी मिती ॥
आम्हांमधीं भराचिया निसेंत पांघरूणिती ॥
पटांमलीन मायिका तळीं हळूंच सोडुनी ॥
पराघरीं बसे तदां लपे गुणास सोडुनी ॥ ६ ॥
धृतीअनूभवामधीं विचार सीरतो जसा ॥
तसा अम्हांमधीं सिरे नकूळ तोचि सारसा ॥
बरा मला उरांमधीं डसे तदां उठे कसी ॥
पळावया त्वरा नसे पिसें जसें अगे तसी ॥ ७ ॥
भयामधीं मि वोरडें बहूत घाबरी रवां ॥
जसा अनूभवीं विषासमींच वीषयां भवां ॥
अनूतपें बहूत तापळें तदां पती उठे ॥
म्हणे मला भितीस तूं कशास गे उगीं धटे ॥ ८ ॥
मगे भिगे तयास तेधवां म्हणे मला डसे ॥
उरांमधीं भरा निजेचिया पती स्तना डसे ॥
असेल तें असो परी मला बहू दिसे भिती ॥
मनामधीं घनाहुनी बहू पुढें दुरी गती ॥ ९ ॥
तयांनि गे दिवा तदां निजासनीं अनूभवें ॥
प्रकाशळा घरांमधीं तदां नकूळ हा भवे ॥

विचारसा समे मनीं दिसे अनूभवावरी ॥
खुणे सिमा धनी वरी दिसे तधीं धिरां उरी ॥ १० ॥
मतीमधीं गती किना सरी मला बरी दिसे ॥
तयास गे भिं पाहुनी भिती उडे पुढें कसें ॥
बराच मुंगसा धिरा भरा तदां लपे तसें ॥
कुळीं सरी न दूसरी बरी उरीं हरी दिसे ॥ ११
कसा तुझ्या मुलां रळा गळा बसे तदां बरा ॥
कळा अजूनिया उरामधीं बहुत घे भरा ॥
कसा पुढें पुरीं तुझ्या ग काळ तो सरे तरी ॥
वदे तुं गे मला रितीं किं सोडु ही तुझी पुरी ॥ १२ ॥
अशा रितीं वदोनियां बसे तदां ति वंदना ॥
अनूभवी जनांमधीं पुरी तरा ठसे मना ॥
अशा रसाविणा हरी भरे नची मनी जरा ॥
चतूर हो धरां उरीं नवाविधींतुनीं चुरा ॥ १३ ॥
सदोदितीं भजा हरी भवांतरावया धणी ॥
धनावरी सदां मना तुझी जसी ति चोंकणी ॥
तयारितीं जरी जरा घडी तरीं गडी धरीं ॥
मनामधीं जरा तुटों गमावुं तूं नको पुरी ॥ १४ ॥
नरापुरी तरावया खरी असे रमे तया ॥
दया हरी तयावरी करी पुरी रमावया ॥
वदोनियां अशा रितीं बसे तधीं पुरीमधीं ॥
हि पंचचामरा तरा वदोनियां रसामधीं ॥ १५ ॥
उठे दुजी दरावजी उभी तदां वदे तरा ॥
असे जिलाचि नांव मालती बरें पुढें सरा ॥
अनंत मानसांमधीं बसे हिसे दरावरी ॥
भरा समागमें वया गमाविती खरी उरीं ॥ १६ ॥ १०५ ॥

## ॥ श्रवणविधी ॥

( मालती. )

बरि तधिं ती वदती दुजी खुजी ॥ रसरसिकांमधीं साधनास जी ॥
जिस पतिचा बहु गे लळा असे ॥ नवरस तें भरपूर जी असे ॥ १ ॥
श्रवणिं धरा श्रवणी हि सार वाणगी ॥ विधि पहिली नव सारवाणगी ॥
मनिं धरि तो तरतो भवांमधीं ॥ संव गंवसे मग बोध तो सुगी ॥ २ ॥
चपळ पळे भव सोडुनी मनीं ॥ मननशिलां धन सांपडे जनीं ॥
गित हरिचें बहु गोड हें खरें ॥ वदन मनां करि त्यासची खरें ॥ ३ ॥
श्रवणि वदे मग तेधवां कशी ॥ सुरस रवामृत गोड फारसी ॥
ह्मणत अगे सुख तूज हा कसा ॥ विटवित हा बहु गे मला कसा ॥ ४ ॥
नमित मि हो पतिला दिनापरी ॥ श्रवण रसां मनगे बहू तरीं ॥
मिपण पती मज हा खरा असे ॥ परि मज मानित तो सदां असे ॥ ५ ॥
रमत मला बहु बावळा तदां ॥ मजवर प्रीत असे बहू सदां ॥
वदत मि त्यारितिं चालती बरें ॥ मग मज सासु ति फार चांवरे ॥६॥
सदनिं सखा बहु तो रमे मला ॥ जसि ममता उरिं खात गो बळां ॥
घर त्यजि जो वनिं जाउनी बसे ॥ मनतमता प्रथमा सुटे नसे ॥ ७ ॥
तसि मज सासु खरी परी तिला ॥ नच बळ तें पतिचा लळा मला ॥
समरधिरासरि आसरी पती ॥ विरचि बरें धरिती खरी निती ॥ ८ ॥
भरदिनतो दिसतो दुतासि गे ॥ घुसळित तें दधि तेधवांचि गे ॥
पळत तुझा हरि तेधवां घरीं ॥ सिरत बहू चपळा सरी परी ॥ ९ ॥
म्हणत मला तुज वेड हें कसें ॥ घरिं बरि घूसळसी भिती नसे ॥
वन्हि वनिं लागत आजरोजिं गें ॥ जळतचि कानन फार वेळ गे ॥ १० ॥
पति तुज टांकुनि गे वनीं कसा ॥ कळत न तीं कसि गे गती असा ॥
निमति बहू जण ते तयामधीं ॥ उठ चल तूं भलि गे वयामधीं ॥११॥
बहुत मि घाबरि बावरी तदां ॥ भिति भरली तनुभागें गे तदां ॥
उठुनि घरांतुन बाहिरिं सरे ॥ तव सुख हा दधि खातसे बरें ॥ १२ ॥
नवनित खाउनि सारलें तधीं ॥ बरि चपळाइ करी हरी सुधी ॥
वदन पुसोनि बरा पळे पुढें ॥ मम घर टांकुनियां ग ऊघडें ॥ १३ ॥

कपटकडी नच घातली असे ॥ घर मग संसृतिला न तें असें ॥
समशिल राहति जे रितीं भवीं ॥ तिच गत भासत आज लाघवी ॥१४॥
पुढति मि गे घरिं जेधवा बघी ॥ रस मन भूवानिं ना असें उगी ॥
सरलि वयांतिल सार गे गती ॥ सरलि वयांतिल सार सांगती ॥ १५ ॥
सरलि वयांतिल सार ती गती ॥ सरलि वयांतिल आज ही भिती ॥ १६ ॥
वदानिं वदे असि ऐकणी सती ॥ समज मना भवनाशकी सती ॥
लिनपण भाविक भावनेमधीं ॥ रस भरतो धृतिशांतितें दधी ॥ १७ ॥
मतिपय सूनिति ती भवा हरी ॥ जसि पतितें सुशिला रमे बरी ॥
मद भव हारवि ही हरी कथा ॥ कथन सुधाहुनि गोड ही कथा ॥१८॥
मनन करी मन आजि तूं बरें ॥ समजनभागिं वसे सदां बरें ॥
गित सदपाद रमापती भरें ॥ वदाते तयास समाधि हीच रे ॥ १९ ॥
वदुनि सरी बरी ही सतीविधी ॥ श्रवणि सुजाणति हे बसे तधीं ॥
मिष नित मालतिछंद हा भला ॥ वदुनि बसे मग चंपका कला ॥२०॥
वदत ति सार कथामृता भली ॥ उपनिषधामृतवीचि फांवली ॥
सुख घरिं घेत अनंत पायिं त्या ॥ शयन धराधरिं ज्यास बाप त्या ॥२१॥

## ॥ कीर्तननिधी ॥

( चंपकमाला. )

बोलत तेव्हां फारचि जिव्हा ॥ आलि पुढें ती चंचळ रीती ॥
आइ ग खोटा हा मुल मोठा ॥ यांस तुं बाई ना भय कांहीं ॥ १ ॥
या भवनाशा दुःखविनाशा ॥ सारसुरेशा ठावहि शेषा ॥
गोकुळ भ्रष्टे कामिनि कष्टे ॥ गोरसिं तुष्टे ऊरत उष्टें ॥ २ ॥
बाळग काळा भीत न काळा ॥ फार खराबा काल बराबा ॥
येउनि गेहा माघारिं गे हा ॥ चावट मोठा नष्टचि खोटा ॥ ३ ॥
मीं मननीं गे तारमधीं गे ॥ पार सकाळीं वासरकाळीं ॥
गात गिताला भाव मथीला ॥ कोठुनि आला राहि अबोला ॥ ४ ॥
भीपण जें गे मापति तें गे ॥ नामि तयाला मानित याळा ॥
बोधपयाला धे वदनाला ॥ मानयनीं गे मारित तें गे ॥ ५ ॥

दोर सुटे तों हा दधि खातो ॥ मी नयनातें चाळित होतें ॥
सर्वहि खाई गोरस बाई ॥ लाज नसे गे कांतरि हें गे ॥ ६ ॥
बोलत कांथी हा मज बाई ॥ हें घर माझें काय ग तूझें ॥
सार मिं खाई स्थूळ तुं पाही ॥ गोकुळ सारें वृत्तित थारे ॥ ७ ॥
कोण तुं कैंची सांग कशाची ॥ आस फुकां कां गोडि तनूची ॥
मीं पर आहें तूं पर पाहें ॥ कांग फुकां हे संसृति थारे ॥ ८ ॥
ना मज तोटा मी ठक मोठा ॥ वारसनातें कोण ग मातें ॥
गूण सरसयां पाहुं मला यां ॥ स्थीरचराचा भार मिं साचा ॥ ९ ॥
आगमपक्षीं गोरस लक्षीं ॥ नीगमठायीं सूख समाई ॥
आजर मीं गे हो परती गे ॥ ना कळ बाधी हा कलि रोधीं ॥ १० ॥
हा भव सारा दृश्य नगारा ॥ काळचि याला नोबतवाला ।
नादचि लुब्धा या श्रुतिशब्दां ॥ नामरवांला सामचि माला ॥ ११ ॥
हावर गेहा तूं वर गे हा ॥ सोडि भवाला मी प्रतिपाळां ॥
माझि रमागे पाय चुरी गे ॥ बाळ मि काळा जन्म सुकाळां ॥ १२ ॥
चाळक चाळां आद्य मि काळां ॥ ना तिन ताळीं सार मि माळी ॥
कीर्तनिं तूं गे हें घर रीघें ॥ देइन ठावां तूज विसावां ॥ १३ ॥
या रितिं बोले काय ग झोले ॥ कोण तरा ही सांग ग आई ॥
चाळक ऐसा गोकुळिं कैसा ॥ बांध तुं याला ना करि काळां ॥ १४ ॥
या रितिं बोले सूक्षम गेले ॥ काय करूं गे मा मज सांगे ॥
बोलुन वैसे दूसरि कैसें ॥ सख्य सतीला ऐकु ति लीला ॥ १५ ॥
चंपकमाला शोक निमाला ॥ बोलि रथोद्धता मग शुद्धाला ॥
साररसा तें हीच मथी ते ॥ शोभति माथां ह्याचि अनंता ॥ १६ ॥

## ॥ सख्यविधि ॥

[ रथोद्धता. ]

बोलती मग पुढें सरोनियां ॥ मान हाल वि वरी रसीकया ॥
सख्य जे वदति त्यांसही सरी ॥ कान द्या मन कथेंत आसरी ॥ १७

ती ह्मणे पतिव्रता मि गे असे ॥ नाचतो मज जनीं कळी नसे ॥
नेम गे मम पती असा करी ॥ बांधितों मुल तुझा अशा परीं ॥ २ ॥
बैसले जपुनि गे पती घरीं ॥ नीजसेज करुनी तदां बरी ॥
संधि पाहत निपूण ते बरें ॥ गूण सारुनि पलीकडे झुरे ॥ ३ ॥
काळ गे गति तुझा मुलांमधीं ॥ खेळतां सदनिं येत त्यांमधीं ॥
दार तें उघडुनी हरी भला ॥ आंत येत हळुं चोर पाउलां ॥ ४ ॥
हात घालुनि शिक्यावरी बरा ॥ काढितो नवनितास बावरा ॥
येवढ्यामधिं बरें पती तया ॥ धांवुनी धरिति घट्ट गे तयां ॥ ५ ॥
बांधिला निजरसीं सुतास गे ॥ बोधधारण तयावरींच गे ॥
रोदनां बहु करी तदां भला ॥ सांवळा कळवळां ळळा गळां ॥ ६ ॥
पोर ते पळत चोर ज्या रितीं ॥ थोर ते वळखिती हि हो रितीं ॥
साधनावरिं जसा सबोध तो ॥ पावतो सुजन हो विचार तो ॥ ७ ॥
हा वदे पतिस गे बहू रितीं ॥ सख्य दाखवि तदां बहू हितीं ॥
गोड तो रस गे मनीच असे ॥ साधि त्यां सतत सार हें असें ॥ ८ ॥
सोड गा स्थुळ तुं हें न आकळीं ॥ अंतरीं मज धरीं गित आकळी ॥
बांधि तूं मज बरा परेवरीं ॥ शांतिचा खुट करी तयावरी ॥ ९ ॥
प्रेमदोर कमरेवरी बरा ॥ बांध गा मज असा करीं त्वरा ॥
सावधान धरि काळ कोटि हा ॥ हीत भीं वदत हें सुखें पहा ॥१०॥
ना गती मज जनीं रिपूंमधीं ॥ काम मोह मति ना कळे सुधी ॥
राहतो गुण भवाहुनी दुरीं ॥ भाविकां सम असे सदां उरीं ॥ ११ ॥
चोरि ही नच करी स्वभाव हा ॥ पाहतो कसुनियां सकाम हा ॥
सूख हेंच समजा मुलांमिषें ॥ बोध बोधित भि गा सदां असें ॥ १२॥
फार ती प्रीति तुह्मांवरी असे ॥ कारणी सगुण मी रसा असें ॥
बाळ मी गुण बरे नवांरसीं ॥ त्यांतही सुरस जातही असी ॥ १३ ॥
मूस ही नवविधी अनादिची ॥ ओतिते नवरसां सुधारुची ॥ १४ ॥
सार जाणुनि पती गंहीवरें ॥ सोडिला मुल तुझा पती बरें ॥
बोलका बहु बरा रुचीकरी ॥ तोलतो समपुरीं निती खरी ॥ १५ ॥

हें मना धर तुं या सबोधनीं ॥ सूख घे निजपुरीं वळींतुनी ॥
बोलुनी मग रथोद्धता बसे ॥ सख्य हो असि रिजे वरावसें ॥ १६ ॥
बोलते दुसरि ते सुरांगणीं ॥ आत्म हें वदत सार हो गुणीं ॥
शार्दुली वदत तेधवां वरी ॥ हा अनंत रिजला तयावरी ॥ १७ ॥

## ॥ आत्मनिवेदन विधि ॥

(शार्दुलविक्रीडित.)

बोले ते सति तेधवां तिजप्रती आत्मींच बोधी रित ॥
गोपी हे नववी नवांमधिं बरी सारामृतीं हो रित ॥
आली जे निजरूपतें धरुनियां बोधास बोधी नित ॥
आनंदास अनंत मीळत तदां गोपालरूपीं सत ॥ १ ॥
बाळाला शिकवी बरा गुण तुं गे कारा मिटी या आजिं ॥
सारा गोंधळ घालितो हरि तुझा बाराकळीं काळजी ॥
चाळा फार बरा न गे दिसत हा सांभाळ आतां सुत ॥ आनंदास० २ ॥
भानूच्या उदयीं बरोबर मुलें घेऊन आला कळ ॥
सद्रेच्या समुरीं मुते मुल तुझा हांसे जसें तें खुळ ॥
बैसे चावडि चोरवाट धरि गे गोपां सखा वारित ॥ आनंदास० ३ ॥
ढोंगें फार करी मुलां फिरवितो पोरांस मारी बहू ॥
चोरीची बहु गोडि गे नवरसीं नारीस गोंवीं बहू ॥
वत्सें सोडुनि धांवतो सुत तुझा वारा जसा वाजत ॥ आनंदास० ४ ॥
गर्ती पाहुनि भूलतो खदखदां हांसे पुढें आननीं ॥
बोले त्यांस सभाधिटासरि वरा बोधामृतां लक्षुनी ॥
चेष्टावा ससरी तयामाधिं हरी सारां वदे हांसत ॥ आनंदास० ५ ॥
पाहूनी ति गरोदरी सति तिला पूसे असें आइका ॥
कां गे थोर बहू दिसे उदर हें ढोलासरीं माफक ॥
बो धानें सुनिती गमे हृदाथें ती शांती रुपां साजत ॥ आनंदास० ६ ॥
बोले ते सति तेधवां मुल तुझे खोटी कशी रीत ही ॥
चाळा कां तुज लागला कुनितिचा गोष्टी जुन्या फार ही ॥
देहातीत कसा मला तरि वदे नामारुपा नाशित ॥ आनंदास० ७ ॥

आहे मीं प्रथमा गरोदर निजीं सेजे पतीपासुन ॥
संभोगासरसीच गर्भिण बरी आत्मीं निती सांचुन ॥
झाले आठजि मास ते तिन दिनी चौथा असे चालत ॥आनंदास०॥८॥
बोले तीस तदां हरी मुल तुझा ऐकें बरी साजणीं ॥
कैसी झालिस तूं गरोदर पतीपूढें वदे साजणी ॥
पोटांमाजिं तुझ्या बहू दुखत गे आहे असें वाटत ॥ आनंदास० ॥९॥
बोले आत्मनिवेदनी निज मुला ऐके खुळा ही रित ॥
जैसा तूं जननीस रे उपजसी त्याचे परी ही गत ॥
जाणें पोट भरीं उगें बस तुं रे बोलूं नको चावट ॥ आनंदास० ॥१०॥
योगी जे निजरूप तेजस असंगी या भवीं सागरीं ॥
इच्छा मारुनि कामिकी स्वतनुतें बोधावरी सांवरी ॥
वाक्याला जपतो भला श्रिगुरुच्या भावीक तो नेमित ॥आनंदास॥११॥
आत्माराम पती असे तनु सती गर्भा धरी ॐबिज ॥
शांतीच्या उदरांत हें मुळ उठे सोहंपणें पारज ॥
वीवेकान्वयमास ते नव पुरे भक्तीरसें शोधित ॥ आनंदास० ॥ १२ ॥
वाढे गर्भ तदां सुनीत बिज तें ऐक्यान्वया सारज ॥
पूर्णानंद सदोदितीं भरत तो ब्रह्मी भुतीं तत्पद ॥
वाढे त्वंपदिं तो बरा निजसुरा पेटीं जसा पारद ॥ आनंदास० ॥१३॥
अष्टाभावानें मास दीन गुण ते गेळे भरोनी भर ॥
न्हेते जीवन घागरीं भरुनियां शांती धृती शारद ॥
मंदीरीं ममता पती जननिती जाची बहू दंडित ॥ आनंदास० ॥ १४ ॥
ऐकोनी मग तो हरी निजमुखें बोले तये सुंदरीं ॥
नारी गार्भिण तूं समे निति ति गे कर्तव्यकर्मीं बरी ॥
वाढे स्थूळ अभीनती मिपण तें संसारसा वाढत ॥ आनंदास० ॥१५॥
खाणी त्वंपद तत्पदीं सरि असे वादा श्रुती रीत ही ॥
गेले थोर बुडोनियां करमटीं ऐक्यां नसे ठावही ॥
आतां ऐक रिती तुला बरि मिती सांगेन हीतीं हित ॥आनंदास० ॥१६॥
आतां पूढतिं गे मला रित बरी बोधान्वयें आजरी ॥
निर्गूणी धरि भाव शोधनरितीं कारां मिटी या जरी ॥
पोटीं शोध विवेक तो अनुभवीं लक्षीं असो घोळत ॥ आनंदास०॥१७॥

नारी गे पति मी बरा मुळ नसें संसारनाशास्तव ॥
झाला हा निजध्यास फार दिनिचा पोटीं धरी आठव ॥
कौमारी मजला भजे सतिपणीं जेथें नसे भीमत ॥ आनंदास० ॥ १८ ॥
सोडूनी मि तुं या पदां समभवामाजीं असें वागत ॥
मंदीरीं निजअंतरीं निज बरी सोडी जरा बोधित ॥
नव्हे तूं स्थुळ लिंग कारण असूं माहाभुतें खेळत ॥ आनंदास० ॥१९॥
माया ही असुरी भुली भवपुरीं संसारसारामृतीं ॥
भ्रांती हीच अनादिची गुणमिती रीती भ्रमाला धृती ॥
जाळें मोहमदां मना गुतविलें कांहींच नाहीं भित ॥ आनंदास० ॥२०॥
सख्या ऐक तु आद्यसार मुळचें संबोधना आत्महीं ॥
सारीसार नवांहुनी बहु बरें आरामनीरामहीं ॥
ज्ञातीगोत नसे वर्णाश्रमपदा ठावा उमेचा गित ॥ आनंदास० ॥ २१ ॥
मानीं मानसि मानवी तनु हि गे काळासरीं नासत ॥
यूगें चार तनूस भोगति निती ऐके तुजा मानित ॥
ब्रह्माकारचि जन्मि तों कृतयुगा साक्षी पुरी वाणत ॥आनंदास०॥२२॥
त्रेता यांत मुळापरी मन सदां खेळीं बळें ध्यासित ॥
द्वापारीं मन धीकल्प तट तो जोरामधीं धांवत ॥ आनंदास० ॥ २३ ॥
वृद्धाप्यीं कलिभाव तो थरथरां कांपे तदां वाणित ॥
दृश्यादृश्य मिटों घटों गितरवें भामे तुझें हें मत ॥
बुद्धी बोधानि शांत तूं रमवि गे लोभाति तोडी हित ॥आनंदास०॥२४॥
सूधा ही नवशोभनी हित गती बोधा धरी त्या सत ॥
घोळावा सतलीं मनांमाधिं हरी नारायणीं वाणित ॥
थोरां लाभत लाभ हा बहु भला थोरांमिटीं ओसत ॥आनंदास०॥२५॥
नाहीं नाम मला रुपां सरि नसे भक्तीवरीं भासतों ॥
प्रेमानंदि वसें भवीं सतत गे भ्रांतीस सोडून तो ॥
नाहीं गेहि जरा मला अजर मीं दृश्या नसें मानित ॥आनंदास०॥२६॥
हें सारें जग अंतरीं वसतसे गूणार्थ लीला वसें ॥
गूणाध्यक्ष सुरासुरीं मत मि गे संगीं परी ना असें ॥
भावीकांमननीं बसें अडकुनीं सौख्यामृतें रांगत ॥ आनंदास० ॥ २७ ॥

शास्त्रें भांडति आपसांत भवि या घालोनि भूली मतीं ॥
वंशां वर्णिति भाट हे झटवुनी पुराणकीर्तीभिती ॥
वेदां पार नसे अनंत असती ब्रह्मा नसे जाणत ॥ आनंदास० ॥ २८ ॥
बोले या रितिं गे तदां मुल तुझा नारी बरी आत्मनी ॥
मीळे भावबळें मनांमधिं तदां गेला असूधामनीं ॥
सारें गोकुळ या रितीं फितविलें संसार तोडी पुत ॥ आनंदास०॥२९॥
ऐशा रीतिं वदूनियां बसत ती बोधीं जशी हो धृती ॥
येकाठायिं मिळोनि शोभत सती शांती धृती वाणिती ॥
गाती पादसरोज भाव बरवा टाळावया संसृत ॥ आनंदास० ॥३०॥
माता हेचि विदेहिनंदवनिता चित्तांतरा ना क्षप ॥
ऐक्या मेळणिं मेळ ती सगुण ह्या निर्गूण जें हो रूप ॥
शांती उन्मनि नीजरूपिं पसरे हो या भवां नाशित ॥आनंदास०॥३१॥
भक्तीभाव धरा वरा त्वरित हो सारा रसाचा भर ॥
गोविंदा मधुसूदना नरहरी गोपाळ गोपी पर ॥
श्रांतीला मिटि या मला वरद तूं देरे मुरारी गत ॥आनंदास०॥३२॥
घेऊं हें जन कानपुरीं नवाविधिरसा साधोनि बोधामृतां ॥
सूखातें हरि दे तयांस घर तें ना काळ भासे रतां ॥
पूरे अर्थ भवांमधीं सकळ तो इच्छे मधीं वागत ॥
आनंदास अनंत मीळत तदां गोपाळरूपीं सत ॥ ३३ ॥

॥ इति नवविध गोपी ॥

---

## ॥ वाल्मिकचरित्र. ॥

( उमा छंद. )

तो नमिला मिग आदि गुणाइश नामि गजानन आद्यसखा ॥
नीगमकाननिं नीट जि वाट हि नीजरुपीं मन आत्मसुखा ॥
दोंदिळ बोधिल बोध निजासनिं शोधनि कामचि मारिल हा ॥
हे गणनायक बा गुणदायक अनंत तो येक तारिल हा ॥ १ ॥

मायग तूं खरि मानितसे उरिं मानवि या पुरीं वास तुझा ॥
चत्वारिवाचक वास निवासनिं वाटत साधनिं साज तुझा ॥
ते मयुरासन वागविलासन वासर तो मणि शोभतसे ॥
ब्रह्मविणा करिं ब्रह्मकुमारि जि अनंत हा दिन नमीतसे ॥ २ ॥
तो गुरु हो धणि तोषवु गायनि तोडर सोडुनि आगमिचा ॥
निगम गोचर निर्ममतास्पद निर्गुण ती मति वास जिवा ॥
सर्व जनीं समधर्म अनूभवि वर्म हि शांतचि आत्ममुखी ॥
हा येकनाथ जि हात शिरीं मम अनंत नाम जि नित्य सुखी ॥ ३ ॥
ही मज आइजि बापहि हा जणु ताप जि हारक एकगुरू ॥
नाथचि भाषित नाहिं दुजी रित नाम जिचें सत नित्य धरू ॥
हा भवतारक हारवि हारव हांवरि ही मति आवरिगा ॥
प्रेमचि हा मज काज जि नीगामिं अनंत सूफळ गांठवि गा ॥ ४ ॥
तो मुनि वाल्मिक वागतसे मनिं सेजनिज्यासनिं ज्याचि असे ॥
बोलियला मुखिं बोलजि नाटकि नामक आत्मजि राम असे ॥
या जगरीतिंत रंजकदायक दावियली नित शोधनिं गा ॥
गाथि सितावर हाशिवरामजि राम रघूत्तम प्रेमचि गा ॥ ५ ॥
कोळिजनामधिं तामसभावनि इच्छित काननिं पारधिला ॥
कुंटुबपोषण कुकर्मरितिनें निष्ठुरता मनिं या महिला ॥
ब्रह्मचि घातकि पातकि निर्दय घोर रहीतचि कोळिवला ॥
ठाणचि देउनि लक्षितसे निट पारधि खाटकि तो वहिला ॥ ६ ॥
देह विलक्षण याचोचि लक्षण मानस तीक्ष्णचि सत्य असा ॥
श्वापद देखित राहे सदोदित दोरिहि ओढुनि चापखसा ॥
येक दिनीं हरि भक्तपरायण नारद तो मुनि कर्मवसें ॥
पोचत तेथचि ब्रह्मविणा करिं आनंद तो उरिं नामवसें ॥ ७ ॥
देखुनिया मग तो कळिचालग लावित निष्ठुर बाण कसा ॥
ओढिहि ओढुनि जोडियला गुणि लक्षचि लक्षुनि भेदितसा ॥
देखुनियां मग तो हरिभक्तचि बोलत आननि बोलचि हें ॥
कोण तुरे उगिं मारिसि कां मज कारण तें कथि सत्वर हें ॥

बोल हें ऐकुनि निष्ठुर बोलत बोल कठोर ति सत्य वदूं ॥
कारण कर्मजि सत्यचि हें मज लावियलें धनें सत्य वधू ॥ ८ ॥
मांसाचि भक्षण देहजि रक्षण काळ विलक्षण कंठुचि गा ॥
जोडुनिया धन कुटुंबपोषण भूषण हें मज सत्यचि गा ॥
हाचि धंदा मज सूहृदतारक याच वनाप्रति नित्य असे ॥
यास्तव मारिन शीघ्रचि तूजसि उसिर तो नसे पाह कसे ॥ ९ ॥
बोलिहि ऐकुनि बोलत नारद पारद कारक सत्याचि तूं ॥
पाहे विचारुनि आपुलिया मनिं या जगिं मानव होउनि तूं ॥
हें अघ या भावें भोगवि भोगचि भ्रांति नसे समजे मनिं हो ॥
दुष्ट रिती हिच टाकुनि देइ तुं सावध हो मनिं सत्यचि हो ॥ १० ॥
ही तनु दुर्लभ दुर्लभ या जगिं कां तरि गा उगिं फंदचि हा ॥
आजुनि सावध घात नको करुं गोडाचि हें परि बंधचि हा ॥
कां उगि नाससि इच्छिसि घातचि मात हि ना बरि जाण तुं रे ॥
पूढति हें अघ देखुनिया मग भोगवि तूजसि येमचि रे ॥ ११ ॥
घालिळ घाणित नर्कचि तो बहु भोगवि भोगचि जाणुनि घे ॥
आप्त तुला मग कोणिच नाहिं हि खातिल तेवढि जाण निघे ॥
सज्जन वाणि हि ऐकुनिया मनिं बोलत तो मग त्या मुनिला ॥
वाणि ति बोधक शोधक नीतिचि ऐकुनिया मनिं हा द्रवला ॥ १२ ॥
हेजि मुनीवर उदर रक्षण कारक कर्मचि दोष कसें ॥
हा चरितार्थचि कुटुंब पोषण दूषण सर्वहि भोगितसे ॥
पातक येथिल भोगिति खातिल तीच जि सत्यचि वाटतसे ॥
मारक मी परि भक्षक ते बहु रक्षक वीषय त्यांस असे ॥ १३ ॥
पूढति तो निज भक्त सखा हरि ज्यास बरोबरि वागतसे ॥
भावित जो कलि मोकलि मानस हा कलि टाळवुं जाणतसे ॥
बोलत बोल तें शोधक कामचि मारक तारक बोधचि हा ॥
जाउनिया घरिं शोध करी तरि कोण बरोबरि तीच पहा ॥ १४ ॥
जाउनिया अजि शोध करी तरि कोण ति हो अघ घेतिल हें ॥
चाल तुं शीघ्रचि आग्रह टाकुनि मागुनिया वध साचचि हें ॥

ऐकुनिया मग चालत नीटचि आपुलिया घरिं शोधक तो ॥
बोधियला मुनि मानसकानानें धारण हो मानें बोधचि तो ॥ १५ ॥

जाउनिया घरिं पूसत कामिनि धामिनि हें मज पातक गे ॥
मारुनिया जिव पाळितसे तुज बापहि आइच पोरें तिं गे ॥
यास्तव पूसत हे मम पातक कोणि तुमी मज भागिस या ॥
सांग सखे मज लौकरि हें गुज दोषचि हे मम भोगासि या ॥ १६ ॥

बोलि हि ऐकुनि बोलत कामिनि नाहिंच मी धणि जाण खरें ॥
या विषया धणि दाण मि कामिनि पाप धणी तुह्मि हेंचि खरें ॥
आइहि ऐसिच बापहि बोलत ताप मना मग उपजला ॥
शीघ्रचि तेथुनि उठून चालत जेथ मुनी वानें हो बसला ॥ १७ ॥

ब्रह्मसुतासचि लक्षुनिया दिठि घालितसे मिठी पायिंच गा ॥
तारि दिनासचि मारु नको मज काय करूं हित तें तुम्हि सांगा ॥
दीन मि गा नर पामर किंकर दुष्ट धुरंधर दे पादिं जागा ॥
सत्यचि कर्म हें घातकि पातकि वाटत आजचि हो मजलागीं ॥
हे सदया उद्यास करी मज गूजचि तें निज अंतर भागीं ॥ १८ ॥

तक्षसी मति अक्षय स्फूरति दीक्षित होइ तुं राखि मला ॥
दक्षपणें गुरु पक्षचि हा जणु लक्षित लक्षाणिं साच तुला ॥
हे हरि प्रियजि देइ जि मानस कानस लाविच या तनुला ॥
हा कलिचा मळ घांसुनि टाकिजि वांकिव पायिंच दीन मला ॥ १९ ॥

हे हरिदासजि आस हि हो मज पादसरोजिंच लागलिसे ॥
ठाव करा तुह्मि भावचि देउनि साव मला जागिं टाळि पिसें ॥
हा तुमचा रव ऊपरतांकर साचचि निर्जर कारक गा ॥
वाटत मानसिं येथ मला खुपि हा भव तारिसि साचचि गा ॥ २० ॥

तूं करुणाकर भक्तमनोहर शामजिसुंदर प्रीय सखा ॥
देवऋषीमुनि दे वर हा मज हांकलि हें अघ देउं नका ॥
कोणिहि गा मज आप्ततें नाहिंच साचचि हें घर सोडिन गा ॥
बोडिन ही मति खोडिन कर्मचि तोडिन फांसचि मोह सगा ॥ २१ ॥

यापरि बोलत तो मति तामस हा सहवासचि हो मुनिचा ॥
संतसमागम हाचि जि हीतक सत्यपणीं मज बोढणिचा ॥
त्या सदयास दया उपजोनिच बोलत हास्मित ते अइका ॥
तूचि भला मज वाटसि सत्यचि सांगेन तें धरि कान निका ॥ २२ ॥
हा रघुवंशज राम शिवप्रिय कामरिपू हर नामचि गा ॥
तारिल तो जगदीश तुला जगिं साचपणी धणि मानुनि गा ॥
त्रासहि हा मिटि बोधानें गांठिल होसिल पाटिल नीगमिं गा ॥
सावध होउनि साधि तु आजिंच गाजि असा मनिं हर्षित गा ॥ २३ ॥
यापरि तो मुनि हें उपदेशक साररवामृत त्यासि वदे ॥
रामरसायण हें भवनाशक मूर्तिप्रकाशक हेंच वदे ॥
यापरि सांगुनि तो गुरु हो मनिं पाहे विलोकुनि शीवसखा ॥
पाप धुरंधर राम नये मुखिं बोलि मरा असि शब्द सुखा ॥ २४ ॥
ज्या घरिं रांजण येक दशावर आणालि ते तिन खडे भरले ॥
येक ब्रह्मवधि येक खडा जणु मापचि या रितिं ते भरले ॥
इतर आणाखि फारचि जीव ते नाहिंच मीत ति मापाला ॥
कोठुनि येइल नाम मुखामधिं या परि पातक तापाला ॥ २५ ॥
अंतर शोधनिं पाहत तो मुनि या पतिता मुखिं काय ठसे ॥
होंचि असें हित वाटत मानसिं बोलु तें ऊलट यासि असें ॥
हे मर हे मर ऊलट रामचि कर्ण मुखीं घालितसे ॥
ती जडली जडि भेदक वर्मिच कर्म समूळचि टाळितसे ॥ २६ ॥
कायजि हा मुनि निःसंग मानसिं आपपरामति ऐक्य असे ॥
वायु जसा नाभिं चंचळ फीरत दीसत ती रित पाळितसे ॥
स्थीरचि ना कधिं धीरहि गंभिर मानव दानव तारितसे ॥
जो कलहप्रिय सूरगणामधिं लावितसे कळि द्वैतपिसें ॥ २७ ॥
चाळविल्याविण चाळत नाहिंच चाळक ती रिति आगमिची ॥
हा भव अंबुधि विश्वकदंबचि रज्जुमती करि चाळितची ॥
शुद्धचि सात्विक तो गुण हो पय ही कळ तो रज गोरस हो ॥
हें दधि चाळवि दश्यचि माळवि वीनय ती रवि चाडच हो ॥ २८ ॥

यास्तव हा मुनि स्पष्टचि श्रेष्ठजि नष्टाचे ती मति हारवितो ।
मारवि तो जणु दुष्ट जनाप्रति तारवितो निजभक्तचि तो ॥
कारण कर्महि तारण कारक मारक ते अरि कामसखे ॥
निर्मोह लक्षण देह विलक्षण शिक्षण साचचि संत मुखें ॥ २९ ॥
देउनिया मग मंत्र तयासचि लक्षित काष्ठजि शुष्कचि तें ॥
रोवियलें मग संनिध तेथचि येतिल पल्लव बोलति ते ॥
येथचि तूं वस भावबळें कस मीतचि दीवस पल्लव हे ॥ ३० ।
पक्षिच या जरि लक्षिल कोणिहि स्पष्टचि होइल आत्मधणी ॥
बोलुनि या परि तो मुनि नारद उठत तेथुनि भक्तिधणी ॥
चालत चालति चंचळ भासति चीपुळियां रव धुंबरती ॥
ब्रह्मविणा करिं तारण तारिच जोडित पंचजि घोर रती ॥ ३१ ॥
ही उपदेशक पंचतत्त्वमसि वाजवि तो मुनि नीजरवा ॥
पंचम जोड हि घोरत घोर हि तो रव हारवि सत्य भवा ॥
ते मुनि पारचि हे मुनि बैसत पंथचि जो सत धरुनिया ॥
कल्पहि लोटति त्यास नसे मति देह मि या रितिं टाकुनिया ॥ ३२ ॥
उलट तें जणुं सूलट होउनि पल्लव ही नव ते दिसती ॥
पूर्ण वस्तुसम अस्तु मुनी मन कानन तें घन उंच गती ॥
कोटि शतान्वय रामरघूगित गाउनिया मित शांतचि तो ॥
यास्तव वाल्मिक नाम तयाप्रति रामहि त्या रिति चाळत तो ॥ ३३ ।
नाटकान्वय तेचि रितीं मग सूर्यजिवंशज जन्मतसे ॥
पूर्णदयाघन दाशरथी रघु भ्रांतिविमोचक मानितसे ॥
रेचकची रिपुनाशक हा भवतारक वीभव बूध मना ॥
हे जन हो मन या भजनामधिं गाउं सितापति धाउं मना ॥ ३४ ॥
या रिति पातकि काननिं तारित नामचि सार जि सत्यपर्णी ॥
भाव धरा मनिं भाविक हो जन लूटुचि हें धन नीजखणी ॥
सावध सावध आवधि थोडिच गोडि हिच्या मनिं वीनवितो ॥
अनंत राघव पादसरोजिंच धारत मानसि सूखिच तो ॥ ३५ ॥

# ॥ श्रीशुकजन्म चरित्र ॥

## ॥ पूर्वभाग ॥

( उमा छंद. )

आधि नमीन मि हा गणनायक विघ्नविनाशक आगमिचा ॥
नाचत आनंनि रंगत रंगचि भंग करी मति दुर्गुणिचा ॥
सोंडहि वक्रचि दंत हाऽन्वय पंथअनादि सखा निगमा ॥
हा हर हा हरि हा चतुरानन सर्वहि हो सम या सुगमा ॥ १ ॥
मायहि मानुनि मानस सावध हा रव गा भव नाशक हो ॥
गात सदोदित नाचत हास्मित ताप निवारणि सत्यचि हो ॥
नाम सरस्वति जी जगता मति पंथचि दाखवि रामपदा ॥
आपदहारक बुद्धिप्रकाशक सावध हो मनिं प्रेम सदां ॥ २ ॥
हा वर गा गुरु मानसि आभरलाभर सारची या मतिला ॥
काय वदूं सुख बोलुं नये मुखिं खोल ति हो गति लाभ भला ॥
तारक नाथजि येकपणीं मज गाउं सदोदित भाव बळें ॥
ज्या घरिं आवडि कावडि तो भरि गोपि पयोधर हाचि बळें ॥ ३ ॥
नामचि गाउनि प्रेम भरें मनिं ध्यात निशीदिनिं सूखचि हें ॥
भूक मला बहु याच सुखास्तव आस निशीदिनिं खासजि हे ॥
हांसत प्रेमळ वीमळ कोमळ नाहिं जया मळ संसृतिचा ॥
भूत जया जनिं त्रीगुणनाशक नीजसखा गुरु हा मतिचा ॥ ४ ॥
हें मन सावध होउनि पार तरे भवसागर गा रघुराया ॥
गीत मनोरम धाम निजासनिं काम नको उरिं राखुं तुं वाया ॥
सूखचि तें सम राहिल त्यासचि सत्यपणीं हर देइल तो ॥
क्रोध नको धरुं शांतिच तूं वर या भविं गाच तुं राज रघू तो ॥ ५ ॥
येक दिनीं सतव्यास मुनी मनिं शोध करी निज कामिनिचा ॥
गर्भचि कीं सळ या उदरामधिं वाढत फारचि हा दिनिचा ॥
द्वादश वर्ष वरी उदरामधिं खासचि वाटत पाडुं इचा ॥
मानस यापरि बोधुनि मूनिवरें वरिला रस या मुळिचा ॥ ६ ॥

ही मुळि अर्धचि गूणत्रयावरि छेदक आवरि मातृक हे ॥
वीवेक साणजि घासि तयावरि तोर अनूभावें घालित हे ॥
ही गति पाहुनि धांवत तो हरि मोहाचि जो हरि आगमिचा ॥
येउनिया मग गर्भाजि लक्षित लाक्षें विलोकित त्या सतिचा ॥ ७ ॥

गर्भिंच तो निज भक्तसखा शुक वारिजलोचनि देखियला ॥
मूषक जो अरि सर्पाचि देखुनि मानासिं भीताचि जो दडला ॥
हाहि तसा अरि कामचि जाणुनि या भव कानानिं सावालिये उदरि लपला।
देखुनिया मग तो जगपालक हा निजबालक बोधियला ॥ ८ ॥
बोधचि बोधित त्या उदरांताजि कारण लक्षुनि तें वहिलें ॥
कीं जनतारक हा उपदेशक जाणुनिया मग बोलियलें ॥
हे शुक हा मल गर्भ तुला रुचिप्राय कसा तरि हा गमला ॥
साधन साधित कानानि जे मुनि कारण नर्काचि हा गमला ॥ ९ ॥
तूं तर यांताचि बुद्धिच देउनि भोगीसि कां तरि हें मजला ॥
सांगासि तूं आजें ऐकु तरी गिति दान भरी तुजि बोल भला ॥
तो मग बालक बोलत जाणुनि हा निजचालक कृष्णसखा ॥
हे जि रमाधव हे खगवाहन हे रिपुनाशक आत्मसखा ॥ १० ॥
हा भव घोराचि फार जि मारक काम मनामाविं घातक हा ॥
क्रोध तयावरि मोह सखा अरे ही ममता वरि हीच पहा ॥
येथिल स्वल्पचि हो परि वाहिर फाराचि हें अघ जाणुनिया ॥
येथाचि मी तुज गाथिन आवाडे ही मज गोडिच जाणुनिया॥ ११ ॥
घाणहि सोसिन राहिन येथाचि कोटिन काळाजि हेंचि बरें ॥
कारण येथिल दुर्गंधिकारक बाहिर मारक चोरचि रे ॥
टोंचिति भाजिति तोडिति मोडिति या परि कीळस सोसुं कसी ॥
सांग दयानिधि हे अघनाशक तूजजि मानालि बोल कसी ॥ १२ ॥

ऐकुनिया मग भक्तमनोहर बोलत त्याजासि तेंचि कथूं ॥
हा विवेकान्वय साधुनिया मग बाधक हे अरि जाण मथूं ॥
हे शुक बालक पालक मी तुज सूखाचि होइल नीघ कसा ॥
काय तुला अरि या भवसागरिं बोध जरी उरें आहे असा ॥ १३ ॥

कोणि तुला जगिं मारक नाहिंच कारण तूजसि नीत असे ॥
बोध अनूभव वीवेकवंत तुं पंत निजासनिं चित्तिं वसे ॥
यास्तव सांगतसे चल नीघचि वेळ नको करुं बाहिर ये ॥
बाप तुला आजिं मारिल साचचि आत्मजि घातकि होउं नये ॥ १४ ॥
कर्मचि जाणुनि हा भवसागर भोगिति ते मुनि संत चि हो ॥
तारक या जगिं बोधानें बोधिति नाम हि गाउनि सूखिच हो ॥
कां भिति तूजसि वाटत ही असि वेळ नको करुं नीघ कसा ॥
मानासिं मानचि हें मम भाषण सूटचि येथुनि बाण जसा ॥ १५ ॥
या परि तो हरि मारक जो अरि बोध करी उरिं त्याजसि गा ॥
ऐकुनिया मग साचचि मानुनि नीघत बाहिर सत्वर गा ॥
ज्या रितिं तो शर सोडि धनुर्धर भासत जोरचि या रितिचा ॥
मूर्ति मनोहर द्वादश साळचि ऊमर कूमर व्यासजिचा ॥ १६ ॥
बाहिर येउनि तो पळतो पळ येकहि ना घडि थारत से ॥
हाकचि मारित पाठिस लागति व्यासमुनीवर बोलत से ॥
हे सुत बाप मि पाहि विलोकुनि कां पळसी तरि सांग मला ॥
पुत्र तूं होउनि निष्ठुर कां तरि सांग मला अजि या रितिला ॥ १७ ॥
बाळक तुं तरि कोमळ ही मति ऐकजि हे निति साचपणाची ॥
आमुचें पाळन पोषणकारक ही मति धारण शुद्ध गुणाची ॥
पाहुनि मी तुज आज सुखी बहु कारण पुत्र तुं सत्य मला हो ॥
या परि मानस तूं तर या रितिं धांवत सूटसि आजचि हो ॥ १८ ॥
ऐकुनिया मग या रितिं बोलिति बोलत बाळक त्या जनकां ॥
शोध करा तुमि आपुलिये मनिं कोण मि कोठिल माताहि कां ॥
बाप कसे तुमि ताप उपाधिक मोहित मोहचि साचपणीं ॥
जो अरिछेदक कामविमोचक त्यासचि मी अजि बाप म्हणीं ॥१९॥
शोध करा तुमि रोष नको मनिं कामिनि धामिनि व्यर्थ पिसें ॥
माय हि बाप तुं सत्य खरी परि मोहचि दायक जन्मवसें ॥
पिंड कशास्तव बंडचि हें मज दंड गमे मति आगमिची ॥
साक्षिसि लक्षण भास विलक्षण पक्षपणीं गति ना सतची ॥ २० ॥

हेजि पुराणिक भारतकारक ज्ञानिच हो तुमि सत्य खरें ॥
होजि समागम व्यासपणा मनिं अहंपणा उरिं मानचि रे ॥
स्थूळचि हें जड पंचभुताकृति दृश्यचि लक्षण भासत हें ॥
नामिक कामिक लिंगहि आकृति मायिक खासचि वाटत हें ॥ २१ ॥
यापरि तो शुक बोधित व्यासजि नाशक मोहचि या परिचा ॥
ऐकोनिया मग स्तब्धचि होउनि शोधित तें मन पंथ हिचा ॥
बाळकवाणि ति मंजुळ कर्णिंच गोडि मनीं बहु भासलि हो ॥
आस सरे मग मानसिं झूरत काय करूं नित शोधक हो ॥ २२ ॥
कोण तरी मुळ काय निती तरि कोठुन पातलि बाळपणीं ॥
कष्टत काननिं स्पष्टचि चालत खोल ति हो मति ओळखणीं ॥
या परि जन्मजि हा शुक जन्मत जो मुकुटामणि या मुनिचा ॥
या सरि आसरि कोण दुजा नच भासत खासचि लक्षणिचा ॥ २३ ॥
निर्मोह लक्षण ध्यानसुलक्षण तर्क विचक्षण नीगमिचा ॥
धन्यजि वंशज कूळमणी सुरवासर या जगिं बोधनिचा ॥
भागवतान्वयें सारचि हा सत गात अनंतचि शोधनिचा ॥ २४ ॥
या परि जन्मजि बोलियलें मुनि थोरचि ते जनिं आठवुं या ॥
गांठवुं आनंद पाहुंचि ते पद लक्षबळें कसुं जाऊनिया ॥
गाउत भाविक भावबळें मनिं काळ नसो अरि त्या सखया ॥
अनंत हें गित मीत नितीचिच नाथ धणी येक गूरुचि या ॥ २५ ॥

॥ इति पूर्वभाग समाप्त ॥

# ॥ श्रीशुकजन्मचरित ॥

## ॥ उत्तरभाग ॥

( उमाछंद )

तो, गणनायक सिद्धिविनायक बुद्धिप्रकाशक म्या नमिला ॥
जो, मतिधारण विघ्ननिवारण शूर्पचिकर्ण जया वहिला ॥
तात गुणाइश हा गणनाथ जि भक्तिसुसाथ महा बरवा ॥
या भवसागरिं नामचि आज हें अनंत हा करि हो बरवा ॥ १ ॥
माय इला ह्मणुं सारचि जाणुनि हंसविलासिनि जगदंबा ॥
जी मति दायिनि आननिं शोभत वास निवाचि भूकदंबा ॥
शुभ्रचि तो कटि हा पट शोभत मुक्त विराजित हारचि ते ॥
गावत नाचत रंग सदोदित अनंत हा नमि मायचि ते ॥ २ ॥
हा गुरु हो वर सिद्ध मनोहर नाथ परात्पर या मनसा ॥
दे मज हा वर हांवरि ही वर हो मति दे गति बोधि कसा ॥
चालवि पंथचि नाम तुझें गुरु दे मजला धिर हांवरिया ॥
कोण मला तुज वांचुन नाहिंत सत्यपणीं येकनाथ दया ॥ ३ ॥
सिंहविलोकनिं तो शुक तेथुनि बापहि बोधुनि चालतसे ॥
व्यास विलोकुनि बोलत हो मनिं जाउंच मागुनि हीत वसें ॥
आणिक बाळक बोलेल काय तें कर्णभरी अजिं ऐकुं कसे ॥
धांवत मागुनि हाक हि फोडित ओरड ओरडिं कंठ बसे ॥ ४ ॥
यारितिं दोघेहि चालत काननिं तेथुन लांबचि पोंचति ते ॥
तेथ सरोवर फार मनोहर वृक्ष हि नीबिड दीसति ते ॥
पारिज वारिज त्या बकुली वट आम्र मनोहर फोंक जसे ॥
अर्जुन थोरचि शुभ्र उमावर, डाळिंब कातर फार वसे ॥ ५ ॥
चिंच सिताफळ रामफळी बहु पोफळि नारळि केळि तशा ॥
आडि खर्जूरि भेलेंहि माड ते जांबळी थोरचि उंच तशा ॥
द्राक्षहि वेलचि मंडप आकृति, शोभत सेवति मालति ही ॥
फार गुलाबहि अनंत शंकर किंकर मोगरि जाइच ही ॥ ६ ॥

जूइहि फूलति ती वटमोगरि सुवर्णचंपक थोरचि ते ॥
केतकि त्या बहु भुजंग वेष्टित कुंदर नागर फारचि ते ॥
पक्षिहि यारितिं त्या तटिं शोभति काय गणूं तरि आननिं गा ॥
पिच्छ उभारित मोरजि शोभति ठावहि तो रत्न मूमुक्षु गा ॥ ७ ॥
आनन उघडि बोधचि पारवे आणिक ते किर बोलति ते ॥
खोलचि ती गति पिंगळि पिंपळि कीडबिडे बहु शोधीत ते ॥
ते बक हो तटिं शुभ्रचि देखणि काननमाजिर जंबुक ते ॥
सूकर ते बक्र मुंगस ऊरग लांडगे पीसथ व्याघ्रहि ते ॥ ८ ॥
यारिति जंगल आणाखिही बहु काय वर्णु मति पूरत ना ॥
त्या दिनिं तेथचि किन्नरकामिनि भामिनि त्या जळिं वस्त्रहिना ॥
क्रीडति हासति त्या सति माधिति चांदणिच्या रिति शोभति ज्या ॥
त्यांचि पथें मुनि शूक अगोदर देखत नाहिंच दृश्यचि ज्या ॥ ९ ॥
त्या सति लाजत नाहिंच त्या मुनि मागुन व्यासजि तेथचि हो ॥
पोंचाति येउनि त्या मग पाहुनि नारिजनामनिं पापचि हो ॥
लज्जित मानसिं होउनि त्या तिरिं चीर उतावळि नेसति त्या ॥
पाहुनिया मग ते मुनि बोलत लाजत कां तरि बोलत त्या ॥ १० ॥
तो वयसी मुल नग्नचि केवळ जो बहु चंचळ त्यासचि ना ॥
लज्जित गे तुमि नाहिंच मानसिं कां मज देखुनिया वसना ॥
घेउन नेसत काय मनीं तुमि वृद्ध मि पाहुनि गे डचका ॥
बोल सती मज ऐकुं तरी रित कां मनिं भीतिच हा ठसका ॥ ११ ॥
या रितिं वाणि ति ऐकुनि कामिनि बोलत त्या मुनिलागिंच हो ॥
पाप मनामधिं त्या सुतिं नाहिंच हें तुमच्या मनिं सत्यचि हो ॥
बाळचि तो शुक ना मनिं कामिनि लक्ष निजासनिं लावियला ॥
तो नरनारिहि नाहिंच जाणत नग्नहि नेणत या रितिला ॥ १२ ॥
यारितिं तो गुरु मानुनि मानसिं नाहिं जि ही मति लज्जित हो ॥
तूमचि साठिंच वुद्धिहि ना निट पूसतसा पट कर्मठ हो ॥
यास्तव लज्जित पाहुनिया मनिं सत्यचि हो मुनि हेंचि खरें ॥
कामचि तो उरि मोहहि यास्तव आगमिचे तुमि सत्य बरें ॥ १३ ॥

यापरिं कामिनि बोलत त्या मुनि ते मग ऐकुनि हो खचले ॥
बाणचि हे उरिं लागति व्यासजि खिन्नचि होउनि चालियले ॥
चित्तसरोवरिं चंचळ तें नि( )भ्रांति वरी मुनि या रितिं हो ॥
स्तब्धचि होउनि चालत पुढति घाबरली मति सत्यचि हो ॥ १४ ॥
पुढति तो सुत पाहुनिया दिठिं बोलति त्याजसि ते परिसा ॥
जाच तुं त्या जनकागृहिं हें मत लक्षिच धारण धायकसा ॥
येथिल कारण या रितिं भावत व्यासमनीं मत यारितिनें ॥
हा सत बोधुनि आगमिं लाविल कारग तो नृप आत्मचि तें ॥ १५ ॥
राजचि योग जि साधन साधुनि अक्षर सूखचि भोगित हो ॥
मूळहि बोधिल लाविल रीतचि आगम सांगुनि भेदिल हो ॥
यापरि सांगुनि आपण फीरति नाहिंच ती गति स्थीरपणीं ॥
तेथुनिया मग मागिर येउनि येक सरोवर रम्यवणीं ॥ १६ ॥
पाहुनिया मग स्थीरगती मति सद्गुरुचिंतनिं स्थीर ति हो ॥
कंदमुळांवर उदरपोषण देहचि रक्षण या परि हो ॥
यापरि ते बहु दीनवरी तप अंतरशोधनिं हो रमले ॥
हे दमले बहु साच परी मनिं शांतचि होउनि हो रंगले ॥ १७ ॥
ऐक्यमती धृति होउनिया मग श्रीगुरुचिंतनि चित्त जडे ॥
टाळुनिया अरि काम नसे उरिं अखंड ध्यानचि आंतिम जडे ॥
हा निजध्यासचि ध्यात सदोदित भावबळावरि हो बसले ॥
मी पण तो अरि ऊठुन चालत त्यावरि हो मग प्रेमचिले ॥ १८ ॥
तेथचि ते मग नारद हो मुनि सन्निध येउनि पोंचति हो ॥
ब्रह्मविणा करिं नीजविराजित त्या चिपुळया सम वाजति हो ॥
सुस्वरगायनिं आळविती हरि रंगित तंबुरि घोरत ती ॥
जे उपनीषदिं सार मथूनिच तत्वमसीरव नीजरिती ॥ १९ ॥
पंचम जोड जि ही निजभक्तिच कृष्णजिचें गित रोंरवती ॥
सूक्षम तंतुचि बोधरसी नव दश्यचि गाळुनि शोभविती ॥
भूतदया सम जोडचि जोडित जीभळि हालवि त्यावरती ॥
अनंत अच्युत माधव तो हरि यारितिं आननिं नाचति ती ॥ २० ॥

देखुनिया मग भक्तसखा मुनि व्यास जि धांवुनि पायंचि ते ॥
मस्तकिं वंदुनि हस्तकिं हो धरि प्रेमभरें मनिं शब्दचि ते ॥
बोलत आननिं स्तन्यमतीकरि दीनपणेंबहु अर्जवि तो ॥
हेजि मुनीवर हा परता कर जी भवरौरव कर्मठ तो ॥ २१ ॥
चित्त जि चंचल फार विलक्षण लक्षण नाहिंच स्थीर गती ॥
काम मनामधिं लासि सदोदित भाजित अंतर कर्मगती ॥
कैसि जि ही गति होइल पूढति ही निगमा गति मागत हो ॥
दीन मि पामर दे मजला वर हे भवसागर तारक हो ॥ २२ ॥
दृश्य विलोकनिं अर्थचि मानित सूख जि मानसिं सत्यचि हें ॥
ज्ञान असें गुरुचिंतनिं चिंतित या हरिचें गित दृश्यचि हें ॥
हा अभिमानचि गांठित मानस तामस तो रज सत्व तिजें ॥
मिश्रित होउनि बूडविती मति भ्रांतिभुली गति लाजित जे ॥ २३ ॥
फार दिनीं मुळ नीज जि बोधक अंतर शोधित तोचि भला ॥
जन्मत ते क्षणिं चालत काननिं मागुनिही मग मीहि भला ॥
पूसत त्याजसि कां पळसी तरि फीर तु ये घरिं यापरि तें ॥
बाळक तो मग हांसत बोलत ती नित ऐकुनि फार भितें ॥ २४ ॥
हेजि दयाघन तारक तूं जग पार करी मज हा भव हो ॥
यारितिं भावित फार गहींवर दाटत अंतरिं तारचि हो ॥
तो करुणार्णव देवऋषी मनिं तोषुनि बोलति तेजि असें ॥
कानचि देउनि येकमतीनिति ज्याचियें मानसिं त्यासि असे ॥ २५ ॥
जी गति चंचल चाळक नीजचि माळचि घालित आत्मसुखी ॥
तो मुनि बोलत व्यासजि लक्षुनि बोधचि बोधित सत्य मुखीं ॥
बा हि अनीतिच रीत ति दूरचि जाण तुं कूसरि या रितिची ॥
कारण कर्महि सोडुन पाहिल मीपण टांकुनि तोचि सुखी ॥ २६ ॥
हा भव दृशचि ना सत भासत भासत मानसिं सत्यपणीं ॥
मायिक ही भुल पंचभुताकृति साक्षिस ना गति कोणि धणी ॥
मानस चंचल चित्तचि हें निर जाग्रति भासक चाळवतें ॥
कर्मचि सत्यहि त्याच रितीं मग मीपण बुद्धिसि लवित ते ॥ २७ ॥

श्रेष्ठाचि जो गुण कर्महि त्या सम भोगित भोगाचि अर्हपणीं ॥
मान मनामाधिं फाराचि इच्छित नाहिंच तें सुख मुख्य गुणीं ॥
हें समजें मनिं भावबळें धरि भक्तिच तूं करि येकमती ॥
मीपण टांकुनि नीज ति वातिच बोधचि हें घृत सत्यघ्रती ॥ २८ ॥
अंतर शोधनिं जी मति वागत तीजसि बोलत भक्तिच मा ॥
स्वरुपिं सावध राहुंच जाणति नीजविलासहि सत्यचि गा ॥
या भवकाननिं हारिण हें मन पारधि वीपय हे टगति ॥
भ्रांतिच ही भुल घालुनि बांधिति भोगविती मग येमगती ॥ २९ ॥
यारितिं कष्टचि स्पष्ट तुं जाणुनि पारचि हा तर एकयणीं ॥
स्वानंदभूवनिं निर्जर होउनि पाजरि हें मन ते घलणीं ॥
शांतिच ती धरि आवरि बावरि मोहबळें उरिं फांसचि हा ॥
पूढति नारद ते उपदेशक भागवतान्वय सांगितला ॥ ३० ॥
श्लोकाचि सत्यते सत्यपरायण कर्णपुटी रव पाजियला ॥
स्नेहचि तें निज आत्मदिपावरिं घालित तो मुनि हो पहिला ॥
यावरिं मस्तकिं हस्तहि ठेऊनि दृष्टि कृपामृत तें दिधलें ॥
से तिन लोकहि बाहिर टांकुनि नीज रवें मुनि बोधियलें ॥ ३१ ॥
ऐकुनिया मग व्यासमुनी मनिं शांति समाधित हो जडला ॥
वाटत मानसिं तो मणि हेमिंच कोंदणिं तो निळ हो घडला ॥
सूचिस हेमचि श्यामल आत्मचि एकचि आसनिं हो स्थिर ती ॥
चित्ताचि चैतन्य जीवाचि तो शिव मार्ग मनोगति आवरती ॥ ३२ ॥
काय जि संगम आभर हो रम श्याम मनोरम जोडियला ॥
तेथुनिया मग भागवतासचि आत्मस्थितीवर हो जडला ॥
लाभचि हा जगिं भागिरथी सरि नाहिंच याचिये सत्यपणीं ॥
सद्याचि मुक्तिहि देहचि टांकुनि जातचि हें मन शोधपणीं ॥ ३३ ॥
पातकनाशक भागिरथी खरि बोलति हो मुनि नाहिं कसें ॥
भागिरथीसम भागवतींचहि आननिं ऊठति बोल असे ॥
तत्त्वविचारिच चित्तचि निग्रहि मानस शोधक जाणिल हें
नाहिं तरी रस हा इतिहासचि गोडिच हो बहु घेउत हे ॥ ३४ ॥

यारिति हो मति बोधनिं पाहुनि शोध निकामनिं लावियला ॥
दीपचि केवळ अंतर शोधनिं नामरसायणिं जोडियला ॥
कारण हा गुरु माथजि हो एक मानुनिया मनिं पाळियला ॥
अनंत गोविंद माधव यादव रंगणिं आणुनि नाचविला ॥ २५ ॥

॥ इति उत्तरभाग समाप्त ॥

## ॥ स्वात्मसुबोध ॥

( शार्दूलविक्रीडित. )

वंदोनी निधिजापती पदिं मतीमाजीं भरे प्रेम तो ॥
जो कां स्वात्मसुबोधभावभरणी संताघरीं वाढतो ॥
नित्यानित्य विचारवंत अवनीमाजील चिंतामणी ॥
चिंताहारक संसृती भ्रमहरी वाणीप्रभाकीरणीं ॥ १ ॥
ध्यानीं नित्य वसो अनित्य हरवी विज्ञप्ति हे मानवा ॥
जायाची तनु ही कळोनि भरसी मोहाब्धिमाजीं जिवा ॥
संसारीं धरि अंतरीं सममती भावें गती पावसी ॥
भावावांचुनि नाससी तनु फुकां भ्रांतीत हेलावसी ॥ २ ॥
वादें गोउं नको फुकां नट नको शास्त्रार्थ वाणी नको ॥
योगाभ्यास नको बहु फिरु नको संसार त्यागूं नको ॥
वाळोनी भर प्राक्तनीं जनिं असे साक्षी वसे या भवीं ॥
ब्रह्मापासुनि पिप्पलीमधि असे आत्मा सबाह्यान्वयीं ॥ ३ ॥

( इंद्रवज्रा. )

भेदू नसावा किमपी मनातें ॥ भूदेवसंता नमिजे हितातें ॥
लौकीकमार्गी वसणें सुखानें ॥ नारायणाचे गुण गा मुखानें ॥ ४

( शार्दूलविक्रीडित. )

ध्यासीं नित्य हरी जरी धरिं तुवां वागोनिया जोडसी ॥
संतांचीं चरितें सुबोधक मतें गावोनियां वाढसी ॥
होसी होडमती भिती हरविसी संतावरीं वागसी ॥
देती ते निजशांतिसी मग तुसीं पाहूनि तूं तोषसी ॥ ५ ॥

भेदाभेद निती मनोघनिसितें जाणोनिया खेळसी ॥
बाणोनी निजबोध आत्मतरणि विश्रांतरीं घोळसी ॥
कवारी जरि भाव तो निढळिचा अभ्यास बाळाकृती ॥
कीर्ती गात अनेक गूण हरिचे प्रेमें जडे या हिर्ती ॥ ६ ॥

( इंद्रवज्रा. )

माया हरीची भवतींत साजे ॥ आया नये ही अभिमान काजें ॥
छाया जसी कां तनुची विराजे ॥ आत्मा प्रकाशें मन बुद्धि साजें ॥७॥

( शिखरिणी. )

स्वरूपीं हे माया गुणगति असे भासक मना ॥
मनाच्या छंदानें अभिमति वसें ठाव मदना ॥
भुली हे नाटोपे गुरुविण कदा ज्ञानगतिनें ॥
अगा ज्ञानाज्ञानीं विचरत असे शोधगतिनें ॥ ८ ॥
कळे छाया मिथ्या ह्मणुनि न वसे दृष्टिवरती ॥
पडे विष्ठामुत्रीं परि नच धुळी कोणि जगतीं ॥
तसी आत्मीं काया कृत उभवणी भेदकपणीं ॥
परी नाची सोडी परमपुरुषा ध्यासकपणीं ॥ ९ ॥

( इंद्रवज्रा. )

जाणीव छाया कशि मूळ देहा ॥ नेणीव तेथें गति कर्म गेहा ॥
स्वात्मा न जाणे गुणभावना हे ॥ आत्माचि पाहे सकळी लिळा हे ॥१०॥
भूतें अनेकीं प्रतिबिंबभावो ॥ आत्मा रवी तो अखिळप्रभावो ॥
जाणीव नेणीव तयासि नाहीं ॥ मायागुणानें गति हे प्रवाही ॥ ११ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

जो कां सागर नाम पावत असे नीराविणें ना दुजें ॥
वापी कूप तडाग व्हाळ नदि ही नामीं अनेकीं रिजे ॥
वारी एकचि क्षार गोड गतिनें भावार्थ भिन्नाकृती ॥
पारावार विलोकनीं जन वदे नामें अनेका रितीं ॥ १२ ॥
जो कां आत्म सबाह्य भाववुनियां व्यापोनि राहे भवा ॥
तोची सागर संत बुद्धिजिवनें उल्हास नित्यीं नवा ॥

चंद्राच्या उदयीं निधी भरतसे ज्या संगमीं त्या नदी ॥
संतो राम कथा विबोध उदयीं आनंद पावे पदीं ॥ १३ ॥
संगें जे वसती तयासहि तही प्रेमा करी जोडणी ॥
विज्ञानी सम आत्मबोधक मती दृश्यार्थ साक्षी उणी ॥
चंद्रासी द्वितिये प्रती तरुवरी फांदी सुमारें दिठी ॥
सांगे देखुनि दूसऱ्या प्रति तसा साक्षी स्वार्थी उठीं ॥ १४ ॥
जैसी जारिण दाखवी पतिप्रती पातिव्रता वैभवो ॥
चित्तीं ध्यात असे अखंड प्रिय तो जो कां सुखा संभवो ॥
तैसेची रितिनें अहंकृति वसें संसारिं वागे खुपी ॥
ध्यासें आत्मवसे निसीदीन मना सूखार्थ वागो कुसीं ॥ १५ ॥

( इंद्रवज्रा. )

सासूरवासी परकांत योजी ॥ चित्तांतरीं तो परि ना वरी जी ॥
कुंटीण येथें बहु ऊपकारीं ॥ भावार्थ घेई सुखदप्रकारीं ॥ १६ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

जातीनें अबला तशांत:तरूणी कांता घरीं राहिली ॥
लौकीकीं नच डागली परनरा भोगोनि संतोषली ॥
ठावें ना पतिला असाचि वहिला योगी भला या भवीं ॥
जो कां वागुनि लौकिकाकृति वसें स्वात्मान्वयो सांचवी ॥ १७ ॥

( स्रग्धरा. )

आशा तृष्णा मनादी षडअरि उदरीं वागताहे अहंता ॥
कांता बुद्धी विलासा परभुवनिचि हे आणिली शब्दवार्ता ॥
आहे जी कां परार्थी समपण उगमीं दाविते लोकमार्गा ॥
शोधीते नित्य भावा अनुभव सगुणी जाणता आर्यवर्गा ॥ १८ ॥

## ॥ स्वात्मबोध ॥

( वसंततिलका. )

वंदोनियां गजमुखा निजयोगभावें ॥
भावार्थ आत्म उभवें प्रतिति स्वभावें ॥
स्वानंदकंद मुळचा सहजा रितीनें ॥
भेदार्थ भाव प्रगटे वरि आकृतीनें ॥ १ ॥

स्वानंद नित्य सहजें भ्रम त्यासि नाहीं ॥
स्वानंद नित्य सहजें भ्रम त्यासि नाहीं ॥
अज्ञानज्ञान विषमाकृति टाळुनीयां ॥
भावार्थ जो उगवतो निजहीत ठाया ॥ २ ॥

(इंद्रवज्रा.)

जेथें विराळी अभिमानबुद्धी ॥ मी देह ऐसी नच ज्या उपाधी ॥
मानापमानें समता तयासी ॥ जो वागतो आत्मलबाह्य देशीं ॥ ३ ॥

(शार्दूलविक्रीडित.)

तृप्तीचे पुर ढेंकरें कळविती स्वानंदवाणी वसें ॥
क्षूधीता श्रवणीं पडेल तधिं हे होईल जाणीवसें ॥
येती बोध स्वआत्मशोधकरणीं नामामृता पीउनी ॥
सत्संगें करुनी निती वसविल्या होई मती उन्मनी ॥ ४ ॥

(यूथिका.)

काम पूर्णपदवीप्रति पावला । कामनाकृति भवार्थ अगोडिला ॥
भोजनें षडरसीं नर जेविला । तृप्तिचेवरि क्षुधे नच चेविला ॥ ५ ॥

(शार्दूलविक्रीडित.)

आनंदा मिळला कदां न उरला भेदाकृती या भवीं ॥
ज्याचें तेज गुणाधिकार पसरे शांती तया संभवीं ॥
ब्रह्मांडा भरुनी उरे भजनिं तो चिंता हरी संसृती ॥
आदी अंत मुरोनि प्राप्त कळि हे सारार्थ तेजाकृती ॥ ६ ॥

(इंद्रवज्रा.)

कैसें वदावें रुप आत्मयाचें ॥ सर्वार्थ भावें मुळ आकृतीचें ॥
वाणी न वादें वदवीत साक्षी ॥ भोगाविणें भोगकळा सुलक्षी ॥ ७ ॥

(स्वागता.)

लक्षणाविण गती मति लाहे ॥ मानवी भवभ्रमाविण आहे ॥
कोड कांहिं तुरवी सुखवीतो ॥ आत्मभाव वदवी न कवी तो ॥ ८ ॥

(शार्दूल०)

शब्दाचे समभाव नीज वदती वीवेक विज्ञानतें ॥
सिद्धांतें नच येथ धीर धरणें वाक्यार्थ लाजाळते ॥

वेदांचें उरलें न कांहिं वदणें मानी तया स्वामि हा ॥
वागे वागणुके स्वसूखगणती संताप्रती वाद हा ॥ ९ ॥
ज्याचेनीं सकळी कळे भवबळें नाहीं भिती मानसीं ॥
सत्तामात्र वसे असोनि न दिसे तादृश्य तेजावसीं ॥
जैसा सागर खेळवी लहरिया अंगावरी आपुल्या ॥
आत्मानुभव योगिही सरि तया भावी मनीं आपुल्या ॥१०॥

( स्वागता. )

मीपणाप्रति कदां निधि नेणे ॥ संतही अभिमतीप्रति नेणे ॥
क्षार तो जलमिषें रस जोडी ॥ क्षार हा भवगती निति जोडी ॥ ११ ॥

( इंद्रवज्रा. )

आत्माप्रचीती नटल्या पराधी ॥ अज्ञानज्ञानाकृतिते न बोधी ॥
ना पंथि दिक्षा मग तेथ कांहीं ॥ एकात्मता ही बुडवी प्रवाहीं ॥१२॥

( यूथिका. )

साक्षिला वदवुनी जन पाळवी ॥ पक्षि हा जगनिती न कळे भवीं ॥
लक्षिला जरि तया तरि संभ्रमीं ॥ नातुडे भवतिचा गति जो क्रमी ॥ १३ ॥
ध्यानवीण धृति हे समधारणा ॥ ध्यातयाविण रमे त्यजुनी पणा ॥
सार हें गवसतें गुरुगम्यते ॥ भक्ति योग चवथा बुध जाणते ॥ १४ ॥
सद्गुरू भजनि हा महिमा वसे ॥ सद्गुरू रुपहि या गतिनें असे ॥
ना कळे किमपिही इतरांकडे ॥ संसृती नट गुणाकृति मार्कंडे ॥ १५ ॥

( मालिनी. )

भजन गुरुवराचें वाच्य जें नीज वाचे ॥
नच सरत पदातें पावल्या चित्त साचे ॥
मन नच मरता हे आत्म होई स्वतेजें ॥
जल विरवित जैसी शर्करा गोड वोजें ॥ १६ ॥
मनपण नच ऊरे आत्म भावार्थ होई ॥
जलपण जल त्यागी शर्करागोडि देई ॥
जलपण नच भंगे शर्करा आंत दावी ॥
अरुपपण करोनी आपुल्या रंगभावी ॥ १७ ॥

मनपण भवनीती स्वाद त्यागोनि आत्मा ॥
विरवुनि निज योगें भाव झाला स्वआत्मा ॥
मति पण नच गेलें चाळवी भक्तिलीला ॥
निजगुण अगुणाचे बोधनाशा कलीला ॥ १८ ॥

( शार्दुल० )

ज्याचेनीं नच कायही परपणें राहे दुरीं मानसीं ॥
ज्याचेंनीं नच होय कायाहि परी सारे करी जो खुशी
ज्याची भावगती उदीत भजनीं नित्यान्वयीं नित्यची ॥
देहातीत उभा स्वभाव रिजवी दूजा न जाणे रुचि ॥ १९ ॥

( स्वागता. )

श्रीगुरू भजनामाधिं आकळे ॥ आकळोनीं वरीवरि आकळे ॥
नासरे रस हा क्षुधिता मुखें ॥ शांतले तरि येथन विन्मुखे ॥२०॥

( शार्दुल० )

भाग्याचा भर ज्याकडे जडणिला आद्यार्थ साध्यांतरीं ॥
ध्याता तो गुरुगम्यते करुनियां ऐक्यान्वयें श्रीहरी ॥
सर्वांचा जनिता गुणाब्धि वसता ज्याचा नसे ठावतो ॥
गांवीं या नर साधनीं वसविला मक्ती सुधा भाव तो ॥ २१ ॥
संताचें निजगूज पंथ गतिला मानूं नये जाणतें ॥
पंथानें क्रम चालिल्यावरि तयां लाधे तरी लाभतें ॥
जैसा मार्ग क्रमोनि जाय पदिचा ठायाप्रती योजिल्या ॥
खुंटे पंथ बसे भला न विसरे झाल्या गती आपुल्या ॥ २२ ॥

( इंद्रवज्रा. )

पंथांतुनीया परपार गेला ॥ स्वानंद सेजेवरी आरुढेला ॥
भोगीत भावा मग तेथिचा तो ॥ तापत्रयाचें कसणीं न येतो ॥२३॥
ब्रह्मा न नेणे गति आपुली हो ॥ नेदांत पाळी अभिमान लाहो ॥
सोहंबिजाचें माधिं आंतुडोनी ॥ राहे सुखानें परि सानमानीं ॥ १४ ॥
सोहंपदानें बिज दग्ध नोहे ॥ अज्ञानची तें विपरीत आहे ॥
सर्वात्मासिद्धी नच या प्रतीती ॥ एकापुढें ही गति संत ख्यातीं ॥ २५ ॥

सोहंपणाखें प्रतिपादुनियां ॥ त्यागी अहंभाव स्थुलार्थ माया ॥
त्याही वरी काक्य विवाद भेदें॥ फोडोनि सोली निज नित्य वादें ॥२६॥

( द्रुतविलंबित. )

शून्य भेदुनि मती गगनासी ॥ जोडली निजकळे भ्रम नाशी ॥
नातळे करतळी असुनि नसे ॥ धन्यधन्य सुजनाख्य हो असे ॥ २७ ॥

( यूथिका. )

निःकामभाव प्रतिचा जधिं सौभरे ॥ सर्व सिद्धि वळती खुषिं आभरे ॥
ऊपमा परिस मा सरि पावणें ॥ धन्यधन्य सुजनाख्य असें जिणें ॥ २८ ॥

[ इंद्रवज्रा. ]

खोटें खरेंना गमणें जयाला ॥ लीला जयाची नच वेम लीला ॥
ज्याचेंनि योगें सुखसंपदा ये ॥ आनंद संताकृतिचा सुन्यायें ॥ २९ ॥

( शार्दुलविक्रीडित. )

कोणासी नच हा उणा परि बहु दूरी असे साधनीं॥
जेव्हां लीनपणाप्रती मति रमे साधे तधीं बोधनां ॥
मायेचा भ्रम हा लटीक ह्मणती ते नेजती या सुखा ॥
मायाची परिपूर्ण हे अवगमे नीजान्वयाच्या सुखा ॥ ३० ॥
निद्रेचें मिष थोकडें करुनियां जो नीजला जागृती ॥
ना ऊठे पुढतां कदांहि समयीं जाणीव ही जाणती ॥
ऐसी जें प्रगटे सुबोधप्रतिमा कार्याविणें कारणीं ॥
नाहीं हो इतरां दुभाव गडिया वीवेकचिंतामणी ॥ ३१ ॥

( इंद्रवज्रा. )

सर्वांभुतीं जो निजता विलोकी ॥ आत्मा दुजा ना समहाचि लोकीं ॥
आत्मा म भासे सगुणाविणें हो ॥ निर्गूणतेंची सगुणाकृती हो ॥ ३२ ॥
दोनीहि एकाकृति जोडलेलीं ॥ बीजामधीं त्या उभयार्थ डाळी ॥
डाळीमधीं मोड निजार्थ जैसा ॥ कोमळांग गतिचा निज हेत तसा ॥३३॥
आदी अनादी रूप आकळावें ॥ त्याणें स्वशोधा मग काय जावें ॥
आधीं न बाधे द्विविधाकृतीतें ॥ तोची अनादी गुरु नाथ मातें ॥ ३४ ॥
मातेहुनी जो कनवाळु पोटीं ॥ जो ताप नासी उभयोनि गोठी ॥
पायीं तयाचें सततीं मनानें ॥ ठाणेंच केलें बहुतां प्रितीनें ॥ ३५ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

स्वादाची परिया रिती गुरुगती येकान्वयें मातली ॥
संधी साधन सोडुनी विजयि हे सर्वांमधीं हो भली ॥
येथेमी बरवा अनंत गतिचा झाला भरू निर्भरू ॥
वंदू श्रीगुरु येकनाथ सदया चित्तांतरीं जो भरूं ॥ ३६ ॥

## ॥ योगेंद्रवर्तन ॥

( शार्दूलविक्रीडित. )

हेरंभा गणनायका दिनदयावंता वसंतालया ॥
हे जी विघ्नविनाशना गुणप्रभू भूपाळ लोकत्रया ॥
आत्मानात्मतया अदोष समया वार्या कराया भया ॥
गायाला गम दे वदे निजपदें नांदे गदें स्वान्वया ॥ १ ॥
संसारीं हरि ना उरीं धरिं तरीं भारी अरी त्यावरी ॥
नारी नागखडी जडी घडि घडीं ओढीत काळाघरीं ॥
मोहाची धडकी थकीत तिडकी हांकी स्वकीयांतुनी ॥
नीती लोभ किती मती न गणती गाती सदां संत ती ॥ २ ॥
जायाचीच खचीत नासुनि तनू जाणूनि बाणूनि घे ॥
वाणूं आननिं जारणी रजकणीं वाणीधनी वाण गे ॥
नाहीं काम अपूर्ण भावभरणी वाणीळ जो कां हरी ॥
सारा मीत भवार्थ लाधत तयां मायाभ्रमातें हरी ॥ ३ ॥

( शिखरिणी. )

हरी गातां गीतीं सकळ फळती भोग निगुती ॥
चिती स्वानंदाची विषयअरुची कारकगती ॥
अगा शांती नाहीं समपणविणा लौकिक मदीं ॥
नदी हे मोहाची मगर ममता हृद्ददपदीं ॥ ४ ॥
धरोनीयां ओढी बुडवित जळीं देत घडकी ॥
अविद्येची ढोळी मधिं भरुनियां देह उरकी ॥
असे देहीं प्राणी तववर घणी भेदकसणी ॥
बहू येती ओढी कळुनि वसळा नंत धरणी ॥ ५ ॥

बहू योगी मूनि जपि तपि कपी धुंडित जया ॥
तयालागीं संतें उदरिं समते भावविनया ॥
भवोहारीयेला अभिमतिमळा पासुनि कळा ॥
निराभागीं जैसी कमलिण फुले रूपकमळा ॥ ६ ॥
मळा तें नीरातें त्यजुनि वरि ये जेवि कमळी ॥
तसी बुद्धी संती आतित भवती होउनि बळी ॥
असे व्यापोनीयां जलकुमुदिनीपत्रभरणी ॥
भवार्थी योगीयां अनुभवपदें लक्ष जडणी ॥ ७ ॥
भवाच्या छंदानें मन नच बुडे नीज मुनिचें ॥
परी राहे ध्यासें वरिवरि असे साक्षपणिचें ॥
जळाधारें पत्रें तराति वरती व्यापुनि जळा ॥
फुलाधारें शोभे मधुकर बरा होय सुजळा ॥ ८ ॥

( इंद्रवज्रा. )

योगेंद्रावो अनुतापभावें ॥ भावें जयाला हरिलाचि गावें ॥
कावे तयांगीं नच लौकिकार्थीं ॥ अर्थीं सदाचारगती समर्थीं ॥ ९ ॥
वाढोनि आली कमळी वरी तें ॥ ती तें न जाणें निर अंतरातें ॥
वीचारमात्रें मन वाड येई ॥ संसार वारी वरि ये उपायीं ॥ १० ॥

( मालिनी. )

रवि उदयप्रभातें पोसली नीजतेजें ॥
निजहित अनुरागी वीकसे पद्मवोजें ॥
सहज गति जयाची पोसली काळमानीं ॥
सदयहृदयवासी येत तेथें भरोनीं ॥ ११ ॥

( भुजंगप्रयात. )

परागी विरागी धरा भागवासी ॥ नरागी असा देखणा योगवासी ॥
जसा साखरेचा जळा मेळ झाला ॥ रुपा मूकली शर्कराकार गेला ॥ १२ ॥
परी गोडपानीं वसोनीचि ठेलें । अभिन्नाकृती यारितीं संत ठेलें ॥
अनेकार्थमार्गें अनूमान वारी ॥ यया साच सिद्धांत सिंधू विचारी ॥ १३ ॥
अनेकापरी बुद्धि हे मानवाची ॥ हरी वागते वासना अंतरीची ॥
जसी सोडिली वावडी जात दीसे ॥ असे दोर हातीं तसें सूत्र भासे ॥ १४ ॥

## ।। सद्गुरुलक्षण ।।

( शार्दूलविक्रीडित. )

मोहाची मुरडी गडी नरडि जो भीमाकृती तो बळी ।।
गाळी गाळ ऊगाळुनी गुणकळा काळार्थ बोधोन्मळी ।।
झोळी ना पथ पक्ष आचरण त्या पक्षी असा तो हरी ।।
गावा नीगमबोध माधवधणी एकात्मता ज्या घरीं ।। १ ।।

( स्रग्धरा. )

त्यागी भोगी समानी उगम जिहमनीं सद्गुरू तोची मानी ।।
मानी ध्यानी जनीं जो स्थिरचर विभुतीमाजि मीं पूर्ण मानी ।।
मानी नाची कदांची बहु विध विरसीं भ्रांतिभेदार्थ वाणी ।।
वाणी वाणी अनंतीं अजर उभव हा स्वात्मबोधार्थ वाणी ।। २ ।।

( शार्दूलविक्रीडित. )

शांतीची नव कांति हे भवभिती वारावया पावली ।।
माउली समली प्रतिष्ठभुवनीं एकादशोद्धावली ।।
साऊली सकला कला अवनि हे अद्यंत स्थोतीविणा ।।
दीनाचार अनंत संत पादिं या येकात्मता देखणा ।। ३ ।।
जो कां आगामिं माजला निशिदिनीं चित्तांतरीं भाव तो ।।
तुष्टी दे वाहिली विचार निज हा विज्ञानतें पावतो ।।
भावी तो मग साम्यते तदुपरी तोची स्वयें होउनी ।।
गोसांवी सद हा अनंत मिळणीं माजीं असे नासुनी ।। ४ ।।

## ।। विनयार्जव ।।

( शार्दूलविक्रीडित. )

संतोषात्मक भाव भार भरला वारोनि भ्रांतीभ्रमा ।।
भातीबोध निजान्वयो व्यतिरिकें चिद्रूपमायाक्रमा ।।
वाढीं वाढत सार तो अनुभवो भावार्थ दाटे घणा ।।
विज्ञानान्वय अर्जवो आजित हा स्वानंद शांता मना ।। १ ।
वारोनी निशिला विलास रविला लोकांतरीं चेतला ।।
झाला लोप कला भला विदुकुला वन्हीप्रभे हारला ।।

तेजें चेतवि गूणभूत भुवनीं नीरामयीं राहुनी ॥
तैसा जो जगसाक्षिचा समक्रमो विज्ञानभावांतुनी ॥ २ ॥
वाणीला सकळी बळी भवमळी पासोनि वेगाळला ॥
बाळाभ्यास अभास भास हरण्या आद्यार्थ चित्तांतला ॥
त्याला योग वियोग भोग भवती जाणोनि जो आगमीं ॥
मीं कोणा ह्मणणें ह्मणोनि जडणें नाहीं तनूलागुनीं ॥ ३ ॥
मानेना भवताप पाप तनु हे हेवा स्वभावें सनी ॥
कामीं व्यागत लिंगभाव समते आराम याचे क्रमीं ॥
ऐशा जो रितिनें मनें उगमिचा चिद्बोध आच्छादला ॥
झाला तोचि बिचार सार जथितां सूपर्णचारी भला ॥ ४ ॥

( मालिनी. )

सदचिद्गतियोगू योग ईशा प्रवेशा ॥
भवभयगमनाशा ध्यास हा आत्मवेषा ॥
विनयमति अरोगी राग जोडी स्वबोधीं ॥
सहजपण उभारे साधुका साज बोधी ॥ ५ ॥

( इंद्रवज्रा. )

बोधें चळे जो मुळभावभावें ॥ भावें जयाचा श्रम नाश पावे ॥
स्वप्नावरी जो गडि चेवलेला ॥ स्वप्ना मुकोनी रुपहेत त्याला ॥ ६ ॥
नीजार्थबोधें भ्रम स्वप्न सृष्टी ॥ जाणोनि वागे नूच होत कष्टी ॥
नष्टी न दृष्टी पुरुषीं नया हो ॥ येकात्मता हे समभावनें हो ॥ ७ ॥

( स्रग्धरा. )

ठायाक्रमीं प्रभावे सहजपण जयापासुनी वागणूके ॥
सूखें सारीं असूखें भवक्रममतिचीं जाणवी भान फीकें ॥
नीकें ध्यानीं समानी अमन वमन ही गूग कार्यार्थ दृष्टी ॥
सृष्टीमार्गीं सखा तो भुत गुणविभुति नीत निजार्थ तुष्टी ॥ ८ ॥

( इंद्रवज्रा. )

जैसें जळानें जिवजीवनावे ॥ तोची स्वभावो सुजनी प्रभावे ॥
सर्वांभुतीं सूहृद भेदवीणा ॥ ज्याचेनि वाक्यें अभयार्थ खूणा ॥ ९ ॥

( शार्दूल० )

सर्वांचे गतिला गतीन उगमे जैसा मुखा आरसा ॥
आत्मार्थे सकळार्थ भाव वळके सूसंत तो सारसा ॥
संसारार्थ समर्थ भाव उगमीं अंगीं उभे बोधनी ॥
साक्षीचा सगुणी गुणी अगुणि ह्या वीचार सिंव्हासनीं ॥ १० ॥

( इंद्रवज्रा. )

जैशास तैसा गतिबोध देतो ॥ कोणा उणा ना बहु भाव होतो ॥
वाणी विनोदी सम सूख भावा ॥ आत्मा प्रभावे अतुल प्रभावा ॥ ११ ॥

( मालिनी. )

बहुविध गुण माया मूळ ठाया मिळाली ॥
निधिप्रति जलओघें जेविं गंगा मिळाली ॥
जिवन घन सकामी वर्षलेल्या समूहा ॥
उभवुनि समतीरा पातली तेविं पाहा ॥ १२ ॥
अमल करुनि भूमी सागरी ओघ जाई ॥
अमल करुनी चित्ता योगिही आत्म होयी ॥
विमल मुख कलेचा शांतकिर्णीं विदू जो ॥
गुणनिशिमधिं साजे तुर्य आर्यप्रभू जो ॥ १३ ॥

( इंद्रवज्रा. )

आत्मप्रभावें समताचि भोगी ॥ गूणी अगूणी इह भाव योगी ॥
भोगी न त्यागी अनुराग रागी ॥ ना येत भेदाकृतिभासपांगीं ॥ १४ ॥
सर्वांतरीचे गुणभाव जाणे ॥ नीसीकृतीचे दिपकाप्रमाणें ॥
भानू प्रभातीं निसिचे सुतेजीं ॥ तेजा लपोनी गमती समाजीं ॥ १५ ॥
दीपानुभावें दिप दीपपात्रीं ॥ प्रभा न घाली दिनिं अन्य धात्री ॥
तैसा स्वआत्मा समबोध तेजें ॥ भेणेंचि यागादिक साजबोजें ॥ १६ ॥

( शिखरीणी. )

स्वबोधें साजे जो अनुभवबळा स्वात्म अमळा ॥
कळा काळांगीच्या सकळ विकळा देखुनि कळा ।

कळा बारा सोळा अभिमतिमळा पासुनि बळा ॥
खळां कामामोहा उगम क्रम हा भाव विकळां ॥ १७ ॥

( इंद्रवज्रा. )

कोहं न सोहं नच मूढ ज्ञाता ॥ ध्याता न ध्यानू नच माय ताता ॥
सिंधू न बिंदू न गुणी अगूणी ॥ गूणी प्रभावे समता प्रमाणी ॥ १८ ॥

( मालिनी. )

सफल नर मतीचा भाव हा आत्मयाचा ॥
सुजन वरिति भावें लाग नाहीं दुजाचा ॥
अभिमतिमल अंगीं नाचि वागे जगीं तो ॥
भवभ्रम हरवाया आत्मबोधू जगीं तो ॥ १९ ॥

( उपेंद्रवज्रा. )

अनंतलीला गुणभावदृष्टी ॥ उभार होई नच तेथ कष्टी ॥
सुखार्थ छंद अगुणाकृतीचा ॥ भावार्थ वारी भ्रम मानसाचा ॥ २० ॥

## ॥ अनंतपथिका ॥

( पृथ्वी. )

प्रबोधउदयान्वया गुणभुपा गणाधीपते
विनाशविजयानना सरळ भाव शुंडाकृते ॥
जगोद्धरण संगमाक्रमण येकदंता महा ॥
स्वभावभरितासनीं वसुनियां स्वबोधीं न हा ॥ १ ॥
परोक्षमतिनें जनीं निरखितां बहू भागलें ॥
नयेसि विलया अखंड गतिनें म्हणोनी भिलें ॥
दिनोघ मनसा यया विपरितार्थ संगोदकीं ॥
अभिन्नमति ध्यासितां परमभाव गंगोदकीं ॥ २ ॥
कृपार्थ वळला वळें घन हरो उरीं तेथवां ॥
मळासकट नीर खळाळ करि हें स्वबोधें भवा ॥
निजात्मनिधिला मनोवभिळणी सदां सारखी ॥
अनूभवि मदाप्रती विगत तो यया पारखी ॥ ३ ॥

अनाशगतिचा सुवास सहजीं मनूजामधीं ॥
परी नच कदां स्वबोध रमती गुणोघीं नदी ॥
महा बिकट काननीं अभिमती मनोघीं भुली ॥
प्रदोद्भवनि कालिका भ्रमविते असूरावळी ॥ ४ ॥
वळीत सुगमी नमीत पद तें अभिन्नाकृती ॥
मती असि पदांबुजीं वसुनियां करी संगती ॥
अनीत अवनीं अमीत गित हें अजातीपणें ॥
ह्मणेल नच मी अभिन्नतरणीपणें देखणें ॥ ५ ॥
सगा न जनि या उगां भ्रम फुका निका जाणुनी ॥
असे शरण सद्गुरू पदिं असा सुयोगी मुनी ॥
जगीं अजित जिंकुनी जिवशिवा पदांची कृती ॥
कृती निज असे पदीं जडुनियां दिनाचे कृती ॥ ६ ॥
छपे अभिमती सदां स्वरुपिं ते नसे लौकिकीं ॥
कसी पडल कामिना जनदिठी नृपाची निकी ॥
बहूत पडदे जनोघदिठिला अहंतापटीं ॥
मधीं वसतसे सदां निरखीते सखीचा गठीं ॥ ७ ॥
तसी अनुभवी विवेकजथनीं क्रमी संगती ॥
गती नच गभे निसी घर जनां दिनाची गती ॥
जला उलुक फूटका नयन तो दिवा जाग्रतीं ॥
कसा अवगमे उचीत रमण्या तया नीगुतीं ॥ ८ ॥
बहूत भवि या गुणाकृति लिला विलासान्वयीं ॥
न पार ह्मगती तयांत वसुनी मना जाणवी ॥
नसोन दिसतें दिसोन अदिसे असें कानडे ॥
जडे मनुजसंगमीं गमतसे ययाचा पडें ॥ ९ ॥
पडेल भिंति जेधवां निकट त्या जनां सज्जनीं ॥
घडेल प्रचिती अनूभवपणें तदां मज्जनीं ॥
मनीं असुख ज्या यया विषयसंगतीं वाटलें ॥
तया गति खरी अनूभवपदीं पदीं दाटलें ॥ १० ॥

सबाह्य हरि हा कळोनि वळला भवीं भाविकां ॥
तसा न इतरां कुतर्क करितां गती शाब्दिकां ॥
अगा सकळही पढोनि गम ना गमा नीगमा ॥
अभिन्न नच ये गती स्वरुपिं त्या भ्रमाची सिमा ॥ ११ ॥
ह्मणे सकळ जाणता परि कसा कळेना मिं तो ॥
मिं तों वदत जागृती अभिमती तमांधार तो ॥
असें गुज गड्या तुझें तुजकडे अहंता झडों ॥
घडो विजय मानवा क्रम भवा मती ना अडों ॥ १२ ॥
पराग गवसे विरागसदनीं न रागी दुजा ॥
जसा कमळणीवरील कमळीं रिजे ना दुजा ॥
रिजे भ्रमर तो दुजा शलभ ना तया अंबुजीं ॥
तसाचि हरिरंगणीं विमुख हा असे कामजी ॥ १३ ॥
सदां सदन जोडितो धन जसें धनापासुनी ॥
तसे सुमति तो जमा उभवितो अनूबोधनीं ॥
सुआत्मजडितें न डाग कुठिचा असा तेजसीं ॥
अमीत करिं जोडणी अनुभवोभवीं सौरसीं ॥ १४ ॥
अनंत पथिका अनंत समता अनंतालयीं ॥
अनंत वसला अनंग धरणीं कथावीनयीं ॥
सुयोग सजवी समोवपणिचा अभिन्नाकृती ॥
जनार्दन जनीं भरोनि उरला तयाची कृती ॥ १५ ॥

## ॥ सारीपाट ॥

( शार्दूल० )

कैलासाचळवासिया शिवगुरू तारी मला पामरा ॥
संसारांतुनि सोडवी त्वरित गा दुःखें हरी आमरा ॥
सारासारविचार हा मजसि दे दायादकामा मिटी ॥
हे ऊमावर नीलकंठ प्रभुजी शंभो दयाळा जटी ॥ १ ॥
ऊमेचा पति राघवीं मति वरी गंगा शिरीं वाहत ॥
ताता तूं गुणदायका गणइशा भोळी मती भावित ॥

व्याघ्राचें चरमासनीं गजवपू ओढीत अंगीवरे ॥
भाळीं चंद्र जटा शिरीं रुळति त्या नंदी बरा गोजिर ॥ २ ॥

विश्वाच्या जनित्या स्मशानिं वसत्या पंचानना तूं इश ॥
काळा हारित ना कळे भित तुला त्याला न होसी वश ॥
नाहीं आपपरा मनीं तंव तुझा वर्णामधीं शंकर ॥
बापा तूज अनंत मायिक मती आहे पदीं किंकर ॥ ३ ॥

गातो शंकर मंत्र यंत्रित तनू शंभो भवीं हा वर ॥
तारी भाविक बोधुनी भवपुरीं सूरेश ज्या चाकर ॥
गौरा रंग गळां वसे शिर नरा माळा बरी गोजिर ॥बापा तूज०॥४॥

अंबा अंकित वामभाग बरवा शांती सुखाची धृती ॥
हेरंबास कटीं तटीं धरुनियां बैसे पुढें ती पती ॥
अंगानें अरुणाकृती नयनिची शोभा भली हारिणी ॥
कंबूकंठ बरा दिसे जडित तो मौक्तीक हीरेमणी ॥ ५ ॥

देवा ही भुवनीं कदंबजितनीं गूणामधीं चाळक ॥
खेळाया जग हें पटांकित गुणी फांसे त्रिकाळीं चक ॥
चौऱ्यांऐंशिगणी गणीत वरकें योनीरुपें मांडित ॥
शंभो संगति खेळती नरद ती या मानवी शोभत ॥ ६ ॥

शीवाशेव करोनियां गुण भरी चैतन्य चित्तांतरीं ॥
नांदे आपण आंत चाळकरुपें ज्ञानामृता पाझरी ॥
रेजा एक त्रिगूण मीत पगडा बाराच सोळा कळी ॥
रेजा जो छक काममोह बरवा दुड्डीहि भ्रांतिभली ॥ ७ ॥

कल्पें कल्पित कामना निजकरीं टाकी धरी भूवरीं ॥
शब्दें नाद भरे नभीं तिनगुणी काळांत हाके सरी ॥
भासे तें जग हें बरें गुणरुपीं वागे मती साक्षिण ॥
अंत्रे तूज अनंत दीनमतिचा वंदी गतीचा हिण ॥ ८ ॥

## ॥ गोपीगीत ॥

( वसंततिलका. )

आधीं नमीन मि हरी मदुसूदनातें ॥
वर्णीन गूण समसाधन कौतुकातें ॥
नामामृतीं कथन हें निजकौतुकाचें ॥
वाणी वदे परमपावन प्रेम साचें ॥ १ ॥
नारी हरी व्रजपुरीं नवरंग गाती ॥
भक्ती असी रसिक ना इतरांमधीं ती ॥
प्रेमा मनीं बहु भरे अजि आननीं ते ॥
गाऊं मना रिजविण्या सुखभावनातें ॥ २ ॥
आधीं उठोनि रविच्या उदयावसानीं ॥
ध्यानीं मनीं वसविती अनुभावपानी ॥
गाती गितामृत रवें गित माधवाचें ॥
वर्णीन तें अजि बरें मनमोहनाचें ॥ ३ ॥
शांतीजळें मुख धुती कवळीत शैय्या ॥
गूणाकृती रचिलि जी रजनींत शय्या ॥
भावावरी निज हरी नववोधयोगें ॥
जो भोगिला अनुभवें रसबोधभोगे ॥
ध्यासासनीं जडत तो दिनरात्रभागीं ॥
जागीच जागृति सदां तनुभागि वागी ॥ ४ ॥
डेरा बरा सजविला निजबोधनीचा ॥
मध्यें दधी प्रकृतितें जम आगमीचा ॥
वीचार हा रविरुपें दधि चाळण्याला ॥
आरंभिती घुसळणा बुध कौतुकाला ॥ ५ ॥
बुद्धीरसी करपुटीं उभयांत साजे ॥
भक्ती विरक्ति वरि ही समभाग काजे ॥
चाळी चराचर तदां घुसमूस ऊठे ॥
हा शब्द येत सम गा सुखसिंधुलाटे ॥ ६ ॥

मूर्खें करोनि उठती रसरंगवाणी ॥
सोमास वास सम तो किरणार्थ कानीं ॥
प्रेमास पूर भरती सुखसिंधुठायीं ॥
तेणें नदी पसरल्या सुजनार्थ गेहीं ॥ ७ ॥
छंदें रवी अनुभवी सुद आत्मनीची ॥
तालास कारण मुळीं प्रित गायकाची ॥
गोपी प्रबोध विखरे निजरंग भक्ती ॥
मूर्कींच ऊपनिषेदं न चलेच युक्ती ॥ ८ ॥
गोविंद गोप सगुणा मधुसूदना रे ॥
कृष्णा हरी नरहरी मनमोहना रे ॥
गोपाल बालवदना निगमासमाना ॥
मानापमान तुजला नच देहभाना ॥ ९ ॥
कानू धनू हृदयिचा सगुणाकृतीचा ॥
सोडीत ह्या अरिकरीं बुध अष्टमीचा ॥
पक्षांत कृष्ण वदनांत वनांत कृष्णा ॥
तीरी तिचा सुमतिचा सित हेत तृष्णा ॥ १० ॥
शामा तमा हरविण्या तव बाळवाणी ॥
गार्णी मना सुचति रे मति हेत वाणी ॥
म्हाणीत म्हाणि जननी जनकृत्यकार्जी ॥
पाणी करें करुनियां निजहेत साजीं ॥ ११ ॥
येई अजीं झडकरीं मज भेट देई ॥
येई बरा धुडधुडा गडणीरमायी ॥
येई घना वरषणीं मति चातकाची ॥
येई हरी सुजनते स्वर मध्यमेची ॥ १२ ॥
येई हरी हरमना हर कामकंदा ॥
येई हरी नवविधी रिति मोदगंधा ॥
येई हरी विधिकृती विधि आत्मनेचा ॥
येई हरी गितरसें सदसंगतीचा ॥ १३ ॥

येई हरी निपुणते बुधछंदवाचे ॥
येई हरी शुभ दिनीं कटि बोधनीचे ॥
येई हरी अमनते रव कौस्तुभाचे ॥
येई हरी मतिमधीं गति जाणत्याचे ॥ १४ ॥
येई मना हरि जरी गितरंगछंदीं ॥
बंदी तुटे असु फिटे सुमनास गंधी ॥
संधी असे शिशुपणीं मति गीत रंगी ॥
तोची भवीं उदधिसा समतो तरंगीं ॥ १५ ॥
का रे हरी व्रजपुरी अजिं सोडलीसी ॥
खोडी तुझ्या स्मरति त्या जिव हा उदासी ॥
लावून गाढ ममता मम देहभागीं ॥
जोगी करोनि सकळां कळ चित्त भागीं ॥ १६ ॥
हे केशवा जड जिवा श्रम फार होती ॥
हे माधवा भ्रमपुरीं कळवाळ येती ॥
हे सांवळ्या मम मना अजिं शांतवीजे ॥
हे दुःखनाशक विभो गिति चित्त दीजे ॥ १७ ॥
वेणूधरा करि त्वरा नच वेळ लावूं ॥
भेटे मला गुजरुपें किति तूज भावूं ॥
कीती करूं उरफुटी दमलोंजि देवा ॥
नाहीं दया तुज कसी अजिं वासुदेवा ॥ १८ ॥
कंठांतरीं मणि तुंची रव गोचराचा ॥
बांधोनियां गळसरी सुजवीत वाचा ॥
खेळे मुखीं गित रसें अनुमोद वाणी ॥
वाणी वदे सगुणते निगमार्थ खाणी ॥ १९ ॥
गायी तुझ्या तुजविणें नच जाति राना ॥
खोडी बहू करिति रे पय नाच पाना ॥
वत्सें मुकोळि बहु हंबरतीं प्रभुते ॥
प्राणांत ओढत त्या तुजस्नेहनातें ॥ २० ॥

पाण्याविणें मिन जसे तुजवीण गोपी ॥
कूपी सुखा व्रजपुरीं गति भाव पापी ॥
प्रेमा घना बळ बरा आजिं याच देशीं ॥
शांती करी सकळिकां बहु रे उदासी ॥ २१ ॥
नाहीं घरावरिं प्रिती धनसूत कांती ॥
वांती करोनि मति ही उठली प्रभातीं ॥
गाती गितीं सगुण तें गित अच्युताचें ॥
वाचेकडोनि तनुला पुनिताव साचे ॥ २२ ॥
गोपीरुपें श्रुतिसख्या निजवेदठायीं ॥
बोधास वास अरुणो सदुपाय पाहीं ॥
आत्मा रवी उदयता बरि नेथ झाली ॥
भ्रांतीनिशी निमलि ते स्वमनेंच चेली ॥ २३ ॥
श्रीगूणवास सरतां सदपादप्राप्ती ॥
नाहींच अर्थ परमार्थ स्वअर्थज्ञप्ती ॥
भक्ती निजाचि रिजते इह देहभागीं ॥
गोडी असे बहु बरी इतरां न भागीं ॥ २४ ॥
गोपी अशा मनपुरी सखभाव हेतू ॥
गाती तया अमन तें सरि बाळ मातू ॥
वाणी अनंत वदनीं सरितानुभावें ॥
प्रेमाब्धिला मिळुनियां बहुतेव धांवे ॥ २५ ॥

## ॥ प्रभातबोध ॥

( द्रुतविलंबित. )

उठुनियां समयीं सुकाळिंगा ॥ गित गुणी हरिनाम हेंचि गा ॥
हरिहरी स्मरतां हरी घरीं ॥ हरि करी तुजला प्रिती बरी ॥ १ ॥
हरि ह्मणा वदनीं प्रभाति हा ॥ हरिल आपद सर्व साच हा ॥
प्रिति करोनि मुखें मनांत रें ॥ मति जडों मळनाश खास रे ॥ २ ॥
सदय हा बहु गा मनीं असे ॥ निजरुपेंकरुनी जनां दिसे ॥
वदत नाम तया घरीं हरी ॥ सकळ काम स्वयें करे करी ॥ ३ ॥

बसवि सेवक आसनीं बरें ॥ बसत आपण सेवकांत रे ॥
दिनसखा असला नसे दुजा ॥ म्हणुनियां कविता हिता गुजा ॥ ४ ॥
यदुपती स्मरणें जिणें बरें ॥ अरिभयाकडुनी दुरी सरे ॥
अरि हरी अरिचा भवामर्धी ॥ सकळ जाणत दास आवधी ॥ ५ ॥
गडि करा यदुकूळ ह्या मणी ॥ निगम गा गम हा गमो गुणीं ॥
धनिपणीं करणी असे गुणी ॥ गुणिपणें सदभाव हा मणी ॥ ६ ॥
स्मर मना मननीं बरें असे ॥ निशिदिनीं सदघोंकणीमिषें ॥
पदसरोजजळीं मिनापरी ॥ सरि करी मतिची असी बरी ॥ ७ ॥
धनसुताहुनि हा बरा खरा ॥ मन रिजे तरि रे कळे बरा ॥
अमनता करितां मनास या ॥ मग वळे सुख तें असी दया ॥ ८ ॥
घन जसा वळतो भुमीवरी ॥ हरि तसा सुजनीं दया करी ॥
नरहरी स्मरणी मनामधीं ॥ हरि भवा भरवी करें सुधी ॥ ९ ॥
मतिमधीं जडतां हितावहा ॥ मतिमधींजडता हिता वहा ॥
मतिमधीं जडतां कवीत हें ॥ मतिमधीं चवि दे बहूत हें ॥ १० ॥
मन स्मरे हरि हा अजीं तुवां ॥ सुख वसें बहुसें हरी जिवा ॥
आजि अनंत मुखें हरी वदे ॥ गडिपणें स्थुळ हें लिही पदें ॥ ११ ॥

## ॥ चिरंजीवपद ॥

( ओवी छंद. )

ॐनमो जी सद्गुरूनाथा ॥ निःसंग निर्मोह ताता ॥
गुणातीता समर्था ॥ नमितों माथां तव पदीं ॥ १ ॥
प्रतिष्ठान गोदातटवासिया ॥ ऐक्य आत्मतेचिया ठाया ॥
मति दे तव गुण गाया ॥ सदपादिच्या राया मजलागीं ॥ २ ॥
कामक्रोधाचा करी झाडा ॥ उघडीं बोधाचिया कवाडा ॥
टाळी अहंपणा द्वाडा ॥ निजगडा करी मज ॥ ३ ॥
वर्णावया तुझिया गुणा ॥ चित्तीं वसे उल्हास दुणा ॥
म्हणुनी भाकीतसे करुणा ॥ प्रबोधअरुणा सुखाब्धी ॥ ४ ॥
आतां नमूं श्रोतां ॥ वक्तेपणीं एकनाथा ॥
वरदहस्ताची कथा ॥ ह्मणुनी कर्ता मी नोहे ॥ ५ ॥

सर्वांठायीं परमानंदू ॥ परी द्वैतपणें झाला भेदू ॥
चित्त चिंती जैसा स्वादू ॥ तोची आनंदू प्राप्त होय ॥ ६ ॥
दशांगुळि याचा ठाव ॥ पूर्णानंदीं सदां भाव ॥
लागतां दुर्जेपणाचा वांव ॥ विषयीं अभाव पैं झाला ॥ ७ ॥
मन चिंती जो विषय ॥ किंवा इंद्रियांचा अभिप्राय ॥
सुखप्राप्ती तेथेंचि होय ॥ आनंद लाहे मनोवृत्ती ॥ ८ ॥
इच्छिलें कार्य जेव्हां होई ॥ मती गुंते सुखाचे ठायीं ॥
न होतां इच्छिलें धायी ॥ दिशा पाही रडतसे ॥ ९ ॥
ह्मणोनी प्रपंचीं दुःख ॥ पूर्ण नसे शांतीसुख ॥
चिंतेची सदां धुकधुक ॥ पोटीं विख कालवतें ॥ १० ॥
पूर्णानंद व्हावया नरकाया ॥ प्राप्त असे गा तुज राया ॥
निकें अवलोकी पत्रा या ॥ चिरंजीव ठाया दावील ॥ ११ ॥
चिरंजीव होणें असे ज्यासी ॥ त्याणीं कर्ण करावें चित्तासी ॥
अधीकार येथें मुमुक्षासी ॥ इतर श्रोत्यांसी सुखकर ॥ १२ ॥
साधन चतुष्टी निका ॥ तोचि येथें अर्थ सखा ॥
अनुरागी साधी विवेका ॥ इच्छी रुका त्यासी नसे ॥ १३ ॥
निःसंग पाहिजे मानसीं ॥ अनुभव विवेकप्राप्तीसी ॥
चित्त मुरवावें एकदेशीं ॥ उपासनेसी हा हेतू ॥ १४ ॥
येक ठायीं चित्त राही ॥ बोधअनुभव प्राप्ती होई ॥
पुढें संगती सज्जनीं पाही ॥ निज घेई साधूनी ॥ १५ ॥
मनाचा करूनियां घोडा ॥ बैसवी बोध निजधडा ॥
विवेकाचा लगाम ओढा ॥ मोह तोडा मनांतुनी ॥ १६ ॥
मोहाठायीं क्रोधा ॥ लावी विषयीं बोधा ॥
अंतरमुख चित्त रोधा ॥ ठाव शोधा आपुला ॥ १७ ॥
राहूं नका एकदेशीं ॥ ठावें होईल ममतेसी ॥
येऊनि बैसेल कुसीं ॥ घरनासी राक्षसी ही ॥ १८ ॥
वळखी करूं नये फार । धरूं नये सिद्धपणाचा भार ॥
मोठेपणीं कामक्रोधा थार ॥ चित्ता वार करिताती ॥ १९ ॥

कार्यावरी लक्ष ठेवा ॥ जगींच घ्यावें अनुभवा ॥
सोडवी त्रिगुणाचा गोंवा ॥ अभेदभावा प्राप्तोसी ॥ २० ॥
तत्त्व विचारी देहावारी ॥ बुद्धीलागीं बोध करी ॥
रामभजनीं प्रेम धरी ॥ शोध संसारीं लावावा ॥ २१ ॥
देह वागवी दीनपणीं ॥ नम्र असावें जगालागोनी ॥
स्तुति ऐकूं नये कानीं ॥ फुग अहंपणीं चढेल ॥ २२ ॥
मोठेपणाचा लागतां घांवो ॥ निंदेठायीं दुःखाचा भावो ॥
अंतरीं होईल खळबळ पहा हो ॥ शुद्ध भावो बुडेल ॥ २३ ॥
ग्राम गीत ऐकूं नये ॥ याचें कारण ऐक बा हें ॥
चित्त त्या ठाया मोहे ॥ मग नोहे कार्यसिद्धी ॥ २४ ॥
निरापेक्ष जरि झाला ॥ तरीही पाहिजे शोध केला ॥
त्यागिलें पाहिजे अहंपणाला ॥ बोल येथील खोल हा ॥ २५ ॥
पंथावरि पोट भरणें ॥ त्यांणींचि भिक्षा मागणें ॥
कर्तेपणा त्यागणें ॥ त्यासी जाणें नाहींच ॥ २६ ॥
प्रारब्ध भाग ठेवी जगीं ॥ होईल तें समभागीं भोगी ॥
चित्त राखी अनुरागीं ॥ विषयभोगीं ठेवूं नको ॥ २७ ॥
गुरुपासोनि बोध झाला ॥ परि तो असे आंधळा ॥
विवेकानें पाहिजे धरिला ॥ वाढी घातला अनुभवें ॥ २८ ॥
पूर्ण बोध होणें जें कां ॥ अधिकाराविणें नसे देखा ॥
वीर पाहिजे एकांग निका ॥ प्रेमळ सखा स्वभाव ॥ २९ ॥
ब्रह्मचारी वानप्रस्थपक्षा ॥ संन्यास परमहंस दीक्षा ॥
नलगे चिरंजीव लक्षा ॥ द्वैतपक्षा उपजवी ॥ ३० ॥
नाम ग्राम पंथ बोली ॥ अहंपणेंचि असे बांधिली ॥
येथें बुद्धी सावध केली ॥ पाहीजे वहिली आधीं ती ॥ ३१ ॥
नामपंथ स्थूळसाक्षी ॥ अविद्येची वळख लक्षी ॥
कर्तेपणीं फळ भक्षी ॥ वासना कुक्षी माजीं दडे ॥ ३२ ॥
ब्रह्मचारी जरी झाला ॥ ब्रह्मीं वळख थोडी याला ॥
जितेंद्रीयपणाच्या बोला ॥ शोध केला नवचे ॥ ३३ ॥

विचारी मनाचा निका ॥ तोची धणी असे या सुखा ॥
ज्यांणीं जन्मार्जित बोध माखा ॥ त्या सुखा काय वर्णू ॥ ३४ ॥
अवघड स्थानीं बसूं नये ॥ कर्मविरहीत राहूं नये ॥
वर्मकर्म बोलूं नये ॥ धरूं नये पक्षपात ॥ ३५ ॥
औघड स्थानीं बैसतां ॥ जनांत फांकेल वार्ता ॥
वाजेल अंगीं सिद्धता ॥ माथां अहंता भरेल ॥ ३६ ॥
जगरीतीं देहा वागवावें ॥ इंद्रियें निग्रहीं चित्त रोधावें ॥
मनोवृत्ती चालावें ॥ बोलावें परमीत ॥ ३७ ॥
चौऱ्यांशी लक्ष योनीं ॥ नरजन्मीं आलों फिरोनी ॥
ह्मणोनी विश्वकुटुंबी मानी ॥ निजधनी व्हावया ॥३८॥
द्वैतभाव मनीं धरणें ॥ तेंचि निजहिता अंतरणें ॥
विकल्पासी वरणें ॥ घडे जाणें अधोगती ॥ ३९ ॥
विकल्पासवें भवभ्रम ॥ विचरूं लागे अधर्म ॥
जडेल त्रिगुणाचें वर्म ॥ मग कर्म सुटेना ॥ ४० ॥
ऐसें जाणूनियां आधीं ॥ विवेकें अनूभव साधीं ॥
तोडी भवाची उपाधी ॥ परमानंद गादी मिळावया ॥ ४१ ॥
जनीं असोनि एकांतीं ॥ राहण्याची ऐके मती ॥
जैसा पतिव्रतेसी प्रिय पती ॥ परी भीती सासूची ॥ ४२ ॥
तेंचि रीतीं येथें पाहें ॥ जग हेंची सासू बाहे ॥
परमानंदी प्रिया हे ॥ बुद्धी राहे आनंदीं ॥ ४३ ॥
सासूचिये जाचणीये ॥ घेणें लागे सुनये ॥
पतीचें चित्त धायिये ॥ ऐसीये गुणीये वर्तत ॥ ४४ ॥
ह्मणोनि जगाचें सोसणें ॥ वर्मकर्म न बोलणें ॥
अनहीत हितार्थ मानणें ॥ निजानंदकेणें साधावया ॥ ४५ ॥
काळालागीं टाळावया ॥ उपाय सांगेन ऐक राया ॥
विसरे आधीं स्थूळा या ॥ अभीमान वायां धरूं नको ॥ ४६ ॥
तूं स्थूळ नव्हसी जाण ॥ लिंगदेह अनादी ठाण ॥
वासनेपासाव उभवण ॥ झाली जाण कायापुरी ॥ ४७ ॥

चित्त हेंची चिन्मय भासे ॥ त्रै अवस्थेचा येथें भास असे ॥
कान देई सूक्षम दशे ॥ अती उल्हासें करूनी ॥ ४८ ॥
चैतन्यरूपी आत्म ॥ हा सर्वांभूतीं सम ॥
यासी नसे क्रियाकर्म ॥ मनोधर्म प्रकृतीचा ॥ ४९ ॥
सुखदुःख आत्मया नसे ॥ परी प्रकृतियोगें भासे ॥
कर्तेपणालागीं डंसे ॥ गुणवसें जन्मकर्म ॥ ५० ॥
गुणत्रयावरता पाहे ॥ अभीमान ठाणें करुनी राहे ॥
अविद्यारजनीमाजीं बाहे ॥ निद्रीत होये दृश्यरूपीं ॥ ५१ ॥
निजठायीं नाहीं रत ॥ म्हणोनि बोळी निद्रिस्त ॥
मोहाब्धींत घोरत ॥ रडत पडत सदां राहे ॥ ५२ ॥
म्हणुनी अहंभाव सोडी ॥ गुणत्रयाच्या मोडी खोडी ॥
अनुभवें भवीं होंचि जोडी ॥ रिती नरकुंडी दवडूं नको ॥ ५३ ॥
अभिमान गेलियावरीं ॥ शुद्धची मग देहपुरी ॥
वृत्ती अंतरमुख करी ॥ इंद्रियांवरी बोधानें ॥ ५४ ॥
भाव ठेवावा भजनीं ॥ आराम हाची राम मानी ॥
जावया प्रेमाचे सदनीं ॥ भाव धणी भक्तीचा ॥ ५५ ॥
फार खादाड असूं नये ॥ जगमेळीं बसूं नये ॥
बसला तरी कसूं नये ॥ त्यांचा न्याय लक्षुनियां ॥ ५६ ॥
बोध हाची अरुणकाळ ॥ गुण नासावयालागीं ढाळ ॥
शांतीची घालूनियां माळ ॥ अनुभवचाळ पायीं बांधी ॥ ५७ ॥
हरीनामें भजन करी ॥ आत्मारवी येईल वरी ॥
थीर अधिष्टानीं धरी ॥ व्यर्थ बाजारीं फिरूं नको ॥ ५८ ॥
आत्मरवी कीर्णयोगें ॥ अंतरदृष्टी शोध लागे ॥
अविद्या रजनी सरे मागें ॥ होती जागे अष्टभाव ॥ ५९ ॥
विकल्प खद्योत निमती ॥ संकल्पाचीं घुबडें दडतीं ॥
संशयाचे ढोळीं निगुतीं ॥ जाण निश्चितीं सर्वथा ॥ ६० ॥
ऐसा दीन आलिया उदया ॥ साधूनि घेई आपुल्या कार्या ॥
शरण जायीं गुरुवर्या ॥ मिरासठाया दावील ॥ ६१ ॥

अंतरींच विचार करणें ॥ चुकवावया जन्म मरणें ॥
नरजन्मनाश करणें ॥ हत्या म्हणणें आत्मयासी ॥ ६२ ॥
इतर देहाचें ठायीं ॥ पशुपक्षादिकीं पाहीं ॥
आहार निद्रा मैथून हीं ॥ कर्मै सर्वाठायीं होतातीं ॥ ६३ ॥
नरजन्मीं ज्ञान विशेष ॥ मिटवावया जन्मत्रास ॥
ऐशाचा केलिया नाश ॥ ज्ञान विशेष कोणतें ॥ ६४ ॥
अज्ञानची फार वाडें ॥ मोह क्रोध अंगीं जडे ॥
करुनी वासनेचें घोडें ॥ अभिमान चढे त्यावरी ॥ ६५ ॥
आशा मनशा दुणावती ॥ कामलोभ उगीच उडती ॥
पुण्यपापाचें डोह घडती ॥ गुणप्रकृतीच्यानियोगें ॥ ६६ ॥
सुहृद आप्त मन इच्छी ॥ प्रीती तयापासीं रक्षी ॥
प्रेम ठेवीं याची पक्षीं ॥ सुख लक्षी आपणातें ॥ ६७ ॥
बापा पाहे दुःख तें हेंची ॥ सुख मानीं मूर्ख तोंची ॥
सुखदुःख फळांची ॥ संधी एकची जाणावी ॥ ६८ ॥
जो नर झाला त्यागी ॥ भोगही असे त्याच भागीं ॥
इतर नरां लोकांचे जागीं ॥ भासे परी उगींच ते जाणावें ॥ ६९ ॥
भविष्य काळासाठीं ॥ मदमाशी मद साठीं ॥
जननेत्र तेथें गांठीं ॥ उठाउठी काढितातीं ॥ ७० ॥
संगृहसूख तें हेंची ॥ जें कां वर्ततसे प्रपंचीं ॥
निंदाअनुवादें चित्त जाची ॥ बाकी सत्यची भोग नाना ॥ ७१ ॥
ऐसें जाणूनियां सुखें ॥ शोध करी रोध निकें ॥
पोटामाजीं बोध पिके ॥ विषयसुखें विसरसी ॥ ७२ ॥
विदेहपणीं भक्ती ॥ हीची सायुज्य मुक्ती ॥
निःसंगाची स्थिती ॥ निःसंगची जाणे ॥ ७३ ॥
सोहंभाव जरी झाला ॥ तरी अहंकार बाकी उरला ॥
निर्विकल्प समाधी पोंचला ॥ मेला उरला समची ॥ ७४ ॥
येथें नरजन्माचें झालें काज ॥ परी साधिले नसे व्याज ॥
प्रेमानंदें भक्ती काज ॥ हाची माज संताचा ॥ ७५ ॥

म्हणूनी प्रेमभावें रामीं ॥ भजणें व्हावया आरामीं ॥
सोडुनी दुष्टबुद्धी कामीं ॥ चित्त निजधामीं पोंचवी ॥ ७६ ॥
चार दिनाचा हा बाजार ॥ स्वप्नवत येरजार ॥
कोणाचा रे संसार ॥ पाहे विचार येथींचा ॥ ७७ ॥
बाळपण अज्ञानदसें ॥ पोरपण खेळीं वसे ॥
तारुण्याचें तें पिसें ॥ थारा न दिसे एक मात्रा ॥ ७८ ॥
विषयसुखीं गुंते मन ॥ कामादी अरींची फणफण ॥
द्वैत वाजे बा घण ॥ दणदण भ्रांती नाचे ॥ ७९ ॥
पुढें तें म्हातारपण ॥ हें दुःख मोठें कठिण ॥
स्वरूप येथें विलक्षण ॥ कांपरी जाण अंगीं सुटे ॥ ८० ॥
दंतपंक्ती पडोनि जाती ॥ शब्द स्पष्ट न उच्चारती ॥
नेत्र न्हावूं लागती ॥ भूताकृती सत्य ही ॥ ८१ ॥
शेंबूड नाकीं वाहे ॥ मुखरसाची गळतीच पाहें ॥
हृदयस्थानीं नित्य वाहे ॥ हाल बापा हे काय सांगूं ॥ ८२ ॥
राम म्हणतां लांब होई ॥ बुद्धी सदां भ्रमतची राही ॥
मग हीत साधेल कांहीं ॥ विचार पाही आपुला ॥ ८३ ॥
तारुण्यांतील आसनारी ॥ वृद्धापकाळीं थट्टा करी ॥
मुलें पोरें हंसती भारी ॥ खडेमारी करिताती ॥ ८४ ॥
तेव्हां क्रोध चढे फार ॥ मोह तोही अनीवार ॥
अंगीं न राहे शक्ती जोर ॥ आठही पार दुःखाचे ॥ ८५ ॥
वासना पोटीं घुसमुटे ॥ इच्छिला विषय इंद्रियां न भेटे ॥
मग ममता न तुटे ॥ अंतर फुटे दुःखानें ॥ ८६ ॥
अंतकाळीं दगा ॥ वासना नच वचे भंगा ॥
इच्छित राही विषय संगा ॥ गुणभागा प्रकृतीचा ॥ ८७ ॥
वासनेमाजीं अहंकार ॥ बीजरूपी करी थार ॥
स्थूळ निमे साचार ॥ कर्मभर संचल्या ॥ ८८ ॥
जैसा कोंड्यामाजीं कण ॥ तैसेंचि वासनेत मीपण ॥
अहंकार आरोपी जाण ॥ जन्ममरण भागावया ॥ ८९ ॥

म्हणूनी वासनेचा त्याग ॥ करणें हाची शुद्धमार्ग ॥
टांकूनी अरियांचा वर्ग ॥ शुद्ध मार्ग आचरावा ॥ ९० ॥
वाईट बरें कर्म जें होई ॥ तें मस्तकावरी न घेई ॥
आद्यजन्मा वजा देई ॥ सम होई भोगावया ॥ ९१ ॥
येथें कर्तेपणा धरिसी ॥ तरी समूळची फससी ॥
गर्भवास भोगिसी ॥ यातनेसी जन्ममरण ॥ ९२ ॥
म्हणुनी साधी घडिया घडी ॥ प्राप्त झालिया मानवकुडी ॥
राहूनियां ऐल थडी ॥ पैल थडी शोधावी ॥ ९३ ॥
विचार धरावा निका ॥ मरण असे दीन एका ॥
शत वर्षें दीन सारखा ॥ ममता फुका स्थुळाची ॥ ९४ ॥
स्थूळ मी जें म्हणणें ॥ तेंचि अज्ञान जाणें ॥
म्हणोनी अलक्षीं राहणें ॥ विचार करणें नित्यानित्य ॥ ९५ ॥
उपासव्रत्त येथें नलगे ॥ अन्न ध्यावें भीत भागें ॥
वृत्ती राखावी अनुरागें ॥ विषयपागें अडूं नयें ॥ ९६ ॥
निद्रा फार घेऊं नये ॥ निद्रेपोटी आलस्य होये ॥
आलस्यें काम दुणावे ॥ बुद्धी उणावें पोटीची ॥ ९७ ॥
येकांती निद्रा न करी ॥ बुद्धी भ्रमे विषयावरी ॥
येथें बडे सज्ञानाची कुसरी ॥ म्हणोनी बरी सुसंगती ॥ ९८ ॥
जेथें असे रामचर्चा भजन ॥ किंवा आत्मचर्चा निवेदन ॥
तेथें करी जागरण ॥ सेजारी जाण निजे त्याच्या ॥ ९९ ॥
पोटांत कपट द्वैतमळ ॥ राखू नये बहू वेळ ॥
उघडें बोलावें सरळ ॥ चित्त पोल न होयी ॥ १०० ॥
चित्तीं कपट राखिती ॥ तीची फणफण उरीं जाळिती ॥
फोडी करावी निगुतीं ॥ स्वहीतीं सुखकर ॥ १०१ ॥
बडे जनाची संगती ॥ फार धरूं नये चित्तीं ॥
गरीबांमाजीं वस्ती ॥ करुनी रहावें ॥ १०२ ॥
स्त्रियांसी एकांतीं भाषण ॥ करूं नये कल्पांतीं जाण ॥
बोलणें झाल्या कार्यकारण ॥ साक्षी करून बोलावें ॥ ३ ॥

स्त्रीरूप हाचि अग्नी ॥ पुरुषमन नवनीत मानी ॥
संघटणीं काम पडे विरणीं ॥ मदनमगी उतरेल ॥ ४ ॥
म्हणोनी मातोश्री या भावें ॥ स्त्रियांचें दर्शन घ्यावें ॥
चित्त ऐसेंचि रोधावें ॥ बहु शोधावें नलगे ॥ ५ ॥
निजध्यास चित्ता जडे ॥ तेव्हां उपासना मोडे ॥
साक्षात्कार घडे ॥ अभीमान दडे तळवटीं ॥ ६ ॥
सर्वांभूतीं ऐक्यभाव होई ॥ सहजची मीतूंपण जाई ॥
पूर्णानंद प्राप्त होई ॥ सुख घेई चिरंजीवीं ॥ ७ ॥
ऐसें रीतीं कार्य साधा ॥ हाची मार्ग वैकुंठा सुधा ॥
बोध अनूभवें रांधा ॥ पद शोधा एकनाथीं ॥ ८ ॥
हें चिरंजीव पाहें पत्र ॥ उघडील निजरूपीं नेत्र ॥
भावबळ धरावें मात्र ॥ चित्त परतंत्र करूं नये ॥ ९ ॥
अनुभवाविण बोलणें ॥ कोणी म्हणूं नये उणें ॥
हिता बाणे तरी घेणें ॥ छळकगुणें निंदू नये ॥ १० ॥
येथें नाहीं कर्तेपण ॥ सत्य सद्गुरूची आण ॥
कर्तेपणा कारण ॥ एका जनार्दन पै असे ॥ ११ ॥
अनंत प्रकृतीचा भाव ॥ येकनाथ गुरुराव ॥
भाव तैसा देव ॥ हा अनूभव सर्वांसी ॥ १२ ॥
इती पत्र चिरंजीवीं ॥ वर्णीयेलें मनोभावीं ॥
क्षमा करावी दीनभावी ॥ अनंत स्वभावीं नमन करी ॥ १३ ॥

॥ इति चिरंजीवपद समाप्त ॥

## ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाष्टक ॥

( चामर. )

निर्विकार गूणतीत द्वैतनाश सद्गुरू ॥
नामगोत्र वर्णसूत्र विश्वतंत्र आभरूं ॥
सर्वसाक्षि अंतरिक्ष दक्षपक्ष शांतिचा ॥
साधकासि नीजवाट दावितांचि मूळचा ॥ १ ॥

प्रेमबोध देहशोध वृत्तिरोध दाविता ॥
भ्रांतिपाश सर्वनाश येमनेम जाणता ॥
सर्व भूत जातमात काव्यतंत्र कूळिचा ॥ साध० ॥ २ ॥
भावभक्ति शक्तियुक्ति मोहसूक्ति सागरू ॥
प्रेमचंद्र हा नरेंद्र बोधनीधि आभरूं ॥
बंद तोडि द्वंद खोडि सूखमोद शब्दिचा ॥ साधका० ॥ ३ ॥
दत्तदेवीं भाव ठेवि प्रेम गोंवि पाइरे ॥
नाम गाइ याच देहिं लाज सोडि आर्जे रे ॥
मीपणास नास खास फार त्रास वाणिचा ॥ साधका० ॥ ४ ॥
संपतीच संततोहिं याच पायिं जोडली ॥
दातयासि याचका तुं पाहिजेच मागली ॥
दीनवाणि लीन होइ नम्रतेस लक्षिचा ॥ साधका० ॥ ५ ॥
तातमात आप्तगोत यासि सात नाहिं तें ॥
हृदयहेत मोडि पंत आत्मि बेत दाविते ॥
कर्मधर्म उर्मिवर्म शांतिमर्म पक्षिचा ॥ साध० ॥ ६ ॥
योगयाग जोग भोग रोग येथ तो नको ॥
शोकमोह कामक्रोध आवरोध आवको ॥
भक्तिपंथ नीजसंत येशवंत साक्षिचा ॥ साध० ॥ ७ ॥
ध्येयध्यान मानसांत ठेवुं हेत पायिं रे ॥
सेवुं प्रेम पूर्णतेस कर्णि मंत्र घेउं रे ॥
वासनेस क्षेत्र वास बोध ध्यास आत्मिचा ॥ साध० ॥ ८ ॥
यासमोर थोरथोर सिद्ध म्हंति देखणें ॥
या खुणेस ध्यास लावि भुक्तिमुक्ति ते चणे ॥
बाल्यमत्त तर्कउर्मि शुद्धबुद्धि नेमिचा ॥ साध० ॥ ९ ॥
पंचतत्त्व वाक्य मंथनार्थ शर्थकर्तरू ॥
भर्तभाव वर्ग योग सांख्य सिद्धि वासरू ॥
याच पार्यि हा अनंत प्रीत भाव गोडिचा ॥ साधकासि ॥ १० ॥

## ॥ श्रीसद्गुरुशंकराष्टक ॥

( कामदा. )

पार्वतीश जी पर्वतालया ॥ वासका प्रभो नित्य आलया ॥
पार ना लिके दीनदीन मीं ॥ सद्गुरू तुझीं पाउलें नमी ॥ १ ॥
नंदिवाहना नंददायका ॥ नंदनाख्य तो आपुला निका ॥
विघ्ननाशना औटाविक्रमी ॥ सद्गुरू० ॥ २ ॥
नागभूषणा नाथ निर्गुणा ॥ कारणान्वया नीजकारणा ॥
कार्यकर्मणी भिन्नभाव मी ॥ सद्गुरू० ॥ ३ ॥
सिंधुजापती पादवाहिनी ॥ मौळिं रक्षिली लक्षसाधनीं ॥
पक्ष दुर्मदीं कर्मकंदमी ॥ सद्गुरू० ॥ ४ ॥
स्वात्मसागरा नित्य भास्करा ॥ भक्तिभाव तूं हे कृपाकरा ॥
चित्तचंद्रमा खंड संगमीं ॥ सद्गुरु० ॥ ५ ॥
योगिया युगा अंत आदि तूं ॥ मध्यभास तूं नित्य मीत तूं ॥
प्रेमवारि तूं आर्तभूत मीं ॥ सद्गुरू० ॥ ६ ॥
जीवभाव तूं शीवसिद्ध तूं ॥ नित्यबूध तूं सर्वईश तूं ॥
रामराग तूं संत ऊगमीं ॥ सद्गुरू० ॥ ७ ॥
देहअंत तो अंत ना भला ॥ अन्त आंतुला नंत लक्षिला ॥
भेद आरसा येक भाव मीं ॥ सद्गुरू० ॥ ८ ॥

## ॥ श्रीसूर्यनारायणस्तोत्र. ॥

( चामर० )

भास्कराख्य दिव्यमंत्र द्वादशाक्ष तेजता ॥
दृश्यज्ञान स्थूळमान गूणरूप दक्षता ॥
भावहेत वंदनार्थ मानसांत सांचला ॥
अर्घ्यपाद्यिं कामधेनुछंदअर्थ पोसला ॥ ॥ १ ॥
ज्ञानज्योति तीव्रभाति कीर्ण नीज सज्जना ॥
भ्रांतिनास शांतिवास बोधकीर्णलोचना ॥ भावहेत० ॥ २ ॥
क्षात्रधार्मि शौर्यतेज वीरदृष्टि राजसा ॥
कंदनार्थ दक्ष अर्थ धैर्य भूत मानसा ॥ भावहेत० ॥ ३ ॥

सृष्टि चारि भूत ग्रामिं नाभि धामि अग्नि तूं ॥
साक्षिचा स्वहा स्वधा तुं भक्ष्य भोज्यि ग्रास तूं ॥ भावहेत॥४॥
तर्कशास्त्रिं तर्कवास सांख्ययोग सूर्य तूं ॥
वेदजातिमाज़िं साम ऊपनीषदार्थ तूं ॥ भावहेत ॥ ५ ॥
सर्वसाक्षि सर्वलक्षि पंचभूतिं देखणा ॥
तेज ज्योतितार्थ आप औषधीस कारणा ॥ भाव०॥ ६ ॥
आत्मज्योति दिव्य दीप्ति ऐक्य भावि सृष्टिला ॥
तूं गुरू सत्पदार्थ प्रेमकंद शोभला ॥ भाव० ॥ ७ ॥
सारथी अरूण आकृती बोध तेजिं धूर हा ॥
सत्त्व शुद्ध अश्व येथ सप्तमूख शुद्ध हा ॥ भाव० ॥ ८ ॥
येक चक्र स्यंदनासि वायु वेगि नातुळे ॥
धारणार्थ अर्थ हेत साक्षि धामिं आकळे ॥ भावहेत० ॥ ९ ॥
भक्तकामनार्थ तुष्ट अर्थ इच्छु पुरता ॥
ध्यानध्यायि ध्येय हाचि साधकार्थ घे हिता ॥ भाव० ॥ १० ॥
पूर्व पुण्य शुद्ध जथ हेत या रुपा ॥
कर्म पाश मोहवास जाळुनीच सोडि पां ॥ भाव० ॥ ११ ॥
पायिंचाच दीनसा मि नामरूप ध्यातसें ॥
मीपरूप स्थूळ साक्षि हा अनंत ध्यातसे ॥ भाव० ॥ १२ ॥

---

## ॥ श्रीरामचंद्रध्यान. ॥

( दुसरी सवाई. )

रघुविर राघव राजिव लोचन शीव मनोरम जानकिचा ॥
पतिद्युति उत्तम अक्ष सुलक्षण दक्ष विलक्षण सत्पथिचा ॥
अमल सुआनन अंबुज प्रेमळ संतकुलोद्भव संगम हा ॥
जयजय राजिव पाजिव हा जिव बोधरसोद्भवशांति पहा ॥ १ ॥
किरिट कपाल सुभाल सुगाल नवाळ सुकाळ सुवास समे ॥
मन अनमास्तव साज मनोरम शब्दरसोद्भविं काम निमे ॥
गरगरके चमकें मन हें जडितें घडितें मणि तेजस हा ॥ जय० ॥ २ ॥

चलचल कुंडल मंडित मंडल श्रोत्रज इंद्रिय आभरलें ॥
उपनिषदे समतीं रमतीं सुमतीं गति ती मतिला सजलें ॥
अनुभवमौक्तिक कौतुक हें तुक नासिल सत्य पहा ॥ जय० ॥ ३ ॥
सुनिल सुरंग नभंग नवंग सुसंग सुदंग सुभृंगमुनी ॥
थरिरित ओष्ट स्पष्ट मनोरम कष्ट विनाशक श्रेष्ट धनी ॥
द्विजवाळिपांक्ति विरक्ति सुउक्ति सुमुक्ति न तुक्ति समोक्ति महा ॥ जय० ॥४॥
सुसरस कंबु कदंबु भवांबु सुधांबु सुशब्दरसें ॥
मधुर सुरोक्ति दिनोक्ति समुक्ति जि नक्तिच तोक्ति सदोक्ति वसे ॥
स्वर रसनेस सुवास सुध्यास न न्यास समे सविदेशजहा ॥ जय० ॥५॥
शरधर चाप लतापशमार्थ समर्थ जनार्थ सुदास जना ।
कर करिचे सरिचे शुभ शुंडित मंडित अंबुज स्कंध मना ॥
तळपद कोमल आमळ ते जल सूशिल तें मळनाशक हा ॥ जयजय० ॥६॥
उराधिर मानस मानत मानव मान असा अजि ऐक मनां ॥
निधन जनांत वनांत मनांत विराम सकामधमारि महा ॥ जय० ॥ ७ ॥
उदर स्थुळाकृति सुकृत आद्य न सांचक साधक साद्य भवा ॥
कटितटिं पीत पटास सुवास सदास शमास सुब्रह्म भवा ॥
पद कमलाकृति क्षूधित सुकृत साधन हें सम संभव हा ॥ जय० ॥ ८ ॥
निजसुख आसन मानस मानित मान समान न ध्यान कधीं ॥
तनमय तल्लिण तल्लिग भुल्लिक वर्गणिकारक वेद सुधी ॥
भुवनि पटासन धामन पाहुन साधुन हें धन शोध महा ॥ जय० ॥ ९ ॥
जनक सुनंदिनि अंकिं समागमिं मंडित जंघनि शोभत ते ॥
अरुण समोघ सुलाल सुरंगित दीप्ति महां घृति शोभविते ॥
अधरसुपंक्ति हि मंडित पेंवाळि कोंवळि आकृति तेज पहा ॥ जय० ॥१०॥
जडित जडाव सुभाव जमाव हिरे निळ माणिक आभरणीं ॥
मणकटि कंकण संकट नाशन शब्दरवांमृत द्वैतपर्णी ॥
खिणि खिणि संभव दृश्य सगोचर मुक्तपणा भवशोधक हा ॥ जय०॥ ११॥
भरत सुबांधव भाविक भावनिं प्रेमळ कोमळ सोलिव हा ॥
चवर रघूवर ढाळित मस्तकिं मोर्चळ वारित अग्रज हा ॥
सुगर सुमित्र सुछत्र धरी वरि तन्मयता नित छायक हा ॥ जय० ॥१२॥

पदिं शिर वंदित अंजनि सानुज अंकित भेषज शीवबरा ॥
मग इतरांचि तरा सद्रास धरा न नरा भुवरां असुरां ॥
सकल मनोरथ साधक वांछित मानस पुर्वित सद्गुरु हा ॥ जय० ॥ १३ ॥
सुजन सुमानस हंस रघुविर भास्करवंशज या रितिनें ॥
धृतिमतिशक्ति न वर्णियला मुखिं मुख्य गती नच येथ मिने ॥
अगणित राघव लाघव वर्णन सर्व भुतोद्भव आत्मचि हा ॥ जय० ॥ १४ ॥
भज मन हें धन संत समागम गीतरसामृत आजर हें ॥
घटघट प्राशन बोधमुखें करि आवधि ना अरि नासिल हें ॥
स्थुळमति जाणिव नाशक जाणुनि आजिं अनंत पदीं नमि हा ॥जय०।१५॥

## ॥ भीमरूपी स्तोत्र ॥

( चामर० )

भीमरूप, माहरुद्र वज्रदेही मारुती ॥
वायुसूत रामदूत भव्यजीत शोभती ॥
काळदंड शक्तिचंड दैत्यबंड मोडिता ॥
भावभक्ति प्रेमशक्ति दासबंध तोडिता ॥ १ ॥
जन्मकाळिं सूर्यबिंब बाळवर्ण बाळ हा ॥
चाळकांश क्षूधितार्थ उड्डुणार्थ साधि हा ॥
रक्तबिंब झेंपभागिं पाणिमाजिं बाणिता ॥ भाव० ॥ २ ॥
भास्करास आननांत घालि तेथ नारसा ॥
फोडितांचि सोडिला जि क्षूधितार्थ मानसा ॥
कामकंद द्वंद्वमूळ छेदुनीच सोडिता ॥ भाव० ॥ ३ ॥
सख्यवास सुग्रिवास त्या ऋषीमुखावरी ॥
राघवास भेटवूनि हेतमात वोघरी ॥
वालिघात रामहातिं दिव्यमुक्ति पाविता ॥ भाव० ॥ ४ ॥
वानराख्य मुख्यमुख्य पद्मकोटि जोडिल्या ॥
नीजबोध शक्तिशोध धीर साध्यि योजिल्या ॥
मोहसिंधु दक्ष लक्षि अर्थसेतु बांधिता ॥ भाव० ॥ ५ ॥

मुद्रिकार्थ रामगीत नेट अंगीं जोडिला ॥
ज्ञानधीर ना समीर या गतीस तूळला ॥
रंगिं दंग तो भुजंग पुच्छ भागिं ओढिता ॥ भाव० ॥ ६ ॥
बेफिकीर हंसधीर गूण बेटिं पातला ॥
जानकीस जेथ वास शीघ्र तेथ वाढला ॥
मुद्रिकेंत गोचरार्थ सौख्यभावि दाविता ॥ भाव० ॥ ७ ॥
नाश येथ वाटिकेस दुष्ट नष्ट नाशिले ॥
हेमपूर ज्ञानअग्नि दिव्यज्योतिं जाळिलें ॥
ब्रह्मपाणिं सर्व लेख अर्थहेत आणिता ॥ भाव ॥ ८ ॥
राजिवाक्ष पादपद्मिं शीरपद्म ठेविलें ॥
दीनवत्स अर्भकास भाव अर्थ दाविले ॥
दिव्यपत्र चापपाणि, पाणिमध्य ठेविता ॥ भाव० ॥ ९ ॥
सिद्धजुद्ध सैन्य बूध नीतितार्थ वाचिले ॥
शोधबोधिं अष्टवर्ग देहभागिं पातले ॥
वाळिसूत शिष्ट धीट गर्वपर्वि धाडिता ॥ भाव० ॥ १० ॥
रावणास त्रासुनीच वर्मि गर्व छेदिला ॥
मंटपासहीत तेथुनी तीव्रशक्ति ऊडला ॥
सर्व सैन्य पूर्वरूप सेतु मार्गिं योजिता ॥ भाव० ॥ ११ ॥
शक्रजीत होमनाश देहनाशकारका ॥
रावणादि सर्व दैत्यवीर्यशौर्यहारका ॥
रामनूजशक्तिघातिं द्रोणगीर आणिता ॥ भाव० ॥ १२ ॥
ठाणमाणि चापपाणि बाण हाणि रावणा ॥
कुंभकर्ण आदि दैत्य रावणाख्य कंदना ॥
चीरंजीव सत्त्वधीश राज्यपाटिं स्थापिता ॥ भाव० ॥ १३ ॥
बंदि फोडि देव कोटि देशधाडिं लाविले ॥
आपआप कर्मकाजिं देहगेहिं जोडिलें ॥
जानकीस रामभेटि बोधिं शक्ति जोडता ॥ भाव० ॥ १४ ॥
पुष्पवृष्टि सूरसृष्टि पारमेष्टि वोपिती ॥
वंदनासि देवपत्नि श्रेष्ठ यत्नें लक्षिती ॥
नारदादि थोरथोर भृंगवृंद तोषिता ॥ भाव० ॥ १५ ॥

नंदिग्रामिं बांधवास रामनाथ मीळणी ॥
प्रेमबोध भावजोगिं अष्टभावमाखणी ॥
माय आदि कैक्यादि तेंचि सांधिं मीळता ॥ भाव० ॥ १६ ॥
सर्व देश सूखपर्वि गर्क होति तेधवां ॥
वंदुनीं गुरुमुनी अरुंधतीस राघवा ॥
पट्टस्थानिं स्थादनार्थ व्हूर्त येत साधिता ॥ भाव० ॥ १७ ॥
अष्टसिद्धि चारि मुक्ति प्रेमपार्वि मीळती ॥
चार सांह आठराहि बंद्दिपाणि शोभती ॥
नीजहेम सत्त्वशुद्ध बुद्धिमंत योजिता ॥ भाव० ॥ १८ ॥
मुख्य पीठ लिंगग्राम तत्पदार्थ आसनीं ॥
नीजहेत त्वंपदार्थ वामअंकवाहिनी ॥
पाद ते असीपदार्थ सार्थकार्थ साधिता ॥ भाव० ॥ १९ ॥
नीजबोध पूर्णनंद नीजकंदिं चेतला ॥
सद्यःसाक्ष सज्जनाथ नीगमार्थि पोसला ॥
शोकमोह कामनाश नीजहीत पावता ॥ भाव० ॥ २० ॥
आंजनेय भीमवेष नम्र होत राघवीं ॥
घे सवी मनानवी सुखाब्धिची तुवां भवीं ॥
सर्व अर्थ पूरवीत पुत्रपौत्रि साह्यता ॥ भाव० ॥ २१ ॥
येकवीस सारमंत्र प्रेमतत्विं गोविले ॥
अंतरांत आगमोक्ति दृश्यहेतु आटले ॥
हा अनंत पादपद्मिं भृंगरूपि राखिता ॥ भावभक्ति० ॥२२॥

---

## ॥ निर्गुण ध्यान ॥

( भुजंग० )

नमा आदिरूपा नमो निर्विकारा ॥
नमो सारसाक्षी गुणातीत सारा ॥
नमो नीगमा रामरूपास सनाथा ॥
नमोवाच्यवेदा सदानंद पंथा ॥ १ ॥

नमो विश्वपाळा पुराणा पुरूषा ॥
नमो कीर्तिसारा सगूणेक वेषा ॥
नमो आत्मरामा नमो सूखकंदा ॥
नमो देवदेवा मना हाचि धंदा ॥ २ ॥
नसे नाम तूतें नसे रूप कांहीं ॥
नसे मोहमाया नसे काम पाहीं ॥
सदा बोधरूपा सदा प्रेमयोगा ॥
जगालागिं दाता तुंची देहभागा ॥ ३ ॥
तुंची रामराया जगामाजिं येसी ॥
अरी नासण्या ठाव हाची विदेशी ॥
तुझा जन्म तो नीजभानू कुळीं गा ॥
सदाचार ठायीं दिसे देहयोगा ॥ ४ ॥
अयोध्याभुमी सात्त्विकी देहपूरी ॥
विवेकी असे राज तो भावचारी ॥
तया तीन पत्नी तिघी तीन रीती ॥
दयाशांति एकी दुजी द्वैतनीती ॥ ५ ॥
सदाचारि खासी तिजी सुंदरी ती ॥
असा मान हा आगमीं क्षत्रज्ञाती ॥
तया भावयोगें बहु दीनमानें ॥
वडीलेंकुशीं जाहलें रामयेणें ॥ ६ ॥
असे नीजबोधें तुझा सर्व ठावो ॥
जदां जन्म झाला तदां तो नवावो ॥
तिघे बंधु आणी तुला पाठभागीं ॥
बरे शोभले तेचि गा हे विभागीं ॥ ७ ॥
सुमित्रे कुशीं ठाव झाला विवेका ॥
तसा कैकयीला भला प्रेम देखा ॥
कळाज्ञानयोगें असे शत्रुनाशा ॥
शत्रुघ्न ऐसें मना मोहनाशा ॥ ८ ॥

( वसंतति० )

आनंद हा दशरथा पुरुषोत्तमाचा ॥ योगांत योग निजबोध गमे प्रितीचा ॥
प्रेमास मानस मिळे सुतवाणिमीषें ॥ स्वानंद हा नरतनू मधिं भाग्यदीसे ।९।
गाधीज साधक मुनी तप काननातें ॥ न्हेयी अरी वधविण्या रघुनाथ तेथें ॥
मारी निशाचरि तदां अरि ताटिका ती।बा वासना असुरि ही प्रथमा वधी ती १०
मारीत ते असुर हो खरदूषणादी ॥ मोहाब्धिचे निजगडे गुणछंद भेदीं ॥
मारी सुबाहु वरि तो अरि आत्मबोधा ॥ शोधामिषें गमतसे सदसंतबोधा ११
वीदेहराज मिथुलेशसुता सुबुद्धी ॥ नाहींच संभव कधीं असुरेव बुद्धी ॥
तेथें असे पण बरा शिवचाप होडो ॥ जें कां असे निढळ गा रजभावकोडी १२
जेव्हां रजोगुण जळीं रुपक्षेत्रि धात्री ॥ सात्त्वीक ब्राह्मणकुळें लपलींच धात्री ॥
होवोनि भार्गव तदां रजगूण आटी ॥ दे धात्रि सत्वान्वय ब्रह्मगांठी ॥ १३ ॥
तेंची धनू जनकजा पण हो विवाहीं ॥ जोडील जो शर बरा नवरी तया ही ॥
बोधामृतें करुनियां निजहेतठायीं ॥ वीवेकवंत समभाव समान देहीं ॥ १४॥
ओढी धनू उचलुनी गुणदोरि तोडी ॥ सितापती तधिं असे जनिं नामगोडी ॥
चिच्छक्ति मुक्ति सदशक्ति निजासनीची । झाली मनोभि रघुराज प्रिया मनाची १५
पुन्हां रजोगुण उठे मति मोह देशीं ॥ लंकापुरी असुरी ती नच शांति ज्यासी॥
संसारसागर बहू अपरांपरातें ॥ मोहाब्धि हा मधिं असे गुणबेट होतें ॥ १६॥
लंकेश रावण अहंमतिरुपें बहु वाढलासे॥त्यानीं सुरां सुजविलें मतिबंधिमीषें ॥
नाशास त्यास वनवास परोपकारा ॥ गोदातिरावरि वरा सदपंथधारा ॥ १७॥
शांतीतिरीं करुनियां नवपर्णकूटी ॥ त्रीवर्ग निग्रहरुपें असतीच पोटीं ॥
तेथें असूर वधिले जडलिंग देहीं॥ जी कल्पना जडजिवीं असुरी कुळी ही॥१८
मायारुपें मृग बरा तनु कांचनाची ॥ मारीच नामक असे भुलभ्रांति साची ॥
सीता भुले मृगरुपा हट घेत भारी ॥ आणा म्हणे वधुनिया पतिलागिं नारी। ९।
रामें मृगास वधण्या करितां वनातें ॥ गेलेच निर्जररुपें मन शोधण्यातें ॥
मागें रजें कपट तें असुरावभावें ॥ चिच्छक्ति चोरिलि असे सगुणेक हावें ।२०
वीवेक लक्षुमण तो जवळींच होता ॥ त्यातें वना कुमतिनें दवडीत होता ॥
रामास शोक जडला निजशक्तिरूपें ॥ धांवे वनीं अनुभवी निजबोध तापें २२
वीचार योगि बरवा सुत अंजनीचा ॥ जोडे सखा निजबळें मिष सेवकाचा ॥
सुग्रीव वाळि उभयां प्रितिचें मधीं हो॥वैरानुभाव जडला वनिते करीं हो २४

वालीबळास तुळणा करणार कोणी ॥ नाहीं भुमी नभिं गणीं धाणि चापपाणी॥
वीरोध रोध उभयां मधिं शक्ति तारा । कारास कारण बरें अनुमोद सारा२५
वीरोध हा वधुनियां मग रामराणा ॥ रोधासि पोषवितसे सदपादिं खूणा ॥
वीचार साह्य जडतां अनुभावसैन्यें ॥ झालीं जमा कपिरुपें बहुतेक मान्यें ॥२६॥
सीता रजीं लपविली वन तें अशोकीं ॥ मारूत रूप हनुमंत बरा विवेकी ॥
मोहाब्धि हा उडुनियां तवं पैलपारा ॥ जातां दुजा नच असा भुमिभागिं सारा२७
नामामृतें करुनियां नववीधभावें ॥ मुद्रा असे रघुकरीं हिच खूण नांवें ॥
शोधार्थ शक्ति बरवी रघुराज देई ॥ फेंकी बरी मग करीं वरि घे सिताई ॥२८॥
पाहोनियां मग मनीं अवलोकि सीता ॥ मुद्रा कसीं मजकरीं जडलीच हीता ॥
कोण्या विरें रघुविराकडुनी हि येथें ॥ आणीयली कळत ना अनुमान हो तें २९
भेटे पुढें रघुदुताप्रति प्रेम वाणी ॥ वाणि सितासति अनूभवसाक्षवाणी ॥
वीचार योग घडतां मग शांत सीता ॥ विध्वंसिलें मग वना स्थुळ दृश्यहीता३०
ज्ञानाग्निवास करुनी अरिबेट जाळी ॥ केली असे सुखरसें स्थुळहेमहोळी ॥
या साठिं हेमवति हें नव नाम लंके ॥ लंकावती नरतनू अधरेवसिंके ॥३१॥
वेदांत मात विधिची करलेख मुद्रा ॥ घेऊनियां उडतसे मग त्या समुद्रा ॥
रुद्रावतार अकरा मणि शीखरीचा ॥ वीचार श्रेष्ठ म्हणु ये सद शोध याचा ३२
मोहाब्धिला तदुपरीं रचि हेत सेतू ॥ पाषाण हे अजनता पुजनास मातू ॥
रामाक्षराकरुनियां क्षर तारियेलें ॥ संधींत गारस असे निज शक्ति बोले ३३
गाळ कपी तरुनियां मग त्या सुवेळे ॥ सूवेळ बेट म्हणती जगरीतिं बोले ॥
सत्वांश भेटत बरा बिभिषण नामें॥रामें स्विकार करुनी विदितावकामें ॥३४॥
मारित ते रजतमादिक दोनि बंधू ॥ झाला तदां सकळिकां सुखमेव सिंधू ॥
बाकी निशाचर तदां निजभक्त झाले ॥ तेची चिरंजिवपदीं सदिं स्थापियेले३५
केले सुरां अभिमतीतुनि मोकळे हो ॥ झाले सुखी सकळही जन ऐक्यते हो ॥
चिच्छक्ति सोडवुनियां निजबोध ठायीं ॥ रामास जानकि मिळे प्रितिभाव गेहीं ३६
सायुज्यता सद विमान मिळे तदां तें ॥ बैसोनियां मग तयामधिं राम हो ते ॥
आले अयोध्यनगरीं सदप्रेम धामीं ॥ जेथें वसे भरत तो निजनंदिग्रामीं ३७
भेटोनियां सदगदें भरअष्ट भावो ॥ भावास राघव मिळे सदप्रेमरावो ॥
आले पुढें स्वनगरा पुरिं ग्रामवासी ॥ स्वानंद आसन पदीं रघुलोकवासी ॥३८॥

ऐशारितीं करूनियां सनकादिकांना ॥ रामयणाकृत भवो अनुमान माना॥३९॥
आरामता पद असे रघुराज गातां ॥ गीतांतरीं चवि बहू सद्पंथ हीता ॥
संताप शांत शमना वद वाणि रामा ॥ श्रेष्टावबोध बरवा सकळीक कामा॥४०॥
यांका सकामसकळी निजहेतु ठेवा ॥ हाची गमे नरतनूमधिं श्रेष्ठ ठेवा ॥
भ्रांती अमांत बुडणें मरण पुढें रे ॥ हा अंधकार हरण्या हरिगीत गारे ॥४१॥
नाहीं दुजा इहरितीं सम आणि योगू ॥ प्रेमें करूनि हरि हा भजणेंचि जोगू ॥
झाले कलींत बहु संत बरे निवाडे ॥ स्वानंदभूवनपदीं गमती निवाडे ॥४२॥
नामागुणाविण असे निजहेतुठायीं ॥ निर्गुणरूप गमतो रघु संतगेहीं ॥
जो कोणिं गायि गित हे प्रितिमान भावें॥सर्वार्थ पूर्ण करि त्या रघुनाथ भावें४३
भावामृतास कविता सदवाट दावी ॥ आर्जी अनंत सदनीं रघूनाथ भावी ॥
भावें नमीन मि अर्जी गुरूयेकनाथा॥पायीं असों दिननिशीं स्थुळदेहमाथा ४४

---

## ॥ श्रीसद्गुरुशंकराष्टक ॥

( विबुधप्रिया० )

ॐनमो मदनाशना सद्‌बोधना निजमानसा शिव शंकरा ॥
किंकराप्रति आसरा शशिशेखरा करुणाकरा ॥
सागरा सद ओघरा शशि राघवा निर प्रेमळा ॥
कोमळा मन आमळा दिन वंदितों तुज मंगळा ॥ १ ॥
नमृता मानिं राखिता सद सोहळा निज सेवका ॥
मर्दिता अरि दानवां मन संभवा रस तोषका ॥ सागरा० ॥ २ ॥
सिद्धि त्या निज दासिशा सद शक्तिचा कर खालिचा ॥
युक्तिचा नग मंडणीं चिर जोडणी पद भुक्तिचा ॥ सागरा० ॥ ३ ॥
वाच्यता स्वर अक्षरा डमरोद्भवा कविचाळका ॥
ब्रह्मसंभव दृश्यकारण साक्षरुपास्पद भाविकां ॥ सागरा० ॥ ४ ॥
येमनेमित ज्ञानसोज्वळ शांत स्वभाविक कानना ॥
ध्यान हें तव आश्रितां सुपथास्पद मनमोहना ॥ सागरा० ॥ ५ ॥
मंत्र हा षडअक्षरा सरि भास्कराहुनि पामरा ॥
चांवरा नच हांवरा सुखशांतिचा पदिं आसरा ॥ सागरा० ॥ ६ ॥

मानवा कवि सानसा मतितार्थ हा सुखसंभवा ॥
तोषला स्थुळ खोडिला भव सारण्या नव वानवा ॥ सागरा० ॥ ७ ॥
आसरा बहु चांगला आजि लाधला सद् पाउलीं ॥
माउली गुरु साउली दिठिं देखिली सुख सोहळीं ॥ सागरा० ॥ ८ ॥
पाठका हार तोषुनी मन वांछिता फळ ओपिता ॥
जेसरी निज बाळका सद्माउली कनवाळुता ॥ सागरा० ॥ ९ ॥
सद्गुरू शिवशंकरू सद् नाथ जी गिति गाथिला ॥
हा अनंत भवांबुधी शिवकीर्तनीं निजिं आटला ॥ सागरा० ॥ १० ॥

## ॥ शंकरध्यान ॥

( सवाई )

गिरिवरवासक वासनिवासक राघवध्यासक राव बरा ॥
सदपदवास भवास शमार्थकमाय जमाव तमारि खरा ॥
वर गिरिजा समजा गमजा करिता हरता भ्रमता ममता ॥
जयजय शंकर भृंग मिं किंकर पद्मपदांकित संम्मतिता ॥ १ ॥
झळझळ तें निर आमळ सोज्वळ विष्णुपदोद्भव धारणता ॥
शिरिं जडितीं जडिता शमनार्थ हलाहल तें भ्रमता हनता ॥
वनवन फीरत हा अनुतापि तसा तपला शमतार्थरता ॥ जय० ॥२॥
नयन सुभाळ सुलाल अलक्षण लक्षण लक्षित लक्ष वहा ॥
परसदनांतर सादर साधक सार्थकतां निजसाधनिं हा ॥
मन अमना तमनाशक मानस मान कमान समान हिता ॥ जय० ॥ ३ ॥
शशिकर खांडित मंडित मौळिंत मौक्तिकवेष्टित आभरला ॥
बहु बरवा दिसला खटला मिटला धिट लाघव दे असुला ॥
मुरहर हा अमरा अमरीं अरिचा अरिसा गमला नमितां ॥ जय० ॥४॥
मुखविधवाण पठाण सुटाण भुतांत भुतात निवास गमे ॥
वरकरदायक नायक सेवक मानस तोषक लोकिं समे ॥
उभय सुनेत्र स्वभाविक भावित तेजस खेचर भूचरता ॥ जय० ॥५॥
भंभभंभभंभभभंरव शंख नभांत अघोर भयंकरसा ॥
दर असुरां उपजे भिति घेउनियां पळती चपळे फणिसा ॥
दृज भुज हे अवतारिक तारक मंडित कर्दाळि दिंडगता ॥ जय० ॥ ६ ॥

टिमिकटिटिंडिडडूंगडडूंधुधुडंगर हा डमरू वदता ॥
क्षरस्वर जात जमांत नभांत हिमात मुखांत सुवाणिगिता ॥
त्रिशुळकरांबुज माल सुमाळ फणीश फणेशधृता ॥ जय० ॥ ७ ॥
नरशिरमाल कपालधराय न राय नभांत असा दुसरा ॥
अवघड पंथ सुसंत समागम नंदनकानन बोध धरा ॥
विषधरमंडित कंठ निळाकृति ऊरज गौरज कर्पुजिता ॥ जय० ॥ ८ ॥
भलाबिल दोंदिल दोंद स्थुलोद्भव वन्हिस तेजल जाग्रत हा ॥
तमदहनार्थ समर्थ सुअर्थ सुतर्क जमाव बुधामृत हा ॥
कटितटिबंधनी बंध प्रबंध शतधृत छंद् कदंबचि हा ॥
भवअनुमोदन लिंगकळा स्थुळ बीजद शारद पारदता ॥ जय० ॥९॥
नरसरिता तरिता सुरता पुनिता सुनिती लिनता रसिसा ॥
फणिलपटा सुपटां सुभटा द्वितटा घट गुह्य विजोत्कृत हा रजसा ॥
सहज समोघ अमोघ कृतासन सर्थ मिमांसक तर्कविता ॥ जय० ॥१०॥
जगनगभंजन भस्मविलेपन चंदनकाननवासकता ॥
निकट वटासन व्याघ्र खडासन आसन कारणिं आभरिता ॥
गित सुहिता सुजिता सुजिता क्षुधिता शमिता रमतां रवता ॥जय०११
उनमनि भंग सुरंग सुदंगित भृंगमती सद सेवित हा ॥
निसिदिनिं आनानिं प्रेमळ कोमळ गीत रघोत्तम गात महां ॥
हिमनगजा गजआनन नाथ गणाधिप कडियेवरता ॥ जय० ॥ १२ ॥
अयि गिरिनंदिनि जंघानिसंभव वामपदोद्भव आकळिला ॥
अवगुणहरावरि कामिनि कर्मिणि चित्तचतुष्टक संभवला ॥
समपद जाणुनि मोहित मोह तमाकृति चैतन चेष्टविता ॥जय०॥१३॥
शुभ धवला वृषभा सद भासन मानत मंडण स्थूळ हिता ॥
सम वसला समुरा सम साधन कारण देह समोद्भमिता ॥
जड जडिता कविता मथितां सुहितास्पद साधन साध्यगिता ॥ज०॥१४॥
मदशमना नमना दुसरा असला जगतीं असरा दिसला ॥
हर बसला दिसला धसला ठसला मतिनें भरिला वमिला ॥
समज अंत अभंग अमोद अनंगशमार्थ अनामिकता ॥ जय० ॥१५॥

## ॥ विश्वनाथ स्तव ॥

( चामर )

हे प्रभो नभांतरीं समान तेजमारुपें ॥
आपणास देखणा उणा वदे स्थुळाहिपें ॥
दृश्यनाश देहभास तथ वास वाणिता ॥
घाणिता न वाच्यते वुधा गमे न वाच्यता ॥ १ ॥
येथ ध्यान कोण मान बुद्धि जाण नेणती ॥
गूणकार्मि वाच्यउर्मि साक्ष धर्मि दृश्य ती ॥
दृश्यठाव हीच माव चंचलाव मूळचा ॥
ना गुणी तुं ना रूपी न पापताप आधिचा ॥ २ ॥
वर्णु काय वृत्ति काय दीन हीन मूळचा ॥
साध्य अर्थ मार्ग लक्ष नाहिं दक्ष कूळिचा ॥
काय वाणुं काय ध्याउं काय पाहुं लक्ष तें
पक्षपात सर्व मात द्वैतमात भ्रांति ते ॥ ३ ॥
नाहिं मंत्र नाच तंत्र यंत्रभूलनेणता ॥
जोग योग संतिस्हंति वांति येत ऐकतां ॥
राखि लाज माझि आज पायिं थार देइ गा ॥
ना सगा मला जगीं दुजा अणी धणी जगा ॥ ४ ॥
कोणि तर्कशास्त्र शोधनार्थ अर्थ साधिती ॥
कोणि सांख्ययोग मुख्य मानुनीच रंजती
बाप नाहिं तूजवीण जाणता मि आजि रे ॥
पादपद्मिं देहबुद्धि प्रेमयुक्त ताजि रे ॥ ५ ॥
वेदपाठि वेद थोर मानुनीच पोसले ॥
जाणतेपणा मनीं धरूनि यांत दाटले ॥
ठाव नाहिं यामधीं मला हरीच वाटतो ॥
नाम गाउं भाव ठेवुं पायिं हेत वांछितों ॥ ६ ॥
सिद्धवाक्य सोहमादि भावभागिं वाढलें ॥
थोर ते समार्गपंथ आत्मभागिं जोडले ॥

नेणता मनीं भि गा गती तुझी ति आत्मनी ॥
बाळबोध मार्गभागीं घेत नाम आननीं ॥ ७ ॥
पंचिकर्ण जारणादि मंत्रतंत्र साधना ॥
भोगभागिं अर्थयोग साधनास लक्षणा ॥
नाहिं वाट मानसास माझिया जि येथ ती ॥
येक वाट रामघांट मानि हेत ही गती ॥ ८ ॥
कोणि शाक्त शक्तिध्यान राजयोगि गूंतले ॥
चक्रशोध स्थूळमान सूक्ष्मादि आंतुले ॥
मंत्रशोध आननांत येम नाहिं जाहले ॥
सिद्ध मी मतीमधीं धरोनियां जि वाटलें ॥ ९ ॥
कर्तृत्वास कर्मवास स्थूळ मान मीपणा ॥
अभिमान ना सुटेचि नाच अर्थ देखणा ॥
माझि आइ रामकृष्ण बाळहेतु जाणती ॥
थोरल्हान कोण मानु सर्व दीर्ष्टि ऐक्यती ॥ १० ॥
कोणि हंस कोणि संत कोणि साधु मानुनी ॥
नांदतीच जाग्रतींत चोर पोटिं रोधुनी ॥
कोण ना मि नामगोत्रि साधनार्थ साधिता ॥
येक देव केशवास प्रेमभाव जाणता ॥ ११ ॥
ब्रह्मचारि वानप्रस्थ दंडधारि साजले ॥
मुंडणादि सांगकर्मि मानसांत गोंविलें ॥
येथ अर्थ मानसास हेत नाहिं माझिया ॥
कोण मानि मीपणास मीपणाच राखिया ॥ १२ ॥
भावहीन भक्तिहीन दीन मीं जि लेंकरूं ॥
धारणा न मानसी मळीन मीं स्थुळा भरूं ॥
काळवेळ शूभ निंद्य सार्थकार्थि नाठवूं ॥
आठवूं रमापती तनू रूपें सुधोंटवूं ॥ १३ ॥
होंचि वाज वृतिसाज नाहिं लाज सांगतां ॥
अर्थ स्वार्थ मानु हाचि मानसांत अच्युता ॥

कंठु काळ हेतमानिं सर्व देश आमुचा ॥
जाउं तेथ मंदिरेंच पारमेष्टि ध्यानिचा ॥ १४ ॥
मायबाप विश्वनाथ हाचि ध्यास मानसा ॥
जाणता मनोमयीं चराचरीं कळारसा ॥
कीर्तनांत गाउं नाचुं वाणुं मूर्णि माधवा ॥
यादवा दिनाचिया दया असो जि साधवा ॥ १५ ॥
मस्तकास हस्तस्पर्श आजि होउं आपुला ॥
तोडि काममोहकंद द्वंद्वमूळ या स्थुळा ॥
भुक्तिमुक्ति सर्व युक्ति पार्थिवास मानुं त्या ॥
गा अनंत बावरा सगोचरात यूग त्या ॥ १६ ॥

## ॥ श्रीगुरुयेकनाथाष्टकें ॥

चामर.

अधिष्ठान क्षेत्र जाण पात्र तीर गौतमी ॥
वास तेथ नाथपंथ येक संत मीं नमीं ॥
मानसांत भावहेत हाचि बेत वाटला ॥
पूर्ण बोध वृत्तिशोध भाव बोधिं भेटला ॥ १ ॥
नीजध्यास फार ज्यास आशफांश तोडिले ॥
भक्तिभाव प्रेमठाव ऐक्यभाविं जोडिलें ॥
येशवंत हा महंत मोहकंद तोडिला ॥ पूर्ण० ॥ २ ॥
सज्जनार्थ हाचि अर्थ नीजरूप शोधण्या ॥
लेखबोध भक्तिजोग आपआप देखण्या ॥
जीवध्यास कल्पनेस हांचि फांश कोरिला ॥ पूर्ण० ॥ ३ ॥
सावधान साधनार्थ रात्रदीन सारिखा ॥
साक्षि साध्य सार साज सामसंगपारखा ॥
शामछंदसागराख्य साधु हाचि आंतुला ॥ पूर्ण० ॥ ४ ॥
ध्येयधारणार्थ ध्यान धाम नीज दाविता ॥
धांक नाहिं काळधांव धावुनीच मोडिता ॥
पादपद्मिं हा अनंत जाणुनीच जाडला ॥
पूर्ण बोध वृत्तिशोध भाव ओघिं भेटला ॥ ५ ॥

( विबुधप्रिया )

मोहना मनकामनाशकाभव्य तेज निजान्वया ॥
द्वैतकाननदाहका अरिभंजना करुणालया ॥
तारि गा पदिं आपुल्या निजदास हा मिळवा सुखा ॥
जातसे गतिमान हा भावभ्रांतिनें विषयोन्मुखा ॥ १ ॥
सद्गुरू अभयार्थका निजबोधनी ध्वनि ऐकुं दे ॥
मानसीं ममअंतरीं भरि रंग गा नय पाहुं दे ॥
भावना तव भाव हा उदयावरी प्रगटे मुखा ॥ जातसे० ॥ २ ॥
कारणाकृति नासुनी निजकारणीं गति फांकुं दे ॥
दे दयानिधि एवढें कर मस्तकीं मम राहुं दे ॥
टांकुनी तव बोधना मदभावनें हुडकूं रुका ॥ जातसे० ॥ ३ ॥
नामची तव हारवी कळिभावना सद संतजी ॥
हे महंत विनोद तो नवकजलोचन कृष्णजी ॥
आवडी पुरवा भली रस जाणवी सद कौतुका ॥ जातसे० ॥ ४ ॥
निर्मळा निजरंजना गति कोमळा भुतभावने ॥
सर्वसाक्षि थि अंतरात्मक सज्जनान्वय दावणें ॥
यादवेंद्र सदां समोर रमापती गाडि ह्या फुकां ॥ जातसे० ॥ ५ ॥
बंधनांतुनि मोकळी भवकर्मणी नच दूसरा ॥
कर्मकांड विभांड वंचकपूर्णतेप्रति भीतरा ॥
तात तूं मज नाथजी जन पूर्णते पण साधका ॥ जातसे० ॥ ६ ॥
भार हा नच वाहणें अभिमानता मम अंतरा ॥
कामक्रोध मदादिक या मतिपासुनी दुर गा करा ॥
सामराज्य अनंत वैभव कीर्तनार्थक देशिका ॥ जातसे० ॥ ७ ॥

( भ्रमरविलसित. )

श्रीनाथा या भ्रमदहरणा ॥ दीना रक्षी निजरविकिरणा ॥
माथां वाहूं सदचिद चरणा ॥ काडा दुःखांतुनि भवमरणा ॥ १ ॥
व्हावी दृष्टी मजवरि पुरती ॥ कामादी हे नच रिपु उरती ॥
आत्मानात्मीं अनुभवभरती ॥ बोधाबोधा गति भ्रम नुरती ॥ २ ॥

कायावाचे शिशुपण मतिचा ॥ भावातीता पथ कथि गतिचा ॥
नाहीं मागे गुणकृतिभरणा ॥ ज्ञानाज्ञाना हित नच वदना ॥ ३ ॥
नामाठायीं मति बहु रमणें ॥ नीजानंदीं गति नित भरणें ॥
नाना जाती अनुभववटिका ॥ होऊं वाणी असिपददिपिका ॥ ४ ॥
माऊलिये विनवित दिन हा ॥ अता पाहूं नच हिन भवि हा ॥
चिंता नासी समुळ सकळ ही ॥ स्वामी दासावरि वळ घनही ॥ ५ ॥
पापातापांतुनि करिं धरणें ॥ नेमानेमा मति दर वरणें ॥
हो यानंता सदचिदपद दे ॥ नीराभासीं मति मम भरुं दे ॥ ६ ॥

( चामर० )

येकनाथनाम गात नित्य नेम राहतां ॥
दुःखदैन्य मोहसैन्य सर्व ताप नाशता ॥
पादपाग्नि भाळ अर्पितांचि पाप नासणें ॥
धन्यधन्य कीर्ति मान नारदादि मानणें ॥ १ ॥
सद्गुरू जनार्दनाख्य भक्तिभाव दाखवी ॥
येक नेम पाहुनीच तर्क लोक माळवी ॥
संतसाधु योगिवृंद नित्य येत दर्शना ॥
हेमना सदां वसे गुरूवरीं लुटी धना ॥ २ ॥
कायभाव भक्तिसाज अर्थराज रावला ॥
हायहाय दत्त बंदि चोपदार राहिला ॥
कांवडी भरी हरी घरीं सदां खुषीमधीं ॥
घांसि गंध नंदनंदनाख्य वंद्य संतधी ॥ ३ ॥
ना रुचे रमा मनीं न गोडि या सरी दुजी ॥
कृष्णदास दास यांस सत्यभाव जेथ जी ॥
ऐक्यता अशी कधीं दुज्यामधीं न वागली ॥
वर्णनीं धणी पुरे प्रभा सुतेज फांकली ॥ ४ ॥
सर्वसाक्षि आत्मबोधिं गद्यपद्य योगरी ॥
गातयासि हांति मुक्ति लाभवित सौभरी ॥
रांगिं दंग होउनी बहू गती प्रती गडी ॥
पावळेहि पावतील पैठणांत आवडी ॥ ५ ॥

गौतमीतटीं भुमी सुदिव्य स्थान शोभवी ॥
नाथनाथ आननांत लोकभाव गाजवी ॥
हीनदीन नित्य द्वारिं कष्टताति आश्रितीं ॥
माउले तुझी कृपा तया बहूत फांवती ॥ ६ ॥

( विबुधप्रिया. )

रंगलें तवकीर्तनीं नर आवडीं तडि पावले ॥
वागतां भवकाननीं निजभाविसें जनिं भाविलें ॥
मांखले गति प्रेम जे भवकौतुकाप्रति कांचेले ॥
हा अनंत विनोद भाविक भावनार्थे जि आपुले ॥ ७ ॥

मालिनी.

नमिन मि गुरुनाथा एकछंदा अभंगा ॥
विनविन दिनभावें प्रेम बोधा सुरंगा ॥
दिनजन करुणेच्या सागराऽद्वैतबुध्ये ॥
नच गमे तव पद्मीं लाजणेचि प्रबुध्ये ॥ १ ॥
सद् चिद् असि पञ्चापासुनी वेगळा तूं ॥
सकळहि उगमाचा ठाव जो भावहेतू ॥
अमरपुरपतीची संपत्ती लज्जितासी ॥
गुरुवरमहिमेचें भाग्य देखोनी दासी ॥ २ ॥
निगमहरिगुणाचें गूणसाक्षीन्वयानें ॥
भवनितळ विराजे आत्मबोधार्थमानें ॥
निजबिज भरडोनी काढिलें सार सारा ॥
भवकृति हरिताहे जेथ भक्ती उभारा ॥ ३ ॥
समपण सहजाचें आसनीं ध्यानमुद्रा ॥
सदयविनय प्रेमा शांततेच्या समुद्रा ॥
जिवशिवपण हारे कीर्तनीं तत्प्रसादें ॥
नरहरिरुप होई भक्तिच्या कोशसादें ॥ ४ ॥
अभयपद सदांचें दासचित्तीं वसों दे ॥
विनय मति विराजों आत्मरंगीं स्वशोधें ॥

अभिमति किमपी हे आश्रमीं आजच्यानीं ॥
उगम नच करूंगा लौकिकीं लोकमानी ॥ ५ ॥
जगनगसमभावो वागवावा मतीनें ॥
सगुणि अगुण व्हावें कीर्तनीं रंग देणें ॥
किमपिहि नच मागें आणि मी मीपणा न्हे ॥
सुख बहु हृदनासे तेधवां अंतरानें ॥ ६ ॥
भवभ्रम तवनामें बापुडा हीनतोंडा ॥
किमपिहि नच शीरे जाग्रती स्वप्नपीडा ॥
प्रणव विवरणाची शक्ति चैतन्यसाक्षी ॥
तव गति सहजाची आत्मभावार्थ लक्षी ॥ ७ ॥
तुजविण मज कोणी तोपवीना न भासे ॥
गुगाचि निजपणानें साक्षि देती नभासे ॥
परपण दुर केलें आणिलें अंतरंगीं ॥
परि सुक न सरे ही मागतां अंतरंगीं ॥ ८ ॥

शिखरिणी

पदीं वंदूं नाथा अभयपण हिताकागिं मजला ॥
अगा द्यावें दात्या कृपणपणता नाचि तुजला ॥
लिलाधारी वर्ते सगुणपणतें गूणगतिनें ॥
नितीच्याधारानें अगुणपणतें भावविमनें ॥ १ ॥
गिरा सूधाकारी हरिगुणकथेमाजिं भरली ॥
बहू केली थोरी निजहितसुखा पेटि खुलली ॥
हिता आली भावें सुजनगतिला नित्य फळती ॥
न होई कल्पांतीं नुतन नवि दे गोडि पुरती ॥ २ ॥
तुझी कीर्ती गातां सकळहि पुरे कामसरिता ॥
अनाथाची गोडी तवगतिबसे भाव भरिता ॥
नको मुक्तिभुक्ति पदिं मम मती जोडवि सुखा ॥
फुका आहें बापा अनुदिनिं नवा रंग हरिखा ॥ ३ ॥
अजी सत्ताधीशा सुर इश इशापासुनि बरा ॥
घरांतीलासारा उचलवि शिरा बा हरहरा ॥

नराकारीं होई हरिघरिं सदां कावडि भरी ॥
उगाळी गंधातें समयसमयीं सर्वहि करी ॥ ४ ॥
रमाकांताची हे गति इहरुपीं तेथ सहजीं ॥
दुजा कोणी राहे सुरनर भवीं फार दुरजीं ॥
असो हें शोभावें हरिजनघरीं दास हरि हा ॥
परि या कौतूका किति तरि वदूं ठावचि महा ॥ ५ ॥
उभा द्वारीं तिष्ठे सुत अनुसुया इंद्र गुरुचा ॥
स्वधर्माच्या छंदें अनुभवगती वेष मुनिचा ॥
कसा त्यागीयेला कठिणपण ते हेरवत सा ॥
पठाणाचा बाणा उमवुनि उभा रात्रदिन सा ॥ ६ ॥
महासिद्धी दासी पदिं विरमती कष्टशमना ॥
मनामध्यें ध्यातों गुरुवर असा ताप हरणा ॥
दुजी गोडी नाहीं मज इहहुनी मानत बरी ॥
अनंतान्वयाचें भय हरुनियां सौख्य उजरी ॥ ७ ॥

पंचचामर.

जगप्रिया नमो सदां पदारविंद मस्तकीं ॥
पराभवा भवाप्रती नवा कराजि स्त्रस्त कीं ॥
निजान्वयाऽमरा जरा करा भुकाळ फार मीं ॥
सुकाळता सदां घरीं असे तुझ्या दयाधर्मी ॥ १ ॥
तपीमुनी मती निमोनि लीन भाव पावले ॥
कितेक सिद्ध साधकादि पाहतांचि लाजले ॥
सुशांतिचे सुबोधके निजाश्रये ममाइगे ॥
त्वरीत पावणें करी शिशूकुळे भवांत गे ॥ २ ॥
न रूचणें दुजा गुणें मना करीं समानता ॥
मनांत पाहसी किती तरी करी दया हिता ॥
भवांबुधी तरावया बरा नची दुजा सरा ॥
पतीत मी गती गुणें गितान्वयें वदे तरा ॥ ३ ॥
अपार सौख्यसागरा नराधिशा गुणागरा ॥
अभेद मानसा समानता मतीं गती करा ॥

रमापती सुदास सात साधकार्थ साधनीं ॥
परांग तूं स्थुळार्थ ते असोनियां बरा धनी ॥ ४ ॥
रुची रुचे रसाहुनी कषायसा असोनियां ॥
अनर्थनाश अर्थदीप ज्योति बोधदातया ॥
दयाघना मनामना करा खरा सुदास हा ॥
अनंत आवडी पदांबुजीं सदां जडो धृती महां ॥ ५ ॥

वसंततिलका.

वंदोनियां शिर पदीं गुरु येकनाथा ॥ वर्णीन मीं स्वसुख तें गतिनें अनाथा ॥
आत्मान्वया भरि रसा निजयोगभावें ॥ गावें सुधाकर तुझे गुण अर्थ भावें १
अद्वैत मानसगती सुरसाळ वाणी ॥ आनंदकंद मिळणी हरिखा न वाणी ॥
सर्वांभुतीं सदयता उदयास्त नाहीं ॥ नाहीं मना गुरु असा स्वसुखार्थ गेहीं २
संतापनाशक सखा सुजनाख्य रावो ॥ संतोष संत गतिचा वरि नाच रावो ॥
स्वानंद भाव उभवी जडजीव हीता ॥ एकादशावरि टिका रचिली स्वहीता॥३॥
लीलावतार कलिचा भ्रम नासण्याला ॥ सूसंत शोधक गती निजआत्मलीला॥
केले अनेक निधडे जनअर्थ अर्थी ॥ भावार्थ आत रचिला बहु तो समर्थी ।४।
काव्योपमा सरि कसी समता प्रभावीं ॥ द्वंद्वार्थभेद करुनी निज ऐक्य दावी॥
वाटे मना सुख बहू पदबोधनीचें ॥ वाणूं महेंद्र सुरनाथ पदार्थ नीचे ॥
जो जाणवी लपवुनी गतिने उदेला ॥ बोधामृता भय करीं भवकर्मलीला ॥
नामान्वयीं वदतसे निज निरयवाणी ॥ खाणीच हे अनुभवाख्य बहू नवाणी ६
श्रीक्षेत्रपैठणपुरी तट गौतमीचा ॥ वैकुंठनाथ वसला वळुनी सुखाचा ॥
कार्यें अनेक करितां महिमार्थ दावी ॥ जो शांत संत गतिचा मति हे वदावी ७
दावी करोनि भजना गुरुगम्यतेचा ॥ ज्याचाचि तो करितसे निजरंग साचा ॥
वेदांत वंद्यपण दे सहजाकृतीला ॥ सायूज्य काय करणें गुरुनाथजीला ॥ ८ ॥
आत्रेय तोषत परांपरि हे स्वबोधें ॥ तेजोन्मनीं पसरली हरिगूणछंदें ॥
स्वामी जनार्दन सुखाप्रति पावला हे ॥ देखोनिया महिवरी महिमान वाहे ९
आतां क्षमा करी धन्या अपराध माझे ॥ अन्यायन्याय न कळे गतिमान तूझें।
पायीं असे भरंवसा हरणें अहंता ॥ दे सूख तात शिशु हा वदवी अनंता।१०।

शार्दुलविक्रीडित.

भावाच्या निजकौतुकीं सुजन हा संताप शांती करी ॥
संताची जननी सुबोध जडणी भावार्थ टीका करी ॥
संसारांतर भावजाच हरवी जैसा रवी यामिनी ॥
अर्थानें उभवीत आत्मसमता ना भासुं दे कामिनी ॥ १ ॥
एकाकार करी हरी गुणकथा नाना तरा कूसरी ॥
कंसारी सरसावला रससुखा आत्मान्वयोभूसुरी ॥
शांतीचें सुखमंदिरीं दिननिशीं सप्रेमता चाखणें ॥
जीवेकालय संसृती अनुभवी नीजान्वयीं जोखणें ॥ २ ॥
ज्याचेनीं कलिकालदर्प हरणें किर्ती अशी कीर्तनीं ॥
बोलाच्या सरिं चालणें अगुणिसा लोकां दिले वर्तनीं ॥
भानूदाससुवंश हा मिरविला भानूकुळा पातला ॥
मानू हा नभिच्याहुनी बहुवरी नीजार्थिचा दाखला ॥ ३ ॥
ज्याचेनीं अभयार्थ भाव भव हा दावी कळा कीरणी ॥
सूर्याची करणी त्रिताप किरणीं जाची जगा कारणी ॥
साचा आगम हा महा निगम तो संतोष येकाकृती ॥
नामें नाथ अनेक तीं परि सरी यातें नची पावती ॥ ४ ॥
एकाची सदशोधनार्थ वटिका टीका नसे ही शिका ॥
वैकुंठाहुनि आणिला भाविंगति सायुज्यतेचा शिका ॥
नामानें जन जागृती प्रतिपदीं नीजाश्रयीं लाविले ।
संगातें किती सेवुनी सहज ते जाऊनियां पोंचले ॥ ५ ॥
दाता कोण असा दुजा वदुं मुखें दूजेपणा ज्या नसे ॥
भावातीत समर्थ भाव करणी गावी कसी मानसें ॥
खुंटे वादविवाद भाव मम हा जोडे बरा पाउलीं ॥
माते तारक नाचि कोण दुसरा आद्यांत ही माउली ॥ ६ ॥
वीदेही जननी सुबोध कथिनी चैतन्य चिंतांगणी ॥
धांवे लौकरिं घाबरा दिन तुझा द्वारिं उभा आंगणीं ॥
पाजी बोधपया जराजरपणें पोसों गुणाच्या लयीं ॥
ठेवाऽनंत पदाब्जपावनगती चैतन्य चित्तालयीं ॥ ७

( कामदा. )

नाथजीपदांबूजतोषकू ॥ पातला असे भाव लौकिकू ॥
देइ दर्शना हे कृपाघना ॥ हारवा मनांतील भावना ॥ १ ॥
संतसज्जना येकनाथजी ॥ पंथवीण मी ताप वार जी ॥
दावि कौतुका योगकानना ॥ हारवा० ॥ २ ॥
भेदभावना ना तुडे तुंतें ॥ आळवूं किती जाणवी गितें ॥
गूणबंधनीं सारशोधना ॥ हारवा० ॥ ३ ॥
पक्षपात ना नीजलक्षणीं ॥ दक्षता असी दाविली गुणी ॥
माझिया असों रंगगोधना ॥ हारवा० ॥ ४ ॥
मायबाप तूं इष्टमित्र तूं ॥ भुक्तिमुक्ति तूं बुद्धिशक्ति तूं ॥
आदिअंत तूं लक्षलक्षणा ॥ हारवा० ॥ ५ ॥
दुःखमोचना दुर्मदांतका ॥ दीनपालका लोकलौकिका ॥
प्रीयपात्र गा तूं जनार्दना ॥ हारवा० ॥ ६ ॥
भक्तिभूषणा भक्ततोषणा ॥ भव्यलोचना दृश्यमोचना ॥
सत्यशांतिच्या प्रेमजीवना ॥ हारवा० ॥ ७ ॥
कीर्तिचा निधी सर्व जाणती ॥ भावभक्तिनें नाम गर्जती ॥
संतपंतजी वाग आनना ॥ हारवा० ॥ ८ ॥
तात पाहुनी घात मानणें ॥ बाळकामती केविं साजणें ॥
स्थूळकारणानंतभावना ॥ हारवा मनांतील भावना ॥ १० ॥

इंद्रवज्रा.

येकात्मतेच्या करुणाविलासा ॥ चिन्मात्रकार्या प्रकृतीपुरूषा ॥
संसारसारा विजयाकृतीचा ॥ नामेंकरोनी पुनितार्थ वाचा ॥ १ ॥
उदार धीरा अरुपा विचारा ॥ वेदांतवेद्या गुरुगम्य सारा ॥
भावार्थ भावाप्रतिमान साहे ॥ देवाधिदेवो घरिं रावताहे ॥ २ ॥
नाथा समर्था तव योगमुद्रा ॥ साक्षी तुळेना किमपी समुद्रा ॥
तो क्षार आहे निधि आपरूपें ॥ तूं शांततेचा विजयो प्रतापें ॥ ३ ॥
श्रीक्षेत्र गोदावरिच्या तटाकीं ॥ सूर्सत आले जगती विलोकी ॥
नासावया या कलिभावनेला ॥ केला कृपेचा निजरंगमेला ॥ ४ ॥

तारीयले फार दिवांधजाती ॥ लावीयले हो किति मोक्षपंथीं ॥
संतापशांती तव भावनेनें ॥ संता महंती तुज नाचि माने ॥ ५ ॥
सिद्धांत लाजे गुडअर्थतेजें ॥ बोधामृताचें हरिगीत तूझें ॥
विज्ञानतर्कालय लक्षकारा ॥ संसारसिंधूंतुनि दास तारा ॥ ६ ॥
फारावतारी हरिदास झाले ॥ येकान्वयाचे चवि ते भुकेले ॥
गाताति कीर्ती गुरु येकनाथा ॥ जागा पदीं दे अजि या अनाथा ॥७॥
कौस्तूभहारी घरिं पानकासें ॥ सामर्थ्य भक्ती सद्भावध्यासें ॥
ज्याच्या पदातें मुनियोगि गाती ॥ तो तिष्ठताहे तव कीर्तनांतीं ॥ ८ ॥
बापा मला द्या पदिं ठाव आतां ॥ नाथा जगाच्या हरणें अहंता ॥
आनंदलों मीं जिवभाव गेला ॥ याहो अनंतीं रचि दे रवमाला ॥ ९ ॥

( शुद्धकामदा. )

नमुनि पाउलें सूख पावलों ॥ अभय सद्गुरू नाथ भाविलों ॥
सदय सौख्य दे आर्त पूरण्या ॥ नच असा दुजा येत धांवण्या ॥ १ ॥
परम प्रीय जो त्या जनार्दना ॥ हृद हरी भवो बोधवर्धना ॥
नच गती मिळे दृश्यशोधण्या ॥ नच० ॥ २ ॥
गतगुणाकृती प्रीयवर्तनीं ॥ जनसुखाव दे भाव कीर्तनीं ॥
विनयकारका आत्मदेखण्या ॥ नच० ॥ ३ ॥
पितर जेविले श्राद्धपर्वणी ॥ द्विजवरांप्रती गर्व हारणी ॥
तुज कसा करूं भाव कोंडण्या ॥ नच० ॥ ४ ॥
परमहंस जी लाळ घोंटिती ॥ निजमराळ तूं देखुनी कृती ॥
तव करांबुजीं मुक्ति टेंकण्या ॥ नच० ॥ ५ ॥
गुरु समर्थ जी पावनाख्य तूं ॥ विमळ मानसा सत्य ठाव तूं ॥
भवभ्रमांतुनी शांति भाविण्या ॥ नच० ॥ ६ ॥
बहुत दाविले अर्थ संग्रहीं ॥ गुढ सुरां नरां ब्रह्मयासही ॥
अनुभवाकृती शांत चांदण्या ॥ नच० ॥ ७ ॥
गरुडवाहना ध्यास आपुला ॥ बहुत आवडी छंद मातला ॥
सवड थोडकी गंध घासण्या ॥ नच० ॥ ८ ॥
हरिपदांबुजीं वंश लाविला ॥ गुरुमुनेंद्र जी प्रेमिं पोसला ॥
तव लिलामृतीं चित्त जोडण्या ॥ नच० ॥ ९ ॥

गुरुगिताष्टकें वर्णितां मुखीं ॥ त्रिविधताप हो शांति पावती ॥
मति अनंत ही ध्यान भावित्र्या ॥ नच असा दुजा येत धांवण्या ॥१०॥

( भुजंगप्रयात. )

नमो येकनाथा दयाळा समर्था ॥ स्फुरो अंतरीं ऐक्यता बोध वार्ता ॥
उदारा जरा थार पायीं असावा ॥ मनोभाव तूझे लिळेनें कसावा ॥१॥
अगा दीनबंधू कृपादृष्टि कीजे ॥ अनाथाप्रती प्रेमता फार दीजे ॥
तुझें चिंतनीं चित्त भावो स्वभावा ॥ मनोभाव० ॥ २ ॥
कृपा संतजी जीवभासीं नसावी ॥ निजानंद आनंदप्राप्ती घडावी ॥
अगा सद्गुरू हारवा जी अभावा ॥ मनोभाव० ॥ ३ ॥
अलंकारलेणीं तुझ्या कीर्तनाचीं ॥ सदां लेईताहे अदोषाकृतीचीं ॥
हरीली अहंता सुखार्थी नवावा ॥ मनोभा० ॥ ४ ॥
समाधी सदांची फुकाची पदीं या ॥ सदानंदकंदा तुझी धन्य माया ॥
सुकाळामधीं धीटता दे नवावा ॥ मनोभा० ॥ ५ ॥
पवाडे घडे नीघडे संसृतीला ॥ मुखें वर्णिलें दावुनी भावलीला ॥
सदा संग स्याचा हराया अभावा ॥ मनोभाव० ॥ ६ ॥
निराकार आकार एकात्म केला ॥ तया पाहतां दृश्यभावार्थ गेला ॥
सनाथा तुझ्या मोल नाहीं ठरावा ॥ मनोभा० ॥ ७ ॥
नमी वेळवेळां पदीं या शिरासी । दुजाभाव त्यागी न दीसे उदासी ॥
समानीमधीं थोर आहे विसावा ॥ मनोभा० ॥ ८ ॥
हरेनाथ हा मंत्र चत्वारि ठायीं ॥ हरे ताप पापा मती शुद्ध होयी ॥
सदां गात गूणा पदानंत व्हावा ॥ मनोभा० ॥ ९ ॥

---

## ॥ श्रीगुरुयेकनाथस्तुति ॥ १४ ॥

( शार्दूलवि. )

रामाची समजूत भूतभुवनीं एकार्थटीका करी ॥
लेखाचे बहु छंदबंध भवती भ्रांतीदशा हांकरी ॥
शांती शाम विराम कामहरणी बुद्धी हरीजे हरी ॥
घेरी घेत सकेर हेत तनुचा विश्वास प्रेमा करी ॥ १ ॥

गंगाओघ सतीगती निजमती नीती वसंतांतली ॥
माती मानविमानभाव न गणी गुणातिती सांटली ॥
संगार्थी भुतभाव धारण करी काळांतरा जाणुनी ॥
पानें तोष अनंतरंगभुवनीं श्रीयेकनाथार्चनीं ॥ २ ॥
संगातीत मुधा मनोघ मुळचा गोकूळवासी हरी ॥
पांगें पांडव पंच इष्टकरुनीं दृष्टांत व्यासू करी ॥
ना रीजे इतरीं जसा सममती श्रीएकनाथाघरीं ॥
वाहे घागरि गौतमीतटिं सदा चैतन्य चित्तीं भरी ॥ ३ ॥
भावाच्या निजरांजणीं सितवणी शांती घणी सांटणी ॥
उल्हाळे सद्प्रेमयोगलहरी भानूकुळा जोडणी ॥
वागे नित्य रिणी अमीत भुवनीं भावार्थचिंतामणी ॥
रंगे रंग अनंतलोचन विभो श्रीनाथप्रेमांगणीं ॥ ४ ॥
भेखावांचुनि येक भाव उभवी एकात्मतेचा रवी ॥
एकाकार कवी न हा विजनिचा भावार्थ जोडे भवीं ॥
दावी तर्क पदार्थ भास निगमीं खोलार्थ वाणी नवी ॥
भोगी प्रेम अनंत चित्तनिधिचा गूणार्थ साक्षी चवी ॥ ५ ॥
डंका वैष्णव शिष्ट स्पष्ट वदनीं नाना धृतीचा गुणी ॥
प्रांतीं प्राकृत ठोकिती रस मुनी मित्रान्वयाकारणीं ॥
मित्रा मित्रध्वनी विनोदकथनीं शांतीप्रभेचा धनी ॥
गोसावीपदिं हा अनंत नमितो कार्याविणें कारणीं ॥ ६ ॥

( मालिनी० )

रविहृश मतिमानीं पोसली भानुदासीं ॥
भुमिवर भर वाहे वासना भेद नासी ॥
गुणनिशि हरुनीया एकनाथीं प्रभातीं ॥
निजभर सुतछंदें भोगवी या अनंतीं ॥ ७ ॥

॥ इति श्रीयेकनाथाष्टक समाप्त ॥

# शंकराष्टक.

( सवाई )

गिरिवरनंदिनिनंदन संभवि संतमनोभ्रमभंगकृता ॥
सुखकर मंडित शुद्ध अखंडित बंधविमोचक भृंगभुता ॥
दनुजनमर्दन वर्धन संगम निर्धन गंडित संडित हा ॥
जयजय शंकर अंकित सुंदर वत्स स्वभाविक वंदित हा ॥ १ ॥
गुणकृत संभव सिद्ध विनेश्वर ऐश्वर सांभविशक्तिरुपें ॥
आरिकुळसंग्रह संगतिविग्रह विकृतमोह अमोघ कृपें ॥
भुजधर सुकृत शुद्ध सुखाणित वेदस्वरुपित भारुक हा ॥ जय० ॥ २ ॥
वरकर अंकुश सुंदर मोदक पाश करासन दिव्य प्रभा ॥
सुरनर किंनर नम्र करांबुजबद्ध नभांगाणीं थक सुभा ॥
मुनिवर संनिध भृंगमनोकृति स्तव्य सुखास्पद शांत महा ॥ जय० ॥ ३ ॥
फणिवरबंधन मंदसुहास्मित कंद निजासनआत्मसुखा ॥
कटितटवेष्टन मोहविमर्दन रिद्धिकुलोद्भव भक्तसखा ॥
शमदमसाध्यक दृश्यभ्रमोच्छद निर्जरवर्जन सत्य पहा ॥ जय० ॥ ४ ॥
रविशशिकुंडल चंचलआकृति पक्षसुरास्पदशब्दरवें ॥
उपनिषदार्थक सांख्यसबोधन साध्य मनोभुत आद्यभवे ॥
जगनगतारण कारण वेपज स्पंद नाभिं स्थुळ ऐक्य पहा ॥ जय० ॥ ५ ॥
सद निगमागम आगमतोषित आलयअंकुर आभरला ॥
खगनगसंभववैभव वीभव हा भव भावविं भावविला ॥
निजपदसेवक सेव्यसभार्चित दिव्यरसोद्यतिसाटक हा ॥ जय० ॥ ६ ॥
मुषकसुवाहन स्थूळसरोजव सिद्धिविनायक दिग्गभवीं ॥
शमदमसदृश्य दृश्यरजोद्भव बोधक मानस साध्य कवी ॥
रजदळअंबुज आद्यअधिष्टण चत्वदलांकितवारुक हा ॥ जय० ॥ ७ ॥
षड्दळ अंबुज अष्टदलाकृति द्वादश षोडश ऐक्यविधी ॥
द्विदलसुसंभवसूत्र मदोद्भव सूक्ष्मभेदक ब्रह्मसुधी ॥
सुरनरपन्नग चैतनचिन्मय चित्तसुधाकर सादर हा ॥ जय० ॥ ८ ॥

भजभज मानसहंसवितोषज गर्भकुलोत्कृशखंड करी ॥
षडारिपुदुर्मति छेदक तुंदिल अंकुशसंभावें दंड करी ॥
मनअमनाकृतभाव भवांबुधितारक सत्याचि संग सुहा ॥ जय० ॥ ९ ॥
चरचरदाकर निष्ठुरता हर क्षूधित किंकर भृंगमती ॥
हुळहुळ वांत्सित दृश्यमनोभव तर्करशोधन दृश्यमती ॥
पदकमलांबुजवंदन इच्छित तर्क अनंत विदर्प महा ॥ जय० ॥ १० ॥

## ॥ शंकरस्तोत्र ॥

( विबुधप्रिया० )

शंकरा गिरीजावरा शशिशेखरा त्रिपुरांतका ॥
भस्मलेपनं अंगभूषण व्याळमंडित माळिका ॥
भाललोचन व्याघ्रआसन ध्यान उन्मनि लावुनी ॥
पाहिमां दिनवत्सला करुणाकरा येई धांवुनी ॥ १ ॥
रुंडमाळ कपालपाणि त्रिशूळधारण मंडितं ॥
काळपाशविनाशकं भववासना रिपु दंडितं ॥
भंभयंकर शब्द घोरत वाद्यवादन साधनीं ॥ पाहि० ॥ २ ॥
नंदिकेश्वर ईशईश्वर शोक नैश्वर हे हरा ॥
थार दे तव पायिं गा दिन प्रार्थितो बहु हांवरा ॥
दास हा मनि आस गा करी आपुली पदसेवनीं ॥ पाहि० ॥ ३ ॥
वास तो शिखराचळीं धवलागिरिवारि राहण्या ॥
कोटि तेत्तिस सूर मस्तकीं वंदिताति तूंते धण्या ॥
धांव पाव दयानिधे जि अनंत मीळणि शोधनीं ॥ पाहि० ॥ ४ ॥

## ॥ सद्गुरुस्तोत्र ॥

( विबुधप्रिया )

सिंधुसा निजबंधु तूं सुखकंदु गा सदभाविकां ॥
सेवकां करिं हा सिका भवनाशना निजतोटका ॥
निर्भयी रघुनाथजी निजबोधनीं रविवंशिचा ॥
साधनी रिपुघातकी मद हारवी शिर कौंचिचा ॥ १ ॥

संत हे नवसंतजी निजसंतसेवनीं आश्रे ॥
मानवी नच वानवी सदभावनीं बुध सांभसे ॥
शांतिचे सदकांतिचे भववांतिचे शशिभांतिचे ॥
दादले बहु भागले भविं नाडले निजशक्तिचे ॥ २ ॥
वृद्धतेप्रति पावले मनिं बोधले नित मागले ॥
वांकले अनुमोदनें नव गोधनें भविं शोभलें ॥
जंगली मति रंजली मठिं बांधली नच आधली ॥
साउली वट फावली गुरुमाउली तळिं बैसली ॥ ३ ॥
पार्वती बिजपर्वतीं पतिपद्धती रुचि राहिली ॥
माउली जगसाउली कनुवाळसी सुख पावली ॥
राघवी जिभ वागवी निजलावकी सद चाळवी ॥
शक्तिचा श्रम पालवी दिप लावबी रघु घोंकवी ॥ ४ ॥
सागरू रसआगरू अजरामरू रविवासरू ॥
भास्करू कुळसद्गुरू बिजआभरू नच तस्करू ॥
भ्रांतितें भववांतिता सदसंत तो खूण जाणता ॥
बाणतांच अनंतता पदप्राप्तता रस ओपिता ॥ ५ ॥

## ॥ शंकरस्तुति ॥

( पृथ्वी० )

सदाशिव हरा जटाधर प्रभो नभामाजिगा ॥
सदासशमना रघूविरप्रिया जगीं तूंचि गा ॥
अगा प्रणतवत्सला पतितपावना थार दे ॥
तुझ्या पदिं बरा गमे मज दिना मना प्रेम दे ॥ १ ॥
गिरीवरसुताप्रिया तुजप्रती उमा शोभती ॥
भली नवरि ही तुला वारितसे कळा जाणती ॥
गति इचि बरी घरासदप्रती निती जावया ॥
वया हरिव या गया सम नया वरी ही बया ॥ २ ॥
त्रिशूळधर अंबुजी डमरुपाणि गा धारका ॥
विभूत धुलिता गळां नरशिरा बरी माळिका ॥

त्रिलोचन शशीधरा फणिभुषांबरा नायका ॥
विलोलितजटामधीं झुळझुळे हरी कन्यका ॥ ३ ॥
गजांबर धरा खडासन समोध व्याघ्रांबरा ॥
सुभा करुनियां भुतांमधि सदां तुवां शंकरा ॥
सकामदहना पशूपति इशा तुला मी नमीं ॥
मला तुंचि भला पदा मिळविगा धरी याद मीं ॥ ४ ॥
कपालधरपात्रभोजन सुपात्र दावा दया ॥
मवाळ मन मानसा तम हरा करा ती दया ॥
गदाधरशिरावरी अरि तुरे पुराणा जुना ॥
धनास मज देइ या सदकथामृता साधना ॥ ५ ॥
सुराधिपातिपावना कलिमला तुमी हारवा ॥
खामाधिं मना जडो प्रिति बहू नवा वा नवा ॥
भवामाधिं जिवारुपें तुजसि बा जमावा गमे ॥
गमे नच दुजा मनामाधिं भजा पती तूं उमे ॥ ६ ॥
जगानगपदा पदांमाधिं तुझा असे थार गा ॥
स्थुळावभव हा स्वभावमतिचा तुझा साच गा ॥
चिताविभुतलेपना भूतगणामाधिं देखणा ॥
खणाणरव खंण खण्ण लघुघंटिका कारणा ॥ ७ ॥
भयानक रवास ओघ बरवा तुझा शंख तो ॥
स्फुरे रव भभंवभंववभभं निराकार तो ॥
गजास्यजनका षडाननपिता निती दाविता ॥
निरामयमती तया करुनियां भला तारिता ॥ ८ ॥
दिनाप्रति मनामधीं वसतसे बहू प्रेम गा ॥
वळोनि निजसेवकाघरिं सदां उभा तूंचि गा ॥
पडे जड तधीं उडी धडपुडी तुवां घालिसी ॥
असे बहुत साक्षी गा भवपुरीं स्फुरे मानसीं ॥ ९ ॥
किरात तरला समानशिलते तुमा मानसीं ॥
चिता विभुतिकारणें सति वधी तधीं भेटसी ॥
दुजा अघपति अघोर मतिचा असे व्याध तो ॥

तमोगुणरुपी मृगा वधि तधीं पुजा योग तो ॥
बरा घडतसे शिवार्चनदिनीं सदाचार तो ॥ १० ॥
दिली गति कसी तुवां जगपतीपदीं वाटणी ॥
असे बहुत पापि ती तनुभगांकि चांडाळणी ॥
मरे शिवदिनीं तधीं निशिमधीं क्षुधें व्यापिली ॥
नसे नयन ते करा करि पुढें जना भीतली ॥ ११
क्षुधातुररुपें करा करि पुढें तयाचा मधीं ॥
सुबिल्व पडलें तधीं धरितसे मुठीचे मधीं ॥
पुढें उघडुनी दुजा करयुगें बरी चाचपी ॥
न भक्ष समजे मनीं तव बहू स्मरे साक्षपी ॥ १२ ॥
अगा शिवशिवा असें स्मरुनियां तळीं बिल्व तें ॥
पडे शिव शिरीं तयावरि तिळा गती बागते ॥
किती तरि वदूं मुळी अमुप ते तुझे गूण गा ॥
जसा भरंवसा जया मनिं असे तसा तूं जगा ॥ १३ ॥
नृपासनि दिना बरा बसविसी तुझी गा तरा ॥
सुतादि करूनी जनां रिजविसी बरा आसरा ॥
अघोरमतिपंथ तो शिळ अमंगळा देखणा ॥
दर्शनीं पतितांप्रती करिसि तूं तुझा पाहुणा ॥ १४ ॥
सुमंगल पदीं सदां चरिसि त्या असी देणगी ॥
तुमांसम नसे दुजा सुर बरा कलीचा युगी ॥
मला अजि हरा तुवां पदसमी दिगा आसरा ॥
नको विसरुं गा धण्या दिन असे बहू हांवरा ॥ १५ ॥
कराच करुणा मनामधिं तुमी जमा सेवकीं ॥
धरा मज अजीं बहू शिणतसें असों प्रीत कीं ॥
मुलासम मला पदां धिर बरा कृपेचा करा ॥
करामम शिरा धरा वरद तो मदा आवरां ॥ १६ ॥
तुझें गित बरें स्मरे मुखिं प्रिती तयाचा ळळा ॥
कलानिधि तुमी बरा पुरवुनी घरीं त्या वळा ॥

मला प्रितअसी तुवां पुरविसी खरी वाटली ॥
अनंतमतिची मळी झडवितां जसी माउली ॥ १७ ॥

## ॥ गंगाष्टक ॥

( शार्दूलविक्रीडित.)

गंगे शांत तुंगे सुरेशभुवने भागीरथी जान्हवी ॥
नासी नीर तुझें कलीमल भवीं साक्षी असे मानवी ॥
किंवा तूं निजशांति सज्जनउरीं बोधामृतादायिनी ॥
शोभे शुभ्र मलारहीत मुख तें भक्तासनीं मालिनी ॥ १ ॥
पोटीं घे तुं अनंत बाळकमती आरामतादायिनी ॥
भंगी भ्रांति तपोधृती रवितसी रंगों मनी कीर्तनीं ॥
बोधीं मानस होउं दे रत भलें वीवेक दे अंतरीं ॥
तूटों दुःख दरिद्र हा कालि वळों वीचार तो मंतरी ॥ २ ॥
रंगी भंग नको मना करुं तुं तो काळा नको तूं भिऊं ॥
सारा गोंधळ या भवीं गमत हा मोहें सकामा सिऊं ॥
तोडी फांश समूळ लोभ ममता संतोषवी मानस ॥
गीतातें वदवी मुखें समगुणी तूं हारवी मानस ॥ ३ ॥
नामाचा महिमा विशेष कथनीं भावा भरी राघव ॥
सिताकांत रघूपती वदनिं हा राहों सरों हा भव ॥
वंदी नंदनसा भिं मंदमतिचा छंदीं भरी रंग तूं ॥
संधि हीच बरी गमे निगमिं ती दंगे मना जोड तूं ॥ ४ ॥
नारी देखुनि पार ि चळुं नको जानी नसे तो अरि ॥
भासे ओघ भला भवीं भरतिचा संसारसिंधूपरि ॥
बारे सागर हा पवनाकृती मिनरुपें काया नराची मित ॥
पाणी तो ढिवरामिषे सतत गा काळीं असे लीखित ॥ ५ ॥
आद्दी देवि तुं गे मनामधिं बरी रंगामधिं नाचुनी ॥
संगांतूनि मला भली उचलुनी घे वीषयापासुनी ॥
भांडारांतरिं बोध हा भरुनियां चावी करी चांगली ॥
वीवेकान्वयसार साधनरिती देई कली हाकली ॥ ६ ॥

नाहीं सोहमकोहमामधिं रमे आरामता निर्जरी ॥
याचांहून पलीकडे बहु दुरी गूणामधिं ना सरी ॥
शून्याहून पलीकडे रमविगे शांतीसुखाच्या पुरीं ॥
अंबे तारक तूं मला गमसि गे संसार नासो उरीं ॥ ७ ॥
अंधारीं रजनी भवांबुभुवनीं कर्माश्रमीं ठेवित ॥
कामीं धर्म पुरूष अर्थ तिन हे गोंवी करी भ्रांतित ॥
जैसा बैल जुपोनि नांगरिं फिरे हांकी धनी त्या सरी ॥
तेंची रीत गमे जनासरि वरी जंजाळ हा नांगरीं ॥ ८ ॥
जुंपोनी अभिमान तो रजगुणी फीरे भ्रमाच्या मधीं ॥
दूताळीमति द्वैतछंदविषयीं भारी भरे पारधी ॥
मोठें नष्ट जनीं खरें लपुनियां कायापुरी राहत ॥
कामादी रिपु चोर हे मनमृगालागीं असे शोधित ॥ ९ ॥
वागूरा हिच कामिनी पसरली जाळें दिसे पूर्वची ॥
कामाचें कुतरें बहू वसवसे धांवे सदां पाठिंची ॥
लोभाची जुट भोंवती फिरतसे भाले करी लोहित ॥
ऐसे हो भवकाननीं रिपु सदां फांसी मना बांधित ॥ १० ॥
यासाठीं मन शोधि तूं दरकुटीं आरामयीं जाउनी ॥
काळा नाकळि गा पळे झडकरी शोधी गुरू तो धनी ॥
ना संगीं मन कामिनींधनसुतीं भावावरी शोभत ॥
गूणातीत अनंत शोधित सदां कौस्तूभाचिन्हांकित ॥ ११ ॥

## ॥ पार्वतीस्तोत्र. ॥

( पंचचामर. )

सदाशिवे समागमे नमामि गे तुला उमे ॥
सदां समीपदा मनीं अरीभये सुखागमे ॥
शिरावरी करा धरी अजीं बरी करी त्वरा ॥
नराधमीं दिठी असों समाउलीच कूमरा ॥ १ ॥

गुणाकृती जगामधीं नगादिकीं सकामने ॥
सुरासुरीं नराविरीं रजोन्मथीत शोधनें ॥
महीवरे गिरीसुते हरप्रिये समासरा ॥ २ ॥ नराधर्मीं० ॥
समातृके सऔट हे गुणामये सज्ञानिये ॥
सबोधनी निजासनीं सुखक्रमे निरामये ॥
भुताकृते प्रमाण तें समानते तुवां धरा ॥ ३ ॥ नराधर्मीं ॥
सुवासने तुं उन्मने सजाग्रती सुषुप्तिप्रिये ॥
निजाक्रिये चतुर्प्रिवे समोत्पते सशोधये ॥
तुझेंच हें सतेजगे रूपक्रमास भास्करा ॥ नराधर्मीं० ॥ ४ ॥
शशीकळेहुनी कळी तुं आगळी नभातळीं ॥
मनोगती समेनिधी पयाकृतीं सवागळी ॥
सुशांतिचा तनूवरी समीर तो सुआभरा ॥ नराधर्मीं०॥५॥
घडोघडीं पदांकडे दिठी असो समाउले ॥
रजींतमीं कमी गमों मनोमयी दि साउले ॥
धरी जमे अनंत हा ससेवकींच बावरा ॥नराधर्मीं०॥६॥

---

## ॥ लक्ष्मीस्तोत्र ॥

( विबुधप्रिया० )

वैष्णव प्रिय जिष्णवे मुनिमानसे रतमाधवे ॥
गाउं गे रववासनीं तवकीर्ति ही भवि संभवे ॥
सेवकावरी दृष्टि दे कनवाळुसे सदशोधनें ॥
तोषणी भवहारिणी अघनाशनी मनकामने ॥ १ ॥
वर्णितां शिणले भले कवि चांगले बहु ऐकिलें ॥
नाहिं गे तव पार तो रज संभवीं मन गुंतले ॥
देखणेपण वेगळें निज आकळे शुभभानने ॥ तोषणी० ॥ २ ॥
वीकळा सकळी कळा तुजवांचुनी भुवनत्रयीं ॥
कोणिही नच ऐकिला सुख पावला समते भुई ॥
आस ही मज लागली निजध्यास हा सदसेवने ॥ तोषणी०॥३॥

या भवीं तुजवांचुनी मज कोण गे नच तारिती ॥
माय तूं तनुदायिनी निज ज्ञानिये तमहारिती ॥
हा अनंत जडाकृती दिनापरी हिन मानणें ॥
तोषणी भवहारिणी अघनाशनी मनकामने ॥ ४ ॥

## ॥ जगदंबिकास्तोत्र ॥

( विबुधाप्रिया० )

आसनीं सदवासनीं मनकामनी जगमोहिनी ॥
तोषणी भवपोषिणी मनबोधिनी गुणशोधनी ॥
ध्यान हें तव शोभलें वय बाल्य तें सकुमारिणी ॥
हा ऋणी तव पद्मिचा दिठिं पाहिगे सुखकारिणीं ॥ १ ॥
चाप तें करिं शोभतें शरधारिणी फणिपाश तो ॥
अंकुशीं मदनासखी कदनामधीं विर जाणतो ॥
पद्म तें तव आसनीं निजबोधनी भय हारिणी ॥ हा ऋणी० ॥ २ ॥
पूजिलें तुज निजरें सदवासनीं जगदंबिके ॥
अंबिके तुज कौतुकें पुजि मातृके दिनतोषके ॥
सत्यवासनिवासिनी तव पद्म तें समदेखणी ॥ हा ऋ० ॥ ३ ॥
कुंकुमाकृति संभवे शशिकोर ती चिरि रेखिलीं ॥
पूर्ण तें वदनांतरीं शशि षोडशीं रसिये तुळीं ॥
दृष्टिची निनपक्षिची चंलचचलें शुभ हारिणी ॥ हा ऋ० ॥ ४ ॥
नासिकीं शुकचंचुचें तिळपुष्पसें जणूं रेखिले ॥
हास्य अधरामृतें शुभ गाल ते बहु शोभले ॥
सिद्धि त्या निजदासिशा करिं चामरें तव ढाळणीं ॥ हा० ॥ ५ ॥
कंचुची सरि शोभली सर मौक्तिकें आणिमादिकें ॥
जोडिलीं बहु कौतुकें निळकोंदणीं पद शोभकें ॥
हीरवी दिठि संभवी कुच मंडळी निज मंडणीं ॥ हा० ॥ ६ ॥

कंचुकी पटाचिंचुकी वरि हार ते सद मालती ॥
सेवती बटमोगरी जुइजाइ ही सर शोभती ॥
अंबरीं नवरंग तो निजकेशरी रजकारिणी ॥ हा० ॥ ७ ॥
खोंविला पट तो कटीं निट वेष्टणी वरि तो पटा ॥
सूभटा सदघोंटणीं निज आटिलें सुगमा तटा ॥
नीगमीं रव मौक्तिकें विधि अष्टकें खणिं जोडणी ॥ हा० ॥ ८ ॥
चार ते चहुखणिचे कर केळिचे कवळेपणें ॥
त्वंपदे सदतत्पदें तुं असी पहें मुळ वाढणें ॥
दृश्यतें नच लक्षिते परपक्षिचें पदवासिनी ॥ हा० ॥ ९ ॥
जाणिता नच अर्चनें मम कर्ज दे तुजपासिलें ॥
ठेविसें निज पीतरें समचातुरें स्मरि माउले ॥
नाहिंसें जरि बोलसी उगिं फोल तें मज कारणीं ॥ हा० ॥१०॥
देखिलीं तव पाउलें मन मोहिलें अघ नासलें ॥
हें भलें मज व्याज गे निजठेवणींवरि दीधलें ॥
प्रेम तो सदहार गे नवकोंदणीं मुळठेवणीं ॥ हा० ॥ ११ ॥
खत घे सदभावनीं निजअक्षरें नित लीहिलें ॥
सज्जनें अनुभावनें मति जोडिलें घरआंतुलें ॥
दूरचा रसपूरिचा घन बोधिचा पयमेळणी ॥ हा० ॥ १२ ॥
पाठका तव ही टिका फळ इच्छि त्या भवि देई गे ॥
ठेविं गे कर मस्तकीं निज चाकरीं मज मोजि गे ॥
हा अनंत समाधिला अजिं घेतसे मनमोरणी ॥
हा ऋणी तव पद्मिचा दिठिं पाहिगे सुखकारिणी ॥ १३ ॥

## ॥ तुळजापुरनिवासीनीस्तोत्र ॥

( विबुधप्रिया० )

कालिके मम पालये भवहारिके निज माउले ॥
फार गे ह्रिर्ति नाडलों निज नाठवे तम मातले
पाहि मां मज अंबिके तुळजे तुके पिठमातृके ॥
त्राहि गे भवहारिणी सगुणाकृते शिवशोधके ॥ १ ॥
पूजिलें मम मानसें तव पाउलें जगनायके ॥
आइके अर्जि भाव तो तुज सांगतों मति बाळकें ॥ पाहि० ॥ २ ॥
अंबुजें कनकासनीं दळ अष्ट ही तव आसनीं ॥
साक्षिणी परभूवनीं सुददायिनी जगमोहिनी ॥ पाहि० ॥ ३ ॥
पाउलें सदचीद तीं बहु कोंवळीं दश अंगुलें ॥
शोभतीं कळिजोडणी सुनिळाकृती नभभांतुलें ॥ पाहि० ॥ ४ ॥
जोडवीरव संभवे ठणकारितो द्विविधाकृती ॥
तोडरावरि नूपुरें लघुघंटिका रुणझूणती ॥ पाहि मां० ॥ ५ ॥
पोंटऱ्यावरि त्या निऱ्या सद झोळिच्या बहु रूळती ॥
पींवळा पट तो कटीं वरि खोंविला अति नीगुतीं ॥ पाहि० ॥ ६ ॥
माणिकें जडिताकृती निगमावळीवरि तो पटा ॥
आंवळी कटि चीवळी हरि देखुनी मनिं तो विटा ॥ पाहि० ॥ ७ ॥
कंचुकी कुचमंडळीं नवरंगिची घट मीनली ॥
त्यावरी जुइ मालती बटमोगरीं सरि गोविली ॥ पाहि० ॥ ८ ॥
कोंदणें जडितें बरीं निळ पांचुची सरि पूतळ्या ॥
कंबुते बहु दाटणी सुरकामिनी बघुनी खुळ्या ॥ पाहि० ॥ ९ ॥
बाहु ते सरळाकृती बिंदपाटल्या हिरिकंकणें ॥
बाजुबंध हि वांकिया तुज बाहुटीं बहु शोभणें ॥ पाहि० ॥ १० ॥
आननीं अधरामृतीं चवि जाणता शिव साक्षिचा ॥
नागवल्या सुवल्य कर्पुर दिव्य तांबुळ मूखिचा ॥ पाहि० ॥ ११ ॥
दृष्टिची कनुवाळणी सुर अंगणीं तुज प्रार्थिती ॥
देहगोहिं विरक्त होउनि तूजलागिं समाचिंती ॥ पाहि० ॥ १२ ॥

कुंकुमागर कस्तुरी द्विदलावरि तुज रेंखिली ॥
देखुनी विधि माधवें ऋषि नारदें पदि पूजेली ॥ पाहि० ॥
कुंडलें कनकाकृती रविमंडळा सम दीप्तिचीं ॥
हालतीं नभमंडळीं सुरभाषणीं निगमोक्तिचीं ॥ पाहि० ॥ १४ ॥
कीरिटावरि मौक्तिकें अणिमादिकें घडि जोडिली ॥
देखुनी सनकादिकें सुमनें करीं बहु वोपिलीं ॥ पाहि० ॥ १५ ॥
पूजिलीं तुज लेंकरें मन आसनीं मतिरूप गे ॥
पाय दे कर संपुटीं निज सेवकां भुक हीच गे ॥ पाहि० ॥ १६ ॥
दीधला तम हा बळी मंदिरा रूपें स्थुल मोह हा ॥
गोंधळीच अनंत लाघवि मूळचा सवदा सुहा ॥ पाहि० ॥ १७ ॥

## ॥ महालक्ष्मीस्तोत्र ॥

सवाई

सद्चिद् पद्मिणि पद्मविलासिनि पद्मसुआननि पद्मकरे ॥
अरिजनमर्दिनि मंडित मेदिनि कामविनाशिनि चापशरे ॥
करवर दायिनि शीवविलासिनि जीवभवोद्भुत पालयते ॥
जयजय सांभावि सांबानिबोधवि शांत स्वभाविनि सुष्टकृते ॥ १ ॥
जगनग चंचल त्वंपद चंचळ चवल लोचन भव्य रूपे ॥
परसदनांतर वास निरंतर आजर आमर ज्ञानरुपे ॥
सुरललनाकृति आकृतिसंभव तेज रवीप्रभकांतिकृते ॥ जय० ॥ २ ॥
हरिहर किन्नर ब्रह्मसुरेंद्रहि मानसपूजनिं आभरले ॥
शुकसनकादिक नारद वैष्णव बद्धकरांबुजिं जोडियले ॥
सद्पद दायिनि गायनिं तोषसि माय तुं शोधनिं आत्मभूते ॥जय०३॥
सुतवितरागीत काम कुलोद्भट शास्त्रसुआनन मंडित हा ॥
अनुभवशोधक साध्वसुबोधक शोधक हा भव सत्य पहा ॥
जानें जननीवत हेत सुवांछित शांतिसुखास्पद सद्पद ते ॥जय०॥ ॥४॥

गुणगणनाथ जि चिद्पद्पालय हे भवआलय संभवला ॥
रुपरसमंडण सिद्धि सनातन रिद्धिसमागम सेवियला ॥
पतिगिरिवर्धन संग मनोरम भालसुलोचन ज्ञानमते ॥ जय० ॥ ५ ॥
जगनगतेजित विश्वकुटुंबिनि विश्ववराश्रय जाग्रति गे ॥
अमरुपदर्शक दृश्यविमोहन चेष्टित चित्तज शक्ति तुं गे ॥
समिर ख तेजस आप भुमंडित भूतकृतांतक सेव्यमते ॥ जय०॥ ६ ॥
अनुभुतसंभवि कुमनिरोद्धवी शांत सुचिन्मय संभवलें ॥
सुरललना निज निर्जरमार्जानें उन्मनि अंबुजिं सांठविलें ॥
तनमनतन्मय आसनिवासक पद्मपदांकित हे रचिते ॥ जय० ॥ ७ ॥
सुमनसुशोभित रंगतरंगित जंगभुजंगित आत्मगती
निजहित सज्जन द्वैतविमोचन पाणि करांबुज पाजविती ॥
मन अमनाकृत कारण हेंकृत निर्विघसंगम साध्यमते ॥ जय० ॥ ८ ॥
धनसुतवर्धन भाविक आश्रय काम्यकिं दोहत धेनुरुपें ॥
कामि नच इच्छित निश्चयसाधनिं सत्यपर्ण करि पूर्ण रुपें ॥
पदिं अनुमोदन हेत अनंताचि नंदनवंदनिं सोडि न ते ॥
जयजय सामवि सांबनिबोधवि शांतस्वभावनि सुष्टकृते ॥ ९ ॥

---

REFBK-0003693

REFBK-0003693

भाग २ रा समाप्त.

## धार्मिक ग्रंथ गोष्टीच्या रूपानें.

**कथाकल्पतरू**—( पूर्वार्ध-स्तवक १ ते ७ ) अध्याय १२६ गोष्टी-रूप भाषांतर. पुस्तकाचा आकार. ग्लेज कागद व कापडी पुठ्याची बांधणी. यांत भागवत, रामायण व १८ पुराणांतील पांचशांवर सुंदर कथा आल्या आहेत. सवलतीची किंमत रु. ४-०-०

**कथाकल्पतरू**—( उत्तरार्ध स्तवक ८ ते १४ ) अध्याय १२६ गोष्टीरूप भाषांतर, पुस्तकाचा आकार, ग्लेज कागद व कापडी पुठ्याची बांधणी. या भागांत संपूर्ण महाभारत, भगवद्गीता, विदूरनीति, भीष्मनीति, गीतामाहात्म्य व पांडवांविषयीं इतर पुराणांतरीच्या कथा आणि विस्तृत उपसंहार आहे. किंमत रु. ४-०-०

**बृहद्योगवासिष्ठ**—अर्थात्—**वसिष्ठ महारामायण.**

( श्री वाल्मिकीमुनिप्रणीत ३२ हजार श्लोकात्मक ग्रंथांचें मराठी गोष्टीरूप रूपांतर ) या ग्रंथांत श्रीवसिष्ठमुनि वक्ते व श्रीराम श्रोता, असा योग आणून अध्यात्म ज्ञानाचें विवेचन केलें आहे. हा ग्रंथ चार भागांत पूर्ण केला असून तो दोन व्हाल्यूममध्यें बांधला आहे, व शेवटीं दोन परिशिष्टें जोडलीं आहेत. दोनही व्हाल्यूम मिळून सवलतीची किंमत ... ... रु. ८-०-०

**गणेशपुराण**—या पुराणांत उपासनाखंड व क्रीडाखंड अशीं दोन मुख्य खंडें असून अध्याय २४८ आहेत. त्याचें गोष्टीरूप हें सुलभ रूपांतर आहे. ... ... ... किंमत १-०-०

**पद्मपुराण**—हा ग्रंथ ५५ हजार श्लोकात्मक असून त्यांत सृष्टीची उत्पत्ति, रचना, घटना, इत्यादि माहिती व अनेक उपयुक्त अशा कथा आहेत. हा संपूर्ण ग्रंथ सरळ गोष्टीच्यारूपानें दोन भागांत पूर्ण केला आहे. शेवटीं विस्तृत सूची आहे. दोन भाग. किंमत ३-०-०

**स्कंदपुराण**—या पुराणांत ७ खंडे असून १८३० अध्याय आहेत आणि त्यांत सर्व तीर्थांची उत्पत्ति, महती व देवस्थानांचें महत्त्व सांगितलें आहे. हा ग्रंथ गोष्टीरूपांत रूपांतर करून तो चार भागांत पूर्ण केला आहे. चार भाग मिळून ... ... किं. ४-०-०

**रंगनाथी योगवासिष्ठ***—ओवीबद्ध प्राकृत ग्रंथ पुस्तकाचे आकारांत रफ कागदावर सन१९०८मध्यें छापलेला जुना आहे. १-०-०

**भक्तलीलामृत**—हा महीपतीकृत ओवीबद्ध ग्रंथ जाड टाईपांत पुस्तकाचे आकारांत रफ कागदावर छापलेला आहे. किं. रु. २-८-०

**संतविजयः**—हा महिपती कृत ओविबद्ध ग्रंथ जाड टाईपांत रफ कागदावर छापला असून आरंभीं छत्रपति शिवाजी महाराजांसह श्रीसमर्थांचें सुंदर चित्र दिलें आहे. ... किंमत १-८-०

## वेदांत विषयाचे ग्रंथ.

**तत्वानुसंधान**—माधवानंद स्वामीकृत संस्कृत ग्रंथाचें मराठी रूपांतर. प्रमेयसिद्धि, प्रमाणसिद्धि, अप्रमेयाचें निरूपण व मुक्ति इत्यादि विषयांचें विवेचन यांत आहे. ... किं. रु. १-०-०

**सांख्यतत्वकौमुदी**- कपिलमुनिप्रणीत सांख्यशास्त्राचें हें मराठी रूपांतर गोड सुलभ भाषेत दिलें आहे. ... किं. ०-१२-०

**जीवन्मुक्तिविवेक**—श्री विद्यारण्य स्वामीप्रणीत निवृत्ति धर्मपर ग्रंथाचें हें मराठी रूपांतर आहे. ... ... किं. ०-१२-०

**पंचदशी**-(उत्तरार्ध) भारततीर्थ कृत (अन्वय अर्थ विवरण यांसह) १ तृप्तिदीपः, २ कूटस्थदीपः, ३ ध्यानदीपः, ४ नाटकदीपः, ५ योगानंदः, ६ आत्मानंदः ७ अद्वैतानंदः, ८ विद्यानंदः व ९ विषयानंद, अशा नऊ प्रकरणांचें अन्वय अर्थासह विवरण. १-८-०

**हरिमिडे स्तोत्र**—आचार्य कृत वेदांताचें विवेचन.... किं. ०-४-०

**आत्मविचार**—श्री परमहंस परिव्राजक स्वामी सच्चिदानंद सरस्वती कृत—ब्रह्म, माया, आत्मा या संबंधानें सोपपत्तिक विवेचन किं. १-८-०

**मार्किस ओरेलियस बादशहांचीं बोधवचनें**— (ले. कृं. अ. केळुसकर) ... ... किं. रु. १-०-०

**मनोविलास**—(ले. ब. ज.) यांत वेदान्तपर विवेचन आहे. ,, १-०-०

**विधवोद्वाहविवेक**—(संस्कृत) ग्रंथ फार जुना आहे. किं. रु. १-०-०